२२१८ निबंध

REFBK-0018414

२००९ / १४/३/६३
२२९८

... खेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे

१२०१४

कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर । तया नमस्कार वारंवार ॥
न पाहे यातिकुळाचा विचार । भक्त करुणाकर ज्ञानाबाई ॥

# ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन

REFBK-0018414

डॉ. प्र. न. जोशी

'प्रसाद' रौप्यमहोत्सवी प्रकाशन

प्रकाशक :
मनोहर य. जोशी B. A., B. Com.
प्रसाद प्रकाशन
१८९२ सदाशिव, पुणे ३०.

●

रौप्यमहोत्सवी प्रकाशन १९७२

●

© डॉ. प्र. न. जोशी
' रेणुका ' नवी पेठ, पुणे ३०.

●

किंमत ७ रुपये

●

मुद्रक :
पां. ल. गोगावले
श्रीगणेश मुद्रणालय,
३५७ शनिवार पेठ पुणे ३०.

## *मनोगत*

श्रीज्ञानेश्वरांचे चरित्र व वाङ्मय यांचा ठसा माझ्या मनावर खोलवर उमटला आहे. जावळी तालुक्यामधील एका आडवळणी गावी लहानपणी घरातच ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्या वचनांचा वर्षाव माझ्या कानांवर नित्य होत राही. तीर्थरूप शास्त्रीपरंपरेतील असलें तरी घरी नित्य वारकरीपद्धतीची कथाकीर्तने होत, प्रवचने होत, भजने होत. मराठी संतांची वाणी बालपणी सहज कानांवर आली आणि भक्तिप्रेमाचे बीज सहजच चित्तभूमीवर रुजले. पुढे प्रौढ विद्यार्थिदशेत संतांची चरित्रे आणि वाङमय यांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रसंग आल्यान या विषयाची गोडी वाढली आणि चिंतनमननाचा तो एक विरंगुळा झाला.

मराठी संतपरंपरेतील श्रीज्ञानश्वर हे एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ व कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. गीतेवर मराठी भाषेत भावार्थ सांगून आबालवृद्धांना व सर्व जातिजमातींना त्यांनी पारमार्थिक ज्ञान उपलब्ध करून दिले. ब्रह्म-विद्येचा सुकाळ या महाराष्ट्रात त्यांनी केला. नामदेवरायांच्या सहवासाने

नामसंकीर्तनाचा सोपा व खात्रीचा मार्ग त्यांनी सर्वांसाठी उपलब्ध केला आणि वैष्णवांची मांदियाळी जमविली. या त्यांच्या मांदियाळीत गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, दासी जनी, चोखा महार असे अठरापगड जातींचे सत्पुरुष दाखल झाले आणि ज्ञानोत्तर भक्तीच्या मार्गाने वाटचाल करू लागले. पुढे एकनाथ, तुकाराम यांनी याच पायवाटेस झाडून पुसून तिचा हमरस्ता बनविला. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी नावाचा एक अलौकिक ग्रंथ लिहून भागवत धर्मास अथवा मराठी वारकरी पंथास तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

अशा या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या जीवनदर्शनावर हे एक लहानसे पुस्तक संतप्रेमी वाचकांच्या हाती देत आहे. ज्ञानेश्वर द्वैती की अद्वैती, सगुणोपासक की निर्गुणोपासक, ते विवर्तवादी की परिणामवादी की अजातवादी, त्यांनी कोणत्या आचार्यांचे अनुकरण केले, यांसारखे प्रश्न महत्त्वाचे असले तरी मी त्यांकडे येथे लक्ष न देता ज्ञानेश्वरांच्या जीवनातील आदर्शांकडे पाहाण्याचे ठरविले. सर्वसामान्य जीवासाठी ज्ञानेश्वर कोणता मार्ग दाखवितात ? श्रीगुरुबद्दल त्यांची भावना कोणती होती ? नामसंकीर्तनाचा मार्ग त्यांनी का सांगितला ? त्यांनी सांगितलेल्या दैवी संपत्तीचे स्वरूप कोणते ? केवळ धनदौलत व सत्ता यांच्या लोभाने मनुष्य आसुरी प्रवृत्तीचा कसा बनतो ? इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह करून मी या पुस्तकात ज्ञानेश्वरांच्या जीवनदर्शनासंबंधी त्यांच्याच शब्दांच्या आधारे काही विवेचन केले आहे. आजच्या या धकाधकीच्या व गुंतागुंतीच्या काळातही ज्ञानेश्वरांनी सांगितलेले मानवी जीवनाचे हे आदर्श फार उपयुक्त होतील असे मला वाटते.

पुणे येथील ‘ प्रसाद ’ प्रकाशनचे चालक श्री. मनोहरपंत जोशी यांनी रौप्यमहोत्सवी योजनेत या पुस्तकाच्या प्रकाशनास अवसर दिला यासाठी त्यांचे कौतुक करायला हवे. ज्ञानेश्वरांच्या जीवनदर्शनामुळे वाचकांना काही लाभ झाला अथवा काही संतोष झाला तर मला समाधान आहे.

‘ रेणुका ’ नवी पेठ, — प्र. न. जोशी

पुणे ३०

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १ ज्ञानेश्वरांची 'किमया' | १ |
| २ नमो चित्सूर्य निवृत्तिनाथ | २५ |
| ३ 'श्रीगुरूचें दार.... सर्वस्वाचें सार' | ३६ |
| ४ 'नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।' | ४७ |
| ५ 'हा लोकु कर्मे बांधिला' | ५८ |
| ६ ही गुणकुसुमांची माळ । | ६७ |
| ७ 'भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव' | ७९ |
| ८ 'जयाचेनि आचारें जगा दुःख' | ९५ |
| ९ 'आनंदु रे आजी आनंदु' | १०५ |
| १० श्रीज्ञानेश्वरांचा पुरुषश्रेष्ठ | ११७ |
| ११ नम्रत्व आणि प्रियत्व | १२६ |
| १२ ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन | १५३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलक्रम
अनुक्रम ८००८९ वि: निबंध.
क्रमांक २२५८ नों दि १२/३/७६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८६९४

## ज्ञानेश्वरांची ' किमया '

### एकनाथांची ज्ञानेश्वरीशुद्धी

शके १५०६ मध्ये म्हणजे ज्ञानेश्वरीच्या निर्मितीनंतर दोनशे चौऱ्याण्णव वर्षांनी एकनाथांनी ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करून लोकांच्या हाती दिली. या दोनतीनशे वर्षांत महाराष्ट्रावर इस्लामी अंमलाचा प्रभाव वाढला होता. हिंदू धर्म, संस्कृती, देवधर्म यांच्या वाताहतीबरोबरच ज्ञानेश्वरीसारखा पवित्र व प्रेरक ग्रंथही मागे पडला होता. या वेळी ज्ञानेश्वरांनीच एकनाथांना प्रेरणा दिली आणि भागवत धर्माचा पुनरुद्धार करण्याचे सुचविले. याच प्रेरणेतून एकनाथी भागवताच्या रूपाने भागवत धर्माच्या इमारतीस एक भक्कम असा खांब मिळाला. याच प्रेरणेतून एकनाथांनी ज्ञानेश्वरीची शुद्धी केली. ' ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध । ' झालेला असल्यामुळे एकनाथांनी या थोर ग्रंथाचे शुद्धीकरण केले. हे शुद्धीकरण होत असताना एकनाथांनी शब्दांची रूपे कशी व किती बदलली, ओव्या कोणत्या कमीजास्त केल्या

यांसंबंधी अंदाज लागत नाही. ज्ञानेश्वरांच्या काळातील ज्ञानेश्वरीची प्रत उपलब्ध नसल्यामुळे एकनाथोत्तर ज्ञानेश्वरीवरच भागवावे लागते. राजवाडे यांची ज्ञानेश्वरी एकनाथपूर्व असली तरी तिचा पुरावा नष्ट झालेला आहे. अशा परिस्थितीत ज्ञानेश्वरीच्या अठरा अध्यायांतील ओव्यांची संख्या ८९०० पासून ९०६० पर्यंत सांगितली जाते.

**नाथपरंपरेतील किमया**

ओव्यांच्या संख्याभेदाचे एक कारण असे सांगितले जाते की, एकनाथांनी मूळ ज्ञानेश्वरीतील काही थोड्या ग्राम्य वा अश्लील ओव्या कमी केल्या असाव्यात. एखादी अतिशय दुर्बोध ओवीही कमी झाली असावी. ‘ किमये ’-संबंधीच्या ओव्या एकनाथांनी कमी केल्या असाव्यात असा एक तर्क आहे. ज्ञानेश्वरांनी ‘ किमये ’ चे शास्त्र गूढ भाषेत ज्ञानेश्वरीत सूचित केले, पण एकनाथांनी त्या ओव्या काढून टाकल्या म्हणून काहीजण त्यांच्यावर आजही रुष्ट आहेत. ज्ञानेश्वर हे योगपरंपरेतील.आदिनाथ–मत्स्येन्द्रनाथ–गोरखनाथ–गहिनीनाथ–निवृत्तिनाथ ही त्यांची परंपरा. या परंपरेत उत्तर काळात किमयेला महत्त्व होते. हीन धातूंवर नाना प्रकारचे रासायनिक संस्कार करून त्यांचे सुवर्ण करण्याच्या नादात नाना प्रकारचे योगी पुरुषही होते. दीर्घ-कालीन तारुण्य मिळावे, आरोग्यकांती वाढावी म्हणूनही ‘ किमया ’ वाढत असावी. ज्ञानेश्वर याच योगमार्गातील नाथपंथी असल्यामुळे त्यांना या किम-येचे वा नाना प्रकारच्या सिद्धींचे रहस्य माहीत असावे अशी आपली कल्पना.

**लोह-परिसाचे दृष्टान्त**

आजही ज्ञानेश्वरीतील लोह-परिसाच्या दृष्टान्ताच्या ओव्या काहीजण बारकाईने पाहून ‘ कियये ’ चा धागा तपासून पाहतात. ‘ लोहाचे कनक होयें । हें सामर्थ्य परिसींच आहे, ’ लोहाचें कनक जहालें । हें एकें परिसें केलें ’, ‘ लोहाचें सांकडें परिसा, ’ ‘ लोहा परिसाची घृष्टी ’ ‘ काइ परिसाची कसवटी, ’ ‘ लोह उभे खाय माती । तें परिसाचिये संगतीं । सोनें जालया पुढती न शिविजे मळें ’ (ज्ञाने० १८ : १४०८ ) ‘ सोनेयां लोहाचा परिसु पाडु न म्हणे ’ इत्यादी विविध संदर्भांवरून ज्ञानेश्वरांना वास्तवसृष्टीतले लोहपरि-साचे नाते माहीत असावे असा काहींचा तर्क आहे. मला मात्र ज्ञानेश्वरांचे हे

लोह-परिसासारखे शब्द केवळ दृष्टान्तासाठी आले आहेत असे वाटते. लोखंडापासून परिसाच्या स्पर्शाने सुवर्ण मिळविण्याची किमया ज्ञानेश्वरांना माहीत होती की नाही हे मला माहीत नाही. परंतु परतत्त्वरूपी परिसाचा स्पर्श जीवरूपी लोहाला करून साऱ्या जीविताचेच सुवर्ण करण्याची किमया मात्र त्यांना अवगत होती. खंडीभर सोने जवळ असले तरी तळमळणारी माणसे आपण पाहतोच; पण गुंजभर सुवर्ण गाठी नसले तरी स्वर्गातील देवादिकांनाही हेवा वाटेल असे आत्मसुख भोगणाऱ्या जीवाच्या गळयात खंडीभर सोन्याच्या लगडीच आहेत असे मानावयास हवे. याच दृष्टि-कोणातून ' अगा फोडावयालागीं । लोहो मिळो कां परिसाचे आंगीं कां जे मिळतिये प्रसंगीं । सोनेचि होईल' (९.४६४) या ओवीचा अर्थ लावावयास हवा. ईश्वराच्या कृपेचा परीस जीवास लागला की त्याचे सोने होऊन जाते असाच भावार्थ ज्ञानेश्वरांच्या या ओवीचा आहे.

**ज्ञानेश्वरांचा सर्वांत मोठा चमत्कार**

हीन धातूंचे सोने करण्याची किमया करावी, काही तंत्रमंत्राचे प्रयोग करावेत, जारणमारणादी विधी वाढवावेत, जादूटोणा, अंगारेधुपारे, छाछूवाल्या सिद्धी आणि लोकांना भुलविणारे चमत्कार यांत गुरफटलेला समाज खरे म्हणजे ज्ञानेश्वरांना बाहेर काढायचा होता. ज्ञानेश्वरांनी स्वतः रेड्यामुखी वेद वदविला, प्रेत उठविले, भिंत चालविली. ज्ञानेश्वरांच्या अंगी हे सामर्थ्य असेलही, पण त्यासाठी ज्ञानेश्वर मोठे आहेत असे नाही. जड-जीवांचा आजही उद्धार करणारा, आजही लक्षावधी लोकांना ' माउली '-प्रमाणे वाटणारा ग्रंथ ' भावार्थदीपिका ' अथवा ' ज्ञानेश्वरी ' या नावाचा त्यांनी निर्माण केला; हा केवढा चमत्कार आहे ! ज्ञानेश्वरांनी हा ग्रंथ कोणत्या वयात लिहिला ? तर अवघ्या पंधराव्या-सोळाव्या वर्षी, ' तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें '-(ज्ञाने. ६ : ४५३) ' प्रौढ दशा येण्यापूर्वीच आणि पक्व वयाची अपेक्षा न धरताच त्याच्या अंगी बालपणीच सर्वज्ञता येते ' हे त्यानी केलेले वर्णन त्यांना स्वतःलाच उत्तम रीतीने लागू पडते. अशा लहान वयात तत्त्वज्ञानाचा, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग यांची सांगड घालणारा, नीति-धर्मांचे आचरण सांगणारा, त्रस्त जीवांना संतोषित करणारा, मानवी

जीविताचे अंतिम ध्येय आबालवृद्धांना सुलभ करून देणारा ग्रंथ त्यांनी लिहिला हाच त्यांच्या आयुष्यातील मोठा चमत्कार! हीच ती त्यांची लक्षणीय किमया आहे.

**आत्मज्ञान सर्वांना खुले**

ज्ञानेश्वरांच्या या चमत्काराचे वा किमयेचे विवेचन विविध अंगांनी करता येण्यासारखे आहे. सर्वांत महत्त्वाची बाब अशी की, ज्ञानेश्वरांनी हे अध्यात्माचे भांडार सर्वांना, आबालवृद्धांना, स्त्रीशूद्रादिकांना खुले केले. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीचे पारमार्थिक ज्ञान संस्कृत भाषेत असल्यामुळे फार थोड्या लोकांना त्याचा आस्वाद घेता येत असे. सर्वोत्तम अशा सुखाचे वाटेकरी मोजके होते. उंच स्थानी विराजमान झालेले हे आत्मज्ञान गोर-गरिबांच्या व शूद्रांच्या झोपडीपर्यंत नेऊन पोचते करण्याची थोर कामगिरी ज्ञानेश्वरांनी केली. ज्या अनेक कारणांसाठी ज्ञानेश्वरांचा छळ झाला त्यांतील एक कारण म्हणजे त्यांनी आत्मज्ञानाची पाणपोई सर्वांसाठी घातली; हे समकालीन शास्त्रीपंडितांना मानवले नाही. सर्व थरांवरील सर्व लोकांना आत्मज्ञान समजावे असा अट्टाहास त्यांचा नव्हता; पण ज्याला कोणाला या ज्ञानाची भूक आहे त्याला जातिधर्माची आडकाठी येऊ नये असे मात्र त्यांना वाटे. 'या महाराष्ट्र भूमंडळीं 'ब्रह्मविद्येचा सुकाळू' होणार आणि सर्वांसाठी 'आनंदाचें आवारु' घातले जाणार हे खरे असले तरी ज्ञानेश्वरांनी पूर्वपरंपरागत रूढी शिथिल केल्या हेही खरेच. वर्णव्यवस्था मोडावी, जातिभेद मुळासकट नष्ट करावेत, त्यासाठी चळवळ करावी असे त्यांचे जीवितध्येय नव्हते. पण वर्णव्यवस्था वा जातिभेद ईश्वरप्राप्तीच्या आड आले तर ते मानू नयेत, असा मात्र त्यांचा कटाक्ष होता. ईश्वराच्या दारात जातिभेदांना स्थान नाही ही त्यांची घोषणा काही कमी क्रांतिकारक नव्हती.

**'खळांची व्यंकटी सांडो'**

सर्व समाजाची कणव हा ज्ञानेश्वरांच्या जीवनदर्शनामधील एक स्थायीभाव आहे. या उदार दृष्टीची प्रचीती त्यांच्या पसायदानात आजही येण्यासारखी आहे. या सर्वश्रेष्ठ पसायदानात ज्ञानेश्वरांनी कोणती इच्छा प्रकट केली आहे? पुत्र इच्छिणाऱ्यांना पुत्र व्हावेत, धन इच्छिणाऱ्यांना धनसंपत्ती

मिळावी, दीर्घायुष्य इच्छिणाऱ्यांना दीर्घायुष्य मिळावे – अशी ही फलश्रुती लौकिक दृष्टीची नाही. परिसाचा शोध घ्यावा, किमया करून हीन धातूंचे सोने करावे ही वांच्छा त्यांच्या मनात असणेच शक्य नाही. त्यांची जीवितविषयक दृष्टी फार थोर व उदार होती. ' जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥ दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जें वांछील तो ते लाहो । प्राणिजात ' (ज्ञाने० १८ : १७९४-९५)– सर्व दुष्ट लोकांची नजर सरळ होवो, त्यांच्या अंतःकरणात सत्कृत्यांबद्दलचे प्रेम वाढो, आणि सर्व भूतमात्रांत परस्परांबद्दल जीवाभावाचे प्रेम वाटून मैत्री वाढो. पापकृत्यांचा अंधार नष्ट होवो, आत्मज्ञानाच्या प्रकाशाने सारे विश्व उजळून निघो; जो प्राणी जे इच्छील ते त्यास मिळो; एवढी उदात्त इच्छा मानवजातीच्या इतिहासात कोणी धरली होती काय ?

**वाक्चातुर्याने लोक सुखी**

ईश्वरनिष्ठांच्या समुदायाची भेट या भूतलावर सर्वांना व्हावी ही त्यांची मनीषा आहे. लहान-मोठा, स्त्रीपुरुष, उंचनीच, गरीब-श्रीमंत हा भेद त्यांना परमार्थाच्या क्षेत्रात मान्य नव्हता. आपला ग्रंथ कोणासाठी आहे हे सांगताना ते म्हणतात, ' तेणें आबालसुबोधें । वोवियेचेनि प्रबंधें । ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंथिलीं ' (ज्ञाने. १८ : १७४२) ' या ओव्यांच्या रचनेत लहान मुलापासून सर्वांना समजतील अशी ब्रह्मरसाने सुगंधित झालेली अक्षरे मी ओविली आहेत ' अशी त्यांची नम्रतेची पण आत्मप्रचीतीची भूमिका आहे. या ग्रंथाचा कसून अभ्यास न करिता श्रद्धेने व सावधतेने नुसता ऐकला तरी काम भागण्यासारखे आहे. ' तैसा प्रबंधु हा श्रवणीं । लगतखेवों समाधि आणी । ऐकिलियाही वाखाणी । काय व्यसन न लावी ? ' (१८ : १७४४) हा ओवीप्रबंध कानांवर पडताक्षणीच ऐकणारांची समाधी लावतो, याच्या नुसत्या श्रवणानेही आत्मानंदाचा शेलका अनुभव कोणालाही येईल. चकोर आपल्या शक्तीने चंद्रामृत पितात म्हणून काय इतरांना चांदणे लाभू नयेच की काय ? असा प्रश्न विचारून ज्ञानेश्वर महाराज सांगतात, ' तैसे अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये । परी लोकु वाक्चातुर्यें । होईल सुखिया ' (१८ :

१७४९)–या ग्रंथाच्या परिशीलनामुळे अधिकारी माणसांना आत्मज्ञानाचे रहस्य ध्यानात येईलच, पण नुसत्या वाक्चातुर्यानेही लोक सुखी होतील.

**' मग आर्तांचेनि वोरसें '**

आपला हा ग्रंथ सर्व लोकांसाठी आहे, आबालवृद्धांसाठी आहे, कष्टी आणि दुःखी जीवांसाठी आहे याची जाणीव ज्ञानेश्वरांना पदोपदी आहे. ' मग आर्तांचेनि वोरसें। गीतार्थग्रंथनमिसें। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु ' (१८ : १७६१)–दुःखितांविषयी पान्हा येऊन गीतार्थ गुंफण्याच्या निमित्ताने जो शांत रसाचा वर्षाव झाला तो हा ग्रंथ असे त्यांनीच म्हटले आहे. आर्त, पीडित, कष्टी, वंचित यांच्यासाठी हा ग्रंथ असल्याने त्यातील विषय सुलभ असावा हे ओघानेच आले. नानाप्रकारचे दृष्टान्त देऊन ज्ञानेश्वर प्रतिपाद्य विषय सुगम, सरस व आकर्षक बनवतात. ' बोलीं अरूपाचें रूप दावीन। अतीन्द्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवी ' अशी त्यांची प्रतिज्ञा आहे, आणि हे सोपेपण बहुजनांसाठी आहे, आबालवृद्धांसाठी आहे, स्त्रीशूद्रादिकांसाठी आहे; इतकेच काय पण पश्चात्ताप पूर्णपणे ज्यांना झाला आहे अशा दुराचारी लोकांना सुद्धा या ठिकाणी पावन होण्यासाठी संधी आहे. ' यालागीं दुष्कृति जऱ्ही जाहला। तरि अनुतापतीर्थीं न्हाला। न्हाऊनि मज आंतु आला। सर्वभावें॥ तरि आतां पवित्र तयाचेंचि कुळ। आभिजात्य तेंचि निर्मळ। जन्मलेयाचें फळ। तयासीसत्र जोडलें (९ : ४२०–२१)–एखादा पुरुष दुराचारी असला, पण पश्चात्तापाच्या तीर्थात सुस्नात होऊन सर्व जीवभावे परमेश्वरास अनुसरला तर त्याचे कुळ पवित्र होऊन जाते. त्याने विद्या, तप, अष्टांगयोग यांची प्राप्ती केल्यासारखे होते.

**' जाति व्यक्ति पडे बिंदुलें '**

जातीपेक्षा, कुळापेक्षा भक्तितत्त्वाला महत्त्व ज्ञानेश्वर देतात. ' अगा कुळाचिया चोखटपणा न लगा। आभिजात्य झणें श्लाघा। व्युत्पत्तीचा वाउगा। सोसु कां वाहावा ? (९ : ४३१)–वंशाच्या शुद्धपणाचे महत्त्व गाऊ नका. कुलीनत्वाचे देव्हारे माजवू नका, आणि ज्ञानाचा सोस तरी वृथा हवा कशाला ? ' एक भाव नाहीं माझा। तरी पाल्हाळ तें ' असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. ' स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि ' या श्लोकार्धावर भाष्य

करतानाही ज्ञानेश्वरांनी अशीच उदार व पुरोगामी दृष्टी ठेवून निर्वाळा दिला आहे की, ' म्हणोनि कुळ जाति वर्ण । हे आघवेंचि गा अकारण । एथ अर्जुना माझेनि पण । सार्थक एक ।। तेंचि भलतेणें भावें । मन मज आंतु येतें होआवें । आले तरी आघवें । मागील वावो ।। जैसे तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवती गंगाजळ । मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ।। कां खैर चंदन काष्ठें । हे विवंचना तंवचि घटे । जंव न घापती एकवटे । अग्नीमाजीं ।। तैसें क्षत्री, वैश्य, स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ।। मग जाति व्यक्ति पडे बिंदुलें । जेव्हा भावें होती मज मीनले । जैसे लवणकण घातले । सागरामाजीं ' (९ : ४५६–६१) – म्हणून कुल, जाती, वर्ण ही सर्व बंडे व्यर्थ आहेत. माझ्या खऱ्या भक्तीतच सर्व काही आहे. मग तो भक्तिभाव कोणत्याही प्रकारचा असो. एकदा या भावाने भरलेले मन माझ्यात प्रविष्ट झाले की पूर्वचरित्र पुसल्यासारखे होते. गंगाजळात मिसळले नाहीत तोपर्यंत नाले, ओढे, नद्या असा फरक होणार. पण गंगाजळात मिसळले की गंगारूपच होणार. अग्नीत पडल्यावर चंदन, खैर अशी वर्गवारी उरते कोठे ? त्याचप्रमाणे माझ्याशी समरस झाल्यानंतर क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अंत्यज अशा जाती उरणार कशा ? समुद्रात टाकलेले मिठाचे दाणे जसे जलमय होऊन जातात, त्याप्रमाणेच सर्व जीव माझ्याकडे आले की ममत्वाला पावतात. ज्ञानेश्वरांची ही घोषणा समकालीन जगात किमयेपेक्षा प्रभाव गाजविणारी नाही काय ?

**' गीतार्थ मऱ्हाठिया केला '**

पारमार्थिक ज्ञान सर्वांसाठी सुलभ करण्याचे ठरले की आणखी एक बाब ओघानेच येते. हे पारमार्थिक वा आध्यात्मिक ज्ञान ज्यांच्यासाठी सोपे झाले त्यांच्या भाषेचे माध्यम पत्करणे भाग पडते. स्वभाषेतून अथवा मातृभाषेतून सांगितलेला विचार स्वाभाविकपणे चटकन आकलन होतो. त्याचे आवाहनही सार्वत्रिक असते. म्हणून ज्ञानेश्वरांनी देशी भाषेचा पुरस्कार केला. संस्कृत भाषेतील ज्ञान देशी भाषेत येते याचेही वैषम्य कांही पंडितांना वाटलेच. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादींचा छळ केवळ याच कारणासाठी झालेला दिसतो. पारमार्थिक ज्ञान, आणि ते प्राकृत भाषेत ? या विचाराचीही

थट्टा झाल्यामुळे मराठी संतांना मराठी भाषेची बाजू समर्थपणे वारंवार मांडावी लागली. ' माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें। परी अमृतातेंहि पैंजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन '(६ : १४) या ओवीतून हाच अभिमान प्रकट झालेला दिसतो. ' देशी आणि संस्कृतवाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं ' असल्याची खात्री ज्ञानेश्वर देतात. ' कृष्णार्जुन संवादु । नागरी बोलीं विशदु ' असल्याचे ते जाणीवपूर्वक सांगतात. 'तीरें संस्कृताचीं गहनें' मोडून ज्ञानेश्वरांनी देशी भाषेत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून दाखविला ही किमया काही लहान नव्हे. ' याकारणें मियां । गीतार्थु मऱ्हाठियां । केला लोकांलागिया । दिठींचा विखो ' अशी त्यांची कबुली आहे.

## ' गीता वाङ्मयी मूर्ति श्रीप्रभूची '

ज्ञानेश्वरांनी मराठीसारख्या प्राकृत अथवा देशी भाषेचे म्हणजेच जनसामान्यांच्या भाषेचे माध्यम पत्करून गीतेचा भावार्थ लोकांना काव्याच्या स्वरूपात सांगितला. त्यांनी गीताच का निवडली ? सर्व उपनिषदांचे व आत्मविद्येचे सार गीतेत आहे. शंकराचार्यादी आचार्यांनी गीतेवरच आपली विख्यात भाष्ये संस्कृतातून लिहिली. ' बाप बाप ग्रंथ गीता। जो वेदीं प्रतिपाद्य देवता। तो श्रीकृष्ण वक्ता। जिये ग्रंथीं '(११ : २६ ) अशी महती गीतेची आहे. ' हे गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचें मथित । आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ' अशी त्यांची सद्भावना आहे. 'म्हणौनि वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्रीगीता । श्रीकृष्णें पांडुसुता । उपदेशिली ।। परी वत्साचेनि वोरसें । दुभतें होय घराउद्देशें । जालें पांडवाचेनि मिषें । जगदुद्धरण ।। ' (१८ : १४६६–६७)याप्रमाणे अर्जुनाच्या निमित्ताने साऱ्या जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य गीतेत आहे. प्रत्यक्ष भगवंताच्या मुखातून गीतामृत प्रकटलेले असल्याने ज्ञानेश्वर म्हणतात, ' गीता जाण हे वाङ्मयी । मूर्ति श्रीप्रभूची । '

## कर्मकांडातून प्रेमभावाकडे

गीतेच्या आधाराने ज्ञानेश्वरांना शुद्ध व सात्त्विक आचरणांवर उभा राहिलेला प्रेमाचा धर्म लोकांसाठी सांगायचा होता.त्यांच्या काळी यज्ञयागादी कर्मकांड वाढलेले होते. जपजाप्य, व्रतवैकल्ये, सोवळेओवळे, नवससायास

इत्यादी निर्जीव क्रियाकर्मांत धर्मविचार गुरफटलेला होता, योगधारणेचा अतिरेक होऊन त्यातून मंत्रतंत्र, जडीबुटी, जादूटोणा, सिद्धींचे चमत्कार यांचाच फैलाव होत होता, शुद्ध आणि निखळ प्रेमाची जाणीव कोणासच नव्हती. संस्कृत भाषा जाणणारा पंडितवर्ग घटपटादी खटपटीत शुष्क वेदान्तचर्चा करून इतरांना दूर लोटीत होता, आणि बहुजनांचे लक्ष क्षुद्र देवदैवतांवर व हीन आचारविचारांवर केंद्रित झाले होते. शुद्ध व पवित्र अंतःकरणाचा उदार धर्म सांगणारी कोणी तरी प्रभावी व्यक्ती हवी होती. सुदैवाने तेराव्या शतकाच्या अखेरीस ज्ञानेश्वरांसारखा तत्त्वज्ञ कवी व साक्षात्कारी सत्पुरुष या कामासाठी पुढे आला. ते स्वतः योगमार्गातले असून त्यांनी जनसामान्यासाठी सहज व सुलभ असा नामसंकीर्तनावर आधारलेला प्रेममय भक्तिमार्ग पुनः प्रचलित केला. सगुण व निर्गुणाची योग्य ती सांगड घालून त्यांनी वाद मिटविले व भागवत धर्माचे संघटन करण्याचा उद्योग आरंभिला. या कामी त्यांना नामदेवरायांचे फार मोठे साह्य झाले.

**‘ शरणागता शरण्य मीचि एकु ’**

कर्मयोग, ज्ञानयोग यांची भक्तियोगाशी त्यांनी सांगड घालून नामसंकीर्तनाचा पुरस्कार केला. हा पुरस्कार करताना त्यांचे लक्ष परमात्म्याच्या अनुसंधानाकडे होते. एका परमेश्वराशिवाय इतर फापटपसारा शाब्दिक ज्ञानाचा काय अथवा शुष्क कर्मकांडाचा काय, त्यांना मान्य नव्हता. पापपुण्य, स्वर्गनरक यांच्या पारंपारिक कल्पना त्यांनी घासूनपुसून स्वच्छ केल्या आणि ज्याने ईश्वर प्राप्त होतो ते शुद्ध पुण्य असा निर्वाळा दिला. या संदर्भात ध्यानात घ्यावयास हवे की, त्यांना वैदिक परंपरेतील यज्ञाचे स्तोम फारसे पसंत नव्हते. या लोकी जे भोग अपुरे पडतात ते पूर्ण करण्यासाठी स्वर्गाची वाट धरणाऱ्या याज्ञिकांची त्यांनी थोडया कडक शब्दांत कानउघाडणी केली आहे. सर्वभोक्ता व पालनकर्ता परमात्मा न ओळखता ज्यांचे लक्ष स्वर्गातील सुखावर आहे त्यांना जीवितसाध्य सापडले नाही असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. ‘ म्यां बोलविल्या वेदु बोले । म्यां चालविल्या सूर्य चाले । म्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळितां ’ अशी त्यांच्या परमात्म्याची शक्ती आहे. या परमात्म्यास सर्वार्थांनी शरण जावे अशी त्यांची शिकवण

आहे. 'जो मज होय अनन्यशरण । त्याचे निवारीं मी जन्ममरण । यालागीं शरणागता शरण्य । मीचि ऐकु ' अशी त्यांची विश्वासाची ओवी आहे.

**शुद्ध पुण्याचा मार्ग**

तेव्हा अशा परमात्म्याचे प्रेम न मागता स्वर्गसुखाची कामना धरणारे याज्ञिक अर्थातच ज्ञानेश्वरांना प्रिय नाहीत. या यज्ञकर्म्या दीक्षितांनी ' पुण्याचेनि नांवें पाप । जोडिलें देखें ' असे ते सांगतात. वेदत्रयाचे पठण करून व शेकडो यज्ञ करून ज्याला हे यज्ञ पोचतात त्या मलाच ते विसरतात व स्वर्गाचा स्वीकार करतात. कल्पवृक्षाच्या तळी बसून झोळीला गाठी देण्यासारखेच नव्हे का हे ! ' म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्गु । तो अज्ञानाचा पुण्यमार्गु । ज्ञानिये तयातें उपसर्गु । हानि म्हणती ' असा निर्वाळा त्यांनी दिला आहे. ' स्वर्गु नरकु या वाटा । चोरांचिया ' असे त्यांचे सांगणे आहे. ' स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥' असे त्यांनी मार्गदर्शन केले आहे. स्वर्गातील सुखांना भुलून कसे भागेल ? तेथील अमर सिंहासन, ऐरावत ' राजधानी अमरावती, नाना सिद्धींचा साठा, अमृत, कामधेनूंची खिल्लारे, चिंतामणीच्या खड्यांची जमिनीला फरसबंदी, कल्पतरूंची झाडे सर्वत्र, गाणे गंधर्वाचे, रंभेसारख्या अप्सरा, उर्वशीसारख्या विलासिनी स्त्रिया, हे सारे सुवर्णवैभव भोगताना परमात्म्याचा विसर पडतो. यज्ञ केल्याचा अभिमान वाढतो आणि काही दिवस स्वर्गभोग भोगल्यानंतर पुण्याचा साठा संपतो, आणि मग दीन, लाचार होऊन परत मृत्युलोकात येणे भाग पडते.

**' बीजचि जाहलें तरु '**

यापेक्षा सतत नामस्मरण व संकीर्तन करून केवळ परमेश्वराचेच चिंतन का नाही करू ? जे चित्तत्त्व स्वसुखासाठी विस्तारले, आकारास आले त्याचेच सतत अनुसंधान व्यक्तास, जीवास वाटते. हे अनुसंधान नामस्मरण व गुणकीर्तन यांनी राहू शकते. जीवाचे व शिवाचे, आत्म्याचे व परमात्म्याचे हे नाते सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, ' माझेया विस्तारलेपणाचेनि नांवें । हें जगचि नोहे आघवें । जैसें दूध मुरलें स्वभावें । तरी तेंचि दहीं ॥ कां बीजचि जाहलें तरु । अथवा भांगारचि अलंकारु । तैसा मज

एकाचा विस्तारु । तें हें जग ॥(९ : ६४–६५). माझ्या विस्ताराची गोष्ट म्हटली तर हे सर्व जग मीच नव्हे काय ? दूध आपल्या स्वभावानुसार विरजले की त्याचेच दही होते. अथवा बीजच वृक्षरूपाने विकसते, सोनच अलंकाररूपाने नटते, त्याचप्रमाणे माझ्या एकाचाच विस्तार म्हणजे हे जग होय. 'सूत्रे मणिगणा इव' यावर भाष्य करताना व्यक्त झालेले जगत् व परमेश्वर यांचा संबंध दाखविताना ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, 'सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाच्या सुतीं वोविले । तैसें म्यां जग धरिलें । सबाह्याभ्यंतरी' (७ : ३२).

## चित्तवृत्ती परमेश्वराकडे

आत्मा-परमात्मा, जीव-शिव यांचे हे नाते ध्यानात घेऊन आत्म्याने, जीवाने परमात्म्यास वा शिवास भेटण्यासाठी आतुर असले पाहिजे. या आतुरतेचा एक सोपा मार्गही ज्ञानेश्वर सांगतात, 'अगा मानस हे एक । माझ्या स्वरूपीं वृत्तिक । करूनि घालीं निष्टंक । बुद्धिनिश्चयेसीं' (१२ : ९७)– बुद्धीचा निश्चय करून मनाच्या सर्व वृत्ती परमेश्वराच्या ठिकाणी अर्पण कराव्यात. पण हे चित्त अथवा मन अतिशय चंचल असल्यामुळे वृत्तींसहित ईश्वराला अर्पण करण्यात अडचण आली तर ? ज्ञानेश्वर सांगतात, 'तरि गा ऐसें करीं । यया आठां पाहारांमाझारीं । मोटकें निमिषभरी । देतु जाय । मग जे जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ॥ (१२ : १०४–१०५). मन, बुद्धी यांसहित चित्त सर्वस्वी परमात्म्याला अर्पण करणे जमत नसेल तर दिवसाच्या आठ प्रहरांपैकी एक अल्प क्षणभर तरी आपले चित्त मनबुद्धीसहित परमात्म्यास अर्पण करावे. ज्या ज्या क्षणास असे सुख भोगायला सापडेल त्या त्या क्षणी विषयांची नावड चित्तात निर्माण होते. चित्त परमेश्वरमय बनून राहते. शरदकालात जशी नदी आटून जाते तसे चित्त लौकिक प्रपंचातून बाहेर येते. 'मग पुनवेहुनि जैसें । शशिबिंब दिसेदिसें । हारपत अवसे । नाहींचि होय ॥ तैसे भोगाआंतुनि निगतां । चित्त मजमाजी रिगतां । हळूहळू पांडुसुता । मीचि होईल' (१२ : १०८–१०९) पौर्णिमेपासून चंद्राचे बिंब दिवसानुदिवस जसे आटत आटत अमावास्येस अगदी नाहीसे होते, तसे इंद्रियभोगांतून बाहेर पडता पडता चित्त माझ्या

ठिकाणी समर्पित होते आणि हळूहळू ते माझ्याच स्वरूपी विलीन होते. ते मीच होऊन जाते. जीवाने शिवाची अवस्था भोगणे, आत्मा परमात्मा आहे ही अनुभूती येणे ही तर जीविताच्या सर्वोत्तम ध्येयाची अखेरची अवस्था. सर्व सुखाचा अनुभव या मार्गाने येणे हीच खरी ज्ञानेश्वरांची किमया होय.

**सायुज्यसदनाचा सोपा मार्ग**

काही जीवांना हा अभ्यासही अवघड वाटतो. चित्त एक क्षणभरही स्थिर न झाल्यामुळे परमेश्वरास अर्पण करणे जमत नाही. मग त्या जीवाने काय करावे? त्याच्याही बोटास धरून ज्ञानेश्वरांनी मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात, 'तरी आहासी जया भागीं । तैसाचि असे '–तू ज्या स्थळी आहेस तेथे असशील तसाच राहा. 'इंद्रियें न कोंडीं । भोगांतें न तोडीं । अभिमानु न संडीं । स्वजातीचा ।। कुळधर्मु चाळीं । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळीं । दिधली आहे ।। परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापार होये । तो मी करितु आहे । ऐसें न म्हणे ।। करणें कां न करणें। हें आघवें तोचि जाणे । विश्व चळतसे परमात्मेनि ।। उणेयापुरेयाचें कांही । उरों नेदीं आपुलिया ठायीं । सजात करूनि घेई । जीवित्व आपुलें।। माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें। तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा ' (१२ : ११५–१२०) – तू काही इंद्रियांना आवरू नकोस, भोगांना सोडू नकोस, आपल्या जातीचा अभिमानही सोडू नकोस. कुळाचार पाळीत जा. विधिनिषेधांना सांभाळ. अशी तुला सर्व मोकळीक दिली आहे. परंतु मनाने, वाणीने, कायेनें जे जे कर्म तू करशील ते ते मी करतो आहे असे म्हणू नकोस. हे कर्म उणे, हे पूर्ण असे तू आपल्या मनात न आणता आपला जोवभाव आपल्याच ठिकाणी एकरूप करून ऐस. माळी पाण्याला जिकडे नेतो तिकडे ते निवांतपणे जाते. त्याच वृत्तीने तू कर्तृत्वाचा अभिमान सोडून शांत राहा. प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचे ओझे स्वतःवर न लादता चित्तवृत्ती निरंतर माझ्या ठिकाणी समर्पित कर. वाट सरळ आहे की वाकडी आहे याची चिंता रथाला कशासाठी? अशा निवान्तपणाने जे जे कर्म होईल ते शांतपणे मला अर्पण करावे. म्हणजे 'ऐसिया सद्भावना । तनुत्यागीं अर्जुना । तूं सायुज्यसदना । माझिया सी ' (१२ : १२४).

**आणि असा हा कर्मफलत्याग**

परंतु काही लोकांना हे कर्मसमर्पणही जमत नाही. त्यांना उद्देशूनही ज्ञानेश्वरांनी एक सोपा मार्ग सांगितला आहे. तो म्हणजे कर्मफलत्यागाचा होय. ' आणि जेणें जेणें वेळें । घडतीं कर्मे सकळें । तयांचीं तियें फळें । त्यजित जायें ॥ वृक्ष कां वेली । लोटती फळें आलीं । तैसीं सोंडीं निपजलीं । कर्मे सिद्धें ॥ परि मातें मनीं धरावें । कां मज उद्देशें करावें । हें कांहीं नको आघवें । जाऊं दे शून्यी ' (१२:१२८-१३०) ज्या ज्या वेळेस जे जे कर्म घडेल त्या सर्व कर्मांच्या फळांचा त्याग तू करावास. झाडे किंवा वेली आलेली फळे टाकून देतात, त्याचप्रमाणे तूही सिद्धीस गेलेली सारी कर्मे टाकीत जा; इतकेच नव्हे तर माझे स्मरण करावे, माझ्यासाठी कर्मे करावीत, हा भावसुद्धा नको. खडकावर पडलेला पाऊस अथवा आगीत पेरलेले बीज, त्यांच्यासारखेच तुझे कर्म निष्फळ आहे असे समज. आपल्या मुलीविषयी कोणी विषयवासना धरीत नाही. त्याप्रमाणे स्वतःच्या कर्माविषयी मन निष्काम व्हावे. सर्व कर्मे शून्यात गडप व्हावीत.

**अशी ही भक्तचिंता**

अनेक जीवांसाठी ज्ञानेश्वरांनी हा जो साधा, सरळ व खात्रीचा मार्ग दाखविण्याची जी किमया केली आहे तिचा आणखी एक विशेष अतिशय रम्य असा आहे. या साधनपरंपरेत अथवा भक्तिमार्गात जीव जसा शिवास, आत्मा जसा परमात्म्यास अनन्य असतो त्याच प्रमाणात किंवा अधिक प्रमाणातही शिव अथवा परमात्माही जीवास अनन्य राहतो. एवढ्या निष्काम वृत्तीने व तळमळीने त्याला हाक मारणारे कोण असते ? सर्वांना धनदौलत हवी, भौतिक सुखे हवीत. पण ईश्वराचे प्रेम मागणारा भक्त त्याला जीवापेक्षाही प्रिय वाटतो. तो आपल्या या लाडक्या भक्ताची वाटच पाहात असतो. वैकुंठ सोडून जेथे नामघोष चालला आहे तेथे त्याचा निवास असतो. भक्तांच्या या नामघोषापुढे, संकीर्तनापुढे त्याला लक्ष्मीची जवळीक नको वाटते. भानुबिंबात अथवा योग्यांच्या चित्तातही त्याचे मन रमत नाही. सर्वस्व परमेश्वराला अर्पण करणारे भक्त त्याला मनापासून आवडत असल्यामुळे त्यांच्याच चित्तास या आपल्या लाडक्या भक्तांचे

अनुसंधान लागते. ' तयांची चिंतवणी । मजचि पडलीं ' अशी अवस्था होते. 'आपुली तहान भूक नेणें । तान्हया निकें तें '। ' माउलीसीचि करणें । तैसे अनुसरले जे मज प्राणें। तयांचें सर्व मी करीं ' ।। पंख न फुटलेल्या पिलांचे सर्व काही त्यांची आईच करते ना ? या आईला स्वतःची तहानभूक समजत नाही, परंतु आपल्या तान्हुल्याचे मात्र ती सर्वच करते. त्याचप्रमाणे जे सर्व भार माझ्यावर टाकून असतात त्यांचे सर्व काही मीच करतो. त्यांचा सांभाळ मीच करतो. त्यांचा योगक्षेम मी वाहतो, अशी भगवंताची ग्वाही ज्ञानेश्वर जीवासाठी प्रकट करतात.

**' आम्ही भावाचे पाहुणे '**

या भक्तश्रेठाचे केवढे कौतुक ईश्वरास असते ? याचे मोठे हृद्य चित्रण ज्ञानेश्वरांनी जागोजाग केले आहे. भक्तवात्सल्याचे अनेक प्रसंग त्यांनी चित्रित केले आहेत. ' पत्रं पुष्पं फलं तोयम् ' या श्लोकावरील ज्ञानेश्वरकृत भाष्य सतत चिंतन–मनन करण्यासारखें आहे. भक्ताने मोठ्या प्रेमाने समर्पण केलेले पान, फूल, फळ, पाणी किती उल्हासाने ईश्वर स्वीकारतो याचे अतिशय चांगले वर्णन या ठिकाणी आहे. ' पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ सानें थोर न म्हणे । आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया '(९ : ३९५) असा निर्वाळा परमात्म्याचा आहे. भक्ताने नुसते पाणी जरी मनोभावे अर्पण केले तरी ईश्वरास वाटते, भक्ताने जणू वैकुंठापेक्षाही मोठी देवळे मला बांधून दिली आहेत, किंवा कौस्तुभापेक्षाही निर्मळ तेजाची व जडावाची लेणी आपल्या अंगावर चढविली आहेत, किंवा क्षीराब्धीहून सुखकर अशी दुधाची नवीन शय्यास्थानेच निर्माण केली आहेत. कापूर, चंदन व कृष्णागरू यांचा सुगंधी मेरूपर्वतच जणू या भक्ताने ईश्वरासाठी निर्णाण केला आहे. किंवा दीपमाळेवर दुसरा सूर्यच अशी काडवात लावली गेली आहे. किंवा गरुडासारखी वाहने, कल्पवृक्षांच्या बागा, कामधेनूंची खिल्लारे, अमृतापेक्षाही स्वादिष्ट अशी पक्वान्ने आपल्या भक्ताने आपणांस अर्पण केली आहेत असे या भक्तवत्सल परमेश्वरास वाटते.

**भक्तिसुखासाठी द्वैतावस्था**

ईश्वराचे वात्सल्य हे असे अहे. हा परमात्माच स्वसुखाच्या अनुभवासाठी द्वैतावर येतो, व्यक्त होतो. ' की भक्ति सुखालागीं । आपणपेंचि दोहीं भागीं ।

वांटुनियां आंगीं । सेवकै बाणे ॥ येरा नाम मी ठेवी । मग भजती वोज बरवी । न भजतया दावी । योगिया जो' (१२ : १८६-८७)–भक्तिसुखाचा अनुभव घेण्यासाठी हा परमात्माच द्विधा होतो, आपल्या एका भागाला तो भक्त अथवा सेवक असे म्हणतो. आणि हा सेवक त्याची भक्ती करू लागला की त्याचेच त्याला व्यसन जडते. 'तयाचें आम्हां व्यसन । आमुचें तो निजध्यान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ॥ तयालागीं मज रूपा येणें । तयाचेनि मज एथें असणें । तया लोण कीजे जीवेंप्राणें । ऐसा पढियें ॥' (१२ : १८८–८९) अशा भक्ताचा मला छंद असतो. आम्ही त्याचेच ध्यान करतो. त्याची भेट हेच आमचे समाधान. त्याच्यासाठी तर आम्ही सगुण रूप धारण करतो. त्याच्यासाठी या जगात वावरतो. त्याच्यावरून आम्ही लिंबलोण ओवाळून टाकतो, इतका तो भक्त आम्हांस प्रिय वाटतो; ही भगवंताची वत्सलता ज्ञानेश्वर अनेक ठिकाणी प्रकट करतात.

**भक्तपूजेची अशी हौस**

ईश्वराच्या भजनात तल्लीन झालेल्या भक्ताविषयी ईश्वराला फार फार प्रेम वाटते. त्याचीच ओढ परमात्म्यास असते. मुलाची जशी आईस तशी. आई मुलाला पाजून तृप्त असते. त्याप्रमाणे ईश्वर भक्तास प्रेमपान्हा पाजून तृप्त होतो. या तृप्तीसाठी त्यालाही भक्ताची आवश्यकता आहे. नामसंकीर्तनात रंगलेला भक्त पाहिला की 'तयातें मी माथां । मुकुट करीं' अशी अवस्था ईश्वराची होऊन जाते. हा भक्तच मग कैवल्याचा अधिकारी बनून मोक्षाची सोडीबांधी करीत असतो. याच भक्ताला मग ईश्वर नमस्कार करू लागतो. त्याची टाचही हृदयावर धारण करण्यात ईश्वराला धन्यता वाटते. 'तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणीं । तयाची कीर्ति श्रवणीं । आम्ही लेऊं ॥ तो पाहावा हे डोहळे । म्हणोनि अचक्षूसि मज डोळें ॥ हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ दोंवरी दोनी । भुजा आलों घेउनी । आलिंगावयालागुनी । तयाचें आंग ॥ तया संगेंनि सुरवाडें । मज विदेहा देह धरणे घडे । किंबहुना आवडे । निरुपमु ॥' (१२ : २२२–२५)–अशा भक्ताच्या गुणवर्णनानेच आम्ही आपल्या वाणीस भूषवितो. त्याच्या गुणश्रवणांची कुंडले आम्ही आमच्या कानांत घालतो. अशा भक्ताच्या दर्शनासाठी मी

अचक्षू असतानाही डोळस होतो. हातातील कमळाने मीच त्याची पूजा करतो. दोहोंवर आणखी दोन हात धारण करून मी माझ्या भक्तास आलिंगन देण्यासाठी येतो. त्याच्या संगतिसुखासाठी मीच देहहीन असूनही देहधारी होतो. मला भक्त किती आवडतो हे उपमेने सांगता येण्यासारखे नाही.

**अशी अलौकिक किमया**

असे हे भक्तवात्सल्य कोणत्या धनदौलतीमुळे अनुभवास येईल ? जीवांना इतक्या सोप्या व सरळ मार्गाने ईश्वरानुभूती देणाऱ्या ज्ञानेश्वरांची ही किमया अलौकिक नाही काय ? परीस लोखंडाला लावून त्याचे सोने झालेले पाहण्यापेक्षा जड जीवास परतत्त्वाचा स्पर्श होऊन त्याचे सुवर्णात रूपांतर करण्याची किमया श्रेष्ठ प्रकारची नाही काय ? परिसापासून सोने निर्माण करण्याच्या किमयेपेक्षा परिसच जेथून निर्माण झाला याचा शोध घेण्याची किमया थोर नव्हे काय ? कबीरदासांनी म्हटले आहे : 'जिस पारससे कांचन निपजा वोहि पारस कच्चा । जिस पारससे पारस निपजा वोहि पारस सच्चा,'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ८००६९ वि: निसंघ
क्रमांक २२९६ नों. दि:

# २

# नमो चित्सूर्य निवृत्तिनाथ

## ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा

भारतीय धर्मसाधनेत गुरुपरंपरेला फार मोठे स्थान आहे. प्रमुख धर्म व धर्मपंथ आणि त्यांच्या गुरुपरंपरा यांच्याच आश्रयाने प्राचीन मराठी साहित्याचा विकास झालेला दिसतो. भागवत धर्माचे आद्य प्रणेते श्रीज्ञानेश्वर व श्रीनामदेव यांच्या चरित्रांत गुरुपरंपरेस विशेष असे महत्त्व होते. सर्वसामान्य लोकांना सुलभ अशा भागवत धर्माची पुनर्घटना करणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या गुरुपरंपरेचे मूळ नाथपंथात असल्याचे प्रसिद्धच आहे. आपल्या या श्रेष्ठ गुरुपरंपरेचा उल्लेख गौरवाने करताना ज्ञानेश्वर म्हणतात :

> क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं ।
> नेणो कैं श्रीत्रिपुरारीं । सांगितलें जें ॥
> तें क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरीं गुप्तु ।
> होता जयाचा हातु । पैठें जालें ॥
> तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगी ।
> भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥

मग समाधि अव्यत्यया । भोगावी वासना या ।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥
तेणें योगाब्जिनी सरोवर । विषयविध्वंसैकवीर ।
तिये पदीं कां सर्वेश्वर । अभिषेकिले ॥
मग तिहीं ते शांभव । अद्वैयानंदवैभव ।
संपादिलें सप्रभव । श्रीगैनीनाथा ॥
णेंते कळि काळित भूतां । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥

( ज्ञाने. १८ : १७५१-५७ )

नाथपरंपरेच्या गुरुतत्त्वाचा थोडक्यात इतिहासच ज्ञानेश्वरांनी वरील ओव्यांतून दिलेला आहे. अत्यंत प्राचीन काळी क्षीरसिंधूच्या परिसरात श्री-शंकरांनी श्रीगौरीच्या कानात या बोधाचे रहस्य सांगितले. हे रहस्य त्या क्षीरसागराच्या लाटांत मगरीच्या पोटी असणाऱ्या मत्स्येंद्रांना लाभले. या मत्स्येंद्रनाथांना सप्तशृंगीच्या पर्वतावर अवयवहीन असे चौरंगीनाथ भेटले. मत्स्येंद्रनाथांच्या दर्शनाने चौरंगीनाथांचे भग्न अवयव पूर्वीप्रमाणे पूर्ण व सुंदर बनले. त्यानंतर अढळ समाधी यथास्थित रीतीने अनुभविण्यासाठी मत्स्येंद्रांनी हे रहस्य श्रीगोरक्षनाथांना सांगितले. हे गोरक्षनाथ योगरूप कमलिनींचे सरोवर व इंद्रियविषयांचे कर्दनकाळ असल्याने मत्स्येंद्रनाथांनी आपले सर्व अधिकार त्यांना देऊन आपल्या पीठावर बसविले. यानंतर गोरक्षनाथांनी श्रीशंभूपासून प्राप्त झालेले हे अद्वयानंदाचे महासुख श्रीगैनीनाथांना समूळ सांगितले. या जगात प्राणिमात्राला कलिकाल ग्राशीत आहे असे पाहून गैनीनाथांनी श्रीनिवृत्तिनाथांना या बोधरहस्याच्या प्रसाराची आज्ञा केली. निवृत्तिनाथांचा उपदेश ज्ञाननाथांना म्हणजे ज्ञानेश्वरांना मिळाला असल्याचे प्रसिद्ध आहेच.

### ' कुळ हें पावन कृष्णनामें '

भागवतधर्मीय ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा अशा रीतीने शिवोपासक नाथ-परंपरेतील आहे. ज्ञानदेवांनी 'आदिनाथें बीज सांगितलें कानीं । सोहं हे शिराणी कैवल्याची' या एका प्रसिद्ध अभंगात हीच गुरुपरंपरा निवेदन करताना म्हटले आहे, आदिनाथ शिवशंकराने 'सोहम्' हा बीजमंत्र कैवल्याची खूण म्हणून सांगितला. मत्स्येंद्रनाथ-गोरखनाथ यांनी या सुखाचा ठेवा प्राप्त

करून घेतला आणि ज्या पंथाने हजारो सिद्ध अपार सुख मिळवितात ते गूज निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरांना सांगितले. या बीजमंत्रात संपूर्ण वेदांचे सार आलेले आहे. याच बीजमंत्राच्या आधारे ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकाच्या अखेरीस 'वैष्णवांची मांदी मेळवूनि' सर्व जगास 'आनंदाचे आवरु' घातले. ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. ज्ञानेश्वरांनी प्रवर्तित केलेला भागवत धर्म वा वारकरी पंथ विठ्ठलाचा वा विष्णूचा उपासक आहे आणि ज्ञानेश्वरांची बोधपरंपरा तर शिवाशी संबंधित दिसते. यात वरवर पाहताना विरोध दिसला तरी शिव-विष्णू या दोन थोर दैवतांचे ऐक्य भागवतधर्मीयांनी मान्य केले आहे. पंढरीचा वारकरी सोमवारचा उपवास करतो यामधील रहस्य हेच आहे. हालाहल विष पचवून 'नीलकंठ' बनलेला शिव अंगाचा दाह कमी व्हावा म्हणून विष्णूच्या अवताराचे रामचंद्राचे नाव घेतो, हेही प्रसिद्ध आहे. या संदर्भात ज्ञानेश्वरांचे गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांच्या एका अभंगाची साक्ष महत्त्वाची आहे. 'आदिनाथ उमाबीज प्रकटलें। मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती' या एका अभंगात निवृत्तिनाथांनी आपल्या बोधपरंपरेचे रहस्य सांगताना म्हटले आहे, 'निवृत्ति गयनीं कृपा केली पूर्ण । कुळ हे पावन कृष्णनामे ।' नाथपरंपरेतून आलेला 'सोहम्' चा बीजमंत्र अशा रीतीने कृष्णनामावर आधारलेला आहे.

### श्रीगुरूंची अनुकूलता

आपल्या सद्गुरुनाथाचे, निवृत्तिनाथांचे ज्ञानेश्वरांनी अनेक ठिकाणी जे वर्णन केले आहे ते वाचून आजही मन भारावून जाते. निष्ठा, आदर, कळकळीचे प्रेम, सेवाभाव, लीनता, दास्यत्वाची वृत्ती इत्यादी गुणांचे सगुणसाकार स्वरूपात दर्शन घ्यावयाचे झाल्यास ज्ञानेश्वरकृत गुरुगौरव पाहावा. गीतेसारख्या थोर ग्रंथावर आपण इतके सुलभ व सुरस भाष्य करतो ते श्रीगुरुनाथांच्या बळावर, असे ज्ञानेश्वर पदोपदी सांगतात. खरे पाहता गीतार्थाची केवढी थोरवी ! ज्याच्या निद्रावस्थेतील घोरणेही वेदार्थ बनले तो सर्वेश्वर आदिनारायणच स्वत: गीतेचे रहस्य सांगत आहे. या बोधरहस्याची अथवा गीतातत्त्वाची वर्णने करताना वेदही थकले, तेथे ज्ञानेश्वर कोणत्या बळावर बोलतात ? 'ऐसें जें अगाध। जेथ वेडावती वेद। तेथ अल्प मी मतिमंद। काय होयें ? ॥ हें अपार कैसेंनि कवळावें। महातेज कवणें

धवळावें । गगन मुठीं सुवावे । मशकें केवीं ? ।। परी एथ असे एकु आधारु । तेणेंचि बोलें मी सधरु । जैं सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे ' (ज्ञाने. १ : ७३–७५) अमर्याद गीतातत्त्व आटोक्यात कसे यावे ? या प्रचंड व दिव्य अशा महातेजाला कोणी घुसळावे ? चिलटाने आकाशाला आपल्या मुठीत कसे कवळावे ? पण अशाही स्थितीत ज्ञानेश्वर म्हणतात, मी बलवान आहे, कारण अनुकूल असणारे गुरुनाथ मला आधार आहेत.

**' मज हृदयीं सद्‌गुरु '**

हा सद्‌गुरुनाथ ज्ञानेश्वरांच्या हृदयात निरंतर निवास करून त्यांना सतत प्रेरणा देत आहे. ' मज हृदयीं सद्‌गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु । म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ' या सद्‌गुरुनाथाच्या कृपाबळावर मी हा संसारसागर तरून गेलो आहे. हा गुरुनाथ माझ्या अंतःकरणावर ठसला असल्याने मला विवेकाबद्दल फारच आदर वाटतो. ' जैसें डोळचां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे । मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ।। कां चिंतामणि आलिया हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्तिं । ज्ञानदेवो म्हणे ।। म्हणोनि जाणतेन गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे । जैसें मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती '(ज्ञाने. १ : २३–२५) डोळयांना दिव्य अंजन लाविले की दृष्टीला अपूर्व बळ येते, त्या बळामुळे जेथे पाहावे तेथे भूमिगत द्रव्यांचे साठे दिसू लागतात. चिंतामणी हातात आला की सर्व मनोरथ पूर्ण होतात, त्याप्रमाणे मी या निवृत्तिनाथांच्या कृपेने पूर्णकाम बनलो आहे असे ज्ञानदेव सांगतात, यासाठीच शहाण्या माणसाने गुरुभक्ती करावी आणि कृतार्थ व्हावे, कारण झाडाच्या मूळांवर पाणी शिंपिले की आपोआप त्यांच्या फांद्या पानांसकट ताज्या टवटवीत होतात. सागरात स्नान केले की आपोआप त्रिभुवनातील तीर्थांचे स्नान घडते, अमृताच्या आस्वादनात सर्व रसांचा अंतर्भाव होतो; त्याप्रमाणेच श्रीगुरूंच्या स्तवनाने सर्व मनोरथ सिद्धीस जातात; म्हणून मी गुरूला पुनःपुनः वंदन करतो.

**चित्सूर्याचा उदय**

ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायाच्या प्रारंभीच ज्ञानेश्वरांनी आपल्या चित्सूर्यरूपी निवृत्तिनाथांचा मनापासून गौरव केला आहे. हा ज्ञानसूर्य अद्वैत-

रूपी कमलाला फुलविणारा आहे. याच्या उदयामुळे अज्ञानरूपी रात्रीचा नाश होतो आणि ज्ञानाज्ञानाच्या चांदण्या विरून जातात. ज्ञानी पुरुषांना याच्या उदयामुळे शुभ दिवस लाभतो. या ज्ञानसूर्याच्या उदयाबरोबर जीवरूपी पक्ष्यांना आत्मज्ञानाची दृष्टी लाभते आणि ते देहभावाची घरटी सोडून देतात. याच्या उदयामुळे वासनात्मक देहरूपी कमळाच्या कोशात बंदिस्त झालेला चैतन्यरूपी भ्रमर एकदम मुक्त होतो. भेदभावनेच्या नदीच्या दोनही तीरांवर शब्दांच्या पकडीत बुद्धिबोधरूपी चक्रवाक पक्ष्यांचे जोडपे सापडलेले असते, परस्परांच्या वियोगाने वेडावलेले असते. दीप जसा घराला तसा हा चैतन्यरूपी आकाशाला प्रकाशाचा लाभ करून देऊन पूर्ण ऐक्याचा लाभ त्यांना करून देतो. या चित्सूर्याचा उदय झाल्याबरोबर भेदबुद्धीची अंधाराची चोरवेळ संपते आणि योगमार्गांचे प्रवासी आत्मप्रचीतीच्या मार्गावर येतात. या सूर्याच्या विवेकरूपी किरणांचा स्पर्श झाला की, ज्ञानरूपी सूर्यकांत मण्यातून तेजाच्या ठिणग्या बाहेर पडून संसारभवाची जंगले जळून जातात. या सूर्याचे किरणजाल कठोर होऊन आत्मस्वरूपाच्या माळावर स्थिरावले की महासिद्धीच्या मृगजळास पूर येतो. पण हाच चैतन्यरूपी सूर्य आत्मबोधाच्या मस्तकावर येऊन ब्रह्मभावाच्या माध्यान्ही तळपू लागला की, आत्म्याची भ्रांतिरूप सावली त्याच्याच बुडाशी जाऊन दडते. याच्या उदयाबरोबर अद्वैत ज्ञानरूपी नगरात जिकडे तिकडे आत्मानंदच कोंडून राहतो आणि सुखानुभवाच्या देण्याघेण्याला मंदाई येते. याच्या प्रकाशामुळे कैवल्यमुक्तीच्या शुभ दिवसाचा लाभ सतत घडतो. हा आत्मभावरूपी आकाशाचा स्वामी असल्यामुळे याच्या उदयाबरोबरच पूर्वादी दशदिशांसह उदयास्ताचाही ठाव नाहीसा करतो. तो ज्ञान व अज्ञान यांना नाहीसे करून यांनी झाकलेले आत्मतत्त्व मात्र स्पष्ट करतो. याच्या उदयाबरोबर एक नवीनच विलक्षण पहाट सुरू होते. आपल्या या प्रखर चित्सूर्यरूपी सद्गुरुनाथाचे वर्णन करून श्रीज्ञानेश्वर म्हणतात, 'तयां चित्सूर्या श्रीनिवृत्ति। आतां नमो म्हणों पुढतपुढती । जें बाधका येइजतसे स्तुती । बोलाचिया' (ज्ञाने. १६ : १७)

**प्रज्ञाप्रभासूर्य गुरुनाथ**

ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरुनाथांचे वर्णन परोपरीने अनेक ठिकाणी केले आहे. चौदाव्या अध्यायाच्या प्रारंभीच ते म्हणतात, 'जय जय आचार्या।

समस्तसुरवर्या। प्रज्ञाप्रभासूर्या। सुखोदया।' आचार्यदेवा, मी तुमचा जयजयकार करतो. सर्व देवांत तुम्ही श्रेष्ठ आहात. बुद्धिरूपी प्रभातवेळेचे तुम्हीच सूर्य आहांत. सर्व सुखांचा उदय तुमच्यापासूनच होतो. तुम्ही सर्वांचे विसाव्याचे स्थान आहात. तुमच्यामुळे आत्मभावनेचा साक्षात्कार होतो. पंचमहाभूतात्मक सृष्टीच्या लाटा ज्यावर उमटतात तो समुद्रही तुम्हीच आहात. तुमचा जयजयकार असो. आचार्य, तुम्ही दुःखितांचे बंधू आहात. अखंड कृपेचे सागर आहात, गुरुराजा, तुम्हीं या विश्वाचे सर्वस्व आहात. आमच्या बुद्धीला इतकेच कळते की, ज्याला या जगात आप म्हणजे पाणी म्हणतात, त्याला तुमच्याच शब्दांनी गोडपणा आलेला आहे. इतकेच नव्हे, तर ' तुझेनि क्षमत्व आलें पृथ्वीसी । ' पृथ्वीला क्षमागुणाची जोड तुझ्यामुळेच मिळालेली आहे. आचार्या, ' रविचंद्रादि शुक्ति । उदो करिती त्रिजगतीं । तें तुझिया दीप्तीं । तेज तेजा '–सूर्य, चंद्र इत्यादी ज्या तेजस्वी शिंपल्या जगात उदय पावतात त्यांना तुझ्यापासूनच तेज प्राप्त होते. वाऱ्याचा चंचळपणा हे तुझेच सामर्थ्य होय. आकाशही तुझ्याच आश्रयाने लपंडाव खेळते. तुझे वर्णन करण्यास वेदांनाही शब्द अपुरे पडतात.

**गुरुकृपेची पौर्णिमा**

सूर्य उगवला की चांदोबा काजव्याप्रमाणे फिका पडतो, त्याप्रमाणे तुमच्या आत्मस्वरूपापुढे वेद आणि मी बरोबरीचे ठरतो. कारण जेथे द्वैताचा ठावच पुसला जातो व परा वाणीसहित वैखरी वाणीचा लोप होतो, तेथे आम्ही कोणत्या तोंडाने तुझे वर्णन करावे ? म्हणून आचार्या, ' यालागी आतां । स्तुति सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें ' आता स्तुतीच्या भरीस न पडता निःशब्द होऊन तुमच्या चरणांवर माथा ठेवावा हेच बरे. स्वामीमहाराज, तुम्ही ज्या स्वरूपाचे असाल त्या स्वरूपात तुम्हांस माझे वंदन असो. आचार्या, माझा हा ग्रंथरचनेचा सोहळा सफल व्हावा म्हणून तुम्ही माझे सावकार व्हा. तुमच्या कृपेचे भांडवल मोकळे करा, आणि ते माझ्या बुद्धिरूपी खोळीत टाका, मला ज्ञानपदाचा लाभ करून द्या, कारण या लाभाच्या आधारानेच मी विवेकवचनांची सुंदर लेणी संतजनांच्या कानांत घालीन. अहो आचार्या, गीतेचा गूढ अर्थ मला समजावा म्हणून आपल्या कृपेचे दिव्य अंजन माझ्या डोळ्यांत घाला. माझ्या बुद्धीच्या डोळ्यांना सारी

वाङ्‌मयसंपत्ती एकदम दिसेल अशा प्रकारच्या निर्मळ करुणेचे मुखमंडळ मिरवीत आपण उदयास यावे. तुमच्या प्रभावाने माझ्या बुद्धिरूपी वेलीला काव्यरूपाची फळे लगडतील, असा हा वसंतऋतू आपणच व्हावे. महाराज, माझ्या बुद्धिरूपी गंगेला तत्त्वसिद्धान्तांच्या लोंढ्याने पूर यावा. विश्वाच्या विश्रामस्थाना, तुमच्या कृपेच्या चंद्राने मला स्फूर्तीची पौर्णिमा लाभो. या पौर्णिमेच्या दर्शनाबरोबर माझ्या ज्ञानसागरास उधाण येवो. नवरसांचे ओघ वाहोत.

**' पिके सारस्वत तुझिया पाऊलीं '**

आपल्या सद्‌गुरुनाथावर ज्ञानेश्वरांचे उत्कट प्रेम आहे. गुरुकृपादृष्टीने आपण न्हाऊन निघतो म्हणूनच अमृतासारखे बोल आपल्या मुखातून निघतात अशी त्यांची श्रद्धा होती. बाराव्या अध्यायाच्या प्रारंभी आपल्या गुरुकृपादृष्टीचा गौरव करताना ज्ञानेश्वर म्हणतात, ' जयजय शुद्धे । उदारे प्रसिद्धे। अनवरत आनंदे। वर्षतिये '– सद्‌गुरुकृपादृष्टी, तू शुद्ध आहेस, उदार आहेस, प्रसिद्ध आहेस, अखंड आनंदाचा वर्षाव तू करतेस. तुझा जयजयकार असो. विषयरूपी सर्पांनी दंश केल्यानंतर अवयव ताठू नयेत म्हणून तुझीच कृपादृष्टी उपयोगी पडते. ' योगसुखाचे सोहळे। सेवका तुझेनि स्नेहाळे । सोहंसिद्धीचे लळे । पाळिसी तूं ।। आधारशक्तीचिया अंकीं । वाढविसी कौतुकीं । हृदयाकाशपल्लकीं । परिये देसी निजे ।। ' गुरुकृपादृष्टी, तू अतिशय प्रेमळ असल्यामुळे आपल्या सेवकांची ब्रह्मानंदाची हौस पुरवितेस. त्यांचे आत्मसाक्षात्काराचे लाड पुरवितेस. मूलाधारचक्ररूपी शक्तीच्या मांडीवर शिष्यबालकांना घेऊन तू त्यांचे कोडकौतुकाने संगोपन करतेस. हृदयरूपी आकाशाच्या पाळण्यात त्यांना निजवून आत्मज्ञानाचे झोके देतेस. त्यांच्यावर आपला जीवभाव ओवाळून टाकतेस. मन व प्राण यांची खेळणी तू त्यांना देतेस. त्यांच्या अंगावर आत्मानंदाची बाळलेणी चढवितेस. सतराव्या पूर्णामृतकलेचे दूध त्यांना पाजतेस. ' म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाऊलीं । या कारणें मी साउली। न संडी तुझी '–गुरुकृपादृष्टी, सर्व साधकजनांचे संगोपन करणारी तू माऊली आहेस. तुझ्या चरणांपासूनच कवित्वाची स्फूर्ती जन्मास येते. म्हणून मी तुझी पाउले कधीच सोडणार नाही.

**विवेकवल्लीची लावणी**

सद्‌गुरुकृपादृष्टी, तुझे दयामृत ज्याला लाभते तो सर्व विद्या निर्माण

करणारा ब्रह्मदेवच होतो. 'म्हणोनि अंबे, श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापीं मातें । ग्रंथनिरूपणीं'–माते गुरुकृपादृष्टी, तू आपल्या सेवकांची मनकामना पूर्ण करणारी कल्पलता आहेस. तरी मला ग्रंथाचे निरूपण करण्यास आज्ञा दे. 'नवरसीं भरवीं सागरु । करवीं उचित रत्नांचे आगरु । भावार्थाचे गिरिवरु । निफजवीं माये ॥ साहित्य सोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया क्षोणीं । विवेकवल्लीची लावणी । हों देईं सैंध–' माते, माझ्या या गीतार्थाच्या निरूपणात नवरसांचे सागर भरू देत. उत्तम रत्नांचे आगर तयार होऊ दे. भगवंताच्या खऱ्या बोलातील अर्थाचे पर्वत उठू देत. या मराठी भाषेत वाङ्मयाच्या खाणी निर्माण व्हाव्यात. जिकडे तिकडे विवेकरूपी वेलीच्या रांगांच्या रांगा दिसू देत. एकवाक्यरूपी फळांनी समृद्ध अशा महासिद्धान्तांच्या बागा तयार होऊ देत. नास्तिकांच्या घळी, वितंडवाद्यांच्या आडवाटा आणि तर्क ह्यांची हिंस्र श्वापदे यांचा नायनाट होऊ दे. श्रीकृष्ण गुणवर्णनाचे मला सामर्थ्य दे आणि या श्रोत्यांनाही श्रवणानंदाचे सामर्थ्य लाभू देत. मराठीच्या या प्रदेशात ब्रह्मविद्येची रेलचेल व्हावी आणि लोकांनी विद्यानंदाची देवघेव सुखाने करावी. सद्गुरुकृपादृष्टी, तू माझ्यावर आपल्या प्रेमळ पदराची पाखर घाल. इतके झाले तर मी हे वाङ्मय आताच निर्माण करीन.

### विशदबोधविदग्धा गुरुराया

श्रीज्ञानेश्वरांच्या मनाची कोवळीक व त्यांची गुरुवरील श्रद्धा यांचे मनोज्ञ दर्शन त्यांच्या वरील ओव्यांतून घडते. गुरूंचा प्रसाद आपणांस सततचा असावा व आपण हा गीतार्थ गुरूच्या कृपाबळावर बोलत आहोत याची साक्ष श्रोत्यांना पटावी म्हणून ज्ञानेश्वर सद्गुरूंचे स्तवन वारंवार करतात. दहाव्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानेश्वर म्हणतात, 'ॐ नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा । परापरमप्रमदा । विलासिया ॥ —गुरुराया, ब्रह्मज्ञानाचा बोध करून देण्यास तू समर्थ आहेस. विद्यारूपी कमलाचा विकास तूच आहेस. परारूपी प्रकृती हीच कोणी युवती असून तिच्याशी विलासही तूच करतोस. तुला नमन असो. संसाररूपी अंधाराला नष्ट करणारा सूर्य तूच आहेस. नुकतीच तरुण झालेली जी तुर्यावस्था म्हणजे आत्मसमाधी तिचे लालनपालन सहजरीतीने तूच करतोस. तुला माझा नमस्कार असो. सर्व जगाचे पालन तूच करतोस. शुभ कल्याणरूपी रत्नांचा संग्रह तूच आहेस. सज्जनरूपी वनाला

सुगंधित करणारा चंदन तूच आहेस. आराधनेस योग्य असे दैवत तूच आहेस. अशा तुला मी नमस्कार करतो. चकोराला जसा चंद्र तसा तू चतुर लोकांच्या चित्तास संतुष्ट करतोस. तू आत्मसाक्षात्काराचा सर्वाधिकारी आहेस. वेदांतील ज्ञानरसाचा तू केवळ सागर आहेस. सर्व जगाचे मंथन करणारा जो कामविकार त्याचेच तू मंथन करणारा आहेस. गुरुराया, तुला नमस्कार असो.

**ब्रह्मानंदाचे भांडार**

गुरुराजा, सद्भक्तांनी वंदन करण्यास तूच एक पात्र आहेस. संसाररूपी हत्तीचे गंडस्थळ तूच फोडतोस. जगाच्या उत्पत्तीचे स्थानही तूच आहेस. तुला नमन असो. महाराज, तुमचा कृपाप्रसाद हाच विद्यापती गणेश होय. याची कृपा लाभली की मूढ बालकासही वाङ्मयप्रदेशात प्रवेश सुलभ होतो. गुरुनाथा, तुमच्या प्रेमळ वाणीने मुक्याला जरी गोंजारिले तरी तो प्रत्यक्ष बृहस्पतीशी ग्रंथ रचण्याच्या बाबतीत स्पर्धा करू शकतो. आपल्या दृष्टीचा प्रकाश ज्याच्यावर पडतो, आपला कोमल करकमल ज्याच्या मस्तकावर असतो तो जीव शिवपदावर आरूढ होतो. गुरुदेवा ! तुमच्या सामर्थ्याचे मी काय वर्णन करावे ? अहो, सूर्याच्या अंगाला कधी उटणे लावता येईल काय ? कल्पवृक्षावर शृंगार कितीसा चढविता येईल ? क्षीरसागराला कोणत्या पक्वान्नांचा पाहुणचार देता येईल ? कापुरास दुसरा सुवास कसा देता येईल ? चंदनाला उटी कोणती लावावी ? अमृताला कोणते अन्न पकवावे ? आकाशाला आणखी उंच कोणी व कसे करावे ? त्याप्रमाणे गुरूचा महिमा वर्णन करण्यासाठी कोठे साधन आहे ? म्हणून फारसा वाचाळपणा न करताच मी मुकाट्यानेच त्याला नमन करीत आहे. गुरुनाथा, ज्या वाणीच्या जंगलात वणवण करीत भटकले असता सार्थ अक्षरांच्या फळांचे नावही ऐकू येत नाही, अशी ही माझी रूक्ष वाणी आपणच विवेकाची कल्पलता बनवून सोडलीत. देहभावमय झालेली माझी बुद्धी तुम्ही ब्रह्मानंदाच्या भांडाराची खोलीच बनविली आहे. आता माझे मन गीतार्थरूपी समुद्रात खुशाल जलशयन करीत आहे.

**रिकाम्या तोंडून गोड गीता**

गीतेचा अर्थ सांगताना ज्ञानेश्वरांना सद्गुरुनाथांचा केव्हाही विसर पडत नाही. पंधराव्या अध्यायाच्या प्रारंभीच ते म्हणतात, आता मी माझ्या हृदयरूपी

चौरंगावर श्रीगुरुचरणांची स्थापना करतो. ज्ञानेश्वरांच्या गुरुप्रेमाला येथे तर भरते आलेले दिसते. श्रीगुरुचरणांची पूजा करताना ज्ञानेश्वरांच्या काव्यशक्तीस अर्थवाही शब्दांची जणू कारंजी फुटली आहेत. सर्व इंद्रिये हीच जणू उमललेली फुले असून ती ऐक्यभावाच्या ओंजळीत घेऊन ज्ञानेश्वर श्रीगुरूला अर्घ्य म्हणून वाहतात. भक्तिरसात्मक ऐक्यभावनेची वासना हीच चंदनाची उटी ते श्रीगुरूंच्या अंगाला लावतात. निर्मळ प्रेमरूपी चोख सोन्याच्या तोरड्या करून ते गुरुंच्या सुकुमार पायांत घालतात. अव्यभिचारभावाच्या शुद्ध प्रेमाची जोडवी त्यांच्या पायांच्या बोटांत चढवितात. आनंदाच्या सुवासाने फुललेले व अष्टसात्त्विक भावांचे आठ पाकळयांचे कमळ त्यांच्या पायांवर ते ठेवतात. अहंकाररूपी धूप जाळतात व गुरुचरणांना 'सोऽहम्' रूपी निरांजनाने ओवाळतात. आपला देह व प्राण या दोन खडावा ते श्रीगुरूंच्या चरणांखाली ठेवतात. भोग व मोक्ष हे निंबलोण करून ते ओवाळून टाकतात. श्रीगुरूच्या कृपाप्रसादानेच त्यांच्या वाणीला अलौकिक सामर्थ्य प्राप्त झालेले असते. या भाग्यामुळे ज्ञानास अगम्य असणारे व ध्यानासही असाध्य असणारे इंद्रियातीत असे ब्रह्मतत्त्व गुरुकृपेतून निघालेल्या शब्दांत असते. आणखी काय सांगावे ? ज्ञानेश्वर म्हणतात, गुरुप्रेमासारखे प्रेम मातेशिवाय अन्यत्र कोठेही आढळत नाही. या श्रीगुरूंनी आपल्या करुणेचा सारा ओघ माझ्यावर वळविला आहे. 'म्हणोनि रिकामे तोंड । करूं गेले बडबड । कीं गीता ऐसें गोड । आतुडलें ' (ज्ञाने० १५ : २१) नशीब अनुकूल असले की वाळूचेही रत्न होते, त्याप्रमाणे गुरुरायांनी माझा अंगीकार केला असल्याने संसारही मोक्षमय बनला आहे. या निवृत्तिनाथांनी माझ्या अजाणतेपणालाही ज्ञानाच्या तोलाला चढविले आहे.

**'स्तुति कांहीं न बोलणें'**

शेवटी अठराव्या अध्यायाच्या प्रारंभीही ज्ञानेश्वरांनी मुक्त कंठाने श्रीगुरूचा गौरव केला आहे. जयजयकार केला आहे. 'जय जय देव निर्मळ' या शब्दांतून ज्ञानेश्वर गुरूचेच वर्णन करीत आहेत. हा सद्गुरुनाथ ज्याची कल्पनाही करता येणार नाही असा कल्पवृक्ष आहे. या गुरूचे वर्णन मनाने, वाचेने करता येत नाही. शब्दांची जडणघडण बांधून स्तोत्रे कशी रचता येतील ? ज्ञानेश्वर म्हणतात, पण गुरुराजा, तुमचे स्मरण झाले की मला माझा विसर पडतो.

माझे मीपणच आपण पिटाळून लाविले आहे. महाराज, आपली स्तुती मी करावी तरी कशी? मौनावाचून दुसऱ्या कोणत्याच लेण्याने तुम्ही स्वत:ला सजवूच देत नाही. 'स्तुति काँहीं न बोलणें। पूजा कांहीं न करणें। सन्निधी कांहीं न होणें। तुझ्या ठायीं'- गुरुदेवा, तुमची स्तुती म्हणजे मौन, तुमची पूजाअर्चा म्हणजे कर्मांचा अभाव, तुमचे सान्निध्य म्हणजे तुमच्या ठिकाणी लय लावून शून्यत्वाला पोचणे....देवा, काही झाले तरी आम्ही बडबड करतो. तुम्ही करुणामाउली आहात, म्हणून सर्व काही सहन करावे झाले.

**'तेचि वंदूं श्रीचरण। श्रीगुरूचे'**

आपल्या गुरुकृपेचे, कृपादृष्टीचे वैभव ज्ञानेश्वरांनी असे अनेक प्रकारे गाऊन आपल्या मनातील सद्भाव व्यक्त केला आहे. तेराव्या अध्यायाच्या प्रारंभीच ते म्हणतात, 'जयांचे केलिया स्मरण। होय सकळ विद्यांचें अधिकरण। तेचि वंदूं श्रीचरण। श्रीगुरूंचे'– ज्याच्या स्मरणानेच सर्व विद्या शिष्याच्या ठायी येतात त्या श्रीगुरुचरणांना वंदन असो. त्याच्या नुसत्या स्मरणाने काव्यशक्ती जागृत होते व जिव्हेवर रसाळ वक्तृत्व उभे राहते. या वक्तृत्वाच्या गोडपणापुढे अमृत फिके पडते आणि प्रत्येक अक्षरागणिक रस सेवेकऱ्याप्रमाणे हात जोडून उभे राहतात. या श्रीगुरूंच्या स्मरणाबरोबरच रहस्याचा बोध होऊन आत्मबोध पूर्णपणे हाती येतो. या सद्गुरुकृपाबळावरच ज्ञानेश्वर असाध्य ते साध्य करून घेतात. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, 'तेणें कारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचें रूप दावीन। अतींद्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवीं' (ज्ञाने. ६ : ३६) या गुरुकृपेवरच मी निरूपण करून निराकार तत्त्वाला आकार आणीन, अतींद्रिय असलेल्या अनुभवास इंद्रियगम्य करून सोडीन. कारण हा सद्गुरुनाथ फार थोर आहे. यांनी माझ्या मस्तकावर हात ठेविला आहे. 'ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरूंनीं केलें कोडें। माथां हात ठेविला तें फुडें। बीजचि वाइलें (ज्ञाने. ६ : ४९२) चाडे म्हणजे बी पेरण्यासाठी पाभरीवर लाकडाचे पात ठेवतात ते. असे चाडेच मला या सद्गुरुनाथांनी केले असून माझ्या मस्तकावर हात ठेविला व आत पेरण्याचे बी घालून ठेविले आहे. अशा या गुरुकृपासंपन्न बीजाचा विस्तार पुढे पाचसहा शतके केवढा तरारून झाला हे सर्वांना माहीत आहेच.

# ३

# ' श्रीगुरूचें दार...सर्वस्वाचें सार '

**सद्गुरूसारखा सोयरा सज्जन**

आजकाल दिसणारे गुरुशिष्यांचे संबंध पाहता ज्ञानेश्वरांच्या अनुभवातील गुरुशिष्यसंबंध फारच वेगळ्या प्रकारचे दिसतील. गुरू नुसती विद्या देतो असे नव्हे, तर गुरूने दिलेल्या विद्येमुळे माणसाचा पुनर्जन्म होतो. ज्ञानचक्षूंमुळे त्याची दृष्टी बदलते, म्हणून शिष्याने करावयाच्या गुरुसेवेचे माहात्म्य फार मोठे सांगितले आहे, ' गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात्पर-ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ' असा श्रीगुरूचा महिमा असल्याने मोठ्या आदराने व श्रद्धेने गुरुसेवा करावी अशी संतांची आज्ञा आहे. खोट्या आणि भोंदू गुरूंबद्दल संतांनी खूप कडक टीका केलेली असली तरी परब्रह्मस्वरूप अस-णाऱ्या गुरूबद्दल त्यांचे मस्तक सदैव नम्र आहे. म्हणूनच ज्ञानदेवांसारखे संतमुकुटमणी अत्यंत आदरबुद्धीने म्हणतात :

सद्गुरुसारिखा सोयरा सज्जन । दाविलें निधान वैकुंठींचें ॥ १ ॥
सद्गुरु माझा जिवाचा जिवलग । फेडियला पांग प्रपंचाचा ॥ २ ॥
सद्गुरु हा अनाथ माऊली । कृपेची साउली केली मज ॥ ३ ॥
ज्ञानदेव म्हणे अवचित घडलें । निवृत्तीनें दिधलें निजबीज ॥ ४ ॥

‘ उघडे परब्रह्म सद्‌गुरुची मूर्ती ’

हा सद्‌गुरुनाथ माउलीप्रमाणे सतत कृपेची सावली करून रक्षीत असतो. ‘सद्‌गुरुवांचूनी संसारीं तारक । नसेचि निष्टंक आन कोण्ही । ’ असे ज्ञानदेवांना वाटते. इंद्र, चंद्र, ब्रह्मदेव जरी प्रसन्न झाले तरी जीवांच्या मनात संशय फेडून प्रभुकृपेचा आस्वाद त्यांना कधी देता येत नाही. परंतु ‘उघडें परब्रह्म सद्‌गुरुची मूर्ती । पुरविती आर्ती शिष्याचिया।’ सद्‌गुरुनाथ प्रत्यक्ष परब्रह्मच असल्यामुळे त्याच्या पायांवर नम्र होऊन असावे. ‘ज्ञानदेव म्हणे गुरूचा मी दास । नेणें साधनास आन कांहीं ’ । सद्‌गुरुसेवेवाचून दुसरे कोणतेही साधन करण्याची जरूरी नाही असे ज्ञानेश्वर सांगतात. हा श्रीगुरू अनादी व स्वयंसिद्ध असल्याचे ते ‘ प्रथम नमूं तो गुरुदेवो ’ या अभंगात सांगतात. मानवी मनाचे मूळ म्हणजे श्रीगुरू असून या ठिकाणी द्वैतभाव उरत नाही. या गुरूच्या रूपात दृश्य-अदृश्य जग सामावलेले असते. त्याच्या स्वरूपास उणेपणा कोठेच येत नाही. आकाशात ढगांच्या रूपांप्रमाणे नाना आकार निर्माण झाले तरी आकाश जसे अविकृतच राहते तसे या गुरूचे स्वरूप आहे. ‘ ऐसा सर्वां अतीत । परी ऐसा जगभरित । कनक कांकणी राहात । तैसा अविकृत निरंतर । ’ सुवर्णाच्या कंकणात जसे सोने त्याप्रमाणे हा श्रीगुरू सर्व वस्तूंत असला तरी सर्वांच्या पलीकडचा आहे. हा श्रीगुरू ज्ञानरूपाने जाणायचा असतो. त्यासाठी त्याची मनोभावे सेवा करायची असते. या गुरूची महती वर्णन करताना ज्ञानदेव आणखी एका अभंगात म्हणतात :–

चित्रीं सूर्यबिंब काढूं येईल चांग । प्रकाशाचें अंग काढतां नये ।। १ ।।
संन्याशाचें सोंग आणूं येईल सांग । अनुभवाचें अंग दावितां नये ।। २ ।।
ब्रह्मज्ञान मुखें बोलूं येंईल सांग । वैराग्याचें अंग आणितां नये ।। ३ ।।
ज्ञानदेव म्हणे गुरुकृपा सांग । तरीच हें भाग्य येईल हाता ।। ४ ।।

सूर्याचे बिंब चित्रात काढले तरी त्याच्यापासून प्रकाश कसा मिळणार ? संन्यासी माणसाचे सोंग घेतले तरी अंतरंगीचा अनुभव काही येणार नाही. तोंडाने ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलता येतील, पण खऱ्या वैराग्याचे महत्त्व अंगी बाणणे कठीण आहे. परंतु श्रीगुरूची पूर्ण कृपा झाली तर अशा प्रकारच्या स्वानुभवाचे सुख हाती येईल.

**सर्व भाग्यांची जननी – गुरुसेवा**

म्हणून या श्रीगुरूची उपासना कशी करावी ? किती विविधतेने व हळुवारपणे गुरूची सेवा करावी ? गुरूला सर्वस्व अर्पण करून आपण लीन कसे असावे ? गुरुचरणी वृत्ती निरंतर कशी कायम करावी ? नवविधा भक्तीच्या स्वरूपात श्रीगुरूचे पूजन कसे करावे हे ज्ञानेश्वरांनी 'आचार्योपासनम्' या शब्दावर तेराव्या अध्यायात भाष्य करताना विस्ताराने सांगितले आहे. त्यांच्या मताने ही गुरुसेवा म्हणजे सर्व भाग्यांची जननी आहे. कारण या गुरुसेवेमुळे ज्या जीवाची स्थिती केवळ शोक करण्यासारखी असते तो जीव ब्रह्मपदाला जाऊन पोचतो. आचार्योपास्ती म्हणजे गुरुसेवा कशी असावी यासंबंधी ज्ञानेश्वर एक पाठच आपणांपुढे ठेवीत आहेत. जलाची सर्व संपत्ती घेऊन नदी जशी समुद्राकडे जाते, अथवा महासिद्धान्तांसहित वेदविद्या जशी ब्रह्मपदी स्थिर व्हावी, अथवा जशी सती आपले पंचप्राण आपल्या सर्वस्वासहित प्रिय पतीस अर्पण करते, त्याप्रमाणे शिष्याने आपले सर्वस्व गुरुचरणी अर्पण करावे, त्याचे चित्त म्हणजे गुरुभक्तीचे माहेरघरच व्हावे. स्मरणभक्ती शिष्याने कशी आचरावी यासंबंधी मार्गदर्शन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'गुरुगृह जिये देशीं । तो देशचि वसे मानसीं । विरहिणी कां जैशी । वल्लभातें' (ज्ञाने० १३ : ३७५) एखादी विरहिणी ज्याप्रमाणे आपल्या चित्तात पतीचे चिंतन करीत असते, त्याप्रमाणे शिष्य आपल्या गुरूच्या निवासस्थानास सतत चित्तात जागा करून देतो. गुरुगृहाकडून वारा जरी आला तरी तो त्याला मोठ्या आवडीने सामोरा जातो. त्या वाऱ्यालाही तो साष्टांग दंडवत घालून 'घरी या ना' अशी विनंती करतो. खऱ्या प्रेमाच्या ओढीने हा शिष्य गुरुगृहाच्या दिशेशीच बोलतो व आपल्या जीवाला गुरुगृहीचा वतनदार करून सोडतो. वासरू जसे दूर गोठ्यात दाव्याने बांधलेले असते, त्याप्रमाणे त्याचे शरीर गुरूच्या आज्ञेवरूनच दूरच्या गावी डांबून राहिलेले असते.

**श्रीगुरूचा सतत ध्यास**

या शिष्याच्या मनात सतत ध्यास हाच असतो की, 'माझ्या गळ्यातील हे दावे कधी सुटेल ? माझा गुरुस्वामी मला केव्हा भेटेल ?' गुरुविरहाचा एक एक क्षण त्याला युगापेक्षा मोठा वाटतो. अशा त्याच्या मनःस्थितीत कोणी जर गुरूच्या गावचे त्याच्याकडे आले तर, किंवा गुरूनेच कोणास तरी मुद्दाम

पाठविले तर ? 'तरि गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ।' गुरूचा निरोप कोणा माणसाबरोबर आला तर मरणोन्मुखास आयुष्याचा लाभ झाल्यासारखे वाटते. या लाभाच्या भाग्याचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेस जणू उधाण आलेले दिसते. ते म्हणतात, ' कां सुकतया अंकुरा- । वरि पडलिया पीयूषधारा । ना ना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ।। ना तरी रंकें निधान देखिलें । कां आंधळेया डोळे उघडले । भणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ।। ' गुरूचा ध्यास मनास सतत असताना कोणी गुरुगृहीहून आले तर सुकणाऱ्या अंकुरावर अमृताचा वर्षाव व्हावा, अथवा लहानशा डबक्यातील मासा मोठ्या जलाशयात यावा, अथवा दरिद्री माणसाला गुप्त धनाचा ठेवा सापडावा, अथवा आंधळ्याला दृष्टी यावी, अथवा भणंगाला इंद्रपद लाभावे, तशी त्याच्या मनाची अवस्था होते. गुरुकुळाचे नाव ऐकल्याबरोबर तो सुखाने एवढा ओतप्रोत होऊन फुगतो, की मोठ्या प्रेमाने आकाशासच जणू तो कवटाळतो. अशी आवड गुरुचरणांशी ज्याची असते त्याच्यापाशी आत्मज्ञान नित्य असते.

**अर्चना व सख्यभक्ती**

हा शिष्य अर्चनद्वारे श्रीगुरूची पूजा कशी करतो ? आपल्या अंतःकरणात प्रेमगुणाच्या सामर्थ्याने तो श्रीगुरूची मूर्ती स्थापन करतो. तो स्वतःच श्रीगुरूचा परिवार बनतो. आत्मानंदाच्या मंदिरात ज्ञानाच्या चौरंगावर श्रीगुरूच्या मूर्तीला बसवून तो तिच्यावर अमृताची धार धरतो आणि ब्रह्म-बोधाच्या ज्ञानसूर्याचा उदय होताच तो बुद्धीची परडी सात्त्विक भावांनी भरतो व त्यांची लाखोली श्रीगुरुरूप शंकरास वाहतो. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी तो त्या मूर्तीपुढे जीवाभावाचा धूप जाळतो व ज्ञानरूप दीपाने तो श्रीगुरूला ओवाळतो आणि ब्रह्मैक्यभावाचा नैवेद्य श्रीगुरूस अर्पण करतो.

या शिष्याची सख्यभक्ती कशी असते ? हा शिष्य एखाद्या वेळेस ' जीवा-चिये सेजे । गुरु कांत करूनि भुंजे । ' कधी प्रेमाच्या कौतुकाने गुरुराजाला पती कल्पून त्याच्या संगतीचे सुख याची बुद्धिरूपी पत्नी भोगते. कधी याच्या चित्तात प्रेमाचे असे भरते येते की, तो त्याला क्षीरसमुद्र असे नाव देतो. या प्रेमसुखात तो ध्यानसुखाच्या निर्मळ शेषमंचकावर गुरुरूपी नारायण जल-संचयात निद्रा करीत असल्याचे पाहतो. या अवस्थेत आपल्या गुरूची सेवा

करावी असे त्याला वाटते. 'मग वोळगती पाय । ते लक्ष्मी आपण होय । गरुड होऊनि उभा राहे । आपणचि ।' या वेळी गुरुनारायणाचे पाय चुरणारी लक्ष्मी हाच होतो आणि जवळ हात जोडून उभा राहणारा गरुड हाच बनतो. या गुरुनारायणाच्या नाभिकमळातून जन्मणारा ब्रह्मदेव तोच होतो. श्रीगुरूच्या प्राप्तीचे मानसिक सुखाचे आस्वाद घेण्याच्या या रीती त्याला ठाऊक असतात. ज्ञानेश्वरांनी या सख्य अथवा वात्सल्यमय गुरुभक्तीचे वर्णन करताना आपला नेहमीचा दृष्टान्त वापरून म्हटले आहे, 'एकाधिये वेळे । गुरु माय करी भावबळें । मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरीं ।' कधी हा शिष्य श्रीगुरू ही आपली आई आहे अशी कल्पना करून तिच्या मांडीवर तो खेळतो, तिच्या स्तनपानाचे सुख भोगतो, किंवा चैतन्यरूपी वृक्षाच्या सावलीची गुरू ही धेनू असून आपण तिचे वासरू आहोत अशी कल्पना तो करतो. कधी हा शिष्य 'गुरुकृपा स्नेहसलिलीं । आपण होय मासोळी ।' कधी तो अशी कल्पना करतो की, गुरुकृपा ही जणू पर्जन्यवृष्टी असून आपण तिच्याखाली वाढणारे सेवावृत्तीचे रोप आहोत. त्याच्या गुरूच्या स्नेहाला काही सीमा आहे का? ज्याला अजून पंख व चोच नीट फुटली नाही असे लहानसे पक्ष्याचे पिलूच आपण आहोत असे तो मानतो. कधी हा शिष्य 'चक्षुपक्षेंवीण । पिलूं होय आपण ।' कधी तो गुरूला तारक समजून त्याची कास धरतो. कधी समुदाला भरती आल्यावर लाटांमागून लाटा येतात तशा गुरुकृपेच्या ऊर्मी त्याच्या मनात उद्‌भवतात.

### दास्याची ही परिसीमा

हा सर्वोत्तम शिष्य गुरूचे दास्य कसे करतो? याच्या मनात नेहमी असे येते की, आपण गुरूची निष्ठेने सेवा करून त्याला प्रसन्न करून घ्यावे. मग त्यांना आपण म्हणावे, 'स्वामीमहाराज, आपला सर्व परिवार मीच होईन. तुमच्या उपयोगाची सर्व उपकरणी मीच होईन.' असे मागणे हा स्वामीजवळ मागतो. गुरुराज आपली एकटयाचीच माऊली व्हावी अशी भीडही तो त्याला घालतो. त्याचे प्रेम तो असे वेधून घेतो की, तो त्याच्याशी एकपत्नीव्रताप्रमाणे वागतो. गुरू त्याच्याच भोवती नित्य वावरेल असे तो करतो. गुरुकृपेचा पिंजरा करून तो त्यात गुरूला ठेवतो. मग 'आपुलिया गुणांचीं लेणीं । करीन गुरुसेवे स्वामिणी । हें असो होईन गवसणी । गुरुभक्तीसीं ।'

गुरुसेवा स्वामिनीला मीं आपल्या गुणांचे सर्व दागिने अर्पण करून सजवीन, त्यानंतर 'गुरुस्नेहाचिये वृष्टीं । मी पृथ्वी होईन तळवटीं ।' गुरुकृपेच्या वृष्टीखाली तो भिजून चिंब होणारी पृथ्वी बनतो. 'म्हणे श्रीगुरूचें भवन । आपण मी होईन । आणि दास होऊनि करीन । दास्य तेथींचें ' आणि उदार श्रीगुरू जेव्हा जाता-येता घराचे उंबरठे ओलांडतील तेव्हा ते मीच होईन. द्वारपाळही मीच होईन असे हा शिष्य म्हणतो. मी त्यांच्या पादुका होईन, मीच त्यांच्या पायांशी त्या ठेवीन. मीच त्यांच्यावर छत्र धरीन. ते चालू लागले की मीच त्यांचा दिवटचा होऊन त्यांना वाट दाखवीन, त्यांच्यावर चवरी वारणारा मीच होईन. मीच त्यांची झारी होऊन त्यांना गुरळा देईन आणि त्यांची चूळ धारण करणारे तस्त मीच होईन. मी त्यांचे पानदान होईन. त्यांच्या विड्याचा चोथा मी घेईन. त्यांच्या स्नानाची तयारीही मीच करीन. 'होईन गुरूचें आसन । अलंकार परिधान । चंदनादि होईन । उपचार ते । ' मीच त्यांचा स्वयंपाकी होऊन त्यांना महानैवेद्य वाढीन आणि मी त्यांना पंचप्राणांनी ओवाळीन. जेव्हा श्रीगुरू भोजन करतील तेव्हा मी त्यांच्याजवळ बसेन व भोजनानंतर मीच त्यांना विडा देईन. 'ताट मी काढीन । सेज मी झाडीन । चरण संवाहन । मीचि करीन । ' मीच मंचक होईन व मग श्रीगुरू त्यावर बसतील.

**' इये शरीरींची माती '**

मग जेणेकरून श्रीगुरूचे मन रमेल असा विनोद व चमत्कार मीच करीन. त्यांचे श्रवण सुरू झाले की मीच शब्दांचा समूह होईन. 'श्रीगुरूचे डोळे । अवलोकनें स्नेहाळें । पाहाती तियें सकळें । होईन रूप । ' श्रीगुरू स्नेहदृष्टीने जे जे पाहतील ते ते मीच होईन. 'तिये रसने जो रुचेल । तो तो रस म्यां होइजेल' या गुरूंच्या जिभेला जो जो रस आवडेल तो तो मीच होईन. त्यांच्या नाकाला जो सुवास आवडेल तोही मीच होईन. याप्रमाणे सर्व वस्तुमात्र मी होऊन श्रीगुरूसेवेत रममाण होईन असे या शिष्याला वाटते. जोपर्यंत त्याच्या देहात प्राण आहे तोपर्यंत तो श्रीगुरूंची अशीच सेवा करील. इतकेच नव्हे, तर त्याच्या देहाचे पतन झाले तरी 'इये शरीरींची माती । मेळवीन तिये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाकती । श्रीगुरूचे । ' जेथे श्रीगुरूंचे चरण

असतील तेथे मी माझ्या शरीराची माती होईन. शिष्याचा पंचमहाभूतात्मक देह कसा विलीन होईल याचे मोठे सुरस वर्णन ज्ञानदेव येथे करताना म्हणतात, माझे श्रीगुरू ज्या पाण्याला स्पर्श करतील ते पाणी मीच होईन. ज्या दीपाने श्रीगुरूंना ओवाळले जाईल त्या दीपातील ज्योततत्त्व मी होईन. श्रीगुरूची चवरी अथवा पंखा जेव्हा फिरू लागेल तेव्हा त्यातील वारा मी होईन. ज्या ज्या स्थळी श्रीगुरूंचा निवास असेल तेथील आकाशतत्त्व मी होईन. मी अशा रीतीने जिवंत असेन अथवा मृत असेन, पण श्रीगुरूसेवेचे व्रत काही सोडणार नाही. ज्ञानेश्वर म्हणतात, अशा थोर वृत्तीच्या शिष्याला व त्याच्या गुरुसेवेला स्थलकालाचे बंधन राहणार नाही.

**‘ गुरु क्षेत्र गुरु देवता ’**

तो सेवेच्या बाबतीत कधी रात्र-दिवस म्हणत नाही, थोडेफार जाणीत नाही, उलट गुरूच्या कठोर आज्ञेने तो अधिकच ताजा टवटवीत होतो. श्रीगुरूंनी सांगितलेले काम आकाशाएवढे असले तरी तो एकटाच ते उरकून टाकतो. गुरूचे कार्य पूर्ण करण्यासाठी शरीर व मन यांच्यांत स्पर्धा सुरू होते. एखाद्या वेळी गुरूनं थट्टेने काही शब्द उच्चारले तरी ते खरे करून दाखविण्यासाठी जीव ओवाळून टाकतो. हा शिष्य गुरुसेवा करूनच देह झिजवितो, आणि गुरुप्रेमाने पुष्ट होतो. ‘जो गुरुकुळें सुकुलीनु। जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु’ हा शिष्योत्तम गुरुकुळाने स्वतःला कुलीन समजतो. गुरुबंधूशी सौजन्याने वागतो. याच्या बाबतीत ‘गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम।’ गुरुसंप्रदायाचे नियम हेच त्याचे वर्णाश्रमधर्म होतात आणि गुरुभक्ती हे त्याचे नित्यकर्म होते. ज्ञानेश्वरांनी गुरुसेवेचे सार सांगताना म्हटले आहे, ‘गुरु क्षेत्र गुरु देवता। गुरु माता गुरु पिता। जो गुरुसेवेपरौता । मार्गु नेणे ।। श्रीगुरूचें द्वार। जें जयाचें सर्वस्व सार। गुरुसेवकां सहोदर–। प्रेमें भजे ’– श्रीगुरूसच तो क्षेत्र, माता, पिता, देवता मानतो, श्रीगुरूचे दार हेच त्याचे सारसर्वस्व असते. आपल्या गुरूच्या सेवकांना तो सख्ख्या भावाप्रमाणें मानतो.

**तत्त्वज्ञानाचा ठावो श्रीगुरुनाथ**

या शिष्याच्या तोंडात नेहमी श्रीगुरुनामाचाच मंत्र असतो. गुरुवाक्यावाचून त्याला दुसरे कोठले शास्त्र माहीतच नसते. श्रीगुरुचरणांचे पाणी त्याला त्रिभुवनांतील तीर्थाहून श्रेष्ठ वाटते. श्रीगुरूचे उष्टे अन्न जर त्याला

मिळाले तर त्याच्यापुढे त्याला समाधिसुखाचे महत्त्व काहीच वाटत नाही. श्रीगुरू रस्त्याने चालले की त्यांच्या पायांपासून जे धुळीचे कण निर्माण होतात त्यांतला एक जरी त्याला मिळाला तरी मोक्षसुखाच्या बदल्यात तो त्याचा स्वीकार करील. आणखी आता त्याच्या गुरुभक्तीचा विस्तार किती म्हणून करावा? गुरुसेवेशिवाय त्याला काहीच गोड लागत नाही. म्हणून हा शिष्य म्हणजे 'तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आवो । हें असो तो देवो । ज्ञानभुक्त ।' हा शिष्योत्तम म्हणजे खरोखर तत्त्वज्ञानाचा आधार असतो. किंबहुना ज्ञानास आकार त्याच्यामुळेच येतो. एवढे सांगून ज्ञानेश्वर म्हणतात, 'खरोखर त्या भक्ताच्या ठिकाणी ज्ञान अगदी मुक्तद्वाराने राहते. आणि ते इतके असते की साऱ्या जगाला ते पुरून उरते. श्रोतेहो ! अशा या गुरुसेवेबद्दल माझ्या मनात उत्कंठा असल्यामुळेच मी एवढा पाल्हाळ केला; नाही तर मी हात असूनही थोटा, भजनाच्या जपणुकीविषयी आंधळा, पाय असून पांगळा, तोंड असून मुका असलो तरी माझ्या मनात मात्र गुरूविषयी अपार प्रेम आहे.'

### 'गुरु परब्रह्म गुरु माता पिता'

अशी ही ज्ञानेश्वरांची गुरुसेवेची भावना पुढे संतवाङ्मयात आणखीनच परिपुष्ट झालेली दिसेल. 'ज्ञानाचा एका' म्हणून ज्या एकनाथांचे वर्णन करतात त्या एकनाथांनी जनार्दनस्वामींची याच गुरुनिष्ठेने सेवा केली आणि तिचे माहात्म्यही त्यांनी आपल्या भागवतात व अभंगांतून गाइले आहे. ज्ञानेश्वरांचे सद्गुरू निवृत्तिनाथ व निवृत्तिनाथांचे सद्गुरू गहिनीनाथ. या नाथपरंपरेतही गुरूची महती विशेषच सांगितली जाते. 'आम्हां हेंचि थोर सद्गुरुविचार । नलगे संप्रधार नाना मतें,' 'चराचरीं हरि गुरुमुखें खरा । माजि ब्रह्म सैरा विचारों आम्हीं,' 'विस्तार हरीचा चराचर झालें । त्यामाजीं सानुलें गुरुदैवत', 'गुरु परब्रह्म गुरु माता पिता । गुरूनें समता दाखविली', 'धन्य माझा भाव सद्गुरु उपदेश । सर्व हृषिकेश दावियेला ।। हरिवीण दुजें नेणें जो सहजें । तया गुरुराजें अर्पियेलें' इत्यादी ओळींतून निवृत्तिनाथांनीही जो गुरुमहिमा गाइला तोच ज्ञानेश्वरांच्या वृत्तीत मुरलेला दिसतो. ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगांतून व प्रबंध ग्रंथांतून याच गुरुमाहात्म्याचे वर्णन परोपरीने केले आहे. त्यांच्या अनुभवामृतात तर 'सद्गुरुवंदन' आणि

'श्रीसद्‌गुरुस्तवन' या दोन विषयांवर मोठे बहारदार विवेचन आहे. ज्ञानेश्वरांच्या मताने गुरुतत्त्व आणि ब्रह्मज्ञान या दोन वस्तू नसून दोनही ठिकाणी एकाच सत्तेचे अस्तित्व आहे. शिवशक्तीसह नांदणाऱ्या प्रणवासही प्रकाशित करणारे परमात्मतत्त्व गुरुस्वरूप असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**'लघुत्वाचेनि मुदलें । बैसला गुरुत्वाचे सेले'**

अनुभवामृतात सद्‌गुरूचा महिमा वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, परमेश्वराच्या प्राप्तीचे नाना उपायरूपी वनात सद्‌गुरू वसंत ऋतूप्रमाणे प्रफुल्लितपणा आणतात व ब्रह्मविद्येचे अखंड सौभाग्य प्राप्त करून देतात. अज्ञानमय व अंधकारमय अशी निद्रारूपिणी माया हीच कोणी एक हत्तीण आहे. तिचा नाश करून स्वस्वरूपाचे ज्ञान श्रीगुरुनाथ करून देतात. सद्‌गुरूच्या बोधचंद्राचा उदय झाला की पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंचप्राण व सोळावे मन अशा सोळा कलांचा उदय होतो व मग अंधारास थाराच उरत नाही. गुरूतत्त्वाचा अनुभव कसा येतो याचे मार्मिक व तात्त्विक विवेचन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'एकपण नव्हे सुवास । म्हणोनि गुरुशिष्यपणाचे करूनि मिस । पाहणेंचि आपुली वास । पाहतसें' (अमृ. २–१३) त्या गुरुतत्त्वासही एकटेपणाने कोठे करमते ? म्हणून सद्‌गुरूच शिष्यत्वाची भूमिका घेतात. म्हणजे शिष्य हे एक गुरूचेच स्वसुखार्थ निर्माण झालेले रूप आहे. या सद्‌गुरूची कृपा एकदा झाली की मग अविद्येचे हल्ले मागच्या मागेच परततात.

पुढे एका ओवीत ते म्हणतात, 'जयाचेनि सावायें । जीवु ब्रह्मोपरू लाहे । ब्रह्म तृणातलीं जाय । उदासें जेणें' (अमृ. २–१६) सद्‌गुरूच्या कृपेनेच जीवास परब्रह्मरूपता येते; सद्‌गुरू आहेत म्हणून ब्रह्मास महत्त्व आहे. सद्‌गुरूच जर उदास राहिले तर त्या परब्रह्मासही कोण विचारते ? त्याला काडीचीही किंमत नाही ! सद्‌गुरूच्या अभावी ब्रह्मास किंमत ती काय ? सद्‌गुरूच्या कृपेनेच वेदरूपी वृक्षांची अर्थरूपी फळे प्राप्त होतात. सद्‌गुरूच्या महत्त्वाबरोबर शिष्याचेही महत्त्व वाढते; अथवा शिष्यामुळेंच गुरूला गुरुपणा येतो. 'लघुत्वाचेनि मुदलें । बैसला गुरुत्वाचे सेले । नासूनि नासिलें । सदैव जो' ( अमृ. २–२० ) शिष्याच्या लघुत्वाच्या भांडवलावर सद्‌गुरुनाथ हे आपल्या गुरुत्वाच्या उच्चासनावर विराजमान होतात. शिष्याचा

शिष्यपणा गेला की गुरूचे गुरुत्वही संपेल. अमृतानुभवातील ज्ञानेश्वरांचे हे सद्‌गृरुस्तवन अती उंच स्थानावर शोभून दिसणारे आहे.

## शिष्य आणि गुरु एकच

ज्ञानेश्वर म्हणतात, शिष्याला आपल्या स्थानावर बसविणाऱ्या सद्‌गुरु-नाथांचे वर्णन तरी किती करावे ? ' तेथे नमनें कां बोलें। केउतें सुयें पावुलें ? ' या सद्‌गुरुनाथांचे शब्दांनी वर्णन करण्यासाठी कशी पावले उचलावीत ? शिवाय या गुरुनाथाचे वर्णन करावे तर आपलेच वर्णन व्हायचे; कारण सद्‌गुरूच स्वसुखार्थ शिष्यपणाच्या पदवीस येतात. ' म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु। या दोहों शब्दांचा अर्थु। श्रीगुरूचि परि होतु। दोहीं ठायीं (अमृ. २-६१) गुरू आणि शिष्य एकत्र कसे नांदतात? ' कां सुवर्ण आणि लेणें। वसतें एकें सुवर्णें। वसतें चंद्र चांदणें। चंद्रींच जेवीं ' (अमृ. २-६२) सोने आणि सोन्याचा दागिना एकाच सुवर्णात नांदतात, चंद्र आणि चांदणे एकाच चंद्रात असतात, त्याचप्रमाणे शिष्यमिषाने श्रीगुरूच नाँदत आहेत. ' नाना कापुर आणि परिमळु। कापुरचि केवळु। गोडी आणि गुळु। गुळचि जेवीं ' (अमृ. २-६३) कापूर आणि त्याचा वास, गूळ आणि त्याची गोडी; त्याचप्रमाणे शिष्य आणि गुरू हे केवळ एक सद्‌गुरुमयच आहेत. फक्त प्रेम-सुखासाठी गुरु-शिष्य हे द्वैत निर्माण होते. हा शिष्य मग गुरुसेवा करून अद्वैताच्या प्रेमसुखाची अनुभूती घेतो.

## ' गुरु हा संतकुळींचा राजा '

ज्ञानेश्वरांचे हे सद्‌गुरुतत्त्व अतिशय महत्त्वाचे व उच्च दर्जाचे आहे. या गुरुतत्त्वाच्या अनुभूतीमुळेच शिष्यास श्रेष्ठत्व येते. सद्‌गुरूसारखा पाठीराखा असताना शिष्याला कसलीच भीती नसते. राजाची कांता काय कधी भीक मागते ? थोर गुरूचा शिष्य कधी उदास वा अज्ञानी राहील ? ज्ञानदेव एका अभंगात निर्वाळा देतात, ' ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों। आतां उद्धरलों गुरुकृपें। ' सद्‌गुरुनाथाच्या महिम्याचे एक सर्वोत्तम उपनिषद् म्हणजे त्यांचा ' गुरु हा संतकुळींचा राजा ' हा श्रेष्ठ अभंग होय, ज्या गुरूने ज्ञानदेवांना तारकमंत्र दिला त्याचे माहात्म्य वर्णन करताना ते म्हणतात :

गुरु हा संतकुळींचा राजा । गुरु हा प्राणविसावा माझा ।
गुरुविण देव दुजा । नाहीं नाहीं त्रिलोकीं ॥ १ ॥
गुरु हा सुखाचा सागरू । गुरु हा प्रेमाचा आगरू ।
गुरु हा धैर्याचा डोंगरू । कदाकाळीं डळमळीना ॥ २ ॥
गुरु वैराग्याचें मूळ । गुरु हा परब्रह्म केवळ ।
गुरु सोडवी तात्काळ । गाठ लिंगदेहाची ॥ ३ ॥
गुरु हा साधकासी साह्य । गुरु हा भक्तालागी माय ।
गुरु हा कामधेनु गाय । भक्ताघरीं दुभतसे ॥ ४ ॥
गुरु घाली ज्ञानांजन । गुरु दाखवी निजधन ।
गुरु सौभाग्य देऊन । साधुबोध नांदवी ॥ ५ ॥
गुरु भक्तीचें मंडण । गुरु दोषांचें दंडण ।
गुरु पापाचें खंडण । नानापरी वारितसे ॥ ६ ॥
काया काशी गुरु उपदेशी । तारक मंत्र दिला आम्हांसी ।
बाप रखुमादेवीवरासी । ध्यान मनासी लागलें ॥ ७ ॥

४

# नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी

**बहुजनांची ओढ**

श्रीज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा नाथपंथीय असली तरी त्यांनी योगधारणेपेक्षा सर्वसामान्य जनांसाठी नामसंकीर्तनावर भर दिलेला आहे. नाथपंथीयांचे आदिदैवत शिवसुद्धा रामनामाचा जप करताना दिसते. ज्ञानेश्वर हे योगी-सम्राट तर खरेच; ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात त्यांनी योग व योग्याची ध्यानधारणा यांचे मोठे काव्यमय वर्णन केले असले, तरी हा मार्ग फार थोड्या लोकांसाठी आणि कष्टाचा असल्याचे त्यांचे मत होते. श्रीज्ञानेश्वरांचे सारे लक्ष बहुजनसमाजाकडे असल्याने त्यांनी योगमार्गापेक्षा नामसंकीर्तनावर आधारलेल्या भक्तिमार्गाचा पुरस्कार केला आहे. एक तर नामसंकीर्तन वा चिंतन नित्याचा व्यवसाय करतानाही साधता येते. त्यासाठी घरदार, प्रपंच, व्यवहार सोडावा लागत नाही; आणि दुसरे असे की, ' उत्तमापासुनी अंत्यजा-वरी ' कोणासही या मार्गाने बिनधोकपणे जाता येते.

**' विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा '**

योगयागादी मार्ग कष्टाचे, त्रासाचे आहेत. मंत्रतंत्रात थोडी जरी चूक झाली तरी विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. नामस्मरणाचे तसे

नाही. 'मंत्रचळे पिसें लागतें सत्वर' असे पुढे तुकोबांनी सांगून निर्णय दिला आहे की, 'विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा.' ज्ञानदेवही सांगतात, 'विठ्ठल उघडा मंत्र कळिकाळा त्रास.' विठ्ठल हा मंत्र सोपा, सोयीचा असून त्याचा धाक प्रत्यक्ष यमालाही असतो. म्हणूनच हरिपाठात नामस्मरणाचे महत्त्व सांगून ज्ञानदेवांनी म्हटले आहे, 'योगयाग विधी येणें नोहे सिद्धी । वांयाचि उपाधी दंभ धर्म–' योगयाग, जपतपादी साधने करून नाना प्रकारच्या सिद्धी प्राप्त झाल्या तरी त्यामुळे श्रीहरीची प्राप्ती मात्र होणार नाही. उगाच दंभ मात्र वाढेल. नाना उपाधी आड येऊन धर्माचा खोटा अभिमान मात्र वाढेल. म्हणून ज्ञानदेव निक्षून सांगतात, 'अष्टांग योगें न शिणिजे । यमनेम निरोध न कीजे रया ।' नाममाहात्म्य सांगताना एका प्रसिद्ध अभंगात ज्ञानदेव म्हणतात :

तत्त्वमस्यादि वाक्य उपदेश । नामाचा अर्धांश नाहीं तेथें ।
म्हणोनि नामसंकीर्तन करितां । जवळी जोडलासि आतां ।
क्षणभरी न विसंबे । जिवाचिया जीवना रया ।। १ ।।
नाम निजधीर गर्जती वैष्णववीर । कळिकाळ यमाचे भार पळाले तेथें ।।२।।
म्हणोनि नाम वज्रकवच । तोचि निर्गुणाचा अभ्यास ।
पाहे पां स्वयें प्रकाश विचारूनि । ऐसें सुंदर रूपडें हृदयीं ।
धरिलें आतां पाहतां । केवीं होये पुनर्योनि रया ।। ३ ।।
ऐसा सकळां अकळ कळता । हृदयीं धरिता समताबुद्धी ।
बापरखुमादेवीवरु विठ्ठलु चिंतितां । तुटली जन्माची आधिव्याधि रया ।।४।।

'तत्त्वमसि' म्हणजे तूच परब्रह्म आहेस अशा अर्थाच्या महावाक्याचा उपदेश हरिनामाच्या अर्ध्या भागाइतकाही नाही. परंतु नामसंकीर्तनामुळे मात्र श्रीहरीची प्राप्ती सहजासहजी होते. धैर्यवान अशा वैष्णववीरांनी नामाचा गजर सुरू केला की यमदूत पळून जातात. हरिनाम हे वज्रकवचाप्रमाणे आहे. स्वयंप्रकाशरूप नामस्मरणाने श्रीहरीचे सगुणसुंदर रूप हृदयात स्थिर होईल आणि मग पुन: जन्म कधी येणार नाही. नामस्मरणाचे माहात्म्य गाणारे अनेक अभंग ज्ञानेश्वरांचे आहेत. 'अशौचिया जपों नये । आणिकांतें ऐकों नये । ऐसिया मंत्राते जग बिहे । त्याचें फळणें थोडें परी क्षोभणें बहुत । तैसा मंत्रराज नव्हे रे रे ।' या एका अभंगात त्यांनी सांगितले आहे की,

अशुद्ध, अपवित्र असणाऱ्यांनी वैदिक मंत्रांचा जप करायचा नसतो. शूद्रादिकांनी तर तो ऐकायचाही नसतो. अशा या मंत्राला सारे जग भिते. या मंत्रांमुळे फलप्राप्ती थोडी, त्रास मात्र जास्त. थोडी चूक होताच चित्ताचा क्षोभ मात्र होणार. तसा रामनामाचा मंत्र नाही. सर्व मंत्रांचा हा राजा आहे. हातांत टाळ घेऊन, हात वर करून श्रीहरीचे भजन करावे. ' काय करील यागें न सिणावें योगें । हें तों व्यसनाचे वाउगें । नरहरि नरहरि उदंड वाचा म्हणाल जरी । तरी कळिकाळ राहिल उगा रे रे ।। ' यज्ञयागाची वृथा खटपट कशाला ? हे व्यसन उगाच आहे. यापेक्षा नरहरी नरहरी असा वाणीने उच्चार केला तर प्रत्यक्ष यमही तुमच्याकडे पाहून थबकेल. कारण या श्रीहरीच्या चरणांपासून सर्वांना पावन करणारी गंगा निर्माण झाली. याच्याच चरणांपासून अहल्येचा उद्धार झाला. याच श्रीहरीमुळे पार्वतीला प्रतिष्ठा लाभली. या श्रीहरीच्या नामाचा आश्रय केल्याने सर्व तीर्थें तुमचेच भजन करतील, अमरपुरीचे देव तुमचे पूजन करतील. तुम्ही जसा भाव मनात धराल तसा देव तुमच्या समोर उभा राहील. हा रखुमादेवीचा पती श्रीविठ्ठल तुमचा ऋणाईत नामस्मरणामुळे होईल.

**योगक्रियांपेक्षा नामस्मरण मोठे**

योगयागापेक्षा नामसंकीर्तनाचा मार्ग याप्रमाणे सोपा व खात्रीचा असल्याचे ज्ञानेश्वर परोपरीने सांगतात : ' ॐ नमो भगवते वासुदेवाया । वोडियाणा बंदु देहुडा वालुनि लागसील पावो ' असा एक त्यांचा दीर्घ-अभंग असून त्यातही त्यांनी हटयोगादी क्रियांपेक्षा नामस्मरणाचा महिमा गाइलेला आहे. शिस्न व गुद यांच्यामधील जागेत पायाची टाच लावून ओढियाण बंधाची किती जरी खटपट केलीस आणि जगात ओतप्रोत भरून असलेला परमात्मा सोडून मनात उगाच अहंभाव धरून राहिलास तरी तुला ॐकार बिंदू परमात्मा कधीही प्राप्त होणार नाही. म्हणून तू द्वारकेचा राणा श्रीकृष्ण यास शरण जा व ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' असा द्वादशाक्षरी मंत्र जप. कुंडलिनी नागीण जागी करणे, नवद्वारांचा निरोधं करणे; अशी योगपद्धती अती कठीण असल्याने अखंडपणे परमेश्वराचे नामस्मरणयुक्त चिंतन करणे हाच एक सुलभ असा परमात्मप्राप्तीचा मार्ग आहे. योगसाधनेच्या खटाटोपात उगाच तुझ्या हातापायांची मोडतोड मात्र होईल. मरणाचा प्रसंग व्यर्थ येईल. त्यापेक्षा

मुकुंदाच्या पायांशी लीन हो ना. जोपर्यंत हातापायांची नीट हालचाल होत आहे, बुद्धी व इंद्रिये टवटवीत आहेत, तोपर्यंतची भगवंताची आराधना तू करावीस. असे सांगताना ज्ञानेश्वर याच अभंगात आपल्या नेहमीच्या पद्धती-प्रमाणे एकापेक्षा एक सरस असे दृष्टान्त देत आहेत. वनामध्ये सिंह असल्या-वर हत्तीने अभिमान का धरावा ? दग्ध झालेल्या बीजाला का अंकुर फुटेल ? वज्रपाणी इंद्र कोपल्यावर पर्वताने समुद्राचे उल्लंघन करावे ? त्याचप्रमाणे ज्याच्या मुखात श्रीहरीचे नाम आहे त्याला संसारदुःख कोठले ? सोसा-ट्याच्या वाऱ्याने आकाशातील मेघांचा समुदाय विखरून जातो ना ? कमळाच्या पानांवर पाण्याचे बिंदू ठरत नाहीत ना ? माकडाच्या हातात चिंतामणी कसा टिकेल ? त्याचप्रमाणे वासुदेवाचे चिंतन करणाऱ्या भक्ता-जवळ पातके राहतीलच कशी ?

**‘ दुःखाचाचि वांटा । भागा आला ’**

योगयागादी कर्मकांडापेक्षा अशा रीतीने नामस्मरणाचा वा कीर्तनाचा मार्ग सुलभ असल्याचा अभिप्राय ज्ञानेश्वरीतही सापडतो. ‘ ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ’ अथवा ‘ क्लेशोऽधिक तरस्तेषाम् ’ या गीतेतील श्लोकांवरील बाराव्या अध्यायातील भाष्य या दृष्टीने महत्त्वाचे आहे, निर्गुणाचे उपासक योगमार्गाच्या वाटेस जाऊन काय काय खटपट करतात हे सांगून झाल्यावर ज्ञानेश्वर म्हणतात, ‘ वांचूनि योगाचेनि बळें । अधिक कांहीं मिळे । एसें नाहीं आगळें । कष्टचि तया ’ (ज्ञाने. १२ : ५९) योगाचरणात विशेष काही लाभ होतो असे नाही. उलट श्रम मात्र अधिक होतात. ज्ञानेश्वरांच्या मते हा हठयोग म्हणजे ‘ अग्निप्रवेश नीच नवा । भ्रतारेंवीण ’– पती नसतानाच नित्य होणाऱ्या अग्निप्रवेशाप्रमाणे हा योग आहे. म्हणून ते स्पष्टपणे सांगतात, ‘ म्हणोनि योगाचियां वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वांटा । भागा आला ।। पाहें पां लोहाचें चणे । जैं बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें कीं प्राणें । शुद्धी म्हणों ।। म्हणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि केंही । कां गगनामाजीं पाईं । रकेलिजतु असे ।। वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी । सूर्याची पाउटी । कां होय गा ।। यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेवीं देहवंता जीवां । अव्यक्तीं गति ।। ऐसाही जरी धिवसा । बांधोनियां आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ।। म्हणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोटंगले ।।

ग्रंथ क्रमांक 50059 22916


(ज्ञाने १२ : ६९-७५). म्हणून अर्जुना, योगाच्या वाटेने माझ्या प्राप्तीसाठी निघाले त्यांच्या वाट्यास केवळ दुःखच आले. बोचऱ्या माणसास जेव्हा लोखंडाचे चणे खाण्याचा प्रसंग येतो तेव्हा ते पोट भरणे म्हणायचे की त्याचा प्राणाशी वियोग म्हणायचा ? बाहूंनी समुद्र तरून जाणे शक्य आहे काय ? आकाशातील पोकळी पायांनी चालून जाता येईल ? युद्धाच्या ऐन गर्दीत अंगावर घाव न घेता सूर्यमंडळाचा भेद करून जाता येईल काय ? पांगळा मनुष्य कधी वायूशी स्पर्धा करील का ? त्याप्रमाणे देहधारी जीव अव्यक्ताच्या उपासनेत यशस्वी होऊ शकत नाही. मोठ्या धैर्याने ते निर्गुणाच्या मागे लागतील तर त्यांना दुःखच होईल. सारांश, भक्तिमार्गास जे लागले त्यांच्या वाट्यास मात्र दुःख येत नाही.

**' नाम पवित्र आणि परिकरु '**

या सर्व पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरांनी ' नाम पवित्र आणि परिकरू । कल्पतरूहुनी उदारू ' म्हणून सांगितले आहे. ' सकळ मंगळनिधी । श्रीविठ्ठलाचें नाम आधीं ' अशी त्यांची निष्ठा आहे. ' प्रेमाचा जिव्हाळा नाम मुखासी आलें । सार्थक पैं जालें संसाराचें ।। केशवनाम सार विठ्ठल उच्चार । राम निरंतर हृदयीं वसे ', ' सार सार सार विठोबा नाम तुझें सार । म्हणोनि शूळपाणी जपताहे वारंवार ', ' सकळ धर्मांचें कारण । नामस्मरण हरिकीर्तन, ' ' प्रेम जयाचें कथेवरी । तोचि धन्य ये चराचरीं, ' ' यश कीर्ति वानुं नेणे मी वाखाणूं । रामकृष्ण आम्हां सणु नित्य दिवाळी, ' अनंत नामाचें पाठांतर । रामकृष्णनाम निरंतर ' अशा शेकडो वचनांतून ज्ञानेश्वर महाराज नामसंकीर्तनाची महती गाताना दिसतात. ' हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करीं ? ' असा त्यांचा आग्रह आहे. ' विष्णुवीण जप व्यर्थ त्याचें ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें, ' ' नामासी विन्मुख तो नर पापिया । हरिवीण धांवया न पवे कोणीं ', ' ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध, ' ' हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रें, ' ' हरि उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाधा भेणें तेथे, ' ' रामकृष्ण उच्चार अनंत राशी तप । पापाचे कळप पळतीं पुढें । हरि हरि हरि हा मंत्र शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष, ' ' रामकृष्ण नामीं उन्मनीं साधिली । तयासी लाधली सकळ सिद्धी ' इत्यादी हरिपाठातील वचनांतून ज्ञानेश्वर नामाचे महत्त्व सांगत आहेत.

### ' हरिवीण नेम नाहीं दुजा '

ज्ञानेश्वरांच्या मताने साऱ्या वेदांचे, शास्त्रांचे, स्मृतींचे सार एकच आहे; ते म्हणजे प्रभूचे नामसंकीर्तन. हरींच्या नामाचा पाठ जे करतील ते सुवासिक फुलांच्या कळीत जसा भ्रमर गुंतून राहतो त्याप्रमाणे श्रीहरीच्या स्वरूपात एकचित्ताने स्थिरावून राहतील. हरिनाम हाच मंत्र, हेच शास्त्र. श्रीहरीचे नाम नित्याने घेणारे जे कोणी आहेत ते प्रभूला प्रिय होतात. ' नारायण हरि नारायण हरि। भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ' असे ज्ञानेश्वरांचे सांगणे आहे. ' एकतत्त्व नाम दृढ धरीं मना । हरीसी करुणा येईल तुझी । तें नाम सोपारें रामकृष्ण गोविंद । वाचेशीं सद्गद जपे आधीं ॥ नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिक पंथा जाशी झणीं । ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं। धरोनि श्रीहरि जपे सदा ' अशा एका अभंगात. ज्ञानेश्वर जणू नामतत्त्वाचे विवरण करताना दिसतात. आणखी एका अभंगात ते म्हणतात :

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंत कोडी गेलीं त्यांचीं ॥ १ ॥
अनंत जन्मांचें तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥ २ ॥
योगयाग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं ॥ ३ ॥
ज्ञानदेवीं यज्ञयाग क्रियाधर्म । हरिवींण नेम नाहीं दुजा ॥ ४ ॥

श्रीहरीचे नामसंकीर्तन हाच वैष्णवांना झालेला एक मोठा लाभ असून त्याच्यामुळे त्यांची अनंतकोटी पातके नाहीशी होतात. अनंत जन्मांच्या तपाचे फळ म्हणजेच श्रीहरीचे नामस्मरण होय. श्रीहरीच्या नामाचा पाठ हाच सर्व मार्गांतील उत्तम व सुगम मार्ग आहे. नाना प्रकारचे योगयागादी मार्ग, नाना साधने, क्रियाकर्मे, धर्माधर्म ही सर्व माया असून ती श्रीहरीच्या नामस्मरणाने लयास जाते. ज्ञानेश्वरांच्या मताने श्रीहरीच्या नामातच यज्ञयाग, क्रिया, धर्म असे सर्व काही येते.

### चंदनाहून शीतळ नाम

या रामनामाचे केवढे महत्त्व पाहा. ' रामनाम वाट हेंचि पैं वैकुंठ । ' रामनाम हीच खरी वैकुंठास पोचण्याची वाट आहे. ज्ञानेश्वर याच अभंगात आश्वासन देतात की, ' ऐसी भगवद्गीता बोलतसे ' । अठरा पुराणे, सहा शास्त्र, चार वेद या सर्वांचे सार रामनाम हेच आहे. हे नाम प्रत्यक्ष शिव-

शंभूने उच्चारले असल्याची नोंद ज्ञानेश्वर अनेकदा करतात. ' जें शंभूनें धरिलें मानसीं । तेंचि उपदेशिलें गिरिजेसी ।। नाम बरवें बरवें । निज मानसीं धरावें ।। जें गंगोदकाहुनी निकें । गोडी अमृत जालें फिकें ।। शीतल चंदनाहुनी वरतें । सुंदर सोनिमाहुनी परतें ।। भुक्ति मुक्तिदायक । भव-बंधनमोचक ' अशा मोठ्या काव्यमय भाषेत ज्ञानेश्वर मोठ्या प्रसन्न वृत्तीने नाममहिमा गाताना दिसतात. ' शिव भवानी उपदेशी प्राणप्रिये । निजमानसीं ध्याये परमानंदु ' या एका अभंगात ज्ञानदेव म्हणतात, ' भगवान शिवशंकर आपल्या प्रिय पत्नीस, पार्वतीस उपदेश करतात, ' पार्वती, तूही रामचंद्राचे ध्यान करीत जा. हा श्रीहरी अथवा रामचंद्रच आपला सखा आहे. श्री-विष्णूच्या सहस्रनामांत कळसरूपाने शोभणारे हे नाम आहे. याचे स्मरण हाच खरा आपला धर्म आहे. नाम हेच परब्रह्म जाणून घेण्याचे साधन आहे. ' जिवांचे जीवन मनाचें मोहन । सुखाचें साधन भक्तिज्ञानाचें अंजन ' अशी या नामाची महती आहे.

**अशी नामभक्तांची नामावली**

शिवानंतर या रामनामाचा जप कोणी कोणी केला ? ' नाम प्रल्हाद उच्चारी । तया सोडवी नरहरी । उचलूनी घेतला कडियेवरी । भक्त सुखें निवाला ' या एका अभंगात ज्ञानेश्वरांनी नामस्मरण करणाऱ्या भक्तांची नामावलीच दिलेली आहे. ध्रुव, उपमन्यू, अजामेळ, वाल्या कोळी इत्यादी नामानेच तरले असल्याचे ज्ञानदेव सांगतात. या श्रीहरीला नरहरी, राम, हरी, गोपाळ अशी नावे असून याच नामाचा बोध अक्रूरास झाला. शुकाने परीक्षिती राजास याच नामाचा उपदेश केला. श्रीकृष्णानेही अर्जुनास याच नामाचा बोध केल्याचे ज्ञानेश्वर सांगतात. भक्तीच्या पेठेत नांदणाऱ्या या श्रीकृष्णाचे व त्याच्या नामाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर एका अभंगात म्हणतात :

सुकुमार वेल्हाळ रूपें पैं सुंदर । तोचि पै आगर नंदाघरीं ।। १ ।।
अवघ्या सुख देतु अवघ्या विदटे । अवघेची पेठें हरिनाम ।। २ ।।
यापरी आगरू कृष्णनाम ठसा । ओतला सरिसा भाग्ययोगें ।। ३ ।।
बाप निवृत्तिराज उपदेशिती आम्हां । ज्ञानदेव महिमा नामें आला ।। ४ ।।

**हरिकथेचा महिमा**

या नामस्मरणाबरोबरच ज्ञानेश्वरांनी हरिकीर्तनासही महत्त्वाचे स्थान दिले आहे. हरिकीर्तनात नामघोष असतोच. परंतु नृत्य, संगीत, वाद्ये

यांच्या साह्याने कीर्तनात प्रभुप्रेमाची गोडी वाढते. 'ब्रह्मीभूत काया होतसे कीर्तनीं' असे पुढे तुकोबांनी म्हटलें आहे. 'नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरींचीं' असा त्यांचाच निर्वाळा आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीही नामदेवादी थोर सत्पुरुषांच्या सहवासात कीर्तन-सुखाची गोडी अनुभविली होती. 'नाचूं कीर्तनाच्या रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं' अशी आद्यकीर्तनकार नामदेव यांची प्रतिज्ञा होती. या 'कीर्तनकुळ-वाडीत' ज्ञानदेवही अग्रेसर होते. 'नित्य हरिकथा नित्य नामावळी । वैष्णवाचे कुळीं धन्य जन्म' म्हणून निवृत्तिनाथांनी हरिकथेचे माहात्म्य गाइले आहे. 'कीर्तनाच्या सुखें सुखी होतो देव', 'काळवेळ नसे नामसंकीर्तनीं'। उंचनीच योनी हेंहि नसे' अशा वचनांनी नामदेव समकाळात कीर्तनमहिमा वर्णन करतात. 'प्रेम जयाचें कथेवरीं। तोचि धन्य या चराचरीं । राम कृष्ण निरंतरी । मुखीं आवडी जपतसे' या अभंगात ज्ञानेश्वर कीर्तनाचाच पुरस्कार करताना दिसतात. 'जिये गावीं हरिकथा । भक्त नांदती सर्वथा । तेंथे देवांचिया चळथा । वेगीं पळती निर्धारें ।। हरिकथा श्रवण । तेणें दोषासी दहन । अंतीं पावे नारायण । चतुर्भुज करी भक्तांसी' या अभंगातही ज्ञानेश्वर हरिकथेचा महिमा गातात.

### 'कीर्तनाचेनि नटनाचें'

कीर्तनमाहात्म्य गाताना ज्ञानेश्वरांना खरे भरते आले आहे ते नवव्या अध्यायातील 'सततं कीर्तयन्तो मां' या श्लोकावर भाष्य करताना. 'तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ।। यमदमा अवकळा आणिली । तीर्थे ठायावरुनी उठविलीं । यमलोकींची खुंटली । राहटी आघवी ।। यमु म्हणे काय यमावें । दम म्हणे कवणातें दमावे । तीर्थं म्हणती काय खावे । दोष ओखदासी नाहीं ।। ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ।। (ज्ञाने.९ : १९७-२००) या माझ्या भक्तांनी कीर्तनप्रसंगीं नृत्यगानाच्या भरात प्रायश्चित्ताचा व्यवहारच बंद पाडला; कारण कीर्तनाच्या ठिकाणी पापाचे नावच शिल्लक उरत नाही. कीर्तनप्रसंगी प्रेमात नाचणाऱ्या या माझ्या भक्तांनी यमदमाला निस्तेज केले. तीर्थक्षेत्रांची ठिकाणे ओस पाडली, आणि यमलोकाचा रस्ताच खुंटवून टाकला. यम म्हणायला लागला,

'यांनी इंद्रिये पूर्वीच आवरली आहेत. आता यमनियमन कशाचे करावे?' यांचा मनोनिग्रह पाहून दम म्हणतो, 'आता मीं दमन तरी कोणाचे करावे!' तीर्थे म्हणतात, 'यांच्या अंगी दोष औषधालासुद्धा नाही, मग आम्ही कोणाचे पातक धुऊन काढावे?' अशाप्रकारे नामसंकीर्तनाच्या साह्याने हे भक्त लोक साऱ्या विश्वाचे दुःख दूर करतात. सर्व जगच आत्मसुखाने दुमदुमून सोडतात.

**बरव्या नामघोषात भगवंत**

नामसंकीर्तनात दंग झालेले माझे भक्त कसे असतात? ज्ञानेश्वर मोठ्या प्रेमाने सांगतात, 'ते पहाटेशिवायच उजडवितात, अमृताशिवाय अमर करतात. योगसाधनेवीण ते डोळ्यांना मोक्ष दाखवितात. राजा आणि रंक यांच्यांत भेदभाव कल्पिणे, किंवा लहानथोरांत निवड करणे हे त्यांच्या गावीही नसते. कोठलाही पंक्तिप्रपंच न करता ते सर्व जगाला आत्मानंदाचे भोजन घालतात. एखादा मनुष्य वैकुंठाला जाईलही; पण हे माझे भक्त सारे विश्वच वैकुंठ करून सोडतात. ते सूर्यासारखे तेजस्वी असतात, पण सूर्याला अस्तकाळाचा दोष असतो., हा दोष त्यांना नसतो. चंद्र कधीकाळी पूर्णत्वास येतो, तर हे माझे भक्त नेहमीच परिपूर्ण व प्रसन्न असतात. उदार मेघांचा साठा कधी तरी संपतो, पण यांचा सतत कृपावर्षाव चालू असतो. माझे नाव एक वेळ मुखात येण्यास हजारो जन्म घ्यावे लागतात ते त्यांच्या मुखात मोठ्या प्रेमाने नित्य नाचत असते म्हणून मी कोठे असतो?' तो मी वैंकुंठीं नसे। वेळ एक भानुबिंबींही न दिसे। वरी योगियांचीही मानसें। उमरडोनि जाय।। परी तयांपाशीं पांडवा। मी हारपला गिवसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती माझा।। कैंसे माझ्या गुणीं धाले। देशकाळातें विसरले। कीर्तनें सुखी झाले। आपणपांचि।। कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामांचे निखळ प्रबंध। माझी आत्मचर्चा विशद। उदंड गाती ( ज्ञाने. ९: २०७-२१० ) तेव्हा अर्जुना, मी वैकुंठात नसतो, एक वेळ सूर्यमंडळातही दिसणार नाही, इतकेच नव्हे तर मी योगी लोकांच्या ध्यानधारणेतही नसतो; पण ज्या ठिकाणी माझे भक्त अनन्य होऊन माझ्या नामाचा घोष कीर्तनात करतात तेथे मी इतरत्र न दिसणारा हटकून सापडतो. कृष्ण, विष्णू,

हरी, गोविंद या नामांची तेथे अखंड गुंफण चाललेली असते; माझ्याच गुण-रूपाची चर्चा सुरू असते. माझ्याच नामसंकीर्तनात ते तेथे दंग झालेले असतात.

**यमदूतांना आज्ञा**

जेथे नेहमी नामघोष व कीर्तन चालू असते तेथ यमदूत जात नाहीत, ही कल्पना ज्ञानदेवांनी अभंगांतूनही अनेक ठिकाणी बोलून दाखविली आहे. ‘ यमधर्म सांगे दूता । परिसावी निजकथा । जेथें रामनामवार्ता । तया देशा न वजावें ’ कारण, ‘ नाम महादोषां हरण । नाम पतीतपावन । नाम कलिमलदहन । भवबंधनमोचक ’ असल्याचे यमधर्मही मान्य करतो. ‘ यमु म्हणे परिसावें ऐसें । रामकृष्ण स्मरिती दिननिशें । ते येथें नाणावे आपैसे । विष्णुभक्त ते सर्वथा ’ या एका अभंगात त्यांनी हेच सांगितले आहे. ‘ दिंडी टाळ गरुडटका । जिये गावीं कथा आयिका । तयासि देखोनियां अनेकां । साष्टांग नमस्कार करावे ।। तयाचेनि चरणतीर्थे । पावन होती सकल पुनीतें । अंतीं सकळ वैकुंठपंथें । मोक्षसुख पावतील ’ या भाषेत यमधर्मही वैष्णवांच्या मेळाव्यातील सुखाचे वर्णन करीत आहे. आणखी एका अभंगात ते म्हणतात, ‘ यम सांगे निजदूतांसि । तुम्ही जावें मृत्युलोकासी । तेथें मान द्यावा विष्णुभक्तांसी । जे रामनाम उच्चारिती ।। रामकृष्ण नारायण । ऐसें करिती जे स्मरण । त्यांचे वंदावे चरण । साष्टांगें निजभावेसीं । ’

**‘ सोनयाचा दिवस आजि ’**

नामसंकीर्तनाच्या सुखाचे नुसते वर्णनच ज्ञानेश्वर करतात असे नाही, तर त्या सुखाची प्रचीतीही अनेक अभंगांतून वर्णन करतात. ‘ सोनयाचा दिवस आजि अमृतें पाहाला । नाम आठवितां रूपीं प्रकट पैं झाला–’ या एका अती गोड अभंगात ते म्हणतात, ‘ पाहा, आज कसा अमृतात न्हालेला सोन्याचा दिवस उजाडला आहे; कारण ज्या श्रीहरीचे मी नामस्मरण करीत होतो तोच माझ्या हृदयात आज प्रकट झालेला आहे. गोपाळा, हेच ध्यान आता माझ्या चित्तात सतत वसावे. त्रैलोक्याचे जीवन असणाऱ्या या श्रीहरीस मी आता एक क्षणभरही विसरणार नाहीं. ’ आणखी एका अभंगात मोठ्या संतोषाने व व्यापक बुद्धीने नामस्मरणातून हरी प्रकट झाल्याचा अनुभव सांगताना ते म्हणतात :

हरि आला रे हरि आला रे। संतसंगें ब्रह्मानंदु जाला रे ।। १ ।।
हरि येथें रे हरि तेथें रे । हरिवांचुनि न दिसे रितें रे ।। २ ।।
हरि पाहीं रे हरि ध्याईं रे। हरिवांचूनि दुजें नाही रे ।। ३ ।।
हरि वाचे रे हरि नाचे रे । हरि पाहतां आनंदु साचे रे ।। ४ ।।
हरि आदीं रे हरि अंतीं रे । हरि व्यापकु सर्वाभूती रे ।। ५ ।।
हरि जाणा रे हरि वाना रे। बाप रखुमादेवीवरु राणा रे ।। ६ ।।

ज्ञानदेवांच्या या अनुभूतिसंपन्न अभंगात विराट् परमात्म्याचा अनुभव त्यांना कसा आला याचे मोठे हृद्य दर्शन आहे. आणि हा श्रीहरी नाम-संकीर्तनाच्या साह्यानेच सुलभपणे प्रकट होतो असा त्यांच्या उपदेशाचा भावार्थ आहे.

## ५

# ‘हा लोकु कर्में बांधिला’

### संतांची कर्मयोगपर शिकवण

संतांनी निवृत्ती शिकविली असे आजही कोठें कोठे बोलले जाते. संतांच्या शिकवणुकीमुळे समाज व पर्यायाने राष्ट्र नेभळे बनले, संतांनी लोकांना कर्तव्यपराङ्‌मुख केले, संतांनी व्यवहार वा प्रपंच डावलून अतिरिक्त वैराग्याची शिकवण दिली असे आजही वारंवार सांगितले जाते. संतांना खरोखरीच प्रपंच वा संसार नको होता का? जगाचे लौकिक व्यवहार त्यांना बंद पाडायचे होते का? लौकिक कर्मापासून मुक्त झाल्याने त्यांना काय मिळणार होते? इत्यादी प्रश्नांचा विचार करताना प्रथमच स्पष्ट करायला वेह की, लौकिक कर्मांपासून संत काहीसे दूर असले तरी त्यांची शिकवण सर्वसामान्य माणसासाठी तशी नाही. जगाचा व्यवहार चालावा म्हणूनच प्राप्त परिस्थितींमधील उचित अशी कर्मे सर्वांनी करावीत असाच त्यांचा उपदेश आहे. या जगाचा व्यवहार आणि त्याचे गतिचक्र यांसाठी लोक स्वकर्तव्यांनी बांधले आहेत; कर्में त्यांना सुटणारी नाहीत, त्यांनी ती सोडू नयेत अशीच त्यांची शिकवण आहे.

**कर्मकुसुमांनी पूजा**

मराठी संतांचे मुकुटमणी श्रीज्ञानेश्वर यांनी आपल्या भल्यासाठी ग्रंथ निवडला तो भगवद्गीता. हताश झालेल्या, गलितगात्र बनलेल्या, परंतु उत्कर्षाची वाटचाल करू इच्छिणाऱ्या माणसास मार्ग दाखविणारा हा गीता ग्रंथ सर्व उपनिषदांचे सार असल्याने हिंदूंच्या जीवनपद्धतीस एक आदर्शभूत असा ठरला आहे. भक्तिप्रेमयुक्त ज्ञानमय कर्माचा एक आदर्श या ग्रंथाने घालून दिला असून ज्ञानोत्तर भक्तीत रंगणाऱ्या ज्ञानेश्वरांनीही प्रकृतिधर्माप्रमाणं वाटचास आलेल्या कर्मयोगाचा पुरस्कार केला आहे. अध्यात्म, परमार्थ, मोक्ष इत्यादींच्या मागे लागून प्राप्त कर्मे सोडावीत असे ज्ञानेश्वरादी संत कधीही म्हणत नाहीत. प्राप्त कर्तव्यकर्माच्या कुसुमांनीच परमेश्वराची पूजा बांधावी असा त्यांचा आदेश आहे. केवळ लौकिक कर्मातच रमू नये, गुंतू नये हे खरेच; पण लौकिक कर्मे ज्या स्तरावर करायची त्या संसाराची, प्रपंचाची, देहाची निंदा करून काय साधणार? केवळ शरीरपरायण वा संसारग्रस्त आपण न व्हावे म्हणून सावधगिरीसाठी कधीं संतांनी देह व संसार यांना विनाशी म्हणून त्यांचा निषेध केला असता तरी अखेरच्या ध्येयसिद्धीसाठी लौकिक कर्ममार्गाच्या गंगेचीच वाट लोकांनीं धरावी असा त्यांचा उपदेश आहे.

**कर्मेंद्रियाचा स्वामी कोण ?**

संन्यास, ज्ञानयोग, आत्मानात्मविचार करणारा सांख्ययोग इत्यादींचा मथितार्थ सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, ज्ञानयोगाने जसा मोक्ष मिळेल तसाच तो कर्मयोगानेही प्राप्त होईल. ‘एक कर्मयोग जाण। जेथ साधकजन निपुण। होऊनियां निर्वाण। पावती वेळें’ (ज्ञाने. ३ : ३७) थोडच्या वेळाने का होईना पण लौकिक कर्मे करणारे लोक मोक्षपदास येतात. दोनही मार्ग शेवटी ध्येयसिद्धीच्या बाबतीत एकाच ठिकाणी मिळतात. उचित कर्म न करता ध्येयसिद्धीची इच्छा करणे बरोबर नाही. थोडच्या अवधीचा असा कर्मयोगाचा मार्ग असला तरी त्य मार्गाने यशाची खात्री आहे. कसलाही धोका या मार्गात नाही. वाटचास आलेली कर्मे सोडून कर्मापासून अलिप्तता भोगणे मूर्खपणाचे आहे. ‘कीं प्राप्तकर्म सांडिजें। येतुलेनि नैष्कर्म्य होइजे। हे अर्जुना वायां बोलिजे। मूर्खपणें (ज्ञा. ३ : ४६) पैलतीराला तर पोचायचे आहे, पण नावेचा, कर्मरूपी नौकेचा मात्र त्याग करायचा हे कसे घडणार? म्हणूनच पार्था,

'जया नैष्कर्म्यपदीं आस्था। तया उचित कर्म सर्वथा। त्याज्य नोहे' (ज्ञा. ३ : ५०) वास्तविक पाहता प्रभुसत्तेतून होणारे आपले वर्तन कर्माधिष्ठित आहे. आपण कर्माचा त्याग करू म्हटल्याने तो होत नाही. आपल्या वर्तनातून प्रकट होणारा इंद्रियांचा स्वभाव जाईल तरी कोठे ? 'सांगें श्रवणीं ऐकावें ठेलें ? । कीं नेत्रींचें तेज गेलें ?। हें नासारंध्र बुझालें। परिमळ ने घे ?' (ज्ञा. ३ : ५५) आपल्या कोणत्या इंद्रियांचा व्यापार थांबतो? कानांनी आपणांस ऐकू येत नाही ? डोळ्यांनी आपण पाहत नाही ? नाकाने सुवास घेत नाही ? या सर्व इंद्रियांतून भोक्ता कोण आहे ? कोणाच्या सत्तेवर हे चलनवलन आहे ? क्षुधा आणि तहान काय आपणांस लागत नाही ? आपणांस झोप लागते, स्वप्न पडते, आपण जागे होतो, आपले हातपाय हालतात. ही काय कर्मे नव्हेत ? ही सारी कर्मे कोणाच्या सत्तेतून वा स्फूर्तीतून होतात ?

## हेतुरहित कर्माचरण

कर्मेंद्रियांची प्रवृत्ती निरोधून कर्मातीत अवस्था मिळणार नाही असे ज्ञानेश्वर स्पष्ट सांगतात. जो मनामध्ये ईश्वराविषयी दृढ भाव धरून आहे, ज्याने चलनवलनाचा केंद्रबिंदू ओळखला आहे, त्याने बाहेरच्या बाजूने इतरांसारखी उचित कर्मे केली तर बिघडले कोठे ? त्याने इंद्रियांचा चालक ओळखला असतो म्हणून 'तो इंद्रियां आज्ञा न करी। विषयांचें भय न धरी। प्राप्तकर्म नाव्हेरी। उचित जें जें' (ज्ञा. ३ : ६९). तो कधी उचित कर्म सोडून देत नाहीच, आणि उचित कर्मांत वरवर गुरफटलेला दिसला तरी तो त्यांनी व्यग्र होत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरमहाराज सांगतात की, 'म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरेंकरूनि प्राप्त। तें कर्म हेतुरहित। आचरें तूं' (ज्ञा. ३ :७८) या ओवीमधील हेतुविरहित हा शब्द फार महत्त्वाचा आहे. मनात कोणताही हेतू न ठेविता कर्मांचे आचरण केल्यास ध्येयसिद्धी होते असा गीतेचा वा संतांचा भावार्थ आहे. स्वधर्माप्रमाणें म्हणजे स्वभावानुसार कर्तकर्माप्रमाणे वर्तन करणे हाच एक पवित्र असा यज्ञ आहे. या यज्ञामुळे पापाचरण घडत नाही. उलट हा निजधर्म सोडून जो वागतो, तोच सांसारिक बंधनात जखडला जातो. परंतु स्वधर्मानुसार जो अखंड कर्मयज्ञ चालवितो तो कोणत्याच बंधनात पडत नाही. खरे पाहता 'हा लोकु कर्मे बांधिला' असून जो याव्यतिरिक्त परतंत्रास भुलला तो आपल्या स्वधर्मास चुकला.

**स्वधर्मरूपी कर्मयोग**

या कर्मयज्ञावरच आधारलेली सृष्टिकथा ब्रह्मदेवाने निर्माण केली. ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणे ज्याला त्याला कर्मे वाटून दिली आहेत. या कर्मांचे आचरण करण्याऐवजी व्रतनियम, शरीरकष्ट, भ्रामक तीर्थयात्रा, योगादी साधने, तांत्रिक अनुष्ठाने इत्यादी भानगडींत कोणी पडू नये असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. ‘ तुम्हीं व्रत नियम न करावे । शरीराते न पीडावें । दूरि केंही न वचावें । तीर्थासी गा ।। योगादिकें साधनें । साकांक्ष आराधनें । मंत्रयंत्र विधानें । झणीं करा ।। देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें । तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ।। ( ज्ञाने. ३ : ८९।९१ )- इतर अनिष्ट कर्मांच्या फंदात न पडता स्वधर्मानुसार कर्मयोगाचा यज्ञ आचरावा हे उत्तम. या पूजनामुळेच तुमचा योगक्षेम नीटपणे चालेल. याच मार्गानें गेलात तर ‘ तुम्ही देवांतें भजाल । देव तुम्हां तुष्टतील । ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ’(ज्ञा. ३ : ९७)या अवस्थेत मग तुम्ही जे म्हणाल ते तुमच्या हातून घडेल. मनाच्या सर्व वासना पूर्ण होतील. वाणीला सिध्दी प्राप्त होईल. ऋद्धीसिद्धीच तुमच्यापुढे हात जोडून उभ्या राहतील.

अशा रीतीने स्वधर्माने वाटयास आलेली कर्मे लोक आचरतील तरच ते सुखी होतील. यज्ञयाग करून जी संपत्ती याज्ञिक मिळवितात तीच संपत्ती कर्मयोगाच्या या यज्ञामुळे प्राप्त होते. परंतु हा स्वधर्म सुटला. हे कर्तव्यकर्म सुटले की मग मात्र फार मोठा अपाय होईल. ‘ तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय’(ज्ञा ३:११०) दिवा मालवताच प्रकाश जातो, त्याप्रमाणे स्वधर्माचरण संपताच सर्व सुखाचा लोप होतो. म्हणून स्वधर्माला जपावे. त्याला अनुसरून नित्य कर्मे करावीत. ही कर्मे करिताना कर्ता, भोक्ता कोण हे ओळखावे. कर्माचे फळ मनात धरू नये. केवळ इंद्रियांवर लक्ष ठेवून त्यांचे विषय भोगावेत असे नव्हे, तर इंद्रियांचा चालक ओळखून ती इंद्रिये स्वधर्माप्रमाणे कर्मप्रवृत्त करावीत. ‘हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें । ’ अशी ज्ञानेश्वरादी संतांची शिकवण आहे. स्वधर्मानुसार कर्मयज्ञ करून सर्व संपत्ती आदिपुरुषास अर्पण करावी असा आदेश आहे.

## रक्षणीय लोकसंस्था

स्वधर्मरूपी यज्ञ जो करीत नाही तो ज्ञानेश्वरांच्या मते पातकी होय. कुकर्मे करून जो केवळ इंद्रियांस भोग देतो तो भूमीस केवळ भार होतो. त्याची सर्व कर्मे निष्फळ ठरतात. अकालीचे म्हणजे दुष्काळातील मेघ अथवा शेळीचे गळ्यातील स्तन जसे निरुपयोगी, तसे स्वधर्माखेरीज अनुसरलेले अनुष्ठान व्यर्थ होय. म्हणून स्वधर्म आचरावा. हा स्वधर्म कर्मावर अधिष्ठित असल्यामुळे कर्मयोग हाच खरा यज्ञ होय. जनकादिकांनाही हा कर्मयोग सुटला नाही. कृतार्थ झालेल्यांनीसुद्धा कर्मे आचरावीत. लोकसंस्थेच्या बांधणीसाठी, स्थैर्यासाठी, स्वकर्तव्यावर आधारलेला हा कर्मयज्ञ फार मोलाचा आहे. 'देखें प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले । तयांही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं '(ज्ञा. ३ : १५५)लोकधारणेसाठी कर्तव्यकर्माची आवश्यकता किती आहे हे पटवून देण्यासाठी उच्चपदी आरूढ झालेल्या जनकाचे उदाहरण दिल्यानंतर भगवंत म्हणतात, 'आतां आणिकाचिया गोठी । कायशा सांगों किरीटी । देखें मीचि इये राहाटीं । वर्तत असे' (ज्ञा. ३ : १६०). नाही तर मला कोणते असे संकट पडले होते? की अशी कोणती इच्छा माझ्या मनात होती? म्हणून मी हा स्वधर्म आचरिला? पूर्णकाम होऊन मी जर आत्मस्थितीत रममाण होईन तर मग 'प्रजा हे कैसेनी निस्तरेल!' सगळी लोकस्थिती बिघडून जाईल ना! ही प्रत्यक्ष भगवंतालाही काळजी लोकसंस्थेची आहे. 'हे सकळ लोकसंस्था। रक्षणीय सर्वथा' असल्यामुळेच 'मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरें लावावें। अलौकिक नोहावें। लोकांप्रति '(ज्ञा. ३ : १७१). सारे विश्व नीट मार्गास लागावे, म्हणून ज्ञानी माणसानेही कर्मांचे आचरण करावे असा भावार्थ.

## सर्पाशी खेळ नको

स्वधर्मानुसार लोकसंस्थेच्या परिपालनासाठी सर्वांनी कर्मे करावीत हा जसा आग्रह आहे, तसाच तो निर्हेतुक कर्मे करण्याविषयी आहे. कर्माच्या मागे कोणताही हेतू नसावा. फलाची आशा धरू नये. मी कर्मे करणारा असा भाव उरू नये, मग संग्रामासारखे कर्म करूनही पृथ्वीवरील पातकी लोकांचा भार हलका करावा हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'आणि हें कर्म मी कर्ता। कां आचरेन या अर्था। ऐसा अभिमान झणें चित्ता। रिघों देसी ॥ तुवां शरीरपरा नोहावें। कामनाजात सांडावें। मग अवसरोचित भोगावे। भोग

सकळ ।। ’ (ज्ञा. ३ : १८७-८८). याच भूमिकेवरून मग भगवंत अर्जुनाला उपदेश करतात, ‘ आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इये रथीं । देई आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ।। जगीं कीर्ति रूढवी । स्वधर्माचा मान वाढवी । ह्या भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ’ (ज्ञा. ३ : १८९-९०). या प्रसंगी क्षत्रियाने संग्राम करणे हाच त्याचा स्वधर्म. या स्वधर्माच्या आचरणानेच लोकसंस्थेचा सांभाळ होणार होता. हा सांभाळ करताना इंद्रियाधीन न व्हावे, देहाभिमानी न व्हावे, मोहात न गुंतावे असे सांगण्यास ज्ञानेश्वर चुकत नाहीत. इंद्रियांचा लळा सांभाळण्यात वा पाळण्यात आयुष्य चालले की मग सर्व संपलेच ! ‘ हां गा सर्पेसीं खेळों होईल । कीं व्याघ्रसंसर्गं सिद्धी जाईल । सांगे हालाहल जिरेल । सेविलिया काई ? ’ (ज्ञा. ३ : २०३) शरीराधीन होऊन, भोगपरायण होऊन कर्तव्यकर्म होत नाही हाही संतांचा कटाक्ष आहे.

**‘ क्षात्रवृत्ती झुंजतां पाप नाहीं ’**

स्वधर्माचे आचरण निष्काम कर्मयोगाच्या मार्गाने करीत असताना इंद्रियांच्या अधीन न व्हावे म्हणून ज्ञानेश्वरादी संत पदोपदी सावध करतात; कारण हे काम, क्रोध, लोभ इत्यादी मर्यादेच्या बाहेर गेले की मग काळाप्रमाणे भासतात. ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ‘ हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषयदरीचे वाघ । भजनमार्गीचे मांग । मारक जे ।। हे देहदुर्गीचे धोंड । इंद्रियग्रामींचे कोंड । यांचें व्यामोहादिक बंड । जगावरी । ’ (ज्ञा. ३ : २४१-४२) म्हणून या कामक्रोधांना जपायचे, यांना ओळखायचे. यांचा चालक जाणून घ्यायचा आणि कोणत्याही विकाराला वश न होता स्वधर्माचे आचरण कर्मयोगास अनुसरून करायचे. संग्रामसमयी चित्त द्रवीभूत होऊन कसे भागणार ? व्याकुळपणा क्षत्रियाला या प्रसंगी कसा शोभणार ? ‘ आनीं आन करितां । नाश होईल स्वहिता ’ हे समजायला हवे. याच भूमिकेवरून भगवंत अर्जुनाला सांगतात, ‘ म्हणोनि यालागीं पाहीं । तुम्हां क्षत्रियां आणिक कांहीं । संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणें ।। निष्कपट होआवें । उसिणां घाई जुंझावें । ’ (ज्ञा. २ : १८९). विकारवश न होता रणांगणावर प्रत्यक्ष लढा देणे हाच स्वधर्म क्षत्रियांचा. हाच त्यांचा कर्मयोग. ‘ तुज क्षात्रवृत्ती जुंझतां । पाप नाहीं ’ असा उपदेश भगवंतांचा आहे.

**'इंद्रियें न कोंडीं'**

मानवी देह लाभून जे कर्तव्यकर्मास चुकतात, स्वधर्मास विसरतात, देहाला तुच्छ लेखतात, त्यांना ज्ञानेश्वरांनी सावध केले आहे. मानवी देहाची आसक्ती नसावी पण तज्जन्य कर्मे कशी सुटणार ? म्हणूनच ज्ञानेश्वर म्हणतात, 'मूर्ति लाहोनि देहाची। खंती करिती कर्माची। ते गांवढे गा ॥ मृत्तिकेचा वीट। घेऊनि काय करील घट ? । केउतें तंतू पट। सांडील तो ? ॥ तैसे शरीराचेनि आभासे। नांदत जंव असे। तंव कर्मत्यागाचें पिसें। काइसें तरी ?' (ज्ञाने. १८ : २१८-२२). देहाचा लाभ एकदा झाला म्हणजे त्यापासून निर्माण होणारी कर्मे सुटणार तरी कशी ? घटाला मातीचा वीट येऊन कसे चालेल ? तंतूला पट कधी सोडील का ? त्याचप्रमाणे कर्मत्यागाचे पिसे म्हणजे वेड देहाला मानवणारे नाही. कर्माचा त्याग जसा व्यर्थ तसा शरीराचा त्यागही उपयोगी नाही. शरीराला क्लेश देणे, त्याला खडतर जपतपादी अनुष्ठानांनी वाळविणे या गोष्टी ज्ञानेश्वरांना मान्य नाहीत. 'इंद्रियें न कोंडीं। भोगांतें न तोडीं। अभिमान न सांडीं। स्वजातीचा ॥' (ज्ञा. १२ : ११५) असा त्यांचा उपदेश आहे.

**घरदार कशासाठी सोडता ?**

मनामधील दुष्ट वासना जोपर्यंत गेल्या नाहीत तोपर्यंत उगाच शरीराला शासन करून काय फायदा ! ' शरीर वरिवरि कां दंडिसी। जंव वारिलें न करी तुझें मन। जळीं नेत्र लाउनी ठोकती अविंशा लागोनीं ॥ तैसें नको नको बकध्यान करूं रया ' अशा एका अभंगात ज्ञानेश्वर म्हणतात, मासा मिळावा म्हणून बगळा ध्यान लावून नदीकाठीं बसतो, त्याप्रमाणे इंद्रियसुखां-साठी डोळे मिटून, ध्यानाचे ढोंग करून काय उपयोग ? याच अभंगात ज्ञानेश्वर म्हणतात, ' तू अगोदर तुझे चित्त निर्मळ कर. बायकामुलांचा त्याग करून रानावनात कशासाठी जातोस ? ' वनीं असोनि वनिता चिंतिसी ' याचा काय उपयोग रे ? म्हणून ज्ञानेश्वरांचा स्पष्ट उपदेश आहे की, ' आतां गृहादिक आघवें। तें कांही नलगे त्यजावें। जें वेतें जाहलें स्वभावें। निःसंग म्हणवुनी (ज्ञाने. ५ : २२ ) घरदार, प्रपंच सोडून, उगाच डोक्यात राख घालून देहाची विटंबना करून परमार्थ साधत नाही. उगाच वैराग्याचा अहंकार मात्र मनात निर्माण होऊन बाधा व्हायची ! ' घरदार वोखटें त्यजूं म्हणसी ' हा ज्ञानेश्वरांचा अतिशय बोधप्रद असा अभंग आहे. त्यात ते

म्हणतात, घरदार वाईट म्हणून तू त्यांचा त्याग करू पाहतोस; पण शरीराचे ओझे तुझ्याजवळ एवढे मोठे आहे त्याचे काय करशील रें? आईबाप वाईट म्हणून त्यांचा त्याग करशील, पण अहंकार व अविद्या यांचे काय करणार? सख्खे भाऊ सोडशील, पण काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर हे तुझ्या भावांपेक्षा जबर आहेत त्यांचे काय करणार? पाठची बहीण सोडशील, पण आशा, तृष्णा, माया यांचे काय करणार रे? असे असता तू टाकलेस तरी काय? स्त्रीचा त्याग करून काय होणार? कल्पना ही मोठी भोक्ती स्त्री काही तू टाकू शकत नाहीस. मुलाबाळांचा त्याग करशील, आणि इंद्रियसुखात रमशील; त्याचा काय उपयोग ? सर्वच टाकू म्हणशील तर तुझ्या मनाला आत्मानंदाची प्राप्ती कधीच होणार नाही रे. डोके मुंडून शरीराची व्यर्थ विटंबना का करितोस ? ' सहज संतोषें असोनि जैसा तैसा 'च तू का राहत नाहीस ? कारण ' आपुले आश्रमीं स्वधर्मी असतां सर्वत्र एकुचि जाणा ' असा उपदेश बाप रखुमादेवीवराची साक्ष ठेवून ज्ञानेश्वर करतात.

**' आहे तें वर्म वेगळेंचि '**

गृहस्थाश्रम सोडावा, देहाला दंड द्यावा, मुलाबाळांचा त्याग करावा, अशी शिकवण कोणत्याच संताची नाही. ज्ञानेश्वरांची तर नाहीच नाही. लोकसंस्थेच्या जपणुकीसाठी कर्तव्यकर्मात्मक स्वधर्म जपावयास हवा. त्यासाठी गृहस्थाश्रम हवा. म्हणूनच ज्ञानदेव एका मर्मज्ञ अभंगात विचारतात, ' कां सांडिसी गृहाश्रम । कां सांडिसी क्रियाकर्म । कासया सांडिसी कुळींचे धर्म । आहे तें वर्म वेगळेंचि ।। ' उगाच घरदार सोडून वनात जाऊ नकोस. कुळधर्माचा, क्रियाकर्माचा त्याग करू नकोस. अंगाला भस्म लावले, जटाभार वाढविला, उदास वृत्तीने दिगंबर होऊन भटकले म्हणजे सर्व साधले असे नाही. जप, तप, अनुष्ठान, क्रियाकर्म, यज्ञयाग, इंद्रियांना बंधन यांपेक्षा ' आहे तें निधान वेगळेंचि ' या वेगळ्या निधानाचा लाभ शुद्ध अंतःकरणाने प्राप्त कर्तव्यकर्म हेतुविरहित वृत्तीने केल्यासच होईल.

**निहेतुक कर्मे ईश्वरार्पण**

लोकसंग्रहार्थ कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करावीत असा ज्ञानेश्वरांच्या बोधाचा भावार्थ आहे. यज्ञयागादी कर्मकांडांना त्यांनी निषेध केला आहे. यज्ञ करणारे दीक्षित ' पुण्याचेनि नांवें पाप ' जोडतात असा त्यांचा अभिप्राय आहे.

कारण, शतकोटी यज्ञ करून लोकांना ईश्वराऐवजी स्वर्गभोग हवे असतात. कल्पतरूच्या तळवटी बसून झोळीला गाठी देण्यासारखाच हा प्रकार आहे. यासाठी ज्ञानेश्वर म्हणतात, ' म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्ग । तो अज्ञानाचा पुण्यमार्ग । ज्ञानिये तयातें उपसर्ग । हानि म्हणती ।। (ज्ञा. ९ : ३१३) मग खऱ्या पुण्याचा मार्ग कोणता ? ज्ञानेश्वर सांगतात, ' मग मातें जेणें पाविजे तें शुद्ध पुण्य ' आणि याच पुण्याच्या प्राप्तीसाठी लोकसंग्रहार्थ सर्वांनी कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करावीत असे सांगताना ते म्हणतात :

' इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं ।
अभिमान न सांडीं । स्वजातीचा ।।
कुळधर्म चाळीं । विधिनिषेध पाळीं ।
मग सुखें तुज सरळी । दिधलीं आहे ।।
परी मनें वाचा देहें । जैसा जो व्यापार होये ।
तों मी करित आहें । ऐसें न म्हणें ।।
करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे ।
विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ।।
माळिये जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें ।
तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा ।। (ज्ञा. १३ : ११५–१२०).

६

# ही गुणकुसुमांची माळ !

**दैवी गुणसंपदा**

व्यक्तीचा काय किंवा समाजाचा काय, स्खलनाकडे कल स्वाभाविकपणे असतो. मोह, लोभ, मत्सर, क्रोध, इंद्रियविषयांविषयी लोलुपता यांनीच मनुष्य पुरेपूर भरलेला आहे. या 'गुणांचे' शिक्षण देण्याची आवश्यकता उरत नाही. प्रवृत्तीच्या रगेचीच ही अपत्ये असल्यामुळे त्यांना स्वाधीन ठेवणे अगत्याचे आहे. म्हणून प्राचीन ऋषिवर्यांनी दैवी गुणसंपदेचे माहात्म्य वारंवार सांगितले आहे. दैवी गुणांची जोपासना जाणूनबुजून करावी लागते. दैवी गुणांचे यश त्वरित दिसणारे नसले तरी व्यक्तीच्या व समाजाच्या अंतिम हिताला तेच कारणीभूत होते. म्हणून ज्ञानेश्वरांसारखे संतपुरुष दैवी संपत्तीचे विस्ताराने वर्णन करतात. महाभारतातील शांतिपर्वात अध्याय १६० ते १६३ पर्यंत दम, तप, सत्य इत्यादी गुणांचे वर्णन आले असून दमातच क्षमा, धृती, अहिंसा, सत्य, आर्जव, लज्जा इत्यादी अनेक गुणांचा समावेश झालेला आहे. सत्याच्या निरूपणात सत्य, समता, दम, अमात्सर्य, क्षमा, लाज, तितिक्षा, अनसूयता, याग, ध्यान, लोककल्याणाची इच्छा, धृती, दया या गुणांचा समावेश आहे.

### मनुष्यदेहधारी परमात्मा

ज्ञानेश्वरांनीही गीतेच्या आधारे तेराव्या व सोळाव्या अध्यायांत दैवी गुणसंपदेचा परामर्श विस्ताराने घेतलेला आहे. तेराव्या अध्यायामधील ज्ञानी पुरुषही दैवी गुणांनीच समृद्ध आहे. सोळावा अध्याय तर 'दैवासुरसंपत्ती'-साठीच प्रसिद्ध आहे. गीतेच्या नवव्या अध्यायात ११ व्या व १२ व्या श्लोकांत राक्षसी व आसुरी स्वभावाच्या लोकांचा मोघम निर्देश आलेला आहे. सर्व भूतांच्या ठायी व्यापून असणारे परमेश्वराचे रूप न जाणता अज्ञानी माणसे केवळ मनुष्यदेहधारी म्हणून परमेश्वराला अवमानितात. त्यांच्या आशा व्यर्थ, कर्मे फुकट, ज्ञान वांझ, चित्त भ्रष्ट असून त्यांनी मोहात्मक व राक्षसी स्वभावाचा आश्रय केलेला असतो असा संक्षेपाने उल्लेख त्या ठिकाणी आहे. उलट, दैवी प्रकृतीचा आश्रय करून राहिलेले महात्मे सर्व भूतांचे अव्यय आदिस्थान असा जो परमात्मा त्याला ओळखून अनन्यभावाने त्याचे स्मरण करतात. ते यत्नशील, दृढव्रत, नित्य योगयुक्त असून परमेश्वराचे सतत नामसंकीर्तन करीत असतात.

### शांतिवेलीचे नवपल्लव

हे महात्मे कसे असतात ? ज्ञानश्वर म्हणतात, 'जयांचिया आस्थेचिया सद्भावा । आंतु धर्म करी राणिवा । जयांचे मनीं ओलावा । विवेकाचा ।। जे ज्ञानगंगे नाहाले । पूर्णता जेऊनी धाले । जे शांतीसि आले । पालव नवे ।। जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ । जे आनंदसमुद्रीं कुंभ । चुबकळोनि भरिले ।। जयां भक्तीची येतुली प्राप्ति । जे कैवल्यातें परौतें सर म्हणती । जयांचिये लीळेमाजीं नीति । जियाली दिसे ।। जे आघवांचि करणीं । लेइले शांतीचीं लेणीं । जयांचें चित्त गवसणी । व्यापका मज ।। ऐसे जे महानुभाव । दैविये प्रकृतीचें दैव । जे जाणोनियां सर्व । स्वरूप माझें ।। मग वाढतेनि प्रेमें । मातें भजती जे महात्मे । परि दुजेपण मनोधर्मे । शिवतलें नाहीं ।। ऐसे मीच होऊनि पांडवा । करिती माझी सेवा । परि नवलावा तो सांगावा । असे आइक ।। (ज्ञाने. ९ : ८९-९६) – त्यांच्या श्रद्धायुक्त शुद्ध भावनेत सदोदित धर्माचेच साम्राज्य असते. त्यांच्या चित्तात नेंहमी विवेकाचा ओलावा असतो. त्यांनी ज्ञानगंगेत स्नान केलेले असते. पूर्ण ब्रह्मस्थितीत पोचून ते समाधान पावले आहेत. ते म्हणजे शांति-

वेलीला फुटलेले नवे पल्लवच होत. जगाची परिणती ज्यात होते त्या परब्रह्मास फुटलेले कोंभ म्हणजेच हे सत्पुरुष होत. हेच धैर्याचे आधारस्तंभ वाटतात. हे म्हणजे आनंदसमुद्रात बुचकळून काढलेले कुंभच होत. त्यांना भक्तीची आवड एवढी मोठी असते की, ते भक्तीपुढे मुक्तीला दूर सारतात. त्यांच्या आचरणातच नीती जिवंतपणे वावरत असते. त्यांची सर्व इंद्रिये शांतीने शृंगारलेली असतात. त्यांच्या विशाल चित्तात प्रत्यक्ष परमेश्वर गुंतून राहतो. हे महात्मे म्हणजे दैवीसंपत्तीचे सौभाग्यच असून परमात्म्याचे रूप जाणून घेतात आणि चढत्या वाढत्या प्रेमाने त्याला भजतात. द्वैतभावाचा स्पर्शही त्यांना होत नाही. ते परमात्मस्वरूप होऊनच त्याची सेवा मनोभावे करतात.

**ही मोहरात्रीची धर्मदिवी**

नवव्या अध्यायात अशा रीतीने दैवी-आसुरी संपत्तीचा जो निर्देश संक्षेपाने आलेला आहे त्याचा विस्तृत आलेख ज्ञानेश्वर महाराज सोळाव्या व तेराव्या अध्यायांत काढतात. दैवी पुरुषाचे चालणे, बोलणे, वागणे ते समजावून देतात. कारण धर्म व नीती यांची जोपासना यांच्या वर्तनातून होणारी असते. ही दैवी संपत्ती कशी आहे ? ज्ञानेश्वर तिचे मोठे रोचक व बहारदार वर्णन करताना म्हणतात, ‘ जे मुमुक्षुमार्गींची बोळावी । जे मोहरात्रींची धर्मदिवी । ’ ही दैवी संपत्ती म्हणजे मुमुक्षुमार्गावरील प्रकाशदायी धर्मरूपी दिवटीच आहे. संपत्ती म्हणजे तरी काय ? ज्ञानेश्वर सांगतात, ‘ जेथ एक एकातें पोरखी । ऐसे बहुत पदार्थ येकीं । संपादिजती ते लोकीं । संपत्ति म्हणिजे ।। (ज्ञाने. १६ : ६६) एकमेकांना पोषक होणाऱ्या अनेक गुणांच्या समुदायास संपत्ती हे नाव असून दैवी संपत्ती ही ‘ सुखसंभवी ’ म्हणजे सुखोत्पादक असल्याने ज्ञानेश्वर प्रथम तिचाच विस्ताराने विचार करतात.

**अभय आणि सत्त्वशुद्धी**

गीतेच्या सोळाव्या अध्यायाच्या प्रारंभीच अभय, शुद्ध व सात्त्विक वृत्ती, ज्ञानयोगव्यवस्थिती, दातृत्व, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, कर्मफलत्याग, शांती, अपैशून्य (क्षुद्र दृष्टी सोडून उदारबुद्धी धारण करणे), सर्व भूतांच्या ठायी दया, हावरेपणा नसणे,

मृदुत्व, वाईट कृत्यांची लाज, अचापल म्हणज रिकामे व्यापार सुटणे, तेजस्विता, क्षमा, धृती, शुचिर्भूतपणा, द्रोह न करणे, अती मान नसणे हे गुण दैवी संपत्तीचे म्हणून सांगितले असून ज्ञानेश्वर प्रत्येकाची फोड आपल्या रसाळ वाणीने करताना दिसतात. ज्ञानेश्वरांच्या मताने या दैवी गुणांत अग्रपूजेचा मान 'अभय' या गुणास आहे. हा गुण ज्याच्या अंगी आहे तो कर्माकर्माच्या मार्गी अहंकाराला वाव न देता संसाराचा धाक सोडतो. याची अद्वैतभावना वाढलेली असल्यामुळे त्याला सर्वांविषयी आत्मभाव वाटतो आणि म्हणून भयाची वार्ता तो देशोधडीला लावतो. पाणी मिठाला बुडविण्यासाठी येते तेव्हा मीठच पाणी होऊन जाते, त्याप्रमाणे याच्या अद्वैतबुद्धीने सर्वच आप्तमय होऊन भयाचा नाश होतो. सत्त्वशुद्धी म्हणजे काय हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'राखेची उंडी जशी जळत नाही की विझत नाही, पाडव्याची चढती कळा ज्याला नाही किंवा अवसेचा क्षयही नाही असा चंद्र जसा मध्यम अवस्थेत सूक्ष्म रूपाने अविकृत राहतो किंवा पावसाळ्यामुळे उतास आलेली नाही की उन्हाळ्यात आटलेली नाही अशी नदी जशी मध्यम स्थितीत संथपणे वाहते, त्याचप्रमाणे रजोगुण व तमोगुण यांनी भरलेल्या मनोरथांची ओढ सोडून बुद्धी केवळ स्वधर्माविषयी आवड धरून असते व इंद्रियांनी वाईट अगर चांगले विषय दाखविले तरी जिच्यात बदल होत नाही ती सत्त्वशुद्धी होय. प्रिय पती परगावीं गेला असताना पतिव्रता विरहव्याकुळ होते, कोणत्याच हानिलाभाकडे पाहत नाही, तर निव्वळ उदासीन असते, तशीच ही सत्त्वशुद्धी आत्मस्वरूपी लय लागल्यामुळे तन्मय होते.

### दान आणि दम

यानंतर 'ज्ञानयोगव्यवस्थिती' म्हणजे काय ते ज्ञानेश्वर सांगतात. आत्मप्राप्ती होण्यासाठी ज्ञानयोगामध्ये आपल्या सामर्थ्याने टिकून राहणे व त्या स्थितीत चित्तवृत्तीचा सर्वस्वी त्याग करणे म्हणजेच 'ज्ञानयोगव्यवस्थिती' होय. यज्ञात कोणतीही कामना मनात न ठेवता आहुती टाकावी, अथवा कुलवंताने आपली कन्या कुलवंताला द्यावी किंवा लक्ष्मी जशी मुकुंदाच्याच ठिकाणी स्थिरावते, त्याप्रमाणे सर्व विकल्प सोडून निर्वेधपणे योग व ज्ञान यांतच जीवनवृत्ती स्थिर करणे यालाच 'ज्ञानयोगव्यवस्थिती' असे

म्हणतात. आता ‘ दान ’ कशाला म्हणावे ? दान करणारा मनुष्य वैरी जरी दु:खात पडला तरी त्याला पाहून देह, वाणी, मन, धन यांची मदत करतो. जो दमला भागला असेल त्याला वाटेवरले झाड जसे पान, फूल, सावली, फळ, मूळ ही देऊन मदत करते, तसे हा दानी मनुष्य धनधान्य देऊन संकटात सापडलेल्यांना मदत करतो. हे दान म्हणजे ‘ मोक्षनिधानाचे अंजन ’ च होय. आता ‘ दम ’ म्हणजे काय ? ज्याप्रमाणे एखादा तलवारबहाद्दुर मनुष्य शत्रूला सपकन् कापून काढतो, त्याप्रमाणे विषय व इंद्रिये यांच्या मिळणीस घाव घालून तोडणे म्हणजे दम होय. याच दमाच्या बळावर श्वासोच्छ्वासापेक्षाही अखंड चालणारी खडतर व्रते आचरली जातात.

**यज्ञ, स्वाध्याय व तप**

आता ‘ यज्ञ ’ म्हणजे काय ते पाहा. पुढल्या रांगेतले ब्राह्मण आणि मागल्या रांगेत येणाऱ्या स्त्रिया वगैरे यांच्यामध्ये जी मंडळी येतात त्यांच्यापैकी प्रत्येकाने स्वत:स योग्य असे देवधर्मांचे मार्ग आचरणे म्हणजेच यज्ञ होय. षट्कर्मे आचरणारा ब्राह्मण व त्याला नमस्कार करणारा शूद्र हे दोघेही आपापल्या परीने ‘ यज्ञ ’च आचरीत असतात ; त्यांना सारखेच फळ मिळते. मात्र या यज्ञात फळाची आशा धरता कामा नये, अथवा ‘ मी कर्ता ’ अशी अहंभावनाही उरता कामा नये. अशा प्रकारचा यज्ञ म्हणजे कैवल्याच्या मार्गाचा एक विश्वासू सोबतीच होय. यानंतर ‘ स्वाध्याय ’ म्हणजे काय ते पाहा. वेदांच्या प्रतिपादनाचा विषय जो ईश्वर त्याचे स्वरूप आपणांस कळावे म्हणून श्रुतिग्रंथांचा निरंतर अभ्यास करणे हाच स्वाध्याय होय. ज्ञानेश्वर दृष्टान्त देताना म्हणतात, चेंडू जमिनीवर आपटावयाचा तो काही जमिनीस मारण्यासाठी नाही, तर आपल्याच हाती परत येण्यासाठी. शेतात बी पेरायचे ते पुढे भरघोस पीक हाती यावे म्हणून. दिव्याच्या प्रकाशाचे साह्य घ्यावयाचे ते गुप्त जागी गाडलेले धन दिसावे म्हणून. झाडाच्या मुळांशी पाणी शिंपायचे ते रसाळ फळांच्या उद्देशानेच. आरसा पुनः पुन: पुसून स्वच्छ करायचा तो आपलेच तोंड त्यात नीट दिसावे म्हणून. त्याचप्रमाणे ईश्वराचे स्वरूप आपणांस कळावे म्हणून स्वाध्याय करावयाचा, आत्मरूपाचा अनुभव येण्यासाठी प्राण, इंद्रिये व शरीर यांची आटणी करणे म्हणजेच ‘ तप ’ होय. दानधर्मांत सर्वस्व देऊन टाकणे म्हणजेच त्याचे सार्थक होय. बी आली की त्याची वनस्पती

सुकून जाते. धूप अग्नीतच लय पावतो. हिणकसाचा नाश झाला की सोने वजनात घटते, पितरांना अमृताचा आहार दिला की चंद्र क्षय पावतो, त्याचप्रमाणे आत्मरूपाचा अनुभव घेण्यासाठी प्राण, इंद्रिये व शरीर यांचा नाश करावा लागतो. यालाच तप म्हणतात. आणि तान्ह्या मुलाच्या हिताकरिताच जसे मातेच्या स्तनांत दूध असते, अथवा नानाविध भूतमात्रांत चैतन्य जसे सारखेच असते, त्याप्रमाणे प्राणिमात्राशी गोड चोखटपणे वागणे म्हणजेच 'आर्जव' होय. आणि 'जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें । राहाटणें तें अहिंसे । रूप जाण ।' जगाला सुखी करण्याच्या उद्देशाने शारीरिक, वाचिक, मानसिक व्यवहार करणे म्हणजेच 'अहिंसा' होय. या अहिंसेचे सविस्तर वर्णन ज्ञानेश्वरांनीं तेराव्या अध्यायात ज्ञानी पुरुषाची लक्षणे वर्णन करताना केले आहे.

**सत्त्याचे स्वरूप**

आता 'सत्याचे' स्वरूप कसे असते ? ज्ञानेश्वर सांगतात, 'आतां तीख होउनि मवाळ । जैसें जातीचें मुकुळ । कां तेज परी शीतळ । शशांकाचें'। मोगरीची कळी जरी बारीक व अणकुचीदार असली तरी मऊ असते, चंद्राचा प्रकाश तेजस्वी असला तरी शीतल व आल्हाददायक असतो. याचप्रमाणे जे भाषण ते सत्य होय. या सत्याला साजेल अशी उपमा कोठून मिळणार ? दाखविल्याबरोबर रोग नाहीसा होतो आणि जिभेला तर कडू लागत नाही, असे औषध कोठे मिळते का ? पाणी बुबुळावर पडले तर काही इजा होत नाही, पण तेच खडकालाही फोडून बाहेर पडते. त्याचप्रमाणे भ्रममोहाला तोडायला ते लोखंडाप्रमाणे कणखर असते, पण कानाला माधुर्याहून मधुर लागते, जे ऐकताना कान जणू काय अधाशीपणाने त्याचे प्राशन करतात, पण ते आपल्या गुणांनी ब्रह्मतत्त्वाचीही फोड करते. पारध्याचे गाणे कानांना मधुर लागले तरी हरिणाला प्राणघातक असते, त्याचप्रमाण जी वाणी कानांना गोड लागते पण प्रसंगीं दुष्ट विकारांपासून अलिप्त ठेविते तीच सत्यस्वरूपाची होय.

**अक्रोध, त्याग व शांती**

यानंतर 'अक्रोध' म्हणजे काय ते ऐका. दगडाला कितीही पाणी घातले तरी त्याला कधी कोंभ फुटत नाहीत, लोणी कितीही घुसळले तरी त्यातून पेज काही निघणार नाही. सापाच्या कातीवर लाथ जरी मारली तरी ती काही

फडा काढीत नाही, अथवा वसंत ऋतूतही कधी आकाशाला फुले येत नाहीत. रंभेच्या रूपलावण्याने शुकमुनीच्या अंतःकरणात कधी कामविकार उत्पन्न होत नाही. भस्म झालेल्या अग्नीवर तूप शिंपडले तरी तो काही प्रज्वलित होत नाही. त्याचप्रमाणे कोणीही चीड आणणारे शब्द बोलले तरी ज्यास राग येत नाही, त्याच्या त्या मनःस्थितीस अक्रोध असे नाव आहे. आता 'त्याग' म्हणजे काय ते पाहू. मातीचा त्याग केला कीं घटाचा त्याग होतोच. तंतूचा त्याग केला की वस्त्राचा, बीजाचा त्याग केला की वृक्षाचा, भिंतीचा त्याग केला की तीवरील चित्राचा, निद्रेचा त्याग केला की तीमधील स्वप्नाचा, पाण्याचा त्याग केला की त्यावरील तरंगाचा, पावसाळ्याचा त्याग केला की मेघांचा, धनाचा त्याग केला की विषयभोगांचा त्याग जसा आपोआप घडतो, त्याचप्रमाणे बुद्धिमंतांनी देहाभिमान सोडून सर्व प्रपंचविषयांतून मुक्त होणे यालाच त्याग असे नाव आहे. आणि ज्ञेयाला जिरवून जेव्हा ज्ञाता आणि ज्ञान दोनही लयाला जातात तेव्हाच्या स्थितीला 'शांती' असे म्हणतात. प्रलय-कालीचा लोंढा विश्वाचे नावगाव पुसून जिकडे तिकडे आपणच एकटा कोंदून राहतो, मग हा नदीचा उगम, हा प्रवाह, हा समुद्र अशी भेददर्शक भाषा उरत नाही, जिकडे तिकडे केवळ पाणीच उरते. त्याचप्रमाणे ज्ञेयाशी गळामिठी पडून तन्मयता झाली म्हणजे ज्ञातेपणाही संपतो आणि मग जे काही उरते ते शांतीचे स्वरूप होय.

### आणि हे असे अपैशुनम्

यानंतर ज्ञानेश्वर 'अपैशुनम्' म्हणजे काय ते सांगतात. जे अज्ञानभ्रमा-दिकांमुळे किंवा पूर्वजन्मीच्या खडतर संचित कर्मांमुळे सर्व प्रकारच्या वाईट व निंद्य मार्गांत खितपत आहेत त्यांच्या दुःखाचे निवारण करणे म्हणजे अपैशुन्य होय. यासाठी ज्ञानेश्वर दृष्टान्त पाहा किती समर्पक व सुंदर देतात ते. रोग्याला दुखण्याचे कष्ट होतात, तेव्हा वैद्य हा आपला शत्रू की मित्र हे पाहत नाही. चिखलात रुतलेली गाय ही दुभती आहे की भाकड आहे हे कोणी पाहत नाही, मनुष्य बुडत असताना तो ब्राह्मण की अंत्यज याचा विचार कोणी करीत नाही, कोणी चांडाळाने रानावनात एखादी स्त्री वस्त्रहीन केली तर सभ्य मनुष्य तिला वस्त्र नेसविल्याखेरीज तिच्याकडे बघत नाही,

त्याचप्रमाणे हे सत्पुरुष आपल्या अंगबळाने दुसऱ्याचे दुःख समूळ दूर करतात. देवाची पूजा करून मग त्याचे ध्यान करावे, प्रथम शेत पेरून मग त्याची राखण करावी; अतिथीला संतुष्ट करून मग त्याचा आशीर्वाद घ्यावा, 'तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें । फेडूनियां पाहणें । तयाकडे ।। ' आपल्या गुणाने दुसऱ्याचे उणे पुरे करावे आणि मग सूक्ष्म नजरेने त्याच्याकडे पाहावे, कोणाच्याही वर्मावर घाव घालू नये. कोणाला कुकर्मात गोवू नये, कोणालाही दोष लावू नये. जो पडला असेल त्याला हरएक उपाय करून उभा करावा व सांभाळावा. मोठ्यासाठी इतरांना कधी क्षुल्लक मानू नये, इतरांचे दोष कधी शोधू नयेत, अशा वर्तनाचे हे 'अपैशुन्य' म्हणजे मोक्षाच्या वाटेवरील विश्रांतिस्थानच होय.

**दयेचे स्वरूप**

आता 'दया' म्हणजे काय ते ऐका. पौर्णिमेच्या चंद्राचे चांदणे सबंध विश्वाला उटी लावीत असताना हा लहान, हा मोठा असा भेदभाव करीत नाही. हा उत्तम, हा अधम असा भेदभाव दुःखितांचे दुःख दूर करताना ते करीत नाही, पाणी स्वतः नाहीसे होईल पण मरत असणाऱ्या गवतास टवटवी देऊन जाईल, त्याप्रमाणेच दुसऱ्याचे दुःख पाहून ज्याला कळवळा येतो तो त्याचे दुःख थोडेतरी कमी करतो. वाहत्या पाण्याला वाटेत खाचखळगा लागला तरी ते तो भरून पुढे जाते, त्याचप्रमाणे हा मनुष्य समोर येणाऱ्यास संतुष्ट करतो. पायाला काटा बोचला की त्याची कळ चेहऱ्यावर उमटते, त्याप्रमाणे दुसऱ्याच्या दुःखाने या थोर माणसाच्या अंगाची लाही होते. पायांना गारवा लाभला की तो डोळ्यांना भासतो, तसा हा दुसऱ्याच्या सुखाने सुखी ोतो. तान्हेलेल्यांना सुखावण्यासाठीच जसे पाणी असते, तसे दुःखितांच्या खासाठीच त्याचे जिणे असते. असा हा पुरुष म्हणजे मूर्तिमंत दयाच होय.

**अलोलुपता मार्दव**

यानंतर 'भूतेष्वलोलुप्त्वम्' म्हणजे काय ते सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात. 'कमळ मनोभावे सूर्याकडे मुख करून असले तरी तो काही त्याच्या सुवासाला रुत नाही. वसंताच्या मार्गात वनश्रीची गर्दी झाली तरी तो तिचा गार न करताच पुढे जातो, महासिद्धींसहित लक्ष्मी जवळ आली तरी

महाविष्णूला तिचा हिशेब नसतो, त्याप्रमाणे एखाद्या महात्म्याच्या मनात लौकिक व भौतिक सुखे दास बनली तरी त्यांचा भोग घ्यावा असे येत नाही. या जीवास कोणत्याही प्रकारचा अभिलाष नसतो. याच वृत्तीला 'अलोलुप्त्व' म्हणावे. 'मार्दवा' चे वर्णन करताना ज्ञानेश्वरांच्या कोमल वृत्तीचे दर्शन होण्यासारखे आहे. दृष्टान्तांची मालिका देताना ते म्हणतात, 'आतां माशियां जैसें मोहोळ । जळचरां जेविं जळ । कां पक्षियां अंतराळ । मोकळें हें ।। ना तरी बाळकोद्देशें । मातेचें स्नेह जैसे । कां वसंतींच्या स्पर्शे । मऊ मलयानिलु ।। डोळेयां प्रियाची भेटी । कां पिलियां कूर्मीची दिठी । तैसी भूतमात्रीं राहटी । मवाळ ते ।। स्पर्शें अति मृदु । मुखीं घेतां सुस्वादु । घ्राणासि सुगंधु । उजाळ आंगें ।। तो आवडे तेवढा घेतां । विरुद्ध जरी न होता । तरी उपमे येता । कापूर कीं ।। परि महाभूतें पोटीं वाहे । तेवींचि परमाणूमाजीं सामाये । या विश्वानुसार होये । गगन जैसे ।। काय सांगों ऐसें जिणें । जें जगाचेनि जीवें प्राणें । तया नांव म्हणें । मार्दव मी' ( ज्ञाने० १६ : १६८–१७४ ).

मधमाश्यांना जसे मधाचे पोळें, जलचरांना जसे पाणी अथवा पक्ष्यांना जसे अमर्याद अंतराळ, मुलाला जसे आईचे प्रेम, वसंतस्पर्शाने जसा नाजुक साजुक बनलेला मलयवायू, डोळ्यांना जसे प्रियाचे दर्शन, पिलांना जशी कासवीची दृष्टीं, ही सर्व मार्दवाची लक्षणे होत. स्पर्शाला अतिशय मऊ, जिभेला स्वादिष्ट, नाकाला अत्यंत सुवासिक, दिसायला अती निर्मळ असा कापूर पाहिजे तेवढा मिळता आणि विषारीपणाची बाधा न करता तर मात्र तो गोडपणाच्या, निर्मळपणाच्या बरोबर येतो. महाभूतांनाही पोटात घ्यावे आणि अणुरेणूंतही सामावून राहावे असे जे समग्र सृष्टीच्या जीवाने जगणे त्यासच मार्दव असे म्हणावे.

**लज्जा व अचापल**

आता '–ही' अथवा लज्जा म्हणजे काय ते पाहा. पराजय झाला की राजा लाजेने चूर होतो. अपमानामुळे मानी मनुष्य निस्तेज होतो, चांडाळाच्या घरी एखादा संन्यासी चुकून जरी गेला तरी तो लाजेने व्यथित होतो. क्षत्रियाचा रणांगणावरील पळ कोणाला सहन होईल ? महापतिव्रतेला वैधव्याचे आमंत्रण कसे सहन होईल ? देखण्या पुरुषाच्या अंगावर कोड उठले तर त्याच्या मनाची स्थिती काय होईल ? संभावितावर जर भलताच

आळ आला तर त्याच्या मनाची अवस्था कशी होईल ? त्याचप्रमाणे जीवास या साडेतीन हातांच्या शरीरात बंदिस्त होऊन पडण्यामुळे होते. लाजेने ते त्याला प्राणसंकटच वाटते. गर्भाशयातील रक्त, मांस व मलमूत्र यांचा ओतीव पुतळा बनून राहणे त्याला फारच लाजिरवाणे वाटते. देह-बंधात पडून नामरूपात्मक अवस्थेस येणे यासारखे लाजिरवाणे दुसरे काही नाही. या ओंगळ देहाची जी किळस तीच लज्जा समजावी. आणि ही लाज निर्मळ पुरुषांनाच वाटते; इतर कोडग्या मनुष्यांना या देहाचेच कौतुक वाटते. यानंतर ' अचापल ' गुण म्हणजे काय ते पाहू. कळसूत्री बाहुल्यांचे निमंत्रण करणारी दोरी तुटली की त्यांची हालचाल बंद पडते, त्याप्रमाणे योगसाधनांमुळे कर्मेंद्रियांची गती कुंठित होते. सूर्यास्त झाला की किर-णांचा पसारा आवरला जातो. तशीच अवस्था मनाच्या निग्रहामुळे इंद्रियांची होते. योगसाधनाच्यामुळे मनाची ही जी नियमित अवस्था तिलाच अचापल असे नाव आहे.

**तेज आणि धैर्य**

आता 'तेज' या गुणाची लक्षणे ज्ञानेश्वर कशी सांगतात ते पाहा. ईश्वर-प्राप्तीसाठी मनाचा निश्चय झाला असेल तर बळाला उणीव पडत नाही, आधीच मरण हे भयंकर, पण ते अग्नीत जळून आले तर आणखीच भयंकर, असे असले तरी पतिव्रता कधी त्याची पर्वा करीत नाही, त्याचप्रमाणे आत्मप्राप्तीच्या आचेने विषयरूपी विषाचा निकाल लावून जीव योगसाध-नाच्या अरुंद वाटेने जाऊ लागतो. मग त्याला निषेध आड येत नाही की तो विधीला जुमानीत नाही. महासिद्धीचाही मोह त्या जीवाला पडत नाही. या रीतीने स्वयंप्रेरणेने ईश्वराकडे धाव घेणे यालाच ' आध्यात्मिक तेज ' असे नाव आहे. यानंतर 'क्षमा' या गुणाचे लक्षण ज्ञानेश्वरांनी असे केले आहे: सर्व सहनशीलांमध्ये मी अतिशय श्रेष्ठ असा गर्व न होणे हीच क्षमा होय. ' धृती ' या गुणाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, शरीरा-वर हजारो केस आहेत, पण त्यांचा भार सहन करताना शरीरास भानही उरत नाही, अथवा इंद्रिये बेताल झाली, अंगातील गुप्त रोग एका-एकी उसळले किंवा प्रियजनांचा वियोग झाला, अनिष्ट संकटांचा वर्षाव एकाएकी झाला, तरी अगस्तीप्रमाणे छातीठोकपणे उभे राहणे याचे नाव

धृती किंवा धैर्य होय. आकाशात धुराच्या जळमटांची एक मोठी रांग उमटावी पण वाऱ्याच्या झुळकीबरोबर ती नाहीशी व्हावी, त्याप्रमाणे अधिदैव, अधिभूत आणि अध्यात्म असा त्रिविध ताप घडला असता तो जिरवून टाकता येतो. अशा विलक्षण प्रसंगी चित्त विचलित न होण्याला धैर्य असे म्हणतात.

**शुचिता आणि अद्रोहत्व**

यानंतर 'शौच' म्हणजे शुद्धता या गुणाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, सोन्याच्या मुलाम्याने स्वच्छ केलेल्या व गंगामृताने भरलेल्या कलशासारखे 'शौच' आहे. शरीराकडून निष्काम कर्म घडणे आणि जीवाने विवेकपूर्णत्वाने वागणे ही सारी शुचित्वाचीच लक्षणे आहेत. 'अद्रोहत्वाची' लक्षणे सांगताना ज्ञानेश्वरांच्या कवित्वास व कोमलतेस पुनः भरती आलेली दिसते. ते म्हणतात, 'कां फेडित पापताप। पोखीत तीरींचे पादप। समुद्रा जाय आप। गंगेचें जैसें ।। कां जगाचें आंध्य फेडितु। श्रियेचीं राउळें उघडितु। निघे जैसा भास्वतु। प्रदक्षिणे ।। तैसीं बांधिलीं सोडितां। बुडालीं काढितां। सांकडीं फेडितां। आर्तांचिया ।। किंबहुना दिवस-रातीं। पुढिलांचें सुख उन्नति। आणित आणित स्वार्थी। प्रवेशिजे ।। वांचूनि आपुलिया काजालागीं। प्राणिजाताच्या अहितभागी। संकल्पाचीही आडवेगी। न करणें जें ।। '—गंगेचे पाणी प्राणिमात्रांचे पापताप शमवीत व तीरांवरील झाडांना पोषीत समुद्राकडे जाते. सूर्य जगाचा आंधळेपणा दूर करतो व जिकडे तिकडे संपत्तीची मंदिरे सताड उघडी करतो आणि मग आकाशाच्या प्रदक्षिणेला निघतो, तसा हा अद्रोही मनुष्य बद्धांना मुक्त करतो, बुडालेल्यांना बाहेर काढतो, दुःखितांचे संकट दूर करतो. रात्रंदिवस हा दुसऱ्यांचे सुख वाढवूनच आपला स्वार्थ साधीत असतो. आपल्या कार्यासाठी इतरांचे वाईट व्हावे अशी कल्पनाही याच्या मनाला शिवत नाही. ही सर्व अद्रोहत्वाची लक्षणे होत.

**मोक्षचक्रवर्तीचे अग्रहार**

दैवी संपत्तीच्या गुणमालिकेतील शेवटचा गुण म्हणजे 'नातिमानिता' म्हणजे अतिमान नसणे हा होय. तेराव्या अध्यायात या 'अमानित्वा' चे वर्णन ज्ञानेश्वरांनी विस्ताराने केले असल्याने या ठिकाणी

एकच समर्पक दृष्टान्त देऊन ते आटोपते घेतात. अमानित्वाचे वर्णन करताना ते म्हणतात, ‘आणि गंगा शंभूचां माथां । पावोनि संकोचे जेविं पार्था । तेविं मान्यपणें सर्वथा । लाजणें जें पार्था,’ शंकरांनी गंगेला आपल्या मस्तकावर जटेत बसविले, म्हणून ती गर्विष्ठ बनली नाही, उलट लज्जित होऊन ती जटेतच लपून राहिली. हे लाजणे अथवा संकोचणे म्हणजेच अमानित्व होय.

याप्रमाणे दैवी संपत्तीचे हे सव्वीस गुण म्हणजे ज्ञानेश्वरांच्या मताने ‘ब्रह्मसंपदा’ आणि ‘मोक्षचक्रवर्तीचे अग्रहार’ च आहेत. अथवा ही दैवी संपत्ती म्हणजे गुणजलाने तुडुंब भरलेली गंगाच वैराग्यरूपी सगरपुत्रांच्या अंगावर लोटली आहे. अथवा ‘कीं गुणकुसुमांची माळा । हे घेऊनि मुक्तिबाळा । वैराग्य निरपेक्षाचा गळा । गिंवसींत असे’ ( ज्ञाने. १६ : २०९ ). ही दैवी संपत्ती म्हणजे सद्‌गुणरूपी फुलांची माळ असून ही मुक्तिरूपी नवरी विरक्ताच्या गळ्यात घालीत आहे असे वाटते. अथवा या सव्वीस गुणांच्या वाती पाजळून ही गीतारूपी पत्नी आपल्या आत्मारामरूपी पतीची नीरांजनाने जणू आरतीच करीत आहे, किंवा हे गुण म्हणजे गीतासागरातून काढलेले दैवी संपत्तिरूप शिंपल्यातील निर्मळ, निखोड मोत्यांचे दाणेच होत. ही दैवी संपत्ती म्हणजे मोक्षसूर्याने उजळलेली पहाटच जाणावी.

## ७

# ‘भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव’

### तत्त्वांचा आचारधर्म

मनुष्याचे शरीर अथवा क्षेत्र आणि आत्मा अथवा क्षेत्रज्ञ अथवा परमात्मा यांच्या ज्ञानाचे विवरण गीतेच्या तेराव्या अध्यायाच्या प्रारंभी आले आहे. शरीर म्हणजे क्षत्र व त्यास जो जाणणारा तो क्षेत्रज्ञ तो मीच असा प्रारंभीच श्लोक आहे. क्षेत्र म्हणजे काय, त्याचे विकार कोणते, क्षेत्रज्ञ कोण इत्यादींचा विचार करताना पाच महाभूते, अहंकार, बुद्धी, अव्यक्त प्रकृती, दहा सूक्ष्म इंद्रिये, एक मन, पाच इंद्रियांचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पाच सूक्ष्म विषय. इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात, चेतना आणि धृती या तत्त्वांचा समुदाय म्हणजे क्षेत्र किंवा शरीर होय. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे ज्ञान हाच या अध्यायाचा मुख्य विषय आहे. या ‘ज्ञाना’चे आणखी तात्त्विक वर्णन करण्यापेक्षा हे ज्ञान ज्यांच्या अंगात मुरले आहे त्यांच्या आचारधर्माचे वर्णन करण्यावर गीतेचा व ज्ञानेश्वरांचा भर आहे. अमूर्त तत्त्वज्ञानापेक्षा त्याचे सावयव व गोचर दर्शन श्रेष्ठ पुरुषांच्या वर्तनात दिसते. या वर्तनावरूनच खऱ्या ज्ञानाचे मार्गदर्शन होण्यासारखे आहे.

**इंद्रियांच्या व्यापारांतून ज्ञान**

या ज्ञानाचा अनुभव एखाद्यास आला आहे हे त्याच्या बर्तनावरून समजावे. या ज्ञानाच्या अनुभवाने बुद्धीचे डोळे उघडतात आणि जीव आनंदाच्या राशीवर लोळू लागतो. या पवित्र ज्ञानामुळे अनेक दोषांत लडबडलेले मन निर्मळ व स्वच्छ होते. या ज्ञानाचे मूर्त स्वरूप कोठे पाहावे? ज्ञानेश्वर सांगतात, 'मग तेंचि इये शरीरीं । जैं आपुला प्रभावो करी । तैं इंद्रियांचिया व्यापारीं । डोळांहि दिसे' (ज्ञाने. १३ : १७८). हे ज्ञान एकदा बुद्धिगम्य झाले की मग या शरीरावर आपली सत्ता चालवू लागते, आणि इंद्रियांच्या व्यापारांनी डोळ्यांनाही दिसू लागते. क्षेत्रक्षेत्रज्ञ यांच्या अव्यक्त ज्ञानाचे व्यक्त रूप श्रेष्ठांच्या आचरणात कसे प्रकट होते हे सांगताना ज्ञानेश्वरांनी फार बहारीचे दृष्टान्त दिले आहेत. ते म्हणतात, 'पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेंनि साजेपणें । जाणिजे तेविं करणें । सांगती ज्ञान ॥ अगा वृक्षासि पाताळीं । जळ सांपडे मूळीं । तें शाखांचिये बाहाळीं । बाहेर दिसे ॥ कां भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । नाना आचार गौरव । सुकुलीनाचे ॥ अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेहो जैसा ये व्यक्ती । कां दर्शनाचिये प्रशस्तीं । पुण्यपुरुष ॥ ना तरी केळीं कापूर जाहला । तो परिमळें जाणों आला । कां भिंगारीं दीपु ठेविला । बाहेरि फांके ॥' (ज्ञाने. १३ : १७९–१८३) झाडांच्या टवटवीतपणामुळे वसंताचे आगमन समजते, त्याप्रमाणे इंद्रियांच्या व्यापारांवरून ज्ञानाची खूण पटते. झाडांच्या मुळांना खोल पृथ्वीच्या पोटात पाणी सापडत असले तरी ते वरील फांद्यांच्या पालवीच्या रूपाने प्रकटते. वर उगवून आलेल्या कोंभांच्या लवलवीमुळे भूमीची सुपीकता अथवा मृदुता ध्यानात येते. कुलीन माणसाचे थोरपण त्याच्या आचारांवरून समजते. आदरसत्कार करण्याच्या बृत्तीवरून स्नेहाची प्रचीती येते, शांत व भव्य चेहऱ्यावरून पुण्यवान माणसाची ओळख पटते. कर्पूरकर्दळीत कापूर झाला की बाहेर दरवळणाऱ्या सुगंधावरून समजतो. भिंगाच्या कंदिलात दिवा ठेविला की त्याचा प्रकाश बाहेर पडतो. 'तैसें हृदयींचेनि ज्ञानें । जिये देहीं उमटतीं चिन्हें'–हृदयात ज्ञान उपस्थित झाले की त्याची चिन्हे बाहेर उमटू लागतात.

**ज्ञानी माणसाची लक्षणे**

ज्ञानी माणसाची वर्तनावरून लक्षणे देताना पाच श्लोकांत गीतेने एक

यादीच दिलेली आहे. मान नसणे, दंभ नसणे, अहिंसा, क्षमा, सरळपणा, गुरुसेवा, शुचिर्भूतपणा, स्थैर्य, मनोनिग्रह, इंद्रियविषयांच्या ठायीं वैराग्य, अहंकार नसणे, जन्म-मृत्यु-जरा-व्याधी व दुःख हे दोष मानणे, अनासक्ती, बायकामुले व घरप्रपंच यांच्याविषयी लंपट नसणे, इष्ट अथवा अनिष्ट प्राप्त झाले तरी चित्ताची समता राखणे, परमेश्वराच्या ठिकाणी अनन्य भक्ती ठेवणे, निवडक वा एकान्ताच्या जागी राहणे, सामान्य लोकांचा चव्हाटा न आवडणे, अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धी असणे व तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तांचे परिशीलन ही ज्ञानी माणसाच्या आचाराची वा वर्तनाची लक्षणे आहेत. या ज्ञानलक्षणांवरील ज्ञानेश्वरांचे विस्तृत भाष्य अतिशय श्रेष्ठ प्रकारचे आहे, एकतर या भाष्यामुळे ज्ञानी माणसाची ओळख पटणे सुलभ झाले आणि दुसरे असे की, उन्नत होत जाणाऱ्या मानवी मनाची उंची किती राहू शकते याचाही प्रत्यय या भाष्यावरून येण्यासारखा आहे. ज्ञानेश्वरांच्या अव्वल दर्जाच्या प्रतिभेचीही साक्ष येथे पटण्यासारखी आहे.

**ज्ञानी माणसास मानाची हाव नसते**

'अमानित्वम्' अथवा मान नसणे किंवा मानाची हाव नसणे या पहिल्याच गुणावरील ज्ञानेश्वरांचे भाष्य पाहा कसे पल्लेदार व मर्मग्राही आहे ते. या ज्ञानी माणसास कोणत्याही प्रकारच्या लौकिक विषयात रंगून जाणे आवडत नाही. लोकांत संभावितपणा मिरविणे त्याला पसंत नसते. स्वतःच्या अंगातील गुणांचे स्तुतिस्तोत्र गाइले जात असताना, बहुमानाचा गाजावाजा झाला असता, मोठ्या योग्यतेची प्रौढी अंगाला चिकटली की ज्ञानी मनुष्य फार कासावीस होतो. जसा काही पारध्याच्या फासात अडकलेला हरिणच ! किंवा कोणी पोहत असतानाच पाण्याच्या भोवऱ्यातच जणू सापडलेला आहे ! लोकमान्यतेचे एक मोठे संकटच त्याला वाटते. लौकिक मोठेपणाला स्वतःच्या अंगास तो शिवूही देत नाही. 'पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी । हा अमुक ऐसी नोहावी । सेचि लोकां ।। तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा देईल भेटी । मरणेंसीं साटीं । नमस्कारितां ।। वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे । परि वेडिवेमाजी दडे । महिमे भेणें ।। चातुर्य लपवी । महत्त्व हारवी । पिसेंपण मिरवी । आवडोनी ।। लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरी उबगु । उगेपणीं चांगु । आथी भरू' ( ज्ञाने. १३ : १८९–९३ ).

या ज्ञानी माणसाला स्वतःचा बहुमान डोळ्यांनी पाहावत नाही. स्वतःची कीर्ती कानांनी ऐकवत नाही. हा अमुक अमुक अशी आठवण लोकांनी काढावी हेही त्याला पसंत पडत नाही. मग आदरसत्काराची गोष्ट तरी कोठली ? लोक त्याला नमस्कार करायला लागले की मरणप्राय वेदना त्याला होतात. स्वतः बृहस्पतीप्रमाणे ज्ञानी असला तरी कोणी मोठेपणा देईल या भीतीने तो वेडसरपणा पांघरून बसतो. तो आपले चातुर्य लपवितो, महत्त्व कमी करतो. त्याला नावलौकिकाचा कंटाळा असतो. शास्त्रार्थाची वटवट करणे सोडून निवान्त जागी मूक होऊन राहणे त्शाला आवडते. जगाने आपली हेळसांड करावी, नातेवाइकांनी आपल्याकडे ढुंकूनही पाहू नये, अशी याच्या मनाची आवड असते. अंगी लहानपणा बाणेल, हीनत्वाचे भूषण अंगी चढेल, असे याचे वर्तन असते. ' हा जिवंतच नाही, हा मुळी नाहीच ' अशी लोकांची भावना स्वतःविषयी व्हावी असे याला नेहमी वाटत असते. हा चालतोय की आपलां वाऱ्याच्या झोताबरोबर लोटला जात आहे अशी लोकांना शंका यावी असे याला वाटते. ' माझें असतेंपण लोपो । नामरूप हारपो । मज झणे वासिपो । भूतजात ' – माझे अस्तित्वच संपावे, नामरूप नष्ट व्हावे, मला पाहताच भूतमात्रांनी भिऊन पळून जावे, असा नवस करणारा हा ज्ञानी मनुष्य नेहमी एकान्ताचा आश्रय करतो. निर्जन प्रदेशाच्या कल्पनेत त्याच्या जीवात जीव येतो, त्याचे वायूशी पटते, त्याचा संवाद आकाशाबरोबर असतो. झाडेच त्याला जीवाभावाची व प्रिय अशी वाटतात.

### त्याला दंभही माहीत नाही

यानंतर 'अदंभित्वम् ' अथवा दंभ नसणे या गुणावरील ज्ञानेश्वरकृत भाष्य पाहा. दंभ नसणारा मनुष्य आपले पुण्यकृत्य आपल्या तोंडाने बोलून दाखवीत नाही. जीव गेला तरी जसे लोभी सनुष्य गुप्तपणे पुरून ठेवलेल्या द्रव्याचा ठेवा सांगत नाही तसेच या ज्ञानी माणसाचे असते. तो पुण्यकर्म आपल्या मुखाने सांगणार नाही. खोडचाळ गाय स्वतःचा पान्हा चोरते, वेश्या आपले वाढलेले वय लपविते, रानात सापडलेला श्रीमंत आपली श्रीमंती दाखवीत नाही, कुलीन स्त्री ज्याप्रमाणे आपले अवयव नीटपणे झाकून घेते, शेतकरी शेतात पेरलेले बी नीट मातीने झाकून टाकतो, त्याचप्रमाणे हा ज्ञानी मनुष्य आपली दानादी सत्कृत्ये नेहमी गुप्त ठेवितो. तो आपल्या

शरीराचे चोचले करीत नाही की लोकांची मर्जी राखण्याचा प्रयत्न करीत नाही, आपल्या धार्मिक कृत्यांची जाहिरात करीत नाही. ‘परोपकारु न बोले। न मिरवी अभ्यासिलें। न शके विकूं जोडिलें। स्फीतीसाठीं’- आपण केलेल्या उपकारांना तो जाहीरपणे मिरवीत नाही. शिकलेली विद्या दाखवीत नाही आणि संपादन केलेले ज्ञान लौकिक कीर्तीसाठी तो कधी विकत नाही. शारीरिक भोगांविषयी तो कृपणच असतो, पण धर्मकृत्यांत धन खर्च करण्यासाठी तो मागेपुढे पाहत नाही. घरात पाहावे तर प्रत्येक गोष्टीची चणचण, शरीर बघावे तर अगदी रोडावलेले, पण दान देण्याच्या बाबतीत त्याची प्रत्यक्ष कल्पतरूशी स्पर्धा असते. आपल्या धर्मकृत्यांत तो शहाणा, दानाच्या वेळी सढळ हाताचा, आत्मचर्चेत चतुर पण येऱ्हवी व्यवहाराच्या बाबतीत मात्र वेडसर असतो. केळीचा खुंट हलका व फोपसा असतो, पण त्यालाच रसभरित फळे येतात. ढगांचे अंग हलके व झिरझिरीत असते, पण त्यांतूनच गारा पडतात. त्याचप्रमाणे या ज्ञानी माणसास सर्व काही माहीत असूनही लौकिक गोष्टींत तो दीनवाणा असतो.

### अहिंसेच्या नावावर हिंसा

आता यानंतर ज्ञानेश्वरांनी ‘अहिंसा’ या शब्दावरील आपले विख्यात असे काव्यमय निरूपण सुरू केले आहे. अहिंसा या गुणासंबंधी स्वतःचे मत सांगण्याअगोदर ज्ञानेश्वर अहिंसेच्या नावावर हिंसा करणारे जे कोणी पंथ वा संप्रदाय आहेत त्यांच्यावर टीका करताना दिसतात. याज्ञिक, जैनधर्मीय, बौद्धधर्मीय, आयुर्वेदाची परंपरा यांवर ज्ञानेश्वरांनी सौम्यशी टीका केली आहे. हिंसा करून अहिंसा कशी साधेल? असा त्यांचा साधा प्रश्न आहे. झाडाच्या फांद्या तोडून का कधी त्याच झाडाला त्यांचे कुंपण घालतात? हातपाय तोडून, त्यांना शिजवून का कधी भूक शमवावी? देऊळ मोडून त्याच दगडांची कधी संरक्षक भिंत बांधतात? या अहिंसेत हिंसाच नाही का? अवर्षणाने गांजलेल्या जगाचे संरक्षण व्हावे म्हणून याज्ञिक यज्ञ करतात, पण या यज्ञकर्मात उघडउघड पशुहिंसा असते. ही कसली अहिंसा? आयुर्वेदसुद्धा याच मार्गाने जातो. एक जीव वाचविण्यासाठी दुसऱ्या जीवांचा घात करावा लागतो. या आयुर्वेदाने काही वनस्पतींचे कंद उपटले, काही वनस्पतींची पानेमुळे ओरबाडली, काही वनस्पती आडव्या मोडून काढल्या, काही

वृक्षांच्या साली काढल्या, काहींचे गाभे भांड्यात उकळले, जन्मापासून कोणाशीही वैर न करणाऱ्या वृक्षांच्या अंगावर त्यांचा चीक मिळावा म्हणून चिरा पाडल्या. अशा प्रकारे हा आयुर्वेद वृक्षांचा, वनस्पतींचा जीव घेऊन ‘ अहिंसा ’ साधतो ! सजीव प्राण्यांना चिरून, त्यांच्या शरीरांतील पित्तादी पदार्थ काढून त्यांची औषधे बनवून रोग्यांचे जीव वाचविणे ज्ञानेश्वरांना पसंत नाही. अहो, राहती घरे पाडून कधी देवळे बांधतात ? व्यवहारात गरिबांना नागवून अन्नछत्रे घालतात ? डोके झाकून ढुंगण उघडे टाकतात ? घर मोडून मांडव करतात ? बैल विकून कधी गोठा बांधतात ? पोपटाला सोडून देऊन कधी पिंजरा तयार करावा ? या सर्व कृत्यांना हसावे की रडावे ? कोणी अहिंसा म्हणून पाणी गाळून पितात, पण या गाळण्याच्या क्रियेत जीवांची हत्या होतेच की. कोणी अहिंसेच्या भीतीने अन्नाचा एक कणही खात नाहीत, म्हणजे स्वतःचा जीव खंगवून त्रस्त करतात. हीही एक प्रकारची हिंसाच की.

**‘ ते वाट कृपेची करितु ’**

आपले स्वतःचे अहिंसेविषयी मत स्पष्ट व्हावे म्हणून प्रथम अशा रीतीने ज्ञानेश्वर इतर मतांना खोडून काढतात. आपल्या मताचे स्पष्टीकरण करताना ज्ञानेश्वर प्रथम कायिक अथवा शारीरिक अहिंसेची महती गाताना दिसतात. अहिंसा ज्याच्या अंगीं पूर्णपणे मुरली आहे तो पायांनी चालतो तरी कसा ? तरंगांना न ढवळता, लहरी न मोडता, पाण्याचा साठा न चाळवता वेगाने व नाजुक हळुवारपणे आमिषाकडे नजर ठेवून बगळा जसा बेताबेताने पाऊल पाण्यात टाकतो, अथवा भ्रमर जसा कमलपराग चुरडून जाऊ नयेत म्हणून कमलावर अलगद पाय ठेवितो, त्याप्रमाणेच हा सत्पुरुष प्रत्येक परमाणूला लहान लहान जीव लगटलेले आहेत असे समजून मोठ्या करुणायुक्त अंतःकरणाने पावले टाकीत असतो. ‘ ते वाट कृपेची करितु । ते दिशा स्नेहभरितु । जीवातळीं आंथरितु । आपुला जीवु ’ – असे त्यांचे वर्तन असते. प्रेमाच्या पोटी मांजरी आपल्या पिलांना तोंडात धरते, तेव्हा तिचे दात त्यांना बोचतात का ? ममताळू आई आपल्या तान्हुल्याची वाट बघत असताना तिच्या दृष्टीत केवढे कोमलत्व असते ! कमळाचे पान हालल्या-

मुळे निर्माण होणाऱ्या वाऱ्यामुळे आपल्या डोळयांना किती त्रास होतो ? याच मृदुपणाने त्याची पावले जमिनीवर पडत असतात; आणि ती जेथे लागतात तेथील जीवांना सुखच होते. वाटेत चालताना त्याला कोठे कृमि-कीटक दिसला तर लगेच दचकून पाऊल मागे घेतो, आणि मनाशी म्हणतो, ' मी दणदण पाय आपटले तर माझ्या या स्वामीची निद्रा मोडेल ना ! या चिंतेने तो पायवाटेवरून माघाराच वळतो, ' जीवाचेनि नांवें । तृणातेंही नोलांडावें । मग न लेखितां जावें । हे कें गोठी ? ' जीव म्हणून गवतालाही चेंगरू नये एवढी काळजी जेथे घेतली जाते तेथे मग निष्काळजी-पणाने पाऊल टाकण्याचे नावच नको. मुंगीला मेरू पर्वत ओलांडवत नाही, माशीला अथवा चिलटाला जसा सागर ओलांडवत नाही, तसा हा थोर सत्पुरुष वाटेत भेटलेल्या जीवांना ओलांडत नाही.

**' नादब्रह्मचि मुसें आलें '**

ही झाली पायांनी साधावयाची अहिंसा. आता वाणीने ती कशी साधायची ? वाचिकी अहिंसेचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांची कोमल प्रतिभा बहरास आलेली दिसते. ज्यांच्या चालण्यात एवढी सावधता त्यांचे बोलणे म्हणजे मूर्तिमंत दयाच असावी. ' स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार । मुख मोहाचें माहेर । माधुर्या जाहले अंकुर । दशन तैसे ।। पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ।। ' असे या श्रेष्ठ पुरुषाचे बोलणे सौम्य व सुखदायक असते. त्याचा श्वासही अती हळुवार व कोमल असतो. त्याचे मुख म्हणजे प्रेमाचे माहेरघर असते, आणि त्याचे दात म्हणजे माधुर्याला आलेले कोवळे कोंभच !. अशा माणसाच्या स्नेहाचा, प्रेमाचा पाझर पुढे आणि त्याच्यामागून उच्चारलेली अक्षरे असा क्रम असतो, आधी कृपा मग तोंडाचा शब्द अशी त्याच्या बाबतीत अवस्था असते. तसे पाहिले तर तो आधी फारसे बोलतच नाही. पण कधी बोललाच तर त्याचे शब्द इतके मऊ असतात की ते कधी कोणाला खुपत नाहीत. त्याच्या बोलण्याची कोणालाही भीती वाटत नाही. आपल्या बोलण्याने कोणालाही क्लेश होऊ नयेत, कोणाचीही भुवई वाकडी होऊ नये असे मनात आणून तो बोलण्याचे टाळतोच. मग कोणी बोलण्याविषयी त्याला प्रार्थनाच केली तर तो असे काही हळुवारपणे बोलतो की, ऐकणाराला वाटावे हा बोलणारा

आपला मायबापच आहे ! याच्या बोलण्याच्या सुखाचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांची उत्तुंग कवित्वशक्ती सांगते, 'कां नादब्रह्मचि मुसें आलें। कीं गंगापय उसळलें। पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें ।। तैसें साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे ।।'– याचे बोलणे म्हणजे जणू नादब्रह्मच आकाराला आले आहे असे वाटते. गंगाजल संथपणे यावे किंवा पतिव्रतेला वार्धक्य यावे तसे याचे बोलणे शुद्ध, कोमल असते. मोजके आणि गोड शब्द अमृताच्या तरंगांप्रमाणे वाटतात. त्याच्या बोलण्यात हटवादीपणा नसतो. कोटिक्रम, उपरोध, जीवाला संताप आणणारा कठोरपणा, कुशंका, लबाडी हे दुर्गुण त्याच्या वाणीत नसतात.

## त्याचे कृतार्थ हात

आता या सत्पुरुषाचे पाहणे कसे असते ? दृष्टीनेही अहिंसेची जपणूक हा कशी करतो ? याच्या भुवयांना आठ्या पडलेल्या नसतात. प्रत्येक भूतमात्रात परब्रह्म वस्तू आहे अशी याची जाणीव असल्यामुळे तो कधी कोणाकडे रोखून पाहातच नाही. आणि कधी काळी याने कोणाकडे दृष्टी टाकली तर ती कशी असते ? 'तरि चंद्रबिंबौनि धारा। निघतां नव्हती गोचरा। परि एकसरें चकोरां ! निघती दोंदें '– चंद्रबिंबातून निघणारी अमृतधारा जरी दिसली नाही तरी तीमुळे चकोरांची पोटे आनंदाने भरून निघतात ना ? तसाच अनुभव याच्या दृष्टीमुळे सर्व जीवांना येतो. कासवीच्या दृष्टीप्रमाणे याची दृष्टी सर्वांना पोषण करणारी वाटते. पायांनी, वाणीने, डोळ्यांनी अहिंसा कशी पाळायची याचे दर्शन घडविल्यानंतर ज्ञानेश्वर हातांच्या क्रियांकडे वळले आहेत. सिद्ध पुरुषांचे मनोरथ पूर्ण झाल्यामुळे ते जसे जागच्या जागी शांत असतात, त्याप्रमाणे या ज्ञानी माणसाचे हात कृतार्थ होऊन स्वस्थ असतात. या हातांना आता काहीच करावयाचे असे उरलेले नसते. या श्रेष्ठ पुरुषाचे वर्तन कसे असते ? 'आसुडैल वारा। नख लागेल अंबरा। इया बुद्धीं करां। चळों नेदी ।। तेथ आंगावरिलीं उडवावीं। कां डोळां रिगतें झाडावी। पशुपक्ष्यां दावावी। त्रासमुद्रा '।। – वाऱ्याला हिसका बसेल, आकाशाला नख लागेल, या भीतीने हा हात चाळतच नाही. मग अंगावर बसलेल्या माशीला टिचकी मारून उडवावे, डोळ्यांत शिरणाऱ्या चिलटाला झटकून टाकावे अथवा पशुपक्ष्यांना भेडसवावे या गोष्टी त्याच्या-

कडून होणार कशा ? तो कधी हातात दंडुका अथवा काठी घेत नाही. शस्त्राला तो कधी शिवत नाही. इतकेच नव्हे, तर ' लीला कमळें खेळणें । कां पुष्पमाळा झेलणें । न करी म्हणे गोफणें । ऐसें होईल ॥ हालवतील रोमावळी । यालागीं आंग न कुरवाळी । नखांची गुंडाळी । बोटावरी ' – तो कधी कमळांशी खेळत नाही की पुष्पमाळा उडवून झेलत नाही. कारण न जाणो, त्या कमळाची अथवा पुष्पमालेची गोफण होऊन कोणाला तरी दगड बसायचा, अशी चिंता त्याच्या मनात असते. या सत्पुरुषाचे हात केवळ लोकांना अभय देण्यासाठीच उचलले जातात. दुसऱ्याला आधार देण्यासाठी, दुःखितांचे भय दूर करण्यासाठी, त्यांना गोंजारण्यासाठीच याच्या हातांचा उपयोग.

**इंद्रियद्वारे फाकणारे मन**

कायिक अथवा शारीरिक अहिंसा कशी आचरावी हे सांगून झाल्यानंतर ज्ञानेश्वर मनाच्या अहिंसेकडे वळताना एक मोठे मानसशास्त्रीय तत्त्व सांगून जातात. त्यांच्या मताने इंद्रियांच्या द्वारे जे मानवी वर्तन होते ते मनाचेच खेळ होत ! अगदी आधुनिक वाटणारा हा विचार सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'आतां मन तयाचें । सांगो म्हणों जरी साचें । तरी सांगितले कोणाचे । विलास हे ?' आता मनाचे वर्णन करायचे तर मग इतका वेळ कोणाचे व्यापार सांगितले ? नेहमीच्या दृष्टान्तमय भाषेत ज्ञानेश्वर पुढे विचारतात, ' काइ शाखा नव्हे तरु । जळेवीण असे सागरू । तेज आणि तेजाकारू । आन काई ?॥ अवयव आणि शरीर । हे वेगळाले काय कीर । कीं रसु आणि नीर । सिनानीं आथी ? ' — फांद्या म्हणजेच झाड नव्हे काय ? पाण्यावाचून समुद्र कोठे असतो का ? तेज आणि तेजस्वी पदार्थ यांच्यांत कधी भिन्नता असते ? अवयव आणि शरीर, रस किंवा पाणी कधी वेगवेगळे असतात ? तेव्हा आतापर्यंत सांगितलेले बाह्य आचारप्रकार म्हणजे मनच होय. ' जें बीज भुईं खोविलें । तेंचि वरी रूख जाहलें । तैसें इंद्रियद्वारीं फांकलें । अंतरचि की ' – जे बीज जमिनीत पेरावे त्याचाच वृक्ष होतो, त्याचप्रमाणे इंद्रियांच्या द्वारेच मन बाहेर प्रकट होत असते. म्हणून अहिंसेची वृत्तीही ' आधीं मनौनीचि उठी । मग ते वाचे दिठीं । करांसि ये ' याप्रमाणे सर्व इंद्रियांच्या व्यापारांचे मूळ मन हेच आहे. आणि

मनाने व देहाने वर सांगितल्याप्रमाणे अहिंसा पाळणारा पुरुषच खरा ज्ञानी म्हणावा लागतो. आपण विवेचनाच्या भरात अहिंसेसंबंधी फार बोललो याचे भानही ज्ञानेश्वरांना आहे. त्यासंबंधी ते म्हणतात, ‘ म्हणाल हिरवे चारीं गोरूं । विसरे मागील मोहर धरूं । कां वारेलगें पाखिरूं । गगनीं भरे ।। तैसिया प्रेमाचिया स्फूर्ती । फावलिया रसवृत्ति । वाहविला मतो । आकळेना ’ ।। – श्रोते कदाचित् म्हणतील, हिरवा चारा पाहिला म्हणजे गुरू जसे आपला मार्ग विसरते अथवा वाऱ्याच्या झुळकेबरोबर वाहणारे पाखरू जसे आकाशात भरारते तसे या ठिकाणी घडले.

**क्षमा आणि आर्जव**

यानंतर ‘ क्षांती ’ म्हणजे क्षमा. खोल डोहातून जशा कमळाच्या वेली वा दैवशाली पुरुषाच्या घरी जशी संपत्ती तसाच या सत्पुरुषाच्या हृदयात क्षमेचा वास असतो. आवडता दागिना ज्या आवडीने आपण अंगावर धारण करतो, त्याच आवडीने तो सर्व काही सहन करतो. तीनही तापांचे डोंगर जरी त्याच्यावर कोसळले तरी तो व्यथित होत नाही, तो मानापमान सहन करतो, सुखदु:खे सारखीच लेखतो, निंदास्तुतीने विचलित होत नाही. तो उन्हाने तापत नाही की थंडीने कापत नाही, कसल्याही प्रसंगात तो भीत नाही. मेरू पर्वताला आपल्या शिखरांचा भार कधी वाटतो का ? तिसरा अवतार वराह कधी पाठीवरील पृथ्वीच्या ओझ्याची तक्रार करतो का ? असंख्य भूतमात्रांच्या दाबाने पृथ्वी कधी दबली जाते काय ? तसाच हा थोर पुरुष सुखदु:खादी द्वंद्वांनी कष्टी होत नाही. यानंतर ‘ आर्जव ’ या गुणाची लक्षणे पाहा. आर्जव नेहमी भेदभावरहित तत्त्व राखते. सूर्याप्रमाणे हा श्रेष्ठ पुरुष सर्वांशी समत्वाने वागतो. पाण्याप्रमाणे तो कोणाही व्यक्तीशी मिळून मिसळून वागतो. त्याच्या चित्तात कोणाविषयीही अढी नसते. आईच्या पुढे यायला मुलाला जशी शंका वाटत नाही, त्याप्रमाणे याला लोकांपुढे स्वत:च्या मनोवृत्ती प्रकट करायला संकोच वाटत नाही. कमळ उमलले की त्याचा कोणताच भाग मिटलेला राहत नाही, त्याप्रमाणे त्याच्या उघडचा मनात कोठेही दडलेला कानाकोपरा उरत नाही. आधीच स्वच्छ असणाऱ्या रत्नामधून जसे तेजस्वी किरण बाहेर पडावेत, त्याप्रमाणे त्याच्या स्वच्छ मनातून निर्मळ वर्तन पाझरत असते. अर्धवट झाकलेले, अर्धवट उघडे असे त्याच्याजवळ काही नसते. अमृताच्या धारेप्रमाणे त्याचे अंतरंग सरळ व साधे असते.

**शुचित्व आणि स्थैर्य**

यानंतर ज्ञानेश्वरांचे प्रसिद्ध असे 'आचार्योपासनम्' वर भाष्य सुरू होते. ज्ञानेश्वरांच्या गुरुसेवेबद्दलच्या कल्पनांवर याच पुस्तकात स्वतंत्र लेख असल्याने या गुरुसेवेचा विस्तार येथे करीत नाही. 'शुचित्वा' चे लक्षण सांगताना ज्ञानेश्वर सांगतात, या पुरुषाचे अंग आणि मन जणू काय कापराचेच असते. रत्नाचा पिंड आतून बाहेरून स्वच्छ असतो, सूर्य आतून बाहेरून सारखाच तेजस्वी असतो, तसा हा कर्माचरणाने व ज्ञानाने निर्मळच असतो. वेदमंत्रांच्या उच्चाराने जशी माती व पाणी यांमुळे बाह्यशुद्धी होते, रेती आरशाला जशी स्वच्छ करते, परटाचे सतेले जसे वस्त्राचा डाग धुऊन काढते, त्याप्रमाणे हा पुरुष बाहेर निर्मळ असतोच, पण त्याच्या अंतरंगातही ज्ञानाचा दिवा तेवत असतो. अंतरंग शुद्ध नसताना बाहेरच्या कर्मांचा थाटमाट काय कामाचा ? ते मढचाला सजविल्यासारखे, गाढवाला तीर्थाने स्नान घालण्यासारखे, कडू दुध्याला गुळाने माखण्यासारखेच आहे. अथवा ओसाड घराला तोरण बांधावे, उपाशी माणसाचे अंग अन्नाने लिंपावे, विधवेने कुंकू लावावे, पोकळ कळसाला मुलामा द्यावा, शेणाचे फळ जसे रंगवावे, तसाच प्रकार या वरकरणी कर्मांचा असतो. म्हणून अंतरंगात ज्ञान असेल तरच बाह्य शुद्धीचा उपयोग आहे. अशा शुद्धचित्त माणसाचे आचरणही मग शुद्धच असते. एकच स्त्री पतीला आणि पुत्राला आलिंगन देते, पण पुत्रप्रेमात कामविकाराला जसा थारा नसतो, त्याप्रमाणे याचे चित्त शुद्ध असल्यामुळे संकल्पविकल्प यास त्रास देत नाहीत.

आता स्थैर्य या गुणाचे वर्णन पाहा. जसे गोमातेचे वात्सल्य वासराला टाकून वनात भटकत नाही, अथवा पतिव्रतेचे विलास जसे वैषयिक प्रेमाला चाळवीत नाहीत, अथवा लोभी दूर गेला तरी जसे त्याचे चित्त पुरून ठेवलेल्या द्रव्यावर खिळून राहते, त्याप्रमाणे देहाच्या चलनवलनामुळे या पुरुषाचे मन चळत नाही. धावणाऱ्या ढगांबरोबर जसे आकाश धावत नाही, किंवा तारांगणाच्या भोवंडीने ध्रुवतारा जसा फिरत नाही अथवा प्रवाशांच्या येरझाऱ्यांबरोर रस्ता काही फिरत नाही, त्याचप्रमाणे पंचमहाभूतात्मक शरीराच्या क्रियांमुळे हा थोर पुरुष अंतःकरणाने चळत नाही, दुःखदैन्याने तो

संतापत नाही की भयशोकाने कापत नाही. आणि देहाला मरण आले तरी तो घाबरा होत नाही. निंदा, अपमान, दंडन घडले तरी अथवा कामक्रोधांचा घाला पडला तरी त्याच्या स्थिर मनाचा एक केसही वाकडा होत नाही. आकाश कोसळून पडो अथवा पृथ्वी दुभंगून जावो, याची चित्तवृत्ती कधी मागे मुरडून पाहत नाही. फुलांनी मारल्यावर हत्ती जसा बाजूला सरत नाही तसा दुष्ट वचनांच्या माऱ्यापुढे तो विचलित होत नाही. सुखदु:खाच्या लाटा कितीही आल्या तरी त्याच्या मनात गोंधळ निर्माण होत नाही. कल्पान्त झाला तरी त्याचे धैर्य चळत नाही. स्थैर्य नावाच्या गुणाची मानसिक अवस्था ही अशी आहे.

**आत्मविनिग्रह व वैराग्य**

यानंतर 'आत्मविनिग्रह' म्हणजे काय ते सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, पिशाच कधी आपल्या झाडाला, द्वंद्व खेळणारा आपल्या शस्त्राला, लोभी आपल्या धनठेव्याला जसा दृष्टीआड होऊ देत नाही, त्याप्रमाणे हा ज्ञानी मनुष्य आपल्या अंत:करणाची जपणूक करून त्याला इंद्रियाधीन होऊ देत नाही. सजीव देह खंगून प्राण जरी आटू लागला तरी तो इंद्रियांना निग्रहात ठेवितो. मूलाधार, मणिपूर व विशुद्ध या तीन चक्रांत वज्र, ओढियाण आणि जालंधर या तीन बंधांची गस्त ठेवून तो आपले चित्त इडा व पिंगला या दोन नाडयांत प्रविष्ट करतो. तो समाधीच्या शय्येवर ध्यानाला जखडून ठेवितो, त्याचे चित्त चैतन्याशी रममाण होते. हाच त्याचा अंत:करणनिग्रह. यामुळेच ज्ञानाचा विजय होतो.

यानंतर 'इंद्रियार्थेषु वैराग्यम्' या पदावरील ज्ञानेश्वरांचे भाष्य पाहण्यासारखे आहे. इंद्रियविषयांबाबतचे वैराग्य या ज्ञानी माणसाच्या अंगी पुरेपूर बाणलेले असते. ओकारीने जसे जिभेला पाणी सुटत नाही, प्रेताला जशी कोणी मिठी मारीत नाही, किंवा विष कोणी गिळीत नाही की जळत्या घरात कोणी शिरत नाही, वाघाच्या घरात कोणी वस्ती करायला जात नाही. उकळणाऱ्या लोखंडाच्या रसात कोण उडी मारणार ? अजगराची उशी घेऊन कोण झोपणार ? त्याचप्रमाणे या सत्पुरुषास विषयांची गोष्ट रुचत नाही. बाणाच्या अंथरुणावर निजण्याप्रमाणेच याला विषयसुख वाटते. या प्रखर वैराग्यामुळे या पुरुषास आत्मलाभ होऊन ब्रह्मानंदही मिळतो. हा

मनुष्य 'अनहंकारी' ही असतो. त्याला केल्या कर्माचा अहंकार नसतो. एखाद्या सकाम माणसाप्रमाणे तो विहिरी खोदणे, तळ्यांना घाट बांधणे, धरण रचणे अशी लोकोपयोगी कामे करतो, पण केलेपणाचा अभिमान बाळगीत नाही. वारा ज्याप्रमाणे स्वभावगुणानुसार सर्वत्र वाहतो, सूर्य जसा निरहंकार बुद्धीने उगवतो, वेद जसे सहजपणे ज्ञानकथन करतात, गंगा जशी निर्हेतुकपणे वाहते त्याप्रमाणे त्याची सर्व कर्मे निरभिमानी वृत्तीने होतात. योग्य हंगाम आला की वृक्ष जशी फळे देतात तशीच याची कर्मे अभिमान-रहित असतात. जशी एका पेडाची दोरी वळावी, आकाशात ढग वावरूनही जसा त्यांचा डाग त्याला लागत नाही, त्याप्रमाणे याच्या देहाकडून कर्मे घडतात, पण तो निर्लेप राहतो. दारूबाजाच्या अंगावर वस्त्र, चित्राच्या हातातील शस्त्र किंवा बैलाच्या पाठीवरील शास्त्रग्रंथांचे ओझे जसे व्यर्थ, त्याचप्रमाणे या पुरुषाच्या ठिकाणी अहंस्फुरण व्यर्थंच असते.

**जन्ममृत्यूची भीती**

यानंतर गीतेत पद येते, 'जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषानुदर्शनम्' म्हणजे जन्म, मृत्यू, जरा, रोग, दुःख यांना दोष मानण्याची वृत्ती. या सर्वांची सतत जाणीव असली म्हणजे सन्मार्गापासून सुज्ञ मनुष्य ढळत नाही असा संतांचा बोध आहे. जन्माचे दुःख या ज्ञानी माणसास सतत सलत असते. साधक जसा पिशाचाला पाहतो, योगी पुरुष उपाधीला, ओळंबा सरळपणाला अथवा वाकडेपणाला न पाहता, न चळता राहतो, त्याप्रमाणे हा जन्माविषयीं निर्लेप असतो. सापाच्या मनातील डूक जसा कधी नाहींसा होत नाही, त्याप्रमाणे याच्या मनात जन्मास आल्याचे दुःख सतत सलत असते. डोळ्यांत रेतीचा कण जसा बोचतो, जखमेत बाणाचे शल्य जसे टोचते, त्याप्रमाणे याला जन्माचे दुःख बोचत असते. जसा जन्माचा धाक याला तशीच मृत्यूची भीतीही हा सतत बाळगतो. खोल डोहात उडी मारण्यासाठी जसा पोहणारा काचा कसून उभा असतो, रणात जाऊन उभे राहण्यापूर्वीच जशी योद्धा आपल्या मनाची तयारी करतो, घाव पडण्याच्या आधीच जशी ढाल पुढे करायची असते, उद्याच्या मुक्कामातील दग्याची सावधगिरी जशी आज घ्यायची असते, त्याचप्रमाणे मृत्यू आज येवो अथवा कल्पांती येवो, पण हा ज्ञानी मनुष्य आजच सावध असतो. नाही तर मग घर जळू लागले की विहीर कोठून

सापडणार ? लग्नाचे केळवण झालेली मुलगी जशी माहेरच्या वियोगाला अथवा संन्यास घेणारा पुरुष प्रपंचाच्या त्यागाला जसा तयार असतो, त्याप्रमाणेच हा पुरुषोत्तम मरणापूर्वीच मृत्यूची ओळख ठेवून वागतो. अशा माणसाला जन्ममृत्यूची मग भीतीच वाटेनाशी होते.

**वृद्धत्व आणि नाना रोग यांची ओळख**

हा ज्ञानी मनुष्य स्वत:ला वार्धक्य येईल हे प्रथमपासूनच ओळखून असतो. शरीरातील आजची पुष्टी त्याला वाळलेल्या काचरीप्रमाणे दिसते. आज या मस्तकाला फुलांची हौस इतकी आहे पण पुढे कधी तरी उंटाच्या गुडघ्यासारखे हे टेंगळाने खडबडीत होणार असल्याचे तो जाणतो. ज्ञानेश्वरांनी वृद्धावस्थेचे वर्णन फार मार्मिकपणे एवढ्यासाठीच केले आहे की, या वृद्धत्वाची आपणांस सतत आठवण असली की आपल्या हातून सद्वर्तन होत राहील. घरातील वृद्धांविषयी आदर वाटायला लागेल. ज्ञानेश्वर म्हणतात, हे डोळे आज कमळाच्या पाकळ्यांबरोबर स्पर्धा करतात, पण पुढे ते पिकलेल्या पडवळाप्रमाणे निस्तेज होतील. भुवया शिळ्या सालपटाप्रमाणे लोंबू लगतील. आणि वक्ष:स्थळ डोळ्यांतील पाणी गळून कुजून जाईल. सरडे आपल्या लाळेने जसे बाभळीचे खोड लडबडून टाकतात त्याप्रमाणे हे तोंड लडबडून जाईल, नाक शेंबडाने बुडून जाईल. आज आपण तोंडाचे ओठ रंगवितो, हसताना दात दाखवितो व वाणीनें सुंदर बोलतो, पण उद्या त्याच तोंडात कफाच्या जळमटांचा बडका येईल, दातांसकट सगळ्या दाढा उन्मळून पडतील. कर्जाच्या भाराखाली जशी शेतवाडी संपते अथवा पावसाच्या झडीने जशी गुरे उठवणीला येतात तशी जीभ काही केले तरी हलेनाशी होईल. तोंडातून लाळेचे पूर येतील. वाचा लुळी होईल, कान बहिरे होतील आणि आजचा सुंदर देह माकडासारखा होईल. वाऱ्याच्या झोताबरोबर शेतातल्या गवताचे बुजगावणे जसे मागेपुढे हालते त्याप्रमाणे अंग थरथर कापू लागेल. चालताना पाय वेडेवाकडे पडतील, हातांची कडबोळी वळतील. मलमूत्रांना धर राहणार नाही आणि मरण्यासाठी इतर नवस करतील. सगेसोयरे कंटाळून जातील. बायका व मुले या वृद्ध व रोगी माणसास पाहून घाबरतील. खो खो करून रात्रभर हा खोकत बसला की 'हा म्हातारा किती दिवस आम्हांस त्रास देणार आहे ?' अशी तक्रार आजूबाजूचे लोक करतील. ज्ञानी मनुष्य हे सर्व जाणून असतो.

म्हणून तरुणपणीच सावध होऊन तो जीवनाचे सार्थक व्हावे म्हणून प्रयत्नशील राहतो. जोपर्यन्त बहिरेपण आलेले नाही तोवर चांगले ऐकावे. पंगुत्व आले नाही तोपर्यंत मुक्काम गाठावा. 'दृष्टी जंव आहे। तंव पाहावें तेतुलें पाहे। मूकत्वाआधीं वाचा वाहे। सुभाषितें।। हात होती खुळे। हें पुढील मोटकें कळे। तंव करूनि घाली सकळें। दानादिकें।।' जोपर्यंत दृष्टी शाबूत आहे तोपर्यंत चांगले पाहावे, वाचा गेली नाही तोवरच गोड भाषण करावे, हात लुळे पडले नाहीत तोवरच दानादिक कार्ये करावीत. उद्या चोर संपत्ती लुटणार आहेत असे समजून आजच तिची चांगली व्यवस्था करावी. दिव्याची वात विझण्यापूर्वीच झाकापाक करावी. म्हणूनच वृद्धत्वाची आठवण निरंतर ठेवून ज्ञाते वागतात. नाना प्रकारच्या 'व्याधी' आपणांस होतील असे समजून हा आतापासूनच सावध असतो.

**एकान्ताची आवड**

या ज्ञानी माणसास पुत्र, पत्नी, गृह इत्यादींविषयी आसक्ती वाटत नाही. वाटसरू जसा धर्मशाळेत बसतो तसा हा शरीराविषयी, प्रपंचाविषयी उदास असतो. झाडाच्या सावलीइतकाच याला स्वतःच्या घराविषयी आपलेपणा वाटतो. स्त्रीची लालूच याला नसते की मुलाबाळांत हा कधी रमत नाही. हा संपत्तीच्या राशीवर लोळत असला तरी एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणे केवळ साक्षीभूत असतो. इष्ट व अनिष्ट यांच्याविषयो याचे चित्त असेच समत्वानें भारावलेले असते. उन्हाळ्यात अथवा पावसाळ्यात महासागर जसे तुडुंब भरलेले असतात त्याप्रमाणे हा इष्ट वा अनिष्ट घडले तरी नेहमी अविकृतच राहतो. याची ईश्वराच्या ठिकाणी अनन्य भक्ती असते. पतीजवळ जाताना धर्मपत्नीला जसा संकोच वाटत नाही, त्याच खुल्या मनाने तो ईश्वराशी रमतो. परमेश्वराशी तो सर्वार्थानें समरस होतो. याला एकांताचा निवास आवडतो. तीर्थे, पवित्र नद्यांची तीरे, शुद्ध तपोवने, रानातील गुहा, पर्वतांच्या कुशीतील दऱ्याखोरी, सरोवरांच्या काठचे प्रदेश यांचे मोठ्या आदरानें तो सेवन करतो. याला एकान्तही फार आवडतो. मनुष्यवस्तीचा याला नेहमीच तिटकारा वाटतो.

**अध्यात्मज्ञानाची आवड**

अध्यात्मज्ञान हीं एकमेव मिळविण्यासारखी वस्तू आहे असे हा मानतो. स्वर्गज्ञानाला तो तिलांजली देतो, संसारविषयांना तो कानीही पडू देत नाही. निर्मळ मनाने तो अध्यात्मज्ञानात रमून जातो. इतर ज्ञानांना, लौकिक विद्यांना बाजूला सारून आकाशातील ध्रुवताऱ्याप्रमाणे हा आत्मज्ञानाच्या गगनात अढळपणे असतो. हा सतत चर्चा तत्त्वज्ञानाची अथवा अध्यात्मज्ञानाची करीत असतो. असा हा निष्ठावान मनुष्य ज्ञानमयच बनून जातो. असा पुरुष प्रत्यक्ष ज्ञानच होय. सूर्य म्हणजे सूर्य असे म्हणावे लागत नाही; तसेच या ज्ञानी पुरुषाचे असते. ज्ञानेश्वरांच्या या ज्ञानी पुरुषाच्या लक्षणांवर श्रोते किती संतुष्ट झाले असतील याची साक्ष आज ज्ञानेश्वरीतही पटण्यासारखी आहे. ‘ज्या ज्ञानाचा एक क्षण तरी लाभावा म्हणून योगादिकांसारखी साधने करावी लागतात ते ज्ञान तर मूळचें समाधानकारकच, तशात ज्ञान-देवा, तुझ्यासारखे रसाळ निरूपण ! मग काय सांगावे ? अमृताचा वर्षाव सतत व्हावा तसे हे झाले. सुखाचे कोटचवधी दिवस लाभले तरी ‘हे संपणार कधी ?’ असे कोण विचारणार ? पौर्णिमेची रात्र सबंध युगभर टिकली तरी चकोर पक्षी तक्रार करील काय ? अहो, भाग्यवान पाहुणा आला आणि वाढणारी सुग्रण आहे, मग जेवण कितीही लांबले तरी कोण तक्रार करणार ? ज्ञानेश्वरा, तू स्वतःच ज्ञानद्रष्टा व ज्ञानरूप आहेस’ अशी पावतीं त्या वेळच्या श्रोत्यांप्रमाणे आजही आपण मनमोकळेपणाने देत राहू, यात संशय कसला ?

## ८

# ‘ जयाचेनि आचारें जगा दुःख ’

### चांगुलपणा दुर्मिळ

पंधराव्या–सोळाव्या शतकात युरोपमध्ये लिओनार्दो व्हिंची नावाचा एक थोर चित्रकार होऊन गेला. ‘ मोनालिसा ’ आणि ‘ लास्ट सपर ’ ही त्याची दोन विख्यात चित्रे कलाप्रेमी रसिकांच्या परिचयाची आहेत. आपल्या शिष्यांसमवेत येशू ख्रिस्ताने जे अखेरचे भोजन घेतले तो विषय या चित्रकाराने ‘ लास्ट सपर ’ या भव्य चित्रात रंगविला आहे. आपणांस माहीत आहे की, ख्रिस्ताच्या याच शिष्यांनी त्याला गोत्यात आणले. येशूला पुढील प्रकार समजला होता. वरून शांत व सज्जन वाटणाऱ्या खुनशी व कपटवाज शिष्यांचे चेहरे रंगविण्यासाठी लिओनार्दोने अनेक खुनी, दरोडेखोर व अप्रामाणिक लोकांच्या चर्येचा अभ्यास केला आणि आपले सारे कौशल्य पणास लावून त्याने ख्रिस्ताचे शिष्य रंगविले; परंतु ख्रिस्ताचा चेहरा पूर्ण झालाच नाही. ख्रिस्तासारखा साधुपुरुष त्याला कोठेच आढळला नाही. त्याला मारणाऱ्यांपैकी मात्र अनेक ठिकाणी भेटले. अशांचीच संख्या जगात मोठी असते.

**आसुरी गुणांचे महत्त्व**

अधमत्वाकडे, दुष्टत्वाकडे, दुराचाराकडे, दंभाकडे, लोभाकडे माणसाची प्रवृत्ती स्वाभाविकपणेच आहे. श्रीकृष्ण, श्रीराम, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, श्रीचक्रधर, श्रीज्ञानेश्वर, श्रीतुकाराम या दैवी पुरुषांना किती संकटांचे जिणे जगावे लागले हे सर्वांना माहीत आहे. म. गांधींना काय थोडा विरोध आयुष्यात झाला? लहानपणी श्रीज्ञानेश्वरांचा छळ काही थोडाथोडका झाला नाही. परंतु ज्ञानेश्वर करुणामूर्ती होते, प्रेममूर्ती होते. ' विश्व रागें झालिया वन्ही। संते सुखें व्हावें पाणी ' अशी त्यांना शिकवण मिळालेली होती. परंतु या दुराचारी व नाठाळ जगाचा परिचय आपणांस सावधतेसाठी असावा म्हणूनच त्यांनी दुष्ट व आसुरी प्रवृत्तीचेही विस्ताराने वर्णन केले आहे. दुष्टांची संख्या जास्त, त्यांचे व्यवहारी वर्तन अधिक फलदायी व तत्काळ सुखदायी असा समज म्हणून यांची ओळख निराकरणासाठी करून देणे ज्ञानदेवांना अगत्याचे वाटले. चतुरांची लक्षणे जशी महत्त्वाची तशीच मूर्खांची लक्षणेही रामदासांना महत्त्वाची वाटली ती याच कारणासाठी. सद्गुरूंचे वर्णन जसे अत्यावश्यक तसे भोंदू बोवांचा निषेधही आवश्यक वाटल्यावरून ज्ञानेश्वर ठायी ठायी दिसणाऱ्या व प्रसंगी वाढणाऱ्या आसुरी गुणांचे वर्णन करताना दिसतात. या गुणांचे दर्शन मानवी वर्तनात कोठे कोठे होते याचा शोध ते घेतात.

सोळावा अध्याय हा दैवी – आसुरी संपत्तीच्या वर्णनाचा आहे. अभय, सत्त्वशुद्धी, ज्ञानयोग, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, अपैशुनम्, दया, मृदुता, लज्जा, तेज, क्षमा, धैर्य, शुचिता, नीतिमानता इत्यादी गुण दैवी संपत्तीचे म्हणून त्यांनीं वर्णन केले. पण या दैवी संपत्तीची ओळख पटणार कशी ? हिचा परिचय फार थोडचा लोकांना. आसुरी संपत्तीचे भोक्ते मात्र अनेक. तेव्हा निषेधासाठी का होईना पण ज्ञानेश्वरांना आसुरी संपत्तीचेही वर्णन विस्ताराने करावे लागले. त्यांनी आपला हेतू स्पष्ट करताना म्हटले आहे, " पैं त्याज्य त्यजावयालागीं। जाणावी जरी अनुपयोगी ' निंद्य वस्तूचा त्याग करता यावा म्हणूनच ती वस्तू कोणती हे प्रथम जाणून घ्यावे लागते. ही ' दुःखाची आंतुवट वेली। दोष कांटयांनी जरी भरली ' तरी तिचे स्वरूप निषेधासाठी, त्यागासाठी समजावून घ्यावें लागते.

**दांभिकाचे असे वागणे**

हे आसुरी प्रवृत्तीचे लोक पक्के दांभिक असतात. आपल्या सामर्थ्याचा डांगोरा ते जोराने पिटत असतात. गुरूने उपदेशिलेल्या विद्या कधी चव्हाटयावर मांडायच्या असतात? जीवनाला आधार अन्न असले तरी ते प्रमाणाबाहेर खाल्ले तर विषाप्रमाणे मारक होईल. धर्म आपणांला तारक आहे म्हणून काही त्याचा दिमाखाने वा दंभाने सतत उद्‌घोष करायला हवा? हा दांभिक मनुष्य स्वतःच्या धार्मिक आचरणांचा बोभाटा करतो तेव्हा तो धर्मही अधर्म बनतो. मग हा मूर्ख मनुष्य अक्षरांचा किंचित संस्कार जिभेला झाला म्हणून ब्रह्मज्ञांच्या सभेलाही नावे ठेंवितो. चाबुकस्वारांचा चढेल घोडा ऐरावताला क्षुद्र गणतो ना? कुंपणावरील सरडा स्वर्गाला तुच्छ मानतो ना? डबक्याच्या आश्रयाने मासा सागराला क्षुल्लक मानतो ना? एका दिवसाच्या परान्नामुळे भणंग भिकारी स्वतःला धन्य मानतो ना? तसाच हा मनुष्य स्त्रिया, पैसा, विद्या, स्तुती, बहुमान यांना मानतो. या दांभिकाचे वागणे कसे असते? ढगांची क्षणिक सावली लाभली म्हणून एखाद्या माणसानें राहते घर मोडून टाकावे, मृगजळाचा पूर पाहून एखाद्याने पाण्याची टाकी फोडून टाकावी, तसे या माणसाचे वर्तन असते. थोडी संपत्ती मिळताच याला गर्व चढतो. याचा अभिमान तरी केवढा असतो? सर्व जग ईश्वराची स्तुती व भक्ती करायला उत्सुक असले तर हा मत्सराने जळू लागतो. तो म्हणू लागतो, ' मी तुमच्या ईश्वराला खाऊन टाकीन, वेदांना विष चारीन, मी माझ्या सत्तेवर त्यांचें महत्त्व बुडवीन. ' पतंगाला दिव्याची ज्योत पाहून त्यात उडी घ्यायची इच्छा होते, काजव्याला सूर्याचा तिटकारा असतो, टिटवी महासागराशी स्पर्धा करते, तसा हा ईश्वराचे नावही सहन करीत नाही. हा असा मूर्ख की, बाप आपल्या संपत्तीत वाटेकरी होईल म्हणून त्याचाही द्वेष करतो.

**असा याचा क्रोध**

दुसऱ्याचे सुख पाहून याला क्रोध चढतो, तापलेल्या तेलात पाण्याचा थेंब पडला की तेल ज्वालांनी भडकते ना? चंद्राच्या उदयाने कोल्ह्याचा जळफळाट होतो ना? सर्व विश्व उजळून टाकणारा सूर्य उगवला की पापी घुबडाचे डोळे फुटतात ना? जगाला आनंद देणारी पहाट चोरांना

दु:खद वाटते. सर्पाच्या मुखातील दूध विष बनते, त्याचप्रमाणे दुसऱ्याची विद्या, सुख, ऐश्वर्यवृद्धी पाहून याचा राग भडकतो. याचे मन कसे असते ? ‘आणि मन सर्पाची कुटी। डोळे नाराचांची सुटी। बोलणें ते वृष्टि। इंगळांची ’ याचे मन म्हणजे सापाचे वारूळ असते. डोळे म्हणजे बाणांचा वर्षाव आणि शब्द म्हणजे जळजळीत निखाऱ्यांचा पाऊस ! याच्या साऱ्या क्रिया म्हणजे धारदार करवतीच. या माणसाचे अडाणीपण कसे असते पाहा. हा मनुष्य पापपुण्यांचे आंबोण कसलाच फरक न करता खातो. दगडाला कोठे थंड-उष्ण स्पर्श असतो ? जन्मांधाला दिवस-रात्र असा फरक समजतो का ? भडकलेली आग विधिनिषेधांचा विचार कोठे करते ? उत्तम सोने व लोखंड यांत परीस फरक करीत नाही. त्याचप्रमाणे हा मनुष्य हे स्वच्छ, हे घाणेरडे असा भेद खातानाही करीत नाहीं.

**अशुद्धत्वाची हौस**

या महादोषांनी आसुरी गुणांची वाढ होते. सर्प लहान असला म्हणून काय झाले ? त्याच्या ठिकाणी महाभयंकर विष असते. हा मनुष्य या दुर्गुणांनी सतत संसारग्रस्त बनून राहतो. पुण्यकृत्यांकडे प्रवृत्ती व पापमार्गाकडे निवृत्ती असावी, या विचारासंबंधी याच्या मनात अंधार असतो. प्रवृत्तिनिवृत्तीचा विवेकच त्यांना नसतो. शुद्धत्वाचा विचार तर यांच्य गावीहीं नसतो. एखाद्या वेळीं कोळसा आपला काळेपणा सोडील, कावळाही चोखट म्हणजे शुद्ध होईल. राक्षस मांसाला विटेल. ‘परि आसुरां प्राणियां। शौच नाही धनंजया ’–आसुरी वृत्तीच्या माणसास शुद्धता मानवणार नाही. मद्याचे भांडे कधी पवित्र होते का ? वडील माणसांचे अनुकरण करावे, आचार शुद्ध राखावेत, हा विचारही या माणसांना सुचत नाही. शेळीचे जसे भरमसाठ चरणे, वाऱ्याचे सैरावैरा वाहणे, अग्नीचे मनसोक्त जाळणे, तसेच या आसुरांचे सत्याशी निरंतर वैर असून आपल्याच नादात ते पुढे सरसावतात. विंचवाच्या नांगीने कधी गुदगुल्या होतील ? उंटाचा कोणता अवयव धड आहे ? तसेच या आसुरांचे वर्तन आहे.

**कामवृत्तीचा अतिरेक**

धुराडयाच्या मुखातून जसा नेहमी धूरच बाहेर पडतो, तसेच याच्या तोंडून नेहमी वल्गना बाहेर पडतात. विश्व हे अनादी आहे, ईश्वर त्याचे

नियमन करतो, यावर याचा विश्वासच नसतो. हा आसुरी गुणांचा मनुष्य म्हणतो, 'याज्ञिकांच्या यज्ञाने लोक फसतात. देवभोळे लोक सगुण पूजेत गुंततात. जोगडे नुसते भगवे नेसून मिरवतात. खरे पाहता, जे जे आपल्या हाती येईल त्याचा उपभोग घ्यावा हेच खरे पुण्य. श्रीमंतांचे प्राण घेणे हे पाप झाले तरी त्याची धनसंपत्ती आपणांस मिळते हे पुण्यच नव्हे का? बलवानाने निर्बलास खावे हे निषिद्ध कसे? मोठे मासे लहान माशांना नाही का खात? कुलगोत्राचा विचार करून मुलामुलींची लग्ने ठरवावीत असे का? प्रजोत्पादन हाच लग्नाचा हेतू आहे. पशू, पक्षी यांनी कुठे कुलगोत्र पाहून लग्ने केली? आणि चोरीचे द्रव्य झाले तरी ते कोणास विष होते का? प्रीतीने परदारागमन केले तर कोडी कोण होतो? परलोक आहे तर तो कोठे दिसत नाही? आणि देवही कोठे आढळत नाही, केवळ कामवृत्तीनें व्यवहार करावा. कामवासनेवाचून या जगास दुसरा आधारच नाही असे विचार हा आसुरी मनुष्य नेहमी मांडीत असतो,

**'पापाचे कीर्तिस्तंभ चालते ते'**

या आसुरांना ईश्वराचा हेवा वाटतो. ते उघडपणे पाखंडाचा पुरस्कार करतात. ते विषयाच्या चिखलात बुडून गेलेले असतात. खरे पाहता हे लोक म्हणजे पापाचे कोंभच असतात. 'पापाचें कीर्तिस्तंभ। चालते ते' अशा शब्दांत ज्ञानेश्वर त्यांचे वर्णन करतात. यांचे एकदा जाळणे पोळणे सुरू झाले म्हणजे नीतीचा विचार त्यांना सुचतच नाही. माजलेल्या हत्तीस दारू पाजल्यावर तो जसा खवळतो तसे यांच्या अंगातील ताठा वार्धक्यातही वाढतो. 'जिहीं परोपतापु घडे। परावा जीवु रगडे। तिहीं कर्मीं होऊनि गाढे। जन्मवृत्ती' दुसऱ्यांना पीडा होईल, दुसऱ्याचा जीव कासावीस होईल अशाच कामांत हे पटाईत असतात. 'मग आपुलें केलें फोकारिती। आणि जगातें धिक्कारिती। दाही दिशीं पसरिती। स्पृहाजाळ' – हे लोक आपल्याच पराक्रमाची फुशारकी माजवून जगाचा धिक्कार करतात. दहाही दिशांनी वासनांचे जाळे लांबलचक असे ते पसरतात, मोकाट सुटलेल्या धर्मधेनूसारखी यांची वागणूक सतत चालू असते.

**इंद्रियभोगांची आवड**

यांची विषयवासना सतत वाढती असते. 'स्त्रियां गाइलें आइकावें। स्त्रीरूप डोळां देखावें। सर्वेंद्रियें आलिंगावें। स्त्रियेतेंचि' अशी यांची एकमेव

वासना असते. अमृतही ओवाळून टाकावे असे त्यांना स्त्रीसुख वाटते. यांच्या वासनेची तृप्ती झाली नाही की त्यांचा द्वेष वाढतो. कामक्रोधांवाचून त्यांना दुसरा पुरुषार्थ मोठा वाटत नाही. रागद्वेषादी विकारांनी ते परिपूर्ण असतात. मनाचा हावरटपणा वाढला की विषयसुखासाठी ते वाटेल ते करतील. पैशासाठी मग त्यांचे नाना उपद्व्याप सुरू होतात. 'एकातें साधूनि मारिती । एकाचीं सर्वस्वें हरिती । एकालागीं उभारती । अपाययंत्रें ॥' हे आसुरी लोक मग द्रव्यासाठी कोणाला फसवून ठार मारतात तर कोणाचे सर्वस्व लुटून नेतात. तर कोणाला अपाय व्हावा म्हणून नाना प्रकारची जारण-मारणादी कुलंगडी करतात. एखाद्या शिकाऱ्याप्रमाणे जाळी, फांस, पोर्ती, कुत्री, ससाणे, खोचेरे इत्यादी त्यांची आयुधे असतात. दुसऱ्याचा प्राणघात करून द्रव्याचे संपादन हे करतात आणि त्यातच त्यांना आनंद वाटतो. आणि याच कैफात म्हणतात कसे? 'मी किती धन्य ! अनेकांची संपत्ती माझ्या हाती आली आहे. आता याच भांडवलावर सर्व चराचर फायद्यात पडेल अशी उलाढाल मी करीन. साऱ्या जगातील संपत्तीचा धनी मीच होईन. जे दृष्टीस पडेल त्याचा स्वामी मीच होईन. सर्व जगात मग माझीच कीर्ती होईल. मग मला मदत न करतील त्यांना मी ठार मारीन; कारण आता 'चराचरीं । ईश्वरू तो मी' अशी त्यांची भावना बनलेली असते. 'मी भोगभूमीचा रावो । आजि सर्व सुखासि ठावो । म्हणोनि इंद्रहि वावो । मातें पाहुनी ॥ मी मनें वाचा देहें । करीं तें कैसें नोहे । कें मजवांचूनि आहे । आज्ञासिद्ध आनु' ॥ साऱ्या सुखभोगांचा धनी मीच आहे. माझ्यापुडे इंद्रही फिका पडेल. मी जे मनाने, वाणीने, देहाने कल्पीन ते होणार नाही असे घडेल कसे? आज्ञा करणारा समर्थ असा माझ्याखेरीज दुसरा आहे तरी कोण?

**अशी यांची भाषणे**

'कुबेर असेल मोठा श्रीमंत ! पण माझी सर त्याला कोठली येणार? माझ्याइतकी संपत्ती प्रत्यक्ष लक्ष्मीपतीजवळही नाही. माझ्या कुळाचा विचार करता प्रत्यक्ष ब्रह्मदेवही कमीच ठरेल. ईश्वराची बिरुदे मिरविणारे सर्वजण खोटेच आहेत. जारणमारण करून, मंत्रतंत्रांचा पुन: उद्धार करून जीवांना पीडा देणारे मी नवे यज्ञयाग संपादीन. 'मातें गाती वानती।

६००९ ... २२९६



नटनाचें रिझविती । तयां देईन मागती । ते ते वस्तु । ' जे कोणी माझे स्तुतिपवाडे गातील, नृत्यनाचाने माझे रंजन करतील त्यांना मी ते जे मागतील ते देईन. नाना प्रकारच्या मादक खाद्यपेयांत आणि तरुण स्त्रियांच्या गाढ आलिंगनात दंग होऊन मी त्रिलोकांत आनंदरूप होईन.' अशी भाषणे करून हे पिसाट लोक आकाशपुष्पांना हुंगावयास पाहतात.

**यांचे अघोरी उपाय**

याच नादात ते वाटेल ते बडबडतात. असंख्य कामनांचे डोलारे यांच्या मनात उभे असतात. यामुळे चढत्या रात्रीत काळोख जसा दाटून येतो तसा या आसुरांच्या अंतःकरणात मोह वाढतो. मोहाबरोबर विषयांचा नाद वाढतो. आणि विषयांच्या नादाबरोबर पातकी कृत्यांची वाढ होते. आणि मग जिवंतपणीच यांना नरकवास भोगावा लागतो. मग यातून सुटण्यासाठी नाना प्रकारचे अघोरी उपाय यांना सुचतात. या आसुरांचे वागणे मोठे चमत्कारिक असते. यजमानाच्या आश्रयाला राहिलेली वेश्या जशी खोटेच सवाष्णपण मिरविते, त्याच प्रकारे हे लोक आपला मोठेपणा मिरवतात. यांना नम्रत्व माहीत नसते. ओतीव लोखंडाच्या खांबाप्रमाणे अथवा आकाशात उंचावलेल्या खडकांसारखे हे ताठ असतात. स्वतःच्या श्रेष्ठतेवर यांचा एवढा विश्वास की, इतर जगाला ते कस्पटाप्रमाणे लेखतात. यज्ञाच्या निमित्ताने लोकांना आमंत्रण देऊन त्यांच्याकडून आहेर उपटतात. स्वतःच्याच पुढे ताशेवाजंत्री लावून आपण दीक्षित झाल्याचे मिरवतात, काळोखाला काजळी चढावी तसा यांचा गर्व शिगेला पोचतो. गर्वाबरोबर यांचा कामविकार वाढतो. क्रोधाग्नी उसळतो. मग हे मनास वाटेल तसा हिंसाचार करायला मागेपुढे पाहत नाहीत. जारणमारणादी प्रयोगांत स्वतःच्या रक्तमांसाचा वेच करण्यासही हे तत्पर होतात.

**यांना सत्काराची हौस**

ज्ञानेश्वरकृत हे आसुरी वृत्तीचे वर्णन तेराव्या अध्यायातील 'अज्ञाना'च्या भाष्यासकट पाहावयास हवे. तेथे ज्ञानी माणसाची लक्षणे सांगून झाल्यावर ज्ञानेश्वर अज्ञानी माणसाच्या वर्तनाचे विस्ताराने वर्णन करतात. त्यांच्या मताने हा अज्ञानी मनुष्य मानाची, सत्काराची वाट पाहतो. मोठ्या स्थानावरून खाली कधी उतरतच नाही. हा मनुष्य ' घाली विद्येचा

पसारा। सुये सुकृताचा डांगोरा। करी तेतुलें मोहरा। स्फीतीचिया।' आपल्याच विद्येचे देव्हारे माजवितो, पुण्यकृत्यांचा डांगोरा पिटतो आणि प्रत्येक कृत्य तो आपल्या लौकिकाच्या वाढीसाठी करतो. आणि 'वन्ही वनीं विचरे। तेथ जळती जैसीं जंगमें स्थावरें। तैसें जयाचेनि आचारें। जगा दु:ख।' रानात भडकलेल्या वणव्यात ज्याप्रमाणे प्राणी व वनस्पती जळून जातात, त्याचप्रमाणे याच्या आचरणामुळे जगास दु:खच होते. याचे साधें बोलणेही पहारेप्रमाणे बोचते. याचा गुप्त हेतू विषापेक्षाही घातक असतो. थोडयाशा स्तुतीने तो आनंदतो व निंदा ऐकली की कपाळाला हात लावून बसतो. चिखल थोडया पाण्याने भिजतो, थोडया वाऱ्याने वाळतो, तसे याचे वागणे असते. हा मोठा आतल्या गाठीचा असतो. याला गुरुकुळाची लाज वाटते. गुरूपासून विद्या संपादन करून हा त्याच्याशीच वादविवाद करतो.

**नाना व्यसनांची आ**

याचे आचरण नेहमी डळमळीत असते. हा नेहमी संशयाने ग्रासलेला असतो. द्रव्यलोभाने याला विवेक आठवत नाही. याला पापाचरणाची लाज नसते. पुण्याची चाड नसते. मनोरथांच्या लोंढयाबरोबर हा वाहत जातो. वादळाप्रमाणे याचा निवास एके ठिकाणी नसतो. हा आपल्याच आचरणानें व्रतांना खंडित करतो, स्वधर्माला लाथाडतो, यमनियमांना जुमानीत नाही. 'नाहीं पापाचा कंटाळा। नेणे पुण्याचा जिव्हाळा। लाजेचा पेंडवळा। खाणोनि घाली।' याला पापाचा कंटाळा येत नाही, पुण्याचा ळळा नसतो, लाज या पदार्थाचे मूळच त्याने उपटून टाकलेले असते. 'वसू जैसा मोकाटु। वारा जैसा अफाटु। फुटला जैसा पाटु। निर्जनींचा॥ आंधळे हातिरूं मातलें। का डोंगरीं जैसें पेटलें। तैसें विषयीं सुटलें। चित्त जयाचें॥' एखाद्या पोळासारखा हा उनाडपणे भटकतो. वाऱ्यासारखा हा अफाट असतो. निर्जन जागेवरील पाटासारखा हा सैरावैरा धावतो. आंधळा हत्ती चवताळावा, डोंगरात वणवा पेटावा तसे याचे चित्त विषयांत भटकत असते. स्वर्गात विषयभोग मिळावेत म्हणून हा या लोकीच तयारी करतो. विषय याला कंटाळतील, पण हा विषयांना सोडीत नाही. विषयाच्या लाभासाठी जळत्या

आगीत हा झेप घेईल. नाना व्यसनांची कुडती अलंकारांप्रमाणे अंगावर मिरवील. मरेपर्यंत हा विषयांनाच धरून असतो.

**याला संपत्तीचा लोभ**

देह हाच आत्मा अशी या अज्ञानी माणसाची श्रद्धा असते. विद्या व तारुण्य यांच्या मदाने हा सदोदित ताठ असतो आणि 'म्हणे मीचि एकु आर्थी। माझ्याचि घरीं संपत्ति। माझी आचरिती रीति। कोणा आहे?' माझ्याएवढा धनवान कोण आहे? माझ्यासारखे आचरण कोणाचे आहे? माझ्यासारखा सर्वज्ञ कोण आहे? याची समजूत कधीच पटत नसल्यामुळे हा सतत कांगावा करतो. मत्सर, अहंकार, गर्व यांचे याला भूषण वाटते. 'जो लाटणें ऐसा न लवे। पाथरू तेविं न द्रवे।' हा कधी लाटण्याप्रमाणे लवत नाही की धोंड्याप्रमाणे द्रवत नाही; फुरसे जसे मांत्रिकाला बधत नाही तसाच हा कोणासच जुमानीत नाही. याला कधी मागच्या-पुढच्या जन्माचा विचारच नसतो. नऊ इंद्रियांची दारे पाझरत असल्यामुळे अंगाला लूत लागली तरी याला खेद होत नाही. आपण अमर आहोत अशीच याची खात्री असते. रात्रंदिवस शरीर कमावून नाना विषयसुखे भोगणे यातच त्याला खरे वैभव वाटते. आहारनिद्रेला भुलून हा निर्बुद्ध बनतो. जीवित संपून जात आहे, मरण जवळ येत आहे, याचे त्याला भान नसते. तारुण्याच्या तोऱ्यात तो म्हातारपण आठवतच नाही. तारुण्याच्या मदाने तो बेताल असतो. याच्या दाढा पडतात, मान डळमळते, पण याची हाव कधी संपत नाही. आपल्या शरीरात कधी रोग ठाण मांडून बसतील याची याला कधी चिंता नसते. तारुण्याच्या मदाने, संपत्तीच्या लोभाने तो मन मानेल तसे वागतो. जे करू नये ते करतो, जेथे जाऊ नये तेथे जातो, पाहू नये ते पाहतो व खाऊ नये ते खातो. ऐकू नये ते तो ऐकतो. अवाच्यपणे बोलतो, भलत्याच कृत्याला कर्तव्य समजतो.

**असा याचा स्त्रीलोभ**

याची प्रीती सतत घरसंसारात रमलेली असते. 'साकरेचिया राशी। बैसली नुठे माशी। तैसेनि स्त्रीचित्त आपेशी। जयाचें मन॥' साखरेच्या ढिगावरील माशी जशी उठत नाही त्याप्रमाणे याचे चित्त स्त्रीपासून दूर होत नाही. बेडूक पाण्यात अडकून राहावा, चिलट शेंबडात गुंतावे, एखादे ढोर चिखलात रुतावे, त्याप्रमाणे याचे मन, चित्त, प्राण घरप्रपंचात गुंतून असतात.

एखाद्या स्त्रीने आपल्या प्रियकराच्या गळ्यास मिठी मारून बसावे तसा तो आपल्याच खोपटाला चिकटून असतो. एकट्या स्त्रीवाचून याला दुसरे काही सुचत नाही. मग याला कशाचीच लाज, हानी, लोकप्रवाद इत्यादींची पर्वा वाटत नाही. गारुड्याच्या माकडाप्रमाणे तो सतत स्त्रीच्याच नादात असतो. कवडी कवडी जमवून तो संग्रह वाढवितो. तो दान कधीच करीत नाही. पण नात्यामधील माणसांना मात्र फसवितो. पण स्त्रीला मात्र रतिभरही कमी पडू देत नाही. तो आराध्य देवतांना समजावितो, गुरुजनांना थापा मारतो. आणि आईबापांना तर फसवितोच. एखादा प्रेमळ भक्त आपल्या ईश्वराला भजेल त्याप्रमाणे तो स्त्रीचे कोडकौतुक करतो. सर्व काही चांगले व सुंदर तो स्त्रीलाच अर्पण करतो.

**असे याचे चंचल वागणे**

हा अज्ञानी मनुष्य ईश्वराची भक्ती विषयसुखांच्या वाढीसाठी करतो. आणि इतकेही करून काही लाभ झाला नाही तर सारी भक्तीच निरर्थक असल्याचे बोलून दाखवितो. मग नवससायास करण्यासाठी हा रोज नव्या देवाची आराधना सुरू करतो. गुरूचा विशेष थाटमाट पाहिला की मग हा त्याच्याच नादी लागतो. त्याचा मंत्र घेतो. खऱ्या देवाची मूर्ती कोठे तरी घरातल्या कोपऱ्यात मांडून हा मात्र इतर देवदेवतांच्या यात्रेसाठी निघून जातो. घरात एका देवाची स्थापना, पण नवस मात्र इतर देवांना; हे दृश्य पाहून ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, एखाद्या बाजारबसवीप्रमाणे या अज्ञानी माणसाचे चित्त चंचल बनलेले असते. या अज्ञानी माणसाला गर्दीचे सुख वाटते. निवान्त व स्वच्छ तपोवने, तीर्थे यांचा वीट येतो. याला इतर लौकिक ज्ञानांच्या फापटपसाऱ्याची हौस वाटते, पण अध्यात्मज्ञानाचा तिटकारा वाटतो. ज्ञानी वाटणारा हा मनुष्य तसा अज्ञानीच असतो. नाना विद्या संपादनही आत्मविद्येकडे दुर्लक्ष करणाऱ्या माणसाचें वर्णन करताना ज्ञानदेवांनी एक समर्पक दृष्टान्त वापरून म्हटले आहे, ' मोराअगीं अशेषें । पिसें असती डोळसें । परि एकली दृष्टि नसे । तैसें तें गा ' — मोराच्या अंगभर रंगीबेरंगी पिसे भरपूर असतात, त्यांवर खूप डोळेही असतात; पण त्यांना दृष्टी मात्र नसते ! आयुष्याविना सौंदर्याच्या बत्तीस लक्षणांना, मस्तकावाचून दागदागिन्यांना, नवरानवरीवाचून वाजंत्र्यांना काय करायचे ?

# १

# ‘आनंदु रे आजी आनंदु’

## परमानंदाचा सोहळा

ज्ञानेश्वर महाराज एका अभंगात म्हणतात, आज सर्वत्र आनंद भरून राहिला आहे. ‘सबाह्य अभ्यंतरी अवघा परमानंदु रे’ म्हणून त्यांची अनुभूती त्यांनी मोठ्या प्रसन्न भाषेत व्यक्त केली आहे. आत्मा-परमात्मा, जीव-शिव यांच्या ऐक्याच्या या अनुभूतीचा परमोच्च आनंद त्यांनी भोगला. ‘आनंदाच्या ताटीं अमृताची वाटीं’ ठेवून त्यांनी ब्रह्मरसाचे भोजन मनसोक्तपण केले. या भोजनाचे वा ब्रह्मरसास्वादाचे एक भव्य रूपक रंगविताना ते म्हणतात, ‘पृथ्वी आडणी आकाश हें ताट। अमृत घनवट आप तेज॥ नित्य हे जेवितां तेज प्रकाशत। सर्वही गोमटीं ब्रह्मद्वारें’ जीवशिवाच्या ऐक्याचे इतके विशाल व काव्यमय वर्णन इतरत्र सापडणे कठीण आहे.

ज्ञानेश्वर या अभंगात म्हणतात, ‘पृथ्वीरूप आडणीवर आकाशरूप ताट ठेविले असून त्यात आप व तेज यांचे अमृत वाढले आहे. नित्य अशा

या भोजनामुळे व प्रकाशरूप अन्नामुळे सारी इंद्रिये तेजस्वी बनून गेली आहेत. जेवणारा हा योगीही तृप्त झालेला आहे. कारण, त्याच्या व्योमरूपी ताटात चांदण्यांचे सुरस नवनीत वाढले आहे. गंगा, यमुना, सरस्वती यांच्या संगमातून खीर निर्माण झाली आहे, प्रकाशमय ब्रह्माची तीत साखर आहे. या अपूर्व भोजनाचा सोहळा श्रीगुरूकृपेने तर अपूर्वच वाटतो. याच वेळी आकाशातील 'सोहम्' च्या ध्वनीमुळे अंत:करणात प्रेम दाटून येते. या भोजनास षड्रसांची उपमा द्यावी तर ब्रह्मरसापेक्षा काहीच गोड नाही. अशा रीतीने या अमृतमय भोजनाने हा योगी तृप्त झाला आणि त्याने अमृतानेच हात आंचविले. अशा प्रकारचा आनंदसोहळा ज्ञानेश्वरांनी अनेकदा भोगला, अनुभवला व शब्दबद्ध केला आहे. आनंदाच्या, ब्रह्मानंदाच्या, परमानंदाच्या या अनुभूतीचे वर्णन त्यांनी अनेकदा केले आहे. 'आनंदें भरीन तिन्हीं लोक' हीच मुळी त्यांची प्रतिज्ञा आहे. 'आनंदाचें आवारू' साऱ्या जगासाठी घालणे हे त्यांचे जीवितकार्य. 'जीवु दोंदावरी लोळे आनंदाचिया'– आनंदाच्या राशीवर लोळणाऱ्या जीवाची कल्पना त्यांनीं केली आहे. 'चैतन्याचिये पोवळीं। माजीं आनंदाचिया राउळीं।' इष्ट देवतेवर अमृतधारेचा अभिषेक करण्यातील सुख त्यांनी अनुभविलें आहे.

### सर्व सुखाचे हे आगर

ज्ञानेश्वरांनी हा आतंदामृताचा अथवा अनुभवामृताचा आस्वाद कसा घेतला हे येथे थोडचा विस्ताराने पाहू. आपल्या थोडक्या आयुष्यात ज्ञानेश्वरांनी कोणती साधना कशी केली याचा तपशील आपल्याजवळ नाही. पण बालपणीच त्यांना सर्वज्ञता प्राप्त झालेली दिसते. चैतन्याची, चित्-तत्त्वाची ओढ त्यांना बालपणापासूनच होती. सद्गुरुकृपेने त्यांना फार काळ साधना करावी लागली नसावी. पूर्वजन्मीचे सुकृतही पाठीशी बरेच होते. 'बहुत सुकृताची जोडी। म्हणून विठ्ठलीं आवडी' त्यांना वाटू लागली. ज्ञानेश्वरीत विठ्ठलाचा उल्लेख नसला तरी श्रीकृष्णाच्या सगुण प्रेमाच्या व भक्तवात्सल्याच्या अनेक खुणा ज्ञानेश्वरीत दिसतात. ज्ञानदेवांच्या अभंगांतून तर श्रीकृष्ण व विठ्ठल यांच्या प्रेमाने ते भारावलेले दिसतात. 'रूप पाहतां लोचनीं। सुख झालें वो साजणी' या प्रसिद्ध अभंगात 'सर्व सुखाचें आगर। बाप रखुमादेवीवर' दिसताच मनाची काय अवस्था होते

याचे मोठे चित्तवेधक वर्णन ते करतात. 'तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा ' म्हणून ते आनंदाच्या भरात जणू नाचत आहेत. या श्रीहरीचे विठ्ठलाचे रूपही त्यांनी मनापासून वर्णन करताना म्हटले आहे, 'अनुपम्य मनोहर । कासें शोभे पीतांबर । चरणीं ब्रीदाचा तोडर । देखिला देवो ' 'पांडुरंगकांती दिव्य तेज झळकती । रत्नकीळा फाकती प्रभा । अगणित लावण्य तेज पुंजाळलें । न वर्णवें तेथींची शोभा,' 'त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनिया माये । कल्पद्रुमातळी वेणु वाजवीतु आहे, ' 'तुरे कांबळा डांगेवरी विषण वेणु घेऊनि करीं । वैजयंति रुळें कैशी वक्षस्थळावरी ' अशा अनेक ओळींतून ज्ञानेश्वरांचे श्रीहरिप्रेम उचंबळून आलेले दिसते.

**'रोषें प्रेम दुणवटे'**

या सुंदर व सावळ्या विठ्ठलाची भेट त्यांना थोड्या विरहानंतर अधिकच सुखदायक वाटते. अत्यंत भूक लागल्यावर भोजनाची गोडी, तहानेने व्याकुळ झाल्यावर पाण्याची गोडी, तसे विरहाने आर्त झाल्यानंतर प्रभुभेटीतील आनंदाची थोरवी. ज्ञानेश्वरांनीच एके ठिकाणी म्हटले आहे, 'अहो तान्हयाचें लागतां झटें । तेणें अधिकचि पान्हा फुटे । रोषें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ' (ज्ञा. ९ : १८). तान्ह्या मुलाच्या मुखाचा धक्का मातृस्तनाला लागला की मग अधिकच पान्हा फुटतो. प्रिय माणसाच्या रागामुळेच प्रेमाचा वेग दुपटीने होतो. याच नात्याने ज्ञानेश्वरही कधी परमात्म्यावर रुसतात, रागावतात. त्यांनाही प्रेमकलहात गोडी वाटते. परिमळाच्या ओढीने जसा भ्रमर धावतो, तशी गोडी देवा, तुझी मला लागू दे, असे ते एका अभंगात म्हणतात. 'अव्टि गे माय विटेना । जवळी आहे परि भेटेना ।। तृषा लागलिया जीवनातें ओढी । तैशी तुझी गोडी लागो या जीवा ' अशा शब्दांत त्यांनी आपल्या मनाची आर्तता व्यक्त केली आहे. 'तुझी सेवा करीन मनोभावें वो', 'तुझिया गुणांसाठी लागलो भजनापाठीं ' अशा ओळींतून त्यांच्या मनाची उत्सुकता व्यक्त होते.

**विरहाची माधुरी**

परमात्म्याच्या तीव्र विरहाने त्याच्या भेटीचे सुख अलौकिक वाटते. कारण या विरहातही ध्यास एकसारखा त्याचाच असल्याने त्या चिंतनातही एकप्रकारची माधुरी असते. एखाद्या वेळी प्रत्यक्ष भेटीत नसेल एवढे सौख्य

जीवाला जीवपणात वाटते, शिवच आपल्या सुखासाठी जीवपणास आलेला असतो. परमात्माच आत्मतत्त्वावर स्वसुखार्थ आलेला असतो. ऐक्याचे, सामरस्याचे, भेटीचे सुख अनुभवण्यासाठी ही द्वैताची बैठक असते. एकदा हे द्वैत स्वानुभवासाठी पत्करले की मग जीवाची ओढ शिवाकडे, आत्म्याची परमात्म्याकडे सुरू होते. विरहाच्या अवस्थेतही मग श्रीकृष्णाच्या रूपाची, गुणांची स्मरणी सुरू होते. ' तुजवीण येकली रे कृष्णा न गमे राती ' या एका अभंगात जीवाची ही व्यथा ज्ञानदेव साकार करताना म्हणतात, ' कृष्णा, तू वृंदावनात मुरली वाजवीत आहेस. पण मला तुझ्याशिवाय या रात्री एकटीला चैन पडत नाही रे. तू माझ्या अंतःकरणातील चैतन्य चोरून नेलेस. रखुमाईच्या वरा, बापा, विठ्ठला, तू माझा स्वीकार कर ना.'

## चंद्रम्याचा असा उबारा

मग सखीभावावरची ही विरहिणी एकदा आपल्या सख्यांना म्हणते, ' सख्यांनो, माझे सर्व अंग सुगंधित करा. अलंकारांनी असे नटवा की, याच्या वेधाने श्रीहरी माझा जिवलग सोयरा होईल, तो माझ्यावर प्रेम करू लागेल. माझ्या अंगाला सुगंधी चंदन लावा ग. त्यामुळे तरी श्रीकृष्ण माझ्याकडे येईल. माझ्या स्वरूपात मीच मावणार नाही असा शृंगार सख्यांनो करा ना. तो गोपाळ मला मनापासून आवडतो ग. त्या प्रभूच्या प्राप्तीसाठी माझा सारा देह पालटून जावा; त्याच्या मीलनाचा आनंद मला भोगायला मिळावा. श्रीकृष्णाच्या वेधाने कासावीस झालेली ही विरहिणी कधी फार त्रस्त होते. तिच्या चित्ताची उलघाल होते. ' चंद्रमा करितो उबारा गे माय । न लवा चंदनु आंगी न घाला विजणवारा । हरिविणें शून्य शेजारु गे माये '– ' सखे, ' या पूर्ण चंद्रामुळे मला फार उकडतेय ग. माझ्या अंगाला तुम्ही चंदन लावू नका, पंख्याने वारा घालू नका. हे सर्व उपाय व्यर्थ आहेत. त्या श्रीहरीशिवाय माझा हा बिछाना शून्य आहे ग. तुम्ही माझ्या जिवाभावाच्या मैत्रिणी असून तुम्हांला योग्य उपाय कसा सुचत नाही ? जा. ' नंदनंदनु घडी घडीये आणा । तयावीण न वांचती प्राणा वो माये '— त्या नंदकुमाराला घेऊन या असे मी परोपरीने सांगते आहे ना. त्याच्या भेटीशिवाय माझे प्राण कधीच वाचणार नाहीत.

## विरहास निसर्गाची साथ

कधी या विरहिणीस निसर्गाची साथ अधिकच तापदायक होते. 'धनु वाजे घुणुघुणा । वारा वाजे रुणुझुणा । भवतारकु हा कान्हा । वेगीं भेंटवा कां ' या सुप्रसिद्ध अभंगातील विरहिणी म्हणते, 'या मेघांचा घुणघुण असा आवाज कसा गंभीर पण सुंदर होत आहे. रुणझुण करून वाराही वाहत आहे. सख्यांनो, अशा या प्रसंगी भवतारक श्रीकृष्ण मला त्वरित भेटवा. या कृष्णा-शिवाय सारे उपचार व्यर्थ आहेत; हे छत, हे रम्य चांदणे, ही चाफ्याची फुले, ही चंदनाची उटी; या साऱ्या गोष्टी त्या देवकीनंदनाशिवाय व्यर्थ आहेत. तो जर नसेल तर, 'चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळीं'. म्हणून हा कान्हू वनमाळी मला भेटवा ना. माझ्या बिछान्यावरची पुष्पशय्या चांगली थंड असली तरी अग्नीप्रमाणे माझें सारे अंग पोळून काढते. ही आग, सख्यांनो, लौकर विझवा ना. बायांनो, तुम्ही माझ्यासाठी गीत गा. पण त्यात कोकिळेचा स्वर आणू नका; कारण त्या स्वराने मला अधिकच त्रास होतो.' अशी वेडयासारखी अवस्था या श्रीहरीच्या नादाने तिची होत आहे.

## आणि असे शुभशकुन

कधी या विरहिणीची मोठी केविलवाणी अवस्था होते. श्रीहरी सखा आता तिच्यासाठीं येणार असल्याचे शकुन तिला होऊ लागतात. 'पैल तो गे काऊ कोकताहे। शकुन गे माये सांगताहे' या अभंगात ती म्हणते, 'त्या पलीकडच्या अंगास एक कावळा मघापासून ओरडत आहे, पाहुणा येणार असल्याचे तो मला सांगत आहे.' म्हणून ती त्याला लडिवाळपणे म्हणू लागते, 'उडरे उडरे काऊ, तुझे सोन्याने मढीन पाऊ। पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती ? ।। दहि-भाताची उंडी लावीन तुझ्या तोंडीं । जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगी'- शकुन सांगणाऱ्या कावळ्या, तू उडून जा. तुझे पाय मी सोन्याने मढवीन. तुझ्या चोचीत दहीभाताचा घास घालीन, पण पंढरीचा राणा घरी पाहुणा कधी यणार हे मला तू सांग. दुधाने भरलेली वाटी मी तुझ्या तोंडाशी लावीन. काऊ, या माझ्या दारात आंब्याच्या फांदीस लागलेल्या रसाळ आंब्यांचा आस्वादही तू घे; पण त्याच्या आगमनाची शुभ वार्ता मला तू सांग.'

कधी विरहिणीचा डावा डोळा लवू लागतो. शुभ वार्ता सांगणारे स्वप्न ती आपल्या सख्यांना सांगत आहे, 'सख्यांनो, आधी माझ्यां अंगावर दागदागिने घाला, चंदनाची उटी लावा, जाई, जुई, पारिजातक, शेवंती या पुष्पांची शय्या करा. आज मोठ्या भाग्याचा दिवस; आज श्रीकृष्ण मला भेटायला येणार आहे. तुम्ही गुढ्या उभारा, सर्वत्र शृंगार करा. तोच एक माझ्या जीवाचा सखा आहे ग..... पण तो अजून कसा नाही आला ? वाटेत चालता चालता थकला की काय ? की मीच त्याच्या गावी जाऊन त्याची समजूत घालू ? मोठ्या प्रीतीने त्याच्यापुढे नृत्य करू ? त्याच्या नादात माझे मन हारपून जाते. माझा पाय त्याच्या नादात रुतून जातो. हा वसंत ऋतू माझ्या मनात त्याच्याविषयी प्रेमभावना निर्माण करीत आहे. हा पाहा, क्षणात दिसतो, क्षणात लपतो, क्षणात भीती दाखवून मला चकित करतो. हा श्रीहरी जर मला भेटला नाही तर मी आपला जीव टाकून देईन. सख्यांनो, पाहा, पाहा, हा श्रीकृष्ण या रात्रीच्या वेळेस नीलवर्ण आकाशातून माझ्याशी बोलत आहे.'

**अशी कृष्णनीळ शोभा**

परमात्म्याच्या नीलवर्णाची साक्ष ज्ञानेश्वरांच्या अभंगांतून अनेकदा पटते. श्रीकृष्णाचा वर्ण काळसर निळसर. अमर्याद आकाश व सागर निळसरच. नीलवर्ण श्रीकृष्णाच्या ध्यासाने त्यांना सर्व जगच निळसर वर्णाचे दिसू लागते. ज्ञानदेव ज्या योगसंप्रदायात वाढले त्यातील ध्यानधारणेंत व समाधिअवस्थेतही नीलवर्णाचा भास योग्यांना होतो. आणि नंदाच्या घरी वाढणारा व क्रीडा करणारा श्रीकृष्णच परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी यांच्या पलीकडचा असला तरी या निर्गुणनिराकारालाच सगुणाचा कृष्णरूपी कोंभ फुटतो. योगी लोकांना उन्मनी अवस्थेत सतराव्या जीवनकलेतील अमृतसेवनानंतर नीलकृष्ण तेजाचीच अनुभूती येते. 'कृष्णनील शोभा विकसली'! 'महाशून्याचा वर्ण निळा,' 'निळिये मंडळीं नीलवर्ण सांवळी,' 'नीलवर्ण अंभ नीलवर्ण स्वयंभ,' 'निलिमा सहजें आकारली,' 'नीलवर्ण तनु नीलवर्ण गुणू,' 'निळें हें व्योम सप्रेम,' 'निळियें सारणी वाहे मोतियाचें पाणी' यांसारख्या अनेंक ओळींतून ज्ञानदेवांनी नीलवर्णाची अनुभूती व्यक्त केली आहे.

**'यातिकुळ माझें गेलें हारपोनि'**

नीलवर्णीय कृष्णाचा इतका ध्यास लागला तरी तो काही भेटत नाही. कधी तिच्या सख्या तिची वेडचातच गणना करतात. मग ती त्यांना बजावते, 'किती वो शिकवाल मज वेळवेळां । मी तव गोपाळा रातलियें ।' तुम्ही मला आता किती वेळ शिकवाल ग ? मी त्या गोपाळाशी रमले आहे. 'यातिकुळ माझें गेलें हारपोनी । श्रीरंगावांचुनी आनु नेणें ।' मी या प्रभूच्या नादात असल्याने माझे कुल, माझी जात, सर्व काही संपून गेले असून मी त्याच्याशिवाय आता कोणासच ओळखीत नाही. आता 'अष्टभोग भोगितां मातें नाहीं चाड '- आता मला अष्टभोग भोगण्याचीही पर्वा उरलेली नाही,

**मी त्याची दासी होईन ग**

कधी ही विरहिणी म्हणते, मी या श्रीहरीसाठी वाटेल ते कष्ट सहन करीन. 'पांचा दामांचा घोंगडा नेसेन । उरली मोट ते मी जेवीन गे बाईये '-बाई ग, पाच दमडचांचे जाडेभरडे वस्त्र मी नेसेन, आणि त्याचे जे काही उष्टे राहिले असेल ते खाईन, पण त्याची दासी होऊन राहीन. 'त्याचा उंबरठा उसिसा करीन '- मीं त्याच्या दाराचा उंबरा उशाला घेऊन झोपेन. पण त्याची जवळीक मी कधी सोडणार नाही. कधी या विरहिणीचे मन बिथरते. 'मन मुरडुनी घातलें मनातें । थोरु मारु तेथें होत असे '- माझे मन वारंवार बाह्य विषयांकडे धावते, पण त्याच्या सर्व वृत्तींना आता मुरडून हृदयस्थ परमात्म्याकडे लावते. कधी ही म्हणते, 'जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा । तुजवांचुनी केशवा अनु नावडें '- केशवा, सर्व जीवांच्या जीवा, प्रेमभावाच्या भावा, मला तुझ्याशिवाय दुसरे काहीच आवडत नाहीं रे. मी सर्व जीवानिशी तुलाच अनुसरिले आहे. तू अजून का येत नाहीस ? सख्यांनो, तो माझा प्राण श्रीकृष्ण तुम्ही त्वरित घेऊन या. ' दुसऱ्या एका प्रसंगी ती म्हणते, 'त्रिभुवनींचें सुख पहावया नयनीं । दिनरात्रीं धणी न पुरे माझी '-विटेवरी उभें राहिलेले त्रिभुवनातले सुख डोळचांनी रात्रंदिवस पाहिले तरी तृप्ती होत नाही. 'विटेवरी सांवळा पहातां पैं डोळां । मन वेळोवेळां आठवितु '-विटेवरील या सावळचा रूपाची मीं राहून राहून आठवण काढीत असते. सागराला भरती येते, त्याप्रमाणें माझ्या मनात उल्हास

दाटून येतो. माझे मन रंगून जाते, आता मी तुझी वाट कोठवर पाहू रे ?' कधी ही विरहिणी तक्रार करते, 'ज्याचिये आवडी संसार त्यजिला । तेणे कां अबोला धरिला गे माये ?'- त्याची—माझी भेट करवा ग. मी त्याचे पाय आपल्या केसांनी झाडीन. हा गोपाळ माझ्यावर कोणत्या कारणासाठी रुसला आहे ? सुखाच्या चार गोष्टी तो माझ्याबरोबर का करीत नाही ?

**अशी माहेराची ओढ**

ज्ञानेश्वर महाराज आपली दिव्य अनुभूती सांगताना विरहिणीची भूमिका घेऊन शृंगारिक भाषेत बोलतात. कित्येक नव्या टीकाकारांना हे त्यांचे बोलणे रुचत नाही, परंतु ही भाषा तेवढी शृंगाराची आहे, तीमधील मनाची तीव्रता मात्र पाहावयाची, हे ध्यानात घेतल्यास, ज्ञानेश्वरांच्या विरहिणींचे मोल अनन्यसाधारण आहे असे मानावयास हरकत नाही. ज्ञानेश्वरादी संतांची विठ्ठल ही माऊली तर खरीच आहे. याच थोर माउलीच्या भेटीचा ध्यास त्यांना आहे. या दृष्टीने 'मायबापे आमुची विठोबा रखुमाई निजाचीं । त्याचीये गांवींची कोण्ही येतु न्यावया ' या एका अभंगात ते म्हणतात, 'विठोबा-रखुमाई हे माझे आईबाप, त्यांच्या गावचे कुणी मला न्यायला येतील का ? माझ्या माहेरचे नाव पं रपूर. मी या माहेरची वाट एकसारखी बघत आहे. मला या सासरी फारच त्रास होत आहे. काम, क्रोध, मद, मत्सर इत्यादींचा जाच मला फार आहे, दंभरूपी जावा, प्रपंचचिंता ही सासू, आशा ही सर्पिणी. यांच्या जाचामुळे माझा जीव कंटाळून गेला आहे. विठोबा-रखुमाई हे मला माहेरी केव्हा नेतील ?

**'शेजे नलगे डोळा'**

एकदा तर निकरावर येऊन ज्ञानेश्वर म्हणतात, 'आल्हादपण काय सांगसी देवा । मन बैसें भावा तैसें करीं ' — देवा, नुसत्या आनंदाच्या गोष्टी सांगण्यापेक्षा अनन्यभावाने देवाला शरण जावे. नुसत्या शौर्याच्या गोष्टी बोलण्यापेक्षा हा घोडा व हा त्यावर बसणारा राऊत असा प्रत्यय दाखवून ब्रह्मपदावर आरूढ व्हावे. कधी शपथ घेण्याच्या निमित्ताने ज्ञानेश्वर म्हणतात, 'तुझी आण वाहिन गा देवराया । बहु आवडसी जीवापासुनिया –'

देवराया, तू आम्हांला आमच्या जीवापेक्षा आवडतोस. म्हणून शपथ घेऊन सांगतो की, तुझ्या चिंतनाशिवाय दुसरे मी काहीच करणार नाही. देवा, 'सुमनाची लता भ्रमराची ओढी । तैसी तुझी गोडी लागो मज' – जसे भ्रमराचे मन फुललेल्या वेलीवर जडते त्याप्रमाणे तुझ्या नामस्मरणात माझे मन गुंतून राहो. देवा, तुझे अवीट रूप जवळ असून भेटत नाही. तहान लागली म्हणजे पाण्याने जशी ती थांबते तशी तुझी गोडी आम्हांस लागावी. दुसऱ्या एका अभंगात ज्ञानदेव म्हणतात, 'हो रे तूं विट्ठला हो रे तूं बिट्ठला । हो रे तूं गोपाळा । क्षेम देईं रे वेल्हाळा' – विट्ठला, गोपाळा, वेल्हाळा, मी तुला भुलून गेले आहे रे. तू मला एकदा कडकडून भेट ना. रात्रंदिवस मी तुझे चिंतन करते. मला तुझे मंगल चरण एकदा दाखीव ना. 'तुजवीण वेल्हाळा कैं सुखसोहळा । रखुमादेवीवरा, विट्ठला, शेजे नलगे डोळा' – देवा, विट्ठला, तुझ्याशिवाय मला कशातच सुख लाभत नाही, रखुमाईच्या वरा, मला अंथरुणावर झोपही येत नाही.

## 'पडलें दूर देशीं'

ज्ञानेश्वरांना वारंवार याप्रकारे श्रीहरीचा, श्रीकृष्णाचा, विठ्ठलाचा, पंढरपुराचा वेध लागलेला दिसतो, 'विट्ठल यात्रे जाती वो माये । त्यांचे धरीन मी पायें ।' जे कोणी पंढरपुरास विट्ठलयात्रेस जातील त्यांचे पाय धरण्यास ते तत्पर होतात. 'माझे जीवींची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।' पंढरपुरास खांद्यावर पताका घेऊन जावे ही एक त्यांच्या मनाची आवड आहे. 'पांडुरंगीं मन रंगलें । गोविंदाचे गुणीं वेधलें' अशी त्यांच्या मनाची अवस्था होते. त्यांच्या मनाची एकमेव इच्छा किती थोर आहे ते त्यांच्या एका प्रसिद्ध अभंगात प्रकट झाले आहे :

अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ।। १ ।।
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ।। २ ।।
सर्व सुकृतांचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगीं ।। ३ ।।
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलेसी भेटी । आपुलें संवसाटी करुनी ठेला ।। ४ ।।

श्रीहरीच्या दर्शनाने, त्याच्या प्रभावाने ज्ञानदेवांना सारा संसार सुखाचा करून तीनही लोकांत आनंदी आनंद करून सोडायचा आहे, यासाठी हा

सर्व अट्टाहास आहे. म्हणूनच 'तुझी गुण कीर्ति ऐकोनी आर्ते मन उचंबळलें। आलिंगना धाविन्नलें उतावीळ' अशी त्यांच्या मनाची तगमग होते. कधीं ते म्हणतात, 'देवा मला, तुझी भुक्ती नको, मुक्ती नको या संकटात मी तुला कधीच घालणार नाही.' एकदा ते ईश्वराला म्हणाले, 'तुझेनी बळें मांडली फळी। तुवां जवळी असलें पाहिजे'– देवा, तुझ्या विश्वासाच्या बळावर मी या संसाराचा खेळ मांडला. आता या खेळात तू माझ्याजवळ नित्य हवास. या संसाररूपी युद्धात मला तू ढकललेस, आणि माझ्यावर दया मात्र करीत नाहीस. देवा, मोठ्या धैर्याने मी या रणभूमीवर आलो, पण तू मात्र मला कुठेच दिसत नाहीस.' अशा प्रकारे जीवाची त्रेधा या संसारात उडते. त्याला आसरा परमेश्वराचा हवा असतो. ज्ञानेश्वरही कळवळयाने श्रीहरीस हाक मारताना म्हणतात :

पडलें दूर देशीं मज आठवे मानसीं। नको नको हा वियोग कष्ट होताती जीवासी ।।१।।

दिनु वैसी रजनी मज जालि वो माये। अवस्था लावुनी गेला अझुनी कां न ये ।।२।।

गरुडवाहना, गंभिरा, येई गा दातारा। बाप रखुमादेवीवरा श्रीविठ्ठला ।।३।।

## 'सुखाचिये गोठी सुख आलें भेटी'

मनाची इतकी तीव्रता झाली की मग मध्येच आनंदाची सुखाची तीव्र रेषा चमकून जाते. सर्वत्र श्रीहरीच भरून राहिला आहे अशी खूणगाठ पटून मन संतुष्ट होते. 'मन हें धालें मन हें धालें पूर्ण विठ्ठलचि झालें। अंतर्बाह्य रंगुनी गेलें विठ्ठलची ।। विठ्ठल जळीं स्थळीं भरला। ठाव कोठें नाही उरला। आज म्यां दृष्टीनें पाहिला। विठ्ठलची' अशी समाधानाची व आनंदाची वृत्ती निर्माण होते. 'योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी। पाहतां पाहतां मना न पुरेचि धणीं' अशा प्रकारच्या अनुभवात चित्तवृत्ती रंगून जाते. 'देखिला देखिला माये देवाचा देवो। फिटला संदेहो निमालें दुजेंपण' अशीं अनुभूती येते. या विठ्ठलाचे पाय देखताच सर्व जन्म सुफळ होऊन जातो. 'आजी संसार सुफळ जाला गे माये। देखियेंले पाय विठोबाचे' अशी वृत्ती संतोषित होते. जीव मग त्याच्याच नादात रंगतो, खेळतो,

नाचतो, बागडतो. 'सांगाती आमुचिया रे। विद्गद पांवया छंदे रे। नाचे विनोदें कान्हा रे। विद्गद पांवया छंदे रे'- या श्रीकृष्णाच्या मुरलीच्या छंदाने आम्ही नाचतो, आणि आमच्या भक्तिप्रेमाने संतुष्ट होऊन तोही नाचतो. या नृत्यातील आनंद काय वर्णावा? 'वृंदावनीं आनंदु रे। विठ्ठल देव आळविती रे' असा घोष मग सर्वत्र सुरू होतो. 'सुखाचिये गोठी सुख आलें भेटी। तया लाभासाठीं जीव वेंचिला गे माये' -प्रभुसुखाच्या गोष्टी बोलता बोलता श्रीकृष्णाच्या रूपाने प्रत्यक्ष सुखच आनंदरूप होऊन हाती आले. 'भेटीसी गेलिये तंव तेचि जालिये' अशी अवस्था मग बनते. अस्सल बावन्नीच्या चंदनाशी संगत केली तेव्हा जातिकुलास मुकून मी त्याच्याशीच रमलो असे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात :

'बावनाचे संगतीं द्रुमभावें रातलें। सेखीं आपुलिया मुकलें जातीकुळा ।।१।।
लोहाचे सायास परिसेंसी फिटले। तैसें मज केलें गोवळचानें ।।२।।
मेघजळ वोळें मिळे सिंधूचिया जळा। तैसा नव्हे तो वेगळा एक होऊनि ठेला ।।३।।
बापरखुमादेविवरु विठ्ठलीं नुरेचि कांहीं। उत्तम मध्यम ठायी व्यापूनि असे ।।४।।

### असा ब्रह्मानंदाचा अनुभव

ज्याचा ध्यास घ्यायचा त्याचेच रूप शेवटी पावून आनंदित व्हायचे. या ब्रह्मानंदाच्या प्राप्तीस दुसरी तुलना नाही. 'पाहातें पाहूं गेलों पाहणें विसरलों। ब्रह्मानंद धालों देवराया' असे ज्ञानेश्वरांनी एका अभंगात म्हटले आहे. विठ्ठलाच्या भेटीसाठी प्राण अर्पण करणारा जीव मग म्हणू लागतो, 'देखिले तुमचे चरण निवांत राहिलें मन। कासया त्यजीन प्राण आपुला गे माये?' मी आता संतुष्ट मनाने माझ्या माहेरी श्रीहरीचे कौतुक करीत राहीन, असे या भक्तास वाटते. कधी परमेश्वराच्या अचानक भेटीनेही जीव आनंदून जातो. 'सांवळा सुकुमार लावण्य त्रिभुवनीं। अवचिता अंगणीं देखिला रया' अशी अनुभूती वारंवार आल्याने ब्रह्मानंदाचीच प्राप्ती होते. हा आनंदघन परमात्मा भेटल्यावर साऱ्या शंका फिटतात. सारी किल्मिषे जळून जातात. जीव आनंदसरोवरात पोहत राहतो. 'आनंद साम्राज्यीं पाटु। बांधिजे जीवा' अशी थोर स्थिती जीवाला प्राप्त होते. हा

विठ्ठल कशी कृपा करतो ? ‘ मन मारूनियां मुक्त पैं केलें । मीपण माझें नेले हिरोनिया ’ अशा या ऐक्यभावाचा कृपेचा आगळाच आनंद जीवास चाखावयास मिळतो. ‘ चैतन्य चोरूनि नेलें चित्त माझें सर्व गेलें । पाहे तंव तन्मय जालें गे माये ’ या वृत्तीमधील आनंद शब्दातीत आहे. ‘ निरखित निरखित गेलीये । पाहें तंव तन्मय जालिये ’ या तन्मयतेतील आनंदाचे वर्णन कोण कसे करू शकणार ? ‘ अकल्पित द्रुम आजी संयोगे घडलें । अपार आपणांतें विसरलें गे माय ’ या वृत्तीमधील तल्लीनता फक्त अनुभवाची बाब आहे. अशाच एका मजेदार अनुभवाची ज्ञानदेवकृत नोंद येथे करतो.

काय सांगूं तूंतें बाई काय सांगूं तूं तें ॥ ध्रु. ॥
जात मी होतें यमुने पाणिया । वातत भेतला सांवला ॥
दोईवल तोपी मयुल पुछाची । खांद्यावली कांबला ॥ १ ॥
तेणें माझी केली तवाली । मग मी तेथून पलाली ॥
पलता पलता घसलून पलली । दोईची घागल फुतली ॥ २ ॥
माझे गुलगे फुतले । मग मी ललत बसलें ॥
तिकून आले शालंगपानी । मला पोताशीं धलिलें ॥ ३ ॥
मला पोताशीं धलिलें । माझें समाधान केलें ॥
निवृत्तीचे कृपें सुख हें । ज्ञानदेवा लाधलें ॥ ४ ॥

१०

# श्रीज्ञानेश्वरांचा पुरुषश्रेष्ठ

**तत्त्वज्ञानाचे सावयव दर्शन**

तत्त्वज्ञानाची उंची कितीही असली तरी आणि नीतिविचारांचे तात्त्विक अधिष्ठान कितीही मोठे असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याचे सावयव व गोचर दर्शन घडत नाही तोपर्यंत सर्वसामान्य जनतेस त्याचे आवाहन पुरत नाही, पोचत नाही. श्रीराम, श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, महावीर, श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, कबीर, तुलसीदास, तुकाराम, रामदास, त्यागराज, नरसी मेहता, मीराबाई, रामकृष्ण परमहंस, रामतीर्थ ही अशी अनेक मानवश्रेष्ठांची नावे आहेत की ज्यांच्या नामोच्चाराबरोबर, दर्शनाबरोबर, वाङ्मयश्रवणाबरोबर नीतिधर्माचे वस्तुपाठ प्रत्यक्ष दिसावेत. प्रत्यक्ष दर्शनावाचून, अनुभवावाचून कोरड्या तत्त्वज्ञानास समाजघटनेत फारसा अर्थ उरत नाही. तत्त्वज्ञानास, नीतिविचारास मानवी व्यवहारात उतरताना सगुण व सालंकृत व्हावे लागते, तरच त्याच्यावरील विश्वास सर्वसामान्य जनतेचा बळावतो. आणि या सर्वसामान्य जनतेसच त्याचे आवाहन पोचले तर त्याची सार्थकता आहे.

## गुणवैभवाचे सुस्वरूप प्रतीक

वीरश्रेष्ठ शिष्योत्तम अर्जुन एवढा कुशाग्र बुद्धीचा ना ? पण त्यालासुद्धा ‘ कश्मला ’ ने ग्रासल्यावर, मोहाने घेरल्यावर, युक्तायुक्ततेचा भ्रम पडला. ‘ काय म्हणिजे स्थितप्रज्ञातें । ओळखों केवीं ?’ असा त्याने भगवंतास प्रश्न केला. हा स्थितप्रज्ञ असतो तरी कसा ? ‘तो कवणें स्थिती असे। कैसेनि रूपीं विलसे ॥ ’ अशी त्याची पृच्छा आहे. या प्रश्नाचे उत्तर देताना स्थितप्रज्ञाची, भक्तश्रेष्ठाची, ज्ञानी माणसाची लक्षणे पुनः पुनः श्रीज्ञानदेवांनी गीतेच्या आधाराने सांगितली आहेत

ज्ञानीभक्ताच्या गुणसंपदेचे निराकार वर्णन तत्त्वज्ञानात होतेच. परंतु त्याचे चालणे, त्याचे बोलणे, त्याचे इतरांशी वागणे, त्याचे विचार, त्याची आध्यात्मिक वृत्ती, त्याची गुरुभक्ती, त्याचे शुचित्व, त्याची निरहंकारता, त्याचे समत्व इत्यादी अनेक गुणविशेषांचे सविस्तर वर्णन श्रीज्ञानदेवांनी जागोजाग केलेले आहे. सर्वात महत्त्वाची बाब अशी की, स्थितप्रज्ञाचें किंवा ज्ञानीभतक्ताचे जे गुणवैभव ज्ञानेश्वर महाराज वर्णन करतात ते अर्जुनास तर पटलेच, पण मराठी भाषा जोपर्यंत बोलली जाणार आहे तोपर्यंत ते सर्वांना, आबालवृद्धांना, सर्व जातींच्या, धर्माच्या स्त्री–पुरुषांना उद्‌बोधक, मार्गदर्शक व प्रेरक ठरणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे या विषयाचे विवरण करणारे श्रीज्ञानेश्वर महाराज हे स्वतःच चालते बोलते असे या गुणवैभवाचे सुस्वरूप त्या वेळच्या श्रोत्यांसमोर होते, आजही ते लक्षावधी लोकांच्या मानससृष्ठीत विराजमान झालेले आहे. त्यांच्या रूपाकडे पाहावे आणि त्यांनी वर्णन केलेल्या पुरुषश्रेष्ठाची लक्षणे आठवावीत.

## ‘जो सर्वदा नित्यतृप्तु’

अशा पुरुषश्रेष्ठांच्या थोर आदर्शांबरोबरच समाज स्थिरावतो, प्रगत होत जातो. असे आदर्श त्याला पुनः पुनः सांगावे लागतात. शेवटी समाज घडविणे म्हणजे त्याच्या घटकाची, एकेक माणसाची सुधारणा करणे हेच होय. माणसाचे मन जेवढे सद्‌विचारांनी उत्क्रान्त व त्यानुसार जेव्हा त्याचा आचार होणार तेव्हाच समाजाची पावले इष्ट अशा मर्गाने पुढे पडत राह-

णार. आणि यासाठीच श्रीज्ञानेश्वर महाराजांसारखे महात्मे पुरुषश्रेष्ठाच्या गुणवैभवाचे कथन वारंवार करीत असतात.

हा पुरुषश्रेष्ठ कसा असतो ? 'जो सर्वदा नित्यतृप्तु । अंतःकरणभरितु ' म्हणजे श्रेष्ठ पुरुष नेहमी संतुष्ट असतो. त्याचे अंतःकरण समाधानाने भरलेले असते. कितीही दुःखे त्याला प्राप्त झाली तरी त्यांचा त्याला उद्वेग वाटत नाही किंवा तो कधी 'सुखाचिया आर्ती । अडपैंजेना । ' त्याच्या ठिकाणी कामक्रोधादी विकार साहजिकच नसतात. हा पुरुषश्रेष्ठ पौर्णिमेच्य । चंद्राप्रमाणें परिपूर्ण असतो. तो सर्वांना सारखाच प्रकाश देतो. काही चांगले प्राप्त झाले की तो आनंदाने वेडावून जात नाही. की दुःखदायक घडले तरी खन्तावत नाहीं. तो कधीच इन्द्रियांना वश झालेला नसतो. इन्द्रियेच त्याला नित्य वश झालेली असतात. असा हा स्थितप्रज्ञ पुरुषश्रेष्ठ कोणाही प्राणिमात्राचा द्वेष करीत नाही, हा आपला, हा परका असा भेद त्याच्याजवळ नसतो. उत्तमाला तेवढा आधार द्यावा आणि नीच माणसाला लोटून द्यावे असा विचार कधी भूमीला सुच- ' का ? ' गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेंचि करूं । तोय जैसें । ' पाणी जशी गाईची तहान दूर करते तशीच वाघाचीही दूर करते. त्याच्या ठिकाणी वरवरचा भेद नसतो. असेच सज्जन पुरुषाचे असते.

**' आपणचि विश्व जाहला '**

अशा या सत्पुरुषाच्या अंतःकरणात वासनेस अवसरच नसतो. अशा या संताच्या सहवासांत गंगासुद्धा पवित्र होते. कारण याचे मन आतून बाहेरून निर्मळ व स्वच्छ असते. आकाशाप्रमाणे निर्लेप असते; सर्व व्यापून पुनः निर्लेप असते. हा नेहमींच आत्मसुखात रममाण झालेला असल्याने त्याच्या मनाला कसलीही टोचणी नसते. कोणत्याही कर्माच्या आरंभास त्याला अहंकाराची बाधा होत नाही. त्याला आत्मसुखासारखे उत्तम काही वाटतच नाही. तो ' आपणचि विश्व जाहला ' अशा भूमिकेत असल्यामुळे द्वेषासारखे विकार त्याच्यात उतरतच नाहींत. त्याच्याजवळ विषमता कधी नसतेच. त्याला शत्रु-मित्र सारखेच वाटतात. घरच्या लोकांना तेवढा उजेड द्यावा, व परक्यांना अंधार द्यावा असे दिवा म्हणतो का ? कोणी कुऱ्हाडीचा घाव

घालणारा असो वा कोणी खतपाणी घालून वाढविणारा असो, वृक्ष सर्वांना एकाच प्रकारची सुखद सावली देतो ना ? पाणी देणाऱ्याला तेवढा ऊस गोड लागतो आणि चरकात गाळणाराला कडू लागतो असे कधी घडते का ? तसे वागणे या भक्तश्रेष्ठाचे असते. राजाला आणि दरिद्री माणसाला चांदणे सारखेच गोड लागते ना ? तसाच तो सर्व प्राणिमात्रांना समभावाने वागवितो.

त्याला निंदेचे कधी वाईट वाटत नाही; तो स्तुतीने कधी हुरळून जात नाही. ‘ जो यथालाभें न तोखे । अलाभें न पारुखें । पाउसेंवीण न सुके । समुद्र जैसा ’ अशी त्याची स्थिती असते. पाऊस पडला नाही म्हणून समुद्र कधी कोरडा राहतो का ? किंवा फार मोठी वृष्टी झाली म्हणून तो कधी भरूनही येत नाही. हे विश्व आपले नित्याचे घर आहे अशी त्याची बुद्धी स्थिर झालेली असल्यामुळे सर्व जगच त्याच्या विश्रांतीचे स्थान झालेले असते. या भक्तश्रेष्ठाचा अधिकार केवढा असतो ? ‘ जे पुरुषार्थसिद्धी चौथी । घेऊनि आपुलिया हातीं । रिगाला भक्तिपंथीं । जगा देतु । कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडी बांधी करी । कीं जळाचिये परी । तळवटु घे । ’ अशा या ज्ञानी भक्ताच्या पाऊल खुणांचा मागोवा घेत जरा निघाले तरच त्याला सुखाचे व शांती–समाधानाचे दिवस दिसतील.

## सहजसुंदर बोध

ज्ञानी भक्ताच्या गुणसंपदेचे वर्णन करताना श्रीज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला उधाण आले आहे ते तेराव्या अध्यायातील ‘ अमानित्वमदम्भित्वमहिंसा ’ इत्यादी गुणविशेषांवर भाष्य करीत असताना. मानवी सद्‌गुणांची उंची केवढी असू शकते याचे एवढे उदात्त व प्रत्ययकारी वर्णन जगाच्या वाङ्मयात सापडणार नाही. ज्ञानेश्वरांच्या मनाची सारी कोवळीक तर यात आहेच, पण सर्व मानवजातीस एका भावार्थाच्या सुखासनावर बसवुन नीतिधर्माचा सहजसुंदर बोध देण्याचे सामर्थ्य या विवेचनात फार मोठे आहे. ज्ञानेश्वरांची उत्तुंग प्रतिभा या गुणविशेषांचे वर्णन करताना साऱ्या विश्वाला गवसणीं घालणारी असली तरी तिचे लक्ष सर्वसामान्य व व्यवहारी माणसाकडे आहेच, कारण त्यांनी ज्ञानी पुरुषाच्या वर्तनाचे जसे बहारदार व चित्तवेधक चित्र काढले आहे तसेच अज्ञानी व विषयरत माणसाचेही तपशीलाने वर्णन केले आहे. काय हवे हे सांगताना काय नको याची जाणीव करून देणारे ज्ञानेश्वर हे

फार मोठे अधिकारी सत्पुरुष होते. त्यांच्या मताने ज्ञानी मनुष्य कसा असतो ? या ज्ञानाच्या प्रकाशाने बुद्धीचे डोळे कसे उघडले जातात ? जीव आनंदाच्या राशीवर कसा लोळू लागतो ? त्याच्या शारीरिक क्रियांतून ते ज्ञान कसे आपोआप प्रकट होते ? झाडांवरील पालवीच्या टवटवीमुळे वसंत ऋतूच्या आगमनाची खूण वाटते. ' कां भूमींचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । ना ना आचार गौरव । सुकुलीनाचे । ' धरणीची सुपीकता तीवर उगवलेल्या कोंभाच्या प्रसन्न लवलवितपणावरूनच जाणायची ना ? कापुर-कर्दळीची खूण तिच्या सुवासावरून जाणायची असते. त्याचप्रमाणे ' हृदयींचेनि ज्ञानें । जियें देहीं उमटतीं चिन्हें.' तीच ज्ञानेश्वरांनी तेराव्या अध्यायात अतिशय रसिकतेने सांगितली आहेत.

ज्ञानी मनुष्य कोणत्याही लौकिक विषयात रंगून जात नाही, की त्याला संभावितपणा मिरविण्यात गोडी वाटत नाहीं. कुणी त्याची स्तुती करायला सुरुवात केली की तो पारध्याच्या फासात अडकलेल्या हरिणाप्रमाणे कासावीस होऊन जातो. स्वतःचा बहुमान त्याला स्वतःच्या डोळ्यांनी पाहावत नाही; लौकिक कुणी गाइला तर ऐकवत नाही. सर्व जगाने आपली हेळसांड करावी, नातेवाइकांनी आपणांकडे लक्ष देऊ नये याचीच त्याला आवड असते. अंगी लहानपणा बाणेल, हीनपणाचे भूषण अंगावर चढेल असे त्याचे वर्तन असते. त्याला दंभ कसा तो ठाऊकच नसतो. स्वतः केलेले पुण्यकृत्य तो स्वतःच्या तोंडाने कधीही सांगत नाही. नाठाळ गाय पान्हा चोरते ना ? शेतकरी धान्य पेरल्यावर ते मातीने झाकून टाकतो ना ? तसे तो आपले पुण्य नेहमी लपवून ठेवतो. तो कधी ' परोपकारू न बोले । न मिरवी अभ्यासिलें । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठी.'

### अहिंसेच्या नावावर हिंसाच

आज अहिंसेच्या नावावर केवढी भयानक हिंसा होत असलेली आपण पाहतो; पण खऱ्या अहिंसेचे लक्षण कोणते ? ती आचरणात कशी आणायची ? यासंबंधी अति भव्य व उदात्त मार्गदर्शन ज्ञानेश्वरांनी येथे केले आहे. विकसित झालेल्या व परमेश्वराच्या कृपेच्या स्पर्शाने पुनीत झालेल्या मानवी मनाचे इतके हृद्य व विलोभनीय दर्शन इतरत्र कुठे मिळेल असे वाटत

नाही. आपले अहिंसाविषयक मत सांगताना श्रीज्ञानेश्वरांनी इतरांची मते अगोदर खोडून काढली आहेत. अहिंसेच्या नावावर हिंसेचाच अवलंब करणाऱ्यांची त्यांनी थोड्या कडक शब्दांत हजेरी घेतली आहे. पशुहिंसा करून अहिंसेची थडी कशी गाठता येणार ? असा प्रश्न त्यानी विचारला आहे, ' पेरिजे नुसधीं हिंसा । तेथ उगवेल काय अहिंसा ? ' असा प्रश्न जगापुढे त्यांनी उपस्थित केला आहे. आयुर्वेदातील मानवी दुःखनिवारणार्थ असलेली हिंसाही ज्ञानेश्वरांच्या कोवळ्या मनास मानवली नाही. ' जीवाकारणें करावा जीवघातु ' हे त्यांना मुळीच पसंत नाही. आज भारतीय स्वराज्य-कालात गोवधबंदी करावी की न करावी म्हणून राज्यकर्ते विचार करीत आहेत ; त्याचे एक टोक व ' अजातशत्रु तरुवरा । सर्वांग देवविल्या शिरां '-अजात शत्रू तरुवरांच्या अंगी भेगा पाडून त्यांचा चीक औषधासाठी घेतला गेल्या-मुळे कळवळणारे श्रीज्ञानेश्वर-हे दुसरे टोक. अहिंसेच्या नावाखाली चाललेली हिंसा पाहून त्यांचे मन व्यथित होते. माणसाच्या जीवासाठी ही अशी हिंसा अगत्याचीच आहे असे मानणाऱ्यांचे व ज्ञानेश्वरांचे कधी पटणार नाही ; कारण ज्ञानदेवांना हा सर्व प्रकार पाहून राहती घरे पाडून देवळे बांधण्याची आठवण होते. गोरगरिबांना नागवून अन्नछत्र घालण्यापैकीच हा प्रकार. मस्तकावर पांघरूण घेताना तळवट उघडे पडते त्याची काय वाट ? बैल विकून गोठा करतात कधी ? पिंजरा विकून कधी कुणी पोपट घेतात का ? भूक लागली म्हणून काय कुणी आपलेच हातापाय शिजवून खातात ? देऊळ मोडून कुणी त्याच्या भोवतीची भिंत बांधतात का ? असे अनेक प्रश्न विचारून ज्ञानेश्वरांनी अहिंसेच्या नावाखाली हिंसा करणाऱ्यांना सावध करून मग आपले स्वतःचे असे अहिंसानिरूपण केले आहे.

### बहरलेली कृपा

ज्ञानेश्वरांनी अहिंसेचे वर्णन विविध प्रकारांनी केले आहे. ज्याच्या अंगी अहिंसा बाणली आहे तो चालतो कसा ? तो तरंगाला न ढवळता, लहरींना न फोडता, पाण्याचा साठा न चाळवता चालतो. फुलांवरील परागकण चुरडून जाऊ नयेत या भीतीने भ्रमर जसा हळुवारपणे पाय ठेवतो, त्याप्रमाणे याचे चालणे असते. ' तैसे परमाणु पांगुतले । जाणूनि जीव सानुले । कारुण्यामाजी पाउले । लपवूनि चाले ' अशी त्याची वृत्ती असते. 'ते वाट कृपेची करितु

ते दिशाचि स्नेहभरितु। जीवातळीं आंथरितु। आपुला जीव' इतक्या सावध रीतीने व परम कारुणिक वृत्तीने सत्पुरुषच चालतात. त्यांचे पाय ज्या धूलीकणांना लागतात तेथील जीवांना त्यामुळे सुखच होत असते. या जीवसृष्टींबद्दल त्याला केवढी चिंता असते? केवढे ममत्व त्याला वाटते? ' म्हणे पावो धडपडील । तरि स्वामीची निद्रा मोडेल' अशी धास्ती त्याला सतत असते 'जीवाचेनी नावें । तृणातेहि नोन्नांडावे' अशी त्याची प्रतिज्ञा असते.

अशा प्रकारे याच्या चालण्यातही कृपा फळाफुलांनी बहरलेली असते. अशा या माणसाचे बोलणे किती मधुर असते? त्याचे श्वसनही किती सुकुमार असते? त्याची मुद्रा म्हणजे स्नेहाचे माहेरघर असते. त्याचे दात म्हणजे जणु माधुर्याला फुटलेले कोंबच! 'पुढा स्नेह पाझरे। माघां चालतीं अक्षरें। शब्द पाठीं अवतरे। कृपा आधी' अशी त्याची रीत असते. कुणालाही आपले शब्द खुपू नयेत अशा सावधतेने तो बोलत असतो. तो आधी सहसा बोलतच नाही. पण फार विनंती करून त्याला बोलता केले तर 'परिसतया होये। मायबापू' असाच अनुभव यावा. त्याचे बोलणे कसे असते? 'कां नादब्रह्मचि मुसें आलें। कीं गंगापय असललें। पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें ॥ तैसे साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे' जसे याचे बोलणे, तसेच याचे पाहाणे. त्याच्या कृपेची कोमल दृष्टी अंगावर पडताच सर्वांनाच समाधान व्हावे. त्याचे हात सर्व पुण्यकर्मे करून कृतार्थ झालेले असतात. वाऱ्याला हिसका बसेल, आकाशाला नख लागेल या भीतीने तो हातांची हालचालच करीत नाही. केवळ हात जोडण्याचीच सवय त्याला असते; दुःखीकष्टी जीवांना अभय देण्यासच ते तत्पर असतात, जो पडेल त्याला आधार द्यावा, जो संकटग्रस्त असेल त्याला गोंजारावे, एवढेच त्याला माहीत असते. त्याचे हात पशूलाही प्रेमळपणाने कुरवाळतात. त्याचे तळहात साधुसंतांच्या शुद्धशीतल शीलाप्रमाणे स्वच्छ असतात!

### ज्ञानी पुरुषाचे गुणवैभव

तेराव्या अध्यायातील ज्ञानी पुरुषाच्या या अहिंसावृत्तीचे वर्णन जितके

हृद्य व विचारप्रवर्तक आहे तितकेच ते सार्वकालिकही आहे. श्रीज्ञानेश्वरांच्या सारख्या महात्म्यांचा उपदेश एका शतकापुरता, एका जातीपुरता, एका धर्मापुरता, एका तात्कालिक प्रश्नापुरता कधी नसतो. सबंध 'विश्व स्वधर्म-सूर्य पाहो' अशी त्यांची मनीषा असते. आज गुरुशिष्यांचे नाते किती दुरावले आहे! कशाचा कशाला मेळ नाही अशीच अवस्था झाली आहे. वृत्तपत्रात नित्य येणाऱ्या विद्यार्थी व त्यांचे अध्यापक यांच्या दंगली व त्यांचे हिंसाग्रस्त जीवन वाचून विचारी माणसाचे चित्त बधिर होऊन जाते. ज्ञानेश्वरांचा श्रीगुरुविषयी असलेला आदर किती थोर! सद्‌गुरुनाथाविषयी त्यांच्या मनात अपार प्रीती, निस्सीम भक्ती. श्रीगुरूची उपासना कशी व किती करावी याचा एक उद्‌बोधक वस्तुपाठ म्हणजे ज्ञानेश्वरांचे आचार्योपासनम्-वरचे हे भाष्य आपण पाहिलेच आहे.

ज्ञानी-पुरुष शुचित्वानेही परिपूर्ण असतो, त्याचे मन स्थिर असते. इंद्रियसुखांबद्दल त्याला विरक्ती असते, त्याने अहंकाराचा त्याग केलेला असतो. जन्म, मृत्यू, जरा, व्याधी, यांतील दोष त्याच्या नेहमी ध्यानात असतात. तो कधी पुत्राविषयी आसक्ती ठेवीत नाही. पुत्र, स्त्री, घर, संपत्ती यांच्या मोहात गुरफटून जात नाही. बऱ्या-वाईट परिस्थितीतही त्याची वृत्ती शांत असते. त्याचे चित्त नेहमी परमेश्वरांपाशी असते. त्याला एकांताची आवड असते. ज्ञानविज्ञानाची चर्चा तो नेहमी करीत असतो. ब्रह्मज्ञानावर त्याचे लक्ष नेहमी असते, अध्यात्मज्ञान हेच खरे ज्ञान अशी त्याची श्रद्धा असते. ज्ञानी पुरुषाचे व त्याच्या समत्व वृत्तीचे केवढे कौतुक श्रीज्ञानेशानी केले आहे! श्रीकृष्णासारखा ज्ञानप्रेमी व अर्जूनासारखा जिज्ञासू श्रोता पाहून ज्ञानेश्वरांना चौपट बळ चढलेले दिसते. जसे ज्ञानाचे वर्णन सविस्तर आहे तसे अज्ञानाचेही निरूपण विस्ताराने त्यांनी केले आहे. कारण अज्ञानाचा परिचय सर्वांचाच अधिक, तेव्हा त्याची ओळख टाळून ज्ञानाच्या वास्तव स्वरूपाकडे वळण्याचा मार्ग ज्ञानेश्वरांनी ज्ञानीभक्ताच्या गुणवैभवाचे निरूपण करताना दाखविला आहे.

### रखरखीत वाळवंटात ओलावा

अशा या पुरुषश्रेष्ठाचे, ज्ञानी भक्ताचे दर्शन व त्याच्या गुणवैभवाचं चिंतन यांच्यामुळेच समाज प्रगतीच्या पथावर राहतो. या प्रकाशदीप-

स्तंभाच्या सोबतीने त्याला धीर येतो. मार्गातील खाचखळगे त्याला समजतात, आणि हा ज्ञानी पुरुष ईश्वरालाही अतिशय प्रिय होतो. ईश्वराचीच ती एक छोटी मूर्ती असते म्हणा ना. आपलेच स्वतःचे रूप पाहून ईश्वरही संतुष्ट होतो. दोन सोडून चार हात धारण करून तो आपल्या या वत्सास आलिंगन द्यावयास उत्सुक असतो. भक्तिसुखासाठी तो ईश्वरच स्वतः होऊन भक्त या अवस्थेला येत असतो. त्याचा एक भाग स्वतः देव असतो व दुसरा सेवक म्हणून भक्त असतो. अशा या भक्ताचा छंद ईश्वरालाच लागतो. 'तयाचें आम्हां व्यसन। आमुचें तो निजध्यान। किंबहुना समाधान। तो मिळे तैं' याच भक्तासाठी परमेश्वर सगुण रूप धारण करून अवतार घेतो व त्यावरून लिंबलोण ओवाळून टाकतो, इतकेच नव्हे तर ज्ञानेश्वरांनी गहिंवरून सांगितले आहे की, 'मग याहीवरी पार्था। माझ्या भजनीं आस्था। तरि तयातें मी माथां। मुकुट करी' आपल्या या अशा भक्तालाच ईश्वर नमस्कार करतो. 'तयाची टांच धरूं। हृदयीं आम्ही' यातही देवाला मग अभिमान वाटतो. त्याचेच गुणवर्णन करण्यात ईश्वराच्या वाणीला भूषण वाटते. त्याच्या गुणश्रवणांची कुंडले तो आपल्या कानांत घालतो. अशा भक्तश्रेष्ठांच्या दर्शनासाठीच अचक्षू परमेश्वरास डोळस व्हावे लागते. हातींच्या लीलाकमळाने तो त्याचीच पूजा करू लागतो. अशी ही भक्तवत्सलता ईश्वराच्या ठिकाणी सतत पाझरत ठेवणारे हे ज्ञानी भक्त अथवा पुरुषश्रेष्ठ किती श्रेष्ठ मानावेत! जगावर त्यांचे केवढे उपकार मानावेत! त्यांच्या नुसत्या स्मृतीनेच व्याधिग्रस्त जगत चिंतामुक्त व्हावे. त्यांचे बोल म्हणजे रखरखीत वाळवंटामधील सजीव ओलावाच. वठत जाणाऱ्या मानवी संस्कृतीवर याचाच अमृतमधुर तुषारांचा शिडकावा पडतो, आणि संस्कृतीचे मूळ तगून राहते. मधून मधून फुलाफळांनी समृद्ध होते. असंख्य आपदग्रस्तांना, कष्टी जीवांना, संसारतप्तांना सुखद सावली देणारे ठरते! त्यांचे उतराई आपण कोणत्याही रीतीने होऊ शकणार नाही.

# १०

# नम्रत्व आणि प्रियत्व

## नम्रत्वाचे व्यक्तिमत्त्व

चालू काळात नम्रत्व आणि प्रियत्व यांचे धडे घ्यावयाचे असतील तर आपणांस ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची ओळख करून घ्यावी लागेल. तुटपुंज्या विद्येने अनेकांच्या अंगी ताठा येतो, अनेकांना अहंकार वाटतो. गर्वाने, अभिमानाने बोलणे आणि वागणे हेच कधी विद्येचे व ज्ञानाचे लक्षण होते. ज्ञानेश्वरांनीं या अहंकारी व गर्विष्ठ वृत्तीचे वर्णन अनेकदा केले आहे. 'नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवें (ज्ञाने.१३ : ८२) हा अहंकार विशेषेकरून ज्ञानी माणसाच्या ठायी दिसून येतो. परंतु ज्ञानेश्वर हे खरोखरच ज्ञानाचे ईश्वर व पंडितांचे मुकुटमणी असूनही त्यांच्या वृत्तीत हा अहंकार कोठेच दिसत नाही. सतत नम्रत्वाने पाझरणारे हे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न व उदात्त आहे. प्रतिपक्षीयांवर टीका करताना ज्ञानेश्वर आक्रमक वृत्ती क्वचितच धारण करतात. श्रीज्ञानेश्वरांचीं वृत्ती सर्वत्र नम्रतेची आणि प्रियतेची आहे.

**श्रोते सुखामृताचे डोहो**

ज्ञानेश्वरीचे प्रतिपादन हे श्रोत्यांसमोर होत असल्याने त्यांना उद्देशून ज्ञानेश्वरांनी स्वतःकडे जी नम्रत्वाची वृत्ती घेतली आहे ती लक्षणीय आहे. आपण कोणीतरी थोर ज्ञाते, तत्त्ववेत्ते आणि समोर बसलेले श्रोते हे मूढ, अडाणी, असमंजस अशी भूमिका ज्ञानेश्वरांची केव्हाही दिसत नाही. उलट, श्रोत्यांच्यामुळेच आपले वक्तृत्व खुलते; म्हणून त्यांनी श्रोत्यांचे मनापासून आभार मानले आहेत. श्रोते हे संतसज्जन असून त्यांच्या कृपेने आपल्या बोलण्यास रुची येते हे ज्ञानेश्वर वारंवार सांगतात. '-प्रभु तुम्ही सुखामृताचे डोहो । म्हणोनी आम्ही आपुलिया स्वेच्छा बोलावो लाहो । येथही जरी सलगी करूं बिहों । तरी निवों कें पां ' (ज्ञाने.९ : ५) संतजनहो, तुम्ही सुखामृताचे डोह आहात. म्हणून तर आम्हांला त्यातून पाहिजे तेवढे अमृत घेता येते. अशा ठिकाणी सलगी करण्याचा मी संकोच केला तर कसे निभावणार ? असे ज्ञानेश्वर श्रोत्यांना विचारीत आहेत. आणि ही सलगी तरी कोणत्या जातींची? 'ना तरी बाळक बोबडा बोलीं । वांकुडा विचुका पाउलीं । ते चोज करुनि माउली । रिझे जेवीं ॥ तेवीं तुम्हां संतांचा पढियावो । कैसेंनि तरी आम्हांवरी हो । या बहुवा आळुकिया जी आहो । सलगी करित॥ (९ : ६-७)' आपल्या बोबडया बोलांचे आणि वाकडयातिकडया पडणाऱ्या पावलांचे कौतुक करून आई संतोषित होते ना ? त्याप्रमाणे तुम्हा संतजनांचे प्रेम मला लाभावे.

**आणि हा असा लडिवाळपणा**

याप्रमाणे ज्ञानेश्वर आपल्या श्रोत्यांना नुसतेच भावार्थाच्या सुखसिंहासनावर बसवितात असे नव्हे, तर त्यांच्याशी लडिवाळपणाने सलगीही करतात. या त्यांच्या सलगीत वात्सल्य, प्रेम, नम्रत्व, कौतुक या नाजुक भावांचा फुलोरा असतोच, पण त्यापाठीमागे श्रोत्यांना 'श्रवणामाजींच मोक्ष आयता ' देण्याची प्रतिज्ञाही असते. ' तरी अवधान एकलें दीजे । मग सर्व सुखासि पात्र होईजे । हे प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइका ' ( ९ : १ ) ही प्रतिज्ञा असली तरी तीत आत्मप्रौढी नाही, अहंकार नाही, कारण लगेच श्रोत्यांना उद्देशून पुनः ज्ञानेश्वर म्हणतात, 'कां जे लळेयांचे लळे सरती ।

मनोरथांचे मनोरथ पुरती । जरी माहेरें श्रीमंतें होतीं । तुम्हांऐसीं ।। तुमचेया दिठिवेयाचिये वोलें । सासिन्नले प्रसन्नतेचे मळे । ते साउली देखोनि लोळे । श्रांतु जी मी ' (९ : ३–४) – ज्ञानेश्वर श्रोत्यांपाशी लडिवाळपणा एवढ्यासाठी करतात की, त्यांना तो आसरा श्रीमंत माहेरासारखा वाटतो. या ठिकाणी त्यांचे सर्व लाड पुरतील, मनोरथ पूर्ण होतील अशी त्यांना खात्री वाटते. श्रोत्यांच्या कृपादृष्टीच्या ओलाव्याने प्रसन्नतेचे मळे भरून जातील. आणि त्यांच्या सावलीखाली आपला तप्त जीव शांत होईल एवढी आत्मीयता ज्ञानेश्वरांना श्रोत्यांबद्दल आहे.

### श्रोते–महेशाच्या मूर्ती

आपल्या श्रोत्यांकडून अवधानाचा चारा मिळावा म्हणून ज्ञानेश्वर त्यांना खुलवताना म्हणतात, 'माझ्या वक्तृत्वाच्या तुलनेने तुम्ही श्रोते केवळ सर्वज्ञच आहात. मी तुमच्यापुढे प्रवचन करणे आणि तुम्ही ते ऐकणे म्हणजे सरस्वतीपुत्राने पाटीवर धडा घेऊन तो गिरविण्यासारखे आहे. काजवा कितीही मोठा असला तरी सूर्याच्या महातेजापुढे काय त्याचा प्रकाश ? अमृताच्या ताटात आणखी रसपरिपाक कोणता ? शीतकिरण चंद्राला कोणी पंख्याने वारा घालते का ? नादतत्त्वाला गाणे कधी ऐकवितात ? अलंकाराला अलंकार चढवितात ? सुगंध काय स्वतःलाच हुंगतो ? समुद्राने कोणत्या डोहात स्नान करावे ? सबंध आकाश सामावले जाईल असा स्थळविस्तार तरी कोणता ? तुमचे चित्त संतोषित होईल असे वक्तृत्व कोणाजवळ असणार ? पण म्हणून काय विश्वाला प्रकाशित करणाऱ्या सूर्याला काडवातीने ओवाळू नये ? पाण्याने अमर्यादपणे भरलेल्या समुद्रास त्याच्याच चुळकाभर पाण्याने काय अर्घ्य देऊ नये ? –' इतके विचारून ज्ञानेश्वर म्हणतात, 'प्रभु तुम्ही महेशाचिया मूर्ति । आणि मी दुबळा अतितुसे भक्ती । म्हणोनि बोल जरी गंगावती । तऱ्ही स्वीकाराल कीं ।। बालक बापाचिये ताटीं रिगे । आणि बापातेंचि जेववूं लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोढवीं ।। ' (९ : १४,१५) श्रोतेहो, तुम्ही श्रीशिवशंकराच्या मूर्ती आहात; आणि आराधना करणारा मी भक्त दुबळा असलो तरी, आणि माझ्या हातात बिल्वपत्राऐवजी निरगुडीचा पाला असला तरी तो तुम्ही आवडीने स्वीकारालच. कारण असे पाहा, बापाच्या ताटात मूल जेवायला बसते,

बापालाच घास भरविते आणि तो घास घ्यायला बाप मोठ्या आनंदाने तोंड पुढे करतो. त्याचप्रमाणे मी पोरबुद्धीने व लाडिकपणाने बाष्कळपणा करीत असलो तरी तुम्हांला संतोष व्हावा. कारण 'ऐसी जाती प्रेमाची असे.'

**' परी गीता ईश्वरू भोळा '**

स्वतः थोर पंडित असूनही एवढी विनम्र वृत्ती ज्ञानेश्वरांच्याखेरीज इतरत्र कोठे दिसणार ? महाभारत व गीता यांची केवढी मोठी थोरवी ! गीता तर श्रीप्रभूची वाङ्मयी मूर्ती होय. व्यासांनी या गीतेच्या निमित्ताने फार मोठा उपकारच केला आहे. या थोर ग्रंथावर भाष्य करण्याची आपली योग्यता नसताना श्रीगुरुकृपा आणि संतसज्जनांचे पाठबळ यांच्या आधारावर आपण हे भाष्य लिहिले वा सांगितले असे नम्रत्वाने सांगताना ज्ञानेश्वरांनी दृष्टान्तांची जी मौज केली आहे ती एवढी आहे की, नम्रता आणि रमणीय कल्पकता यांच्या या संगमात न्हाऊन कृतार्थ व्हावे असे आजही वाटते. ज्या विषयात व्यासादिकांची बुद्धीही कमी पडते त्या विषयावर माझ्यासारखा एखादा अल्पमतीचा मनुष्य का वटवट करतो आहे ?

या प्रश्नाचे उत्तर देताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'परी गीताईश्वरु भोळा । ले व्यासोक्ति कुसुममाळा । तरी माझिया दूर्वादळां । ना न म्हणे कीं ॥ आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा । तेथ काय मुरकुटा । वारिजत असे ? ॥ पांखफुटे पाखिरूं । नुडे तरी नभींच थिरु । गगन आक्रमी सत्वरु । तो गरुडही तेथ ॥ राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शाहाणें । आणिकें काय कोणें । चालवेंचि ना ? ॥ जी आपुलेनि अवकाशें । अगाध जळ घेपे कलशें । चुळीं चूळपणाऐसें । भरूनि न निघे? ॥ दिवटीच्या आंगीं थोरी । तरी ते बहु तेज धरी । वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ जी समुद्राचे नि पैसें । समुद्रीं आकाश आभासे । थिल्लरीं थिल्लराऐसें । बिंबेचि पैं ॥ तेंवि व्यासादिक महामति । वावरों येती इये ग्रंथीं । मा आम्ही ठाकों हे युक्ती । न मिळे कीर ॥ जिये सागरीं जळचरें । संचरती मंदाराकारें । तेथ देखोनि शफरें येरें । पोहों न लाहती ? अरुण आंगाजवळिके । म्हणोनि सूर्यातें देखे । मा भूतळींची न देखे । मुंगी काई ? ॥ यालागीं आम्हां प्राकृतां । देशिकारें बंधें गीता । म्हणणें हें अनुचिता । कारण नोहे ॥ आणि बापु पुढां जाये । ते घेत पाउलाची सोये ।

बाळ ये तरी न लाहे । पावों कायी ?॥ तैसा व्यासांचा मागोवा घेतु । भाष्यकारांतें वाट पुसतु । अयोग्यही मी न पवतु । कें जाईन ? '॥ (१८ : १७१०-२२).

हा गीताईश्वर फार भोळा आहे. तो व्यासवचनांची पुष्पमाला घेतो तरी माझ्या दूर्वादळांना 'नाही' म्हणत नाही. क्षीरसागराच्या किनाऱ्यावर हत्तींचे कळप तहान भागविण्यास येतात, तेथे काय चिलटाला बंदी असते ? आकाशात गरुड उड्डाण करतो, पण नुकतेच पंख फुटलेले पाखरूही आपल्या-परीने उडत असतेच. भूमीवर राजहंस डौलाने चालत असला तरी काय इतरांनी चालू नये ? हंडा आपल्या परीने पुष्कळ पाणी साठवून धरील, म्हणून काय चुळकाभर पाणी चुळीनें घेता येत नाही काय? दिवटीचा प्रकाश मोठा असेल, पण लहान वातही आपल्या परीने प्रकाशते ना ? समुद्रात आकाशाचे प्रतिबिंब मोठे पडले तरी डबक्यातही ते पडतेच ना ? त्याचप्रमाणे महामती व्यासांनी ग्रंथ लिहिला म्हणून तो आम्ही लिहू नये असे नाही. समुद्रात मंदरपर्वताएव्हढी जलचरे असतीलही, पण तेथे लहानशी मासळीही फिरकू शकते. सूर्याच्या जवळ त्याच्या रथावरच बसलेला अरुण त्याला पाहतो, पण मग जमिनीवरची मुंगी त्याचेकडे बघत नाही काय ? आमच्यासारख्या माणसाने गीतेवर ग्रंथ प्राकृतात रचिला यात अनुचित ते काय ? बाप पुढे चालला आहे, त्याच्या पावलांवर पाऊल टाकून मुलाने जाऊ नये का ? मी तसाच व्यासांचा माग काढीत, भाष्यकारांना वाट विचारीत निघालो आहे.

**'वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनिविण'**

पूर्वी होऊन गेलेल्या श्रेष्ठ ग्रंथकारांबद्दल आदर तर येथे आहेच; पण स्वतःकडे लीनत्व घेणे, नम्रत्व घेणे हा ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाचा खास भाग आहे. याच नम्रत्वाच्या भावनेने ज्ञानेश्वर श्रोत्यांना खुलवितात, मोठे-पणा देतात. ज्या गीतार्थाची थोरवी प्रत्यक्ष वेदालाही गाता येत नाही त्या गीतेचा अर्थ मराठीत सोपा करून सांगण्यासाठी त्यांना सामर्थ्य एक गुरू-कडून आले आणि दुसऱ्या बाजूने ते सतत श्रोत्यांना विनंती करताना दिसतात. कारण ज्ञानेश्वरांच्या मते श्रोत्यांच्या अवधानांत चंद्रापेक्षा जास्त शीतळाई,

अमृतापेक्षा जास्त गोडी आहे. ते म्हणतात, ‘ कां जैं दिठिवा तुमचा वरुखे । तैं सकळार्थ सिद्धि मती पिके । एऱ्हवी कोंभेला उन्मेषु सुके । जरी उदास तुम्ही ।। सहजें तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा । तरी दोंदें पेलती अक्षरां । प्रमेयांचीं ।। ’ (९ : २५.२६)– तुमच्या कृपादृष्टीचा वर्षाव झाला की सर्व मनोरथ सिद्धीस जातात. आणि तुम्हीच जर उदास राहिलात तर ज्ञानाचा फुटलेला कोंभही सुकून जातो. म्हणून श्रोतेहो, वक्त्याच्या वक्तृत्वाला श्रोत्यांच्या अवधानाचा चारा मिळतो आणि मग सिद्धान्तांची रत्ने शब्दरूप होऊन बाहेर पडतात. म्हणून ज्ञानेश्वर श्रोत्यांना वारंवार विनंती करतात, ‘ म्हणोनि संवादाचा सुवावो ढळे । तऱ्ही हृदयाकाश सारस्वत वोळे । आणि श्रोता दुश्चित तरि वितळे । मांडिला रस । (९ . २८)– म्हणून श्रोता व वक्ता यांच्या सुसंवादाचा वारा वाहू लागला की हृदयाच्या आकाशात रसमेघाचा संचार होतो, आणि श्रोतेच जर उदासीन राहिले तर निर्माण झालेला रसही वितळून जाईल. चंद्रकांत मण्याला पाझर फुटतो ही गोष्ट खरी असली तरी ते सामर्थ्य चंद्राचे आहे. ‘ म्हणऊनि वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनिविण’ (९ : २९)

**‘एथ चातुर्य शाहणें झालें’**

महाभारत व त्यामधील गीताकथनप्रसंग ओळखून ज्ञानेश्वर त्यांचे माहात्म्य पुनः पुनः सांगतात. विवेकतरूंचे अभिनव उद्यान, सर्वसुखाची आदी, प्रमेयमहानिधी, नवरससुधाब्धी, सर्व विद्यांचे मूळपीठ, शास्त्रजाता वसौट (वसतिस्थान), सकळ धर्माचें माहेर, सज्जनांचे जिव्हार, शारदेचे लावण्य-रत्नभांडार असलेली ही महाभारतकथा मुळातच गोड आणि उदात्त. ज्या ग्रंथावर आपण भाष्य लिहिणार त्यावर ज्ञानेश्वरांचे केवढे प्रेम ! केवढा आदर ! ज्ञानेश्वरांच्या मताने ‘ एथ चातुर्य शाहणें झालें । प्रेम रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें येथ ।। माधुर्या मधुरता । शृंगारीं सुरेखता । रूढपण उचितां । दिसे भलें ’।। (१ : ३५-३६)–या कथेमुळे चातुर्यालाच शहाणपण आले, भक्तिरस स्वादाला चढला, आणि सुखाचे सौभाग्य परिपुष्ट झाले, हिच्यामुळेच माधुर्याला गोडी आली, शृंगाराला सुरेखपण आले, योग्य गोष्टीला लोकप्रियतेची जोड मिळून शोभा आली

महाभारतातील या कथेपासूनच कलेला आस्वाद चढला, पुण्याला अपूर्व

वैभव मिळाले. सूर्याच्या तेजाने जसे त्रिभुवन उजळते तसे 'व्यासमतीं कवळिलें । मिरवे विश्व' व्यासांच्या प्रतिभेचे वर्णन असेच नम्रत्वाने करताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'ना तरी नगरान्तरीं वसिजे । तरी नागरचि होइजे । तैसें व्यासोक्तितेजें । धवळत सकळ ॥ की प्रथमवयसाकाळी । लावण्याची नव्हाळी । प्रकटे जैसी आगळी । अंगनाअंगी ॥ ना तरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे । आदिलापासोनि अपाडें । जियापरी ॥ ना ना घनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण । मग अळंकारीं बरवेपण । निवाडु दावी ॥ तैसें व्यासोक्ती अलंकारिलें । आवडतें बरवेपण पातलें । तें जाणोनि काय आश्रयिलें । इतिहासीं (१ : ४१.-४५) नगरात राहिलेला मनुष्य जसा चतुर व हुशार होतो त्याप्रमाणे सकल वस्तुजात व्यासांच्या वाणीने प्रकाशले आहे, तरुणपणाच्या आरंभी स्त्रीच्या अंगी लावण्याची व नवतीची अपूर्व प्रभा प्रकटते ना ? वसंतऋतूत वनभूमीवर, लहानमोठ्या झाडाझुडपांवर वनश्रीचे वैभव खुलते ना ? सोन्याच्या आटवलेल्या गोळ्यापेक्षा त्यांच्या दागिन्यांतील सौंदर्य अधिक खुलते ना ? त्याचप्रमाणे व्यासांच्या वाणीने अलंकार चढवून सौंदर्य वाढविले आहे. इतिहासानेही याच कथेचा आश्रय घेतला आहे.

### असा आस्वाद श्रोत्यांनी घ्यावा

अशा या महाभारतातील परागस्थानी असलेली गीता म्हणजे सर्व वाङ्.मयाचे मंथन करून व्यासांच्या प्रतिभेने काढलेले नवनीतच होय. हे नवनीत ज्ञानाच्या अग्नीवर कढविलेले असल्यामुळे त्याला खमंग असा स्वाद आलेला आहे. या गीतेच्या भावार्थास श्रोत्यांनी किती सावधान चित्ताने ऐकावे यासंबंधी नम्रत्वाची भूमिका घेऊन ज्ञानेश्वर त्यांना विनवितात, 'जैसें शारदियेचिये चंद्रकळे— । माजीं अमृतकण कोंवळे । ते वेंचिती मनें मवाळे । चकोरतलगें ॥ जैसे भ्रमर परागु नेती । परी कमलदलें नेणती । तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ॥'– शरद्ऋतूमधील बारीक चंद्रकलेतील कोवळे अमृतकण जशी चकोराची पिले वेचतात अथवा कमळातील पराग भ्रमर नेतात, पण त्याची दादही कमळास नसते, अशा नाजुक व हळुवार वृत्तीने श्रोत्यांनी ही कथा ऐकावी. आपले ठिकाण न सोडता कुमुदिनी उगवत्या चंद्राला आलिंगन देऊन त्याचे प्रेमसुख अनुभवते ना ? त्याच तन्मयतेने

श्रोत्यांनी ही कथा ऐकावी. आपण श्रोत्यांना थोडी जास्त प्रमाणात जाणीव देत आहोत अशी कल्पना मनात येऊन ज्ञानेश्वर म्हणतात, 'हें सलगी म्यां म्हणितलें। चरणांलागोनि विनविलें । प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणौनियां ॥ जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ॥ तैसा तुम्हीं मी अंगिकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला । तरी उणें सहजें उपसाहला। प्रार्थूं काई ? ' (१ : ६३–६५)— अपत्याच्या वात्सल्याचा नेहमीचा दृष्टान्त देऊन ज्ञानेश्वर म्हणतात, 'श्रोतेहो, मी जरा अमर्यादा करून थोडी लगट केली आहे हे खरे, पण तसे नाही; आपण गंभीर व उदार अंतःकरणाचे असल्याने मी आपल्या चरणांपाशी विनंती केली. मूल बोबडे बोलले तरी त्यात संतोषच मानणे हा स्वभावच आईबापांचा नव्हे का ? तुम्ही मला आपले म्हटले म्हणून माझ्याकडून काही उणे पडले तर सहन करा अशी प्रार्थना तरी कशासाठी ?'

**गुरू व संत यांची कृपा**

पुनः येथे ज्ञानेश्वरांनी स्वतःकडे लघुत्व घेऊन केवळ गुरुकृपेच्या बळावर आपण गीता सांगण्याचे धाडस करीत असल्याचे म्हटले आहे. ते म्हणतात, या अमर्याद गीतातत्त्वास कसे प्रकट करावे ? या अलौकिक तेजाला कोणी घुसळावे ? चिलटाने आकाशाला मुठीत घ्यावे ? टिटवीने समुद्रास प्राशन करावे ? पण श्रीगुरूच्या कृपेने मी समर्थ झालो आहे असे ज्ञानेश्वर म्हण-तात. 'येऱ्हवीं तरी मी मूर्खु । जरी जाहला अविवेकु । तरी संतकृपा दीपकु । सोज्वळु असे ॥ लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे । कीं मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धी ' ॥ (१ : ७६–७७ ) – सर्वसाधारणपणे मी मूर्ख व अविवेकी असलो तरी संतकृपेचा दीप तेजस्वी आणि स्पष्ट आहे ना ? लोखंडाचे सोने होणे ही शक्ती परिसाचीच मानावी लागते. मृताला सजीव करण्याचे काम अमृतच करू शकते. संत व गुरुनाथ यांच्या कृपेने सरस्वती प्रसन्न झाली तर मुका बोलू लागेल, 'जयातें कामधेनु ऐसी माये । तयासी अप्राप्य कांहीं आहे ? ' असाही प्रश्न मग ज्ञानेश्वर आत्म-विश्वासाने विचारतात. आणि सद्गुरुनाथ व श्रोते यांना विनवून म्हणतात, 'तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करूनि घ्यावें हें तुमतें । विन-वितु असें ॥ आतां देइजे अवधान । तुम्हीं बोलविल्या मी बोलेन । जैसें

चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ।। तैसा मी अनुगृहीतु । साधूंचा निरोपितु । ते आपुलिया परी अलंकरितु । भलतैसा ।। ' ( १: ८०-८२ ) तेव्हा आता या माझ्या ग्रंथात काही उणे असल्यास ते पूर्ण करून घ्या व काही अधिक असल्यास प्रसंगोचित करून घ्या अशी विनंती आहे. तरी आता माझ्याकडे लक्ष द्यावे. कारण तुम्ही बोलायला लावलेत तरच मी बोलणार आहे. कळ-सूत्री बाहुलीचे चलनवलन सूत्रधाराकडेच असते ना ? त्याप्रमाणें मी साधु-संतांचा अनुगृहीत आहे, त्यांच्या कृपेचा आश्रित आहे. मी सर्वस्वी त्यांनाच वाहिलेला आहे. तुम्हांला रुचेल त्याप्रमाणे मला अलंकारमंडित करा.

**' कानांतें निघतीं मुखें '**

ज्ञानेश्वर श्रोत्यांना एवढया नम्रत्वाने मान का देतात ? या प्रश्नाचे उत्तर आता समजण्यासारखे आहे. श्रोत्यांच्या आधारावरच आपण बोलतो, आपली प्रतिभा खुलते असे ज्ञानेश्वरांनी अनेक दृष्टान्त देऊन सांगितले आहे. ज्ञानेश्वरांच्या या श्रोत्यांसंबंधीही थोडे सांगितले पाहिजे. तेराव्या शतकाच्या अखेरीस जेव्हा हा तरुण व प्रतिभासंपन्न सत्पुरुष नेवासे येथील खांबाला टेकून भगवद्गीतेवर भाष्य करायला निघाला तेव्हा त्याच्याभोवती कोणतें श्रोते असतील ? एक तर हे भाष्य मऱ्हाटी भाषेतील असल्यामुळे मऱ्हाटी जाणणारे श्रोते त्यांच्यासमोर असतील यात वादच नाही, परंतु हे श्रोते नाना जातीचे असावेत. ज्यांना संस्कृत भाषेच्या अडचणीमुळे परमार्थज्ञान ऐकावयास मिळाले नव्हते, पण युगायुगांची भूक मात्र तेवत होती असे हे श्रोते असावेत. म्हणून ज्ञानेश्वरांचे हे अलौकिक भाष्य त्यांनी ' कानांतें निघतीं मुखें ' अथवा ' रसाळपणाचिये लोभा । श्रवणींच होती जिभा ' अशा तन्मयतेने ऐकले. ज्ञानेश्वर एखादा सूक्ष्म विचार सांगण्यासाठी नाना प्रकारचे दृष्टान्त एकामागून एक असे देतात; याचे कारण तरी हेच की, परिचित अशा सृष्टीतून श्रोत्यांना अपरिचित असा तत्त्वबोध सुलभपणे व्हावा. ज्ञानेश्वरांची प्रतिभासंपन्न व प्रसादपूर्व वाणी ऐकून श्रोतेही तल्लीन झालेले दिसतात. ज्ञानेश्वरांच्या मुखातून बाहेर पडलेले अमृतमधुर बोल ऐकून श्रोत्यांचे अंतःकरण तृप्त झाले असावे. " स्वयें श्वसणेचि तें सुकुमार । मुख मोहाचें माहेर । माधुर्या आले अंकुर । दशन तैसे ।। पुढां स्नेह पाझरे । मागां चालतीं अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ।।

....'कां नादब्रह्मचि मुसे आलें । की गंगापय असळलें । पतिव्रतें आलें । वार्धक्य जैसे ।। तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसें कल्लोळ । अमृताचे " अशा भाषेत ज्ञानेश्वर जेव्हा ज्ञानी पुरुषाचे वर्णन करू लागले असतील तेव्हा एक साक्षात ज्ञानच आपल्यापुढे बोलत आहे असे समजून श्रोतेही आनंदाने डोलले असतील व त्यांना ज्ञानाच्या ऐकीव लक्षणांपेक्षा ज्ञानमूर्तीच्या दर्शनाने संतोष झाला असेल.

**येथे श्रवणातच मोक्ष**

असा शब्दब्रह्माचा साक्षात्कार ज्ञानेश्वरीचे श्रवण करीत असताना श्रोत्यांना अनेकदा झाला असावा. या श्रवणातच त्यांचा मोक्ष होता. शब्द सुटचा अक्षरांचा बनला असला तरी त्या अक्षरांना सुवर्णाची कांती होती. शब्दब्रह्माचा हा साक्षात्कार पाहून श्रोत्यांना दिवाळीसारखा सण वाटला. शांतरसात्मक असे हे निरूपण त्यांना सुखामृतासारखे वाटले. शब्द दिसायला तसा लहान दिसतो, पण त्याचा प्रभाव फार मोठा असतो. शिवाय हा शब्द कोणाच्या मुखातून निघतो, त्यामागची शक्ती कोणती आहे यासही महत्त्व आहेच. ज्ञानेश्वरांनीच म्हटले आहे– ' जैसें बिंब तरी बचकेएवढे । परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें । '- सूर्यबिंब पाहिले तर बचकेंएवढें असते, पण प्रकाश साऱ्या त्रिभुवनास देऊन उरते, म्हणून ज्ञानेश्वर वारंवार या श्रोत्यांना विनवितात की, श्रोत्यांनी नीट अवधान देऊन या शब्दांचे श्रवण करावे. श्रोते स्वभावतःच सर्वज्ञ आहेत अशीही त्यांची खात्री असली तरी ते नम्रपणे विनंती करतात, आपल्या निरूपणाची ओवी कशी आहे ? हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, एखाद्या स्त्रीच्या ठिकाणी लावण्य आहे, गुण आहेत, कुलीनपणा आहे आणि पावित्र्यही आहे, त्याप्रमाणे या ओवीमध्ये साहित्यगुण व शांतरस यांचा सुंदर मिलाफ झाला आहे. आधीच साखर आवडती, मग तीत थोडे औषध घातले तर उत्तमच ! मलयवायू आधीच मंद आणि सुगंधी असतो, मग त्याला अमृताची गोडी लाभली तर ? त्यात सुखद असे नाद निर्माण झाले तर ? ' तरी स्पर्शे सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी । तेवींचि कानांकरवीं । म्हणवी बापु माझा ' (४ : २२०) तर तो मलयवायू आपल्या स्पर्शाने सर्व अंगाचा दाह थांबवील, गोड रुचीने जिव्हेला संतुष्ट करील आणि तृप्त कानांकडून ' धन्य धन्य ' असे उद्गार काढवील.

'तैसें कथेचें इये ऐकणें । एक श्रवणासि होय पारणें । आणि संसारदुःख मूळवणें । विकृतीविणें (४ : २२१)–ही शब्दबद्ध कथा ऐकिली की, कानांचे पारणे एकदम फिटते, आणि कोणत्याही अपायाशिवाय संसाराचे दुःख समूळ नाहीसे होते. मंत्राने जर शत्रू मरतो तर हातात कट्यार घेण्याचे कारण काय ? दूधसाखरेने जर रोग नाहीसा होतो तर कडूलिंबाचा रस कशासाठी घ्यायचा ? 'तैसा मनाचा मारु न करतां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्षु असे आयता । श्रवणाचि माजीं' (४. २२३)– म्हणून मनाला न मारता आणि इंद्रियांना दुःख न देता या कथेच्या श्रवणातच मोक्ष आपल्या हातांत आपोआप येतो.

**' ऐसें हळुवारपण जरी होईल '**

याप्रमाणे नुसत्या श्रवणाने, मराठीसारख्या प्राकृत भाषेतील निरुपणाने सहजासहजी मोक्ष अनायासे हातात आला तर श्रोत्यांना किती आनंद होईल ? ' सहजें ब्रह्मरसाचें पारणें । केलें अर्जुनालागीं नारायणें । ' तरी याच संधीचा फायदा मिळून असंख्य श्रोत्यांना व नंतर अनेक शतके वाचकांना या अलौकिक पंगतीचा लाभ झाला. तान्हेलेल्याने पाणी म्हणून प्यावे आणि ते अमृत निघावे तशी ज्ञानेश्वरांच्या श्रोत्यांची व वाचकांची अवस्था होते, आणि ज्ञानेश्वरीकथनाचा हाच हेतू होता. ज्यांना कधी ऐकायलाच मिळाले नव्हते त्यांना आत्मज्ञानाचा रस कानांनी चाखता यावा ही ज्ञानेशांच्या मनाची भावना होती. वेद संपन्न झाला, पण तो तीन वर्णांच्याच कानी लागला म्हणून थोड्या रुष्टतेने त्यांनी त्याला कृपण म्हटले आहे. वेदांची ही कृपणता भरून काढण्यासाठी ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत भावार्थाचे सुखसिंहासन निर्माण केले. गीतेमधील हे अलौकिक तत्त्वज्ञान साहित्याचा उजळा देऊन त्यांनी सगुण व साकार केले, मराठीतील आपले शब्द गोडपणात प्रत्यक्ष अमृतालाही लाजवितील असा ज्ञानेश्वरांचा यथार्थ आत्मविश्वास आहे. ज्ञानेश्वर स्वतःच म्हणतात, या शब्दांच्या कोमल गुणांशी तुलना केली तर गायनातील सुरांची कोवळीकही कमी प्रतीची ठरेल. या शब्दांच्या मोहक सुवासापुढे सुगंध फिका पडेल. याच्या रसाळपणाची थोरवी अशी की, कानांसही जिभा फुटतील आणि याच्या प्राप्तीसाठी इंद्रियांत भांडण लागेल. तसे पाहिले तर शब्द हा विषय कानांचा,

पण जीभ म्हणू लागेल, 'या शब्दांतील रस हा माझा विषय आहे; असाच वाद नाक, डोळे इत्यादी इंद्रिये घालतील आणि शेवटी शब्दांचे अर्थगर्भ वाक्य बाहेर येईल तेव्हा श्रोत्यांचे मन बाहेर धावेल आणि शब्दांना दोनही हातांनी मिठी मारील! असे या शब्दांचे माहात्म्य! 'हें असो तया बोलांचीं ताटें भलीं । वरी कैवल्यसें वोगरलीं । ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी' ( ६ : २२ ) – या मराठी शब्दांच्या ताटात मी हे निष्काम ब्रह्मरसाचे भोजन साधुजनांना ग्रंथरूपाने घालीत आहे; ही ज्ञानेश्वरांची गीतानिरूपणामागची भावना नम्रत्वाची पण आत्मविश्वासाची आहे. म्हणून ते विनवितात की, श्रोत्यांनी केवळ श्रवणेंद्रियांचाच आश्रय न करता मनाच्या बळावरही या निरूपणाचा आस्वाद घ्यावा. शब्दाचे दिखाऊ कवच सोलून आतील गाभ्यातील ब्रह्मभावाशी एकरूप व्हावे. 'ऐसें हळुवारपण जरी होईल । तरीच हें उपेगा जाईल । एऱ्हवीं आघवी गोष्टी होईल । मुकया-बहिरयाची' (६ : २६ ) – श्रोत्यांच्या अंगी असा नाजुकपणा येईल तरच ठीक; नाहीतर हे निरूपण म्हणजे बहिऱ्यामुक्यांचा संवाद होईल. इतके सांगितल्यानंतर आपल्या श्रोत्यांचा अधिकार ज्ञानेश्वरांच्या ध्यानी येतो आणि ते म्हणतात, इतके सांगण्याची जरुरी नाही. माझ्या निरूपणाचे श्रवण करण्याचा अधिकार तुम्हांला आहेच. तुम्ही ज्ञानपिपासू असल्या-मुळेच माझ्या ग्रंथाचे सेवन तृप्त मनाने करू शकाल.

**कृष्णार्जुनांचे प्रेम**

सबंध ज्ञानेश्वरीत याप्रमाणे श्रोते व वक्ता यांचा सुखसंवाद आहे. श्रोते उत्कंठित आहेत, श्रोत्यांना पाहून वक्ता संतुष्ट आहे. श्रवणामध्ये आयता मोक्ष हाती येणार असल्यामुळे श्रोते ज्ञानेश्वरांच्या निरूपणावर एकदम खूष आहेत. आपल्या मायबोलीत ते ब्रह्मनिरूपण प्रथमच ऐकत होते, पण ज्ञानेश्वरांच्या प्रतिभास्पर्शाने मराठीचेही महत्त्व वाढले. ज्ञानेश्वरांच्या श्रीकृष्ण-अर्जुनप्रेमाच्या दर्शनाने व तत्त्वनिरूपणाने संतुष्ट होऊन श्रोते म्हणाले, 'अहो, केवढे आमचे हे दैव! या शब्दांत काय विलक्षण शोभा साठविली आहे! गायनातील सप्तसुरांवर मात करणारी गोडी या शब्दांत आहे. 'हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी । वाणें उमटताहे आकाशीं । साहित्यरंगाचें (६ : १३३) काय नवलाची गोष्टी!

ही भाषा सामान्य प्राकृत कशी म्हणावी ? साहित्यकलेतील नाना प्रकारच्या रसांनी व अलंकारांनी अद्वैताचे प्रतिपादन कसे उठावाने होत आहे ! 'कैसें उन्मेख चांदणें तार। आणि भावार्थु पडे गार। हेचि श्लोकार्थु कुमुदिनी फार। साविया होती ' (६ : १३४)– या मराठी भाषेत चांदणे पाहा कसे स्वच्छ पडले आहे. गूढ भावार्थाची शीतलाई सर्वत्र कशी पसरून राहिलेली आहे ! हिच्या प्रकाशाने गीतेच्या श्लोकार्थांची कमळे आपोआप विकसित होत आहेत. या सुंदर निरूपणाने मनाच्या उत्कंठतेला भरती आली आणि श्रोत्यांच्या अंतरंगात आनंद निर्माण झाला; त्यांची मस्तके तल्लीनतेने डोलू लागली.

**प्रियत्वाची अशी आवड**

ज्ञानेश्वरीच्या वाचनाने, चिंतनाने ज्ञानेश्वरांच्या वृत्तीचे नम्रत्व जसे मनावर ठसते, तसेच आणखी एका गुणाचे महत्त्व मनावर कायमचे टिकते. ज्ञानेश्वर वृत्तीने जसे नम्र आहेत तसेच अंत:करणाने अती प्रेमळ आहेत. प्रियत्वाच्या गोष्टी निघाल्या की त्यांचे चित्त विरघळून जाते. श्रोते, सद्गुरू, साधुसंत इत्यादींच्या प्रेमाचे वर्णन सुरू झाले की ज्ञानेश्वर हर्षाने डोलू लागतात. श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या प्रेमाच्या वर्णनात तर ते अक्षरश: स्वत:स विसरून जातात. प्रियत्वाचा एवढा जिवंत साक्षात्कार इतर कोणत्याही ग्रंथात सापडणार नाही. प्रियत्वाची ओढ ज्ञानेश्वरांना मनापासून आहे. वादविवाद, खंडणमंडण, हल्लाप्रतिहल्ला, शब्दांचे कठोर प्रहार, कुचाळकी इत्यादींनी ज्ञानेश्वरांचे साहित्य डागळलेले नाही. शांत व प्रेममय वृत्ती हाच एक स्थायीभाव ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात आहे. पुढे मराठीतील भागवतधर्मीय संतांनी हाच थोर कित्ता गिरवून वादविवादात व शाब्दिक पांडित्यात न पडता ब्रह्मसुखाचा आस्वाद स्वत: घेतला व इतरांना घेण्यास उत्सुक केले.

**'श्रीकृष्ण कोकिळ। अर्जुन वसंत'**

ज्ञानेश्वरांच्या मनाची कोवळीक आणि वृत्तीमधील प्रियत्व पाहावयाचे झाल्यास त्यांनी ज्ञानेश्वरीत जागजागी श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या प्रेमाचे वर्णन केले आहे ते पाहावे. श्रीकृष्ण आणि अर्जुन ! 'श्रीकृष्ण कोकिळ। अर्जुन वसंत ' अशा शब्दांत ज्ञानेश्वर हे नाते वर्णन करतात. गीताकथनाचा

प्रसंगही मोठा अद्‌भुत व रोमांचकारी; कौरवपांडवांची सैन्ये युद्धासाठी सज्ज झाली आहेत, श्रीकृष्णासारखा शिष्टाई करणारा असताना समेट झाला नाही, दोनही पक्ष युद्धास उत्सुक झाले. रणघोषांचा व शंखघोषांचा एकच मेळ झाला. भयानक व कर्कश अशी वाद्ये वाजू लागली. नौबती, नगारे, मृदंग नाला, शंख, झांजा, कर्णे यांच्या नादात कोणी भुजदंड थोपटले, कोणी चवताळू लागले, कोणी नाचून थयथयाट करू लागले. पांडवांच्या बाजूस अर्जुनाचा रथ सिद्ध झाला होता. या रथाचा सारथी कोण होता? 'जेथ अश्ववाहकु आपण । वैकुंठींचा राणा जाण । तया रथाचे गुण । काय वर्णू ? ' (१ : १४०) ज्या रथाचा सारथी वैकुंठीचा राणा श्रीकृष्ण स्वत: अश्ववाहक होऊन बसला त्याचे गुणवर्णन काय करावे ? त्याच्या पताकेवरील वानर हा तर प्रत्यक्ष शंकरच. या श्रीकृष्णाचे प्रेम आपल्या भक्तावर केवढे पाहा- 'देखा नवल तया प्रभूचें । अद्‌भुत प्रेम भक्ताचें । जें सारथ्य पार्थाचें । करितु असे ।। पाइकु पाठीसी घातला । आपण पुढां राहिला । ' (१ : ४२-४३) आणि आश्चर्य असे पाहा की, त्या प्रभूचे आपल्या भक्तावर एवढे प्रेम की, श्रीकृष्णाने दासाला, अर्जुनाला आपल्या पाठीमागे बसवून आपण स्वत: पुढे स्थान घेतले. अर्जुनाच्या घोड्यांचे लगाम श्रीकृष्णाने आपल्या हाती घेतले.

**'तुजशीं अंतराय होईल'**

आणि आता सेनापती अर्जुन सारथी श्रीकृष्णाला आज्ञा करणार ! 'देवा, आतां झडकरी रथ पेलावा । नेऊनि मध्यें घालावा । दोन्हीं दळां '- दोनही सैन्यांमध्यें रथ नेऊन उभा करण्याची सूचना अर्जुनाने केली. मग अर्जुनाने आपले आप्त, काके, मामे, बंधू शत्रुपक्षात पाहिले. ज्यांच्या हातून विद्या घेतली ते आचार्य पाहिले आणि त्याचा धीर खचला. त्याला वैराग्य उत्पन्न झाले. तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'देखे देह कांपत । तोंड असे कोरडें होत । विकळता उपजत । गात्रांसी' (१ : १९६ ) अर्जुनाचा देह थरथर कापू लागला. त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. त्याचे तोंड कोरडे पडले. त्याच्या हातून गांडीव धनुष्य गळून पडले. तो मोहाने ग्रस्त होऊन श्रीकृष्णालाच तत्त्वज्ञान शिकवू लागला. ज्याने शंकराचा पराजय केला होता, निवातकवचनामक राक्षसाचे ज्याने निर्दाळण केले तो अर्जुनही मोहग्रस्त होऊन विकल झाला. त्याला युद्ध नकोसे झाले. रक्ताने माखलेल्या सिंहासनावर

ही भाषा सामान्य प्राकृत कशी म्हणावी ? साहित्यकलेतील नाना प्रकारच्या रसांनी व अलंकारांनी अद्वैताचे प्रतिपादन कसे उठावाने होत आहे ! 'कैसें उन्मेख चांदणें तार । आणि भावार्थु पडे गार । हेचि श्लोकार्थु कुमुदिनी फार । सावियां होती ' (६ : १३४)– या मराठी भाषेत चांदणे पाहा कसे स्वच्छ पडले आहे. गूढ भावार्थाची शीतलाई सर्वत्र कशी पसरून राहिलेली आहे ! हिच्या प्रकाशाने गीतेच्या श्लोकार्थांची कमळे आपोआप विकसित होत आहेत. या सुंदर निरूपणाने मनाच्या उत्कंठतेला भरती आली आणि श्रोत्यांच्या अंतरंगात आनंद निर्माण झाला; त्यांची मस्तके तल्लीनतेने डोलू लागली.

**प्रियत्वाची अशी आवड**

ज्ञानेश्वरीच्या वाचनाने, चिंतनाने ज्ञानेश्वरांच्या वृत्तीचे नम्रत्व जसे मनावर ठसते, तसेच आणखी एका गुणाचे महत्त्व मनावर कायमचे टिकते. ज्ञानेश्वर वृत्तीने जसे नम्र आहेत तसेच अंतःकरणाने अती प्रेमळ आहेत. प्रियत्वाच्या गोष्टी निघाल्या की त्यांचे चित्त विरघळून जाते. श्रोते, सद्गुरू, साधुसंत इत्यादींच्या प्रेमाचे वर्णन सुरू झाले की ज्ञानेश्वर हर्षाने डोलू लागतात. श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या प्रेमाच्या वर्णनात तर ते अक्षरशः स्वतःस विसरून जातात. प्रियत्वाचा एवढा जिवंत साक्षात्कार इतर कोणत्याही ग्रंथात सापडणार नाही. प्रियत्वाची ओढ ज्ञानेश्वरांना मनापासून आहे. वादविवाद, खंडणमंडण, हल्लाप्रतिहल्ला, शब्दांचे कठोर प्रहार, कुचाळकी इत्यादींनी ज्ञानेश्वरांचे साहित्य डागळलेले नाही. शांत व प्रेममय वृत्ती हाच एक स्थायीभाव ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात आहे. पुढे मराठीतील भागवतधर्मीय संतांनी हाच थोर कित्ता गिरवून वाद-विवादात व शाब्दिक पांडित्यात न पडता ब्रह्मसुखाचा आस्वाद स्वतः घेतला व इतरांना घेण्यास उत्सुक केले.

**'श्रीकृष्ण कोकिळ । अर्जुन वसंत'**

ज्ञानेश्वरांच्या मनाची कोवळीक आणि वृत्तीमधील प्रियत्व पाहावयाचे झाल्यास त्यांनी ज्ञानेश्वरीत जागजागी श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या प्रेमाचे वर्णन केले आहे ते पाहावे. श्रीकृष्ण आणि अर्जुन ! 'श्रीकृष्ण कोकिळ । अर्जुन वसंत ' अशा शब्दांत ज्ञानेश्वर हे नाते वर्णन करतात. गीताकथनाचा

प्रसंगही मोठा अद्‌भुत व रोमांचकारी; कौरवपांडवांची सैन्ये युद्धासाठी सज्ज झाली आहेत, श्रीकृष्णासारखा शिष्टाई करणारा असताना समेट झाला नाही, दोनही पक्ष युद्धास उत्सुक झाले. रणघोषांचा व शंखघोषांचा एकच मेळ झाला. भयानक व कर्कश अशी वाद्ये वाजू लागली. नौबती, नगारे, मृदंग नाला, शंख, झांजा, कर्णे यांच्या नादात कोणी भुजदंड थोपटले, कोणी चवताळू लागले, कोणी नाचून थयथयाट करू लागले. पांडवांच्या बाजूस अर्जुनाचा रथ सिद्ध झाला होता. या रथाचा सारथी कोण होता? 'जेथ अश्ववाहकु आपण । वैंकुंठींचा राणा जाण । तया रथाचे गुण । काय वर्णू ?' (१ : १४०) ज्या रथाचा सारथी वैकुंठीचा राणा श्रीकृष्ण स्वतः अश्ववाहक होऊन बसला त्याचे गुणवर्णन काय करावे? त्याच्या पताकेवरील वानर हा तर प्रत्यक्ष शंकरच. या श्रीकृष्णाचे प्रेम आपल्या भक्तावर केवढे पाहा- 'देखा नवल तया प्रभूचें। अद्‌भुत प्रेम भक्ताचें। जें सारथ्य पार्थाचिं। करितु असे ।। पाइकु पाठीसी घातला । आपण पुढां राहिला।' (१ : ४२-४३) आणि आश्चर्य असे पाहा की, त्या प्रभूचे आपल्या भक्तावर एवढे प्रेम की, श्रीकृष्णाने दासाला, अर्जुनाला आपल्या पाठीमागे बसवून आपण स्वतः पुढे स्थान घेतले. अर्जुनाच्या घोड्यांचे लगाम श्रीकृष्णाने आपल्या हाती घेतले.

**'तुजशीं अंतराय होईल'**

आणि आता सेनापती अर्जुन सारथी श्रीकृष्णाला आज्ञा करणार! 'देवा, आतां झडकरी रथ पेलावा । नेऊनि मध्यें घालावा। दोन्हीं दळां'– दोनही सैन्यांमध्यें रथ नेऊन उभा करण्याची सूचना अर्जुनाने केली. मग अर्जुनाने आपले आप्त, काके, मामे, बंधू शत्रुपक्षात पाहिले. ज्यांच्या हातून विद्या घेतली ते आचार्य पाहिले आणि त्याचा धीर खचला. त्याला वैराग्य उत्पन्न झाले. तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'देखे देह कांपत । तोंड असे कोरडें होत । विकळता उपजत । गात्रांसी' (१ : १९६) अर्जुनाचा देह थरथर कापू लागला. त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. त्याचे तोंड कोरडे पडले. त्याच्या हातून गांडीव धनुष्य गळून पडले. तो मोहाने ग्रस्त होऊन श्रीकृष्णालाच तत्त्वज्ञान शिकवू लागला. ज्याने शंकराचा पराजय केला होता, निवात-कवचनामक राक्षसाचे ज्याने निर्दाळण केले तो अर्जुनही मोहग्रस्त होऊन विकल झाला. त्याला युद्ध नकोसे झाले. रक्ताने माखलेल्या सिंहासनावर

त्याला बसणे इष्ट वाटले नाही. बंधूंची, गुरूंची हत्त्या करावी हे त्याला पटेना. या सगळ्या सोयऱ्यांना मारून आपण विजयी व्हावे हे त्याला इष्ट वाटेना, यांचा वध केल्यावर श्रीकृष्णा, मान वर करून तुमच्या मुखाकडे मला पाहावेल का ? कुलाच्या नाशाचे पाप मला लागेल; मग काहीं देवा, 'तुम्ही आपल्या मायेचीं पाखर माझ्यावर घालणार नाही. देवा, 'तुजशीं अंतराय होईल । मग सांगे आमचें काय उरेल । तेणें दुःखें हियें फुटेल । तुजवीण कृष्णा '–' कृष्णा, तुमचाच मग जर बियोग घडला तर काय उरले हो ? त्या दुःखप्रसंगाने माझे हृदय फूटून जाईल. या पापाने कुलधर्म संपतील अधर्म माजेल, कुलस्त्रिया भ्रष्ट होतील, कुल नासले की मग सर्वांनाच नरकवास प्राप्त होईल.'

**हाती धनुष्यबाण घे–**

इतके अर्जुन बोलतो आहे तरी श्रीकृष्ण मात्र स्वस्थ आहे. अर्जुनाने त्यावर विचारले, 'देवा, हें विविध कानीं ऐकिजे । परी अजुनिवरी त्रासु नुपजे । हृदय वज्राचें हें काय कीजे । अवधारीं पां ॥' '–देवा, मी इतक्या परीने तुम्हांस ऐकवीत आहे, पण तुमच्या वृत्तीत काही चलबिचल नाही. तुमचे हृदय वज्राचे आहे काय हो ?' आणि या अवस्थेप्रत अर्जुन आल्यावर भगवान श्रीकृष्णाने त्याला सावध केले. 'अरे अर्जुना ! तू कोण आहेस ? आणि हे काय मनात आणतोस ? तू शौर्याचे भांडार, क्षत्रियांचे अग्रेसर, तुझ्या मनात हा काळोख आला कोठून ? वारा कधी अभ्रांना भितो ? अमृताला कधी मरण बाधते ? लाकूड कधी विस्तवाला गिळून टाकते ? मिठाने कधी पाणीच विरघळते ? महासर्प कधी बेडकाकडून गिळला जातो ? सिंहाबरोबर कधी कोल्हा झगडतो ? अरे, हा मूर्खपणा मनातून काढून टाक. हातात धनुष्यबाण घेऊन सज्ज हो.

**'तूं गुरु बंधु पिता'**

परंतु श्रीकृष्णाचा हा उपदेश जिव्हाळ्याचा असला तरी अर्जुनास पटला नाही. तो पुनः सलगीने श्रीकृष्णाला म्हणतो, 'देवा, तुम्ही जरा लक्ष द्या ना. या संग्रामाचा तुम्हीच जरा विचार करा. मातापितरांना पूज्य मानावे, त्यांचा संतोष राखावा, अशी नीती असताना तुम्हीच त्यांच्या वधास प्रवृत्त करता ? देवा, संतमंडळींना बंदन करावे, साधल्यास त्यांची पूजा

करावी. देवा, त्यांचाच मी वध करावा असे तुला वाटते?' असे पुनः पुनः विचारून अर्जुन देवालाच 'काय लक्षात आले ना?' असे विचारीत राहिला. देव काही बोलेना. तेव्हा अर्जुन अधिकच व्यथित झाला. आणि पुनः म्हणाला, 'देवा, खरेच माझे मन भ्रमिष्ट बनले आहे. उचित काय, अनुचित काय, हे मला समजेनासे झाले आहे. 'म्हणून तरी श्रीकृष्णा, तुवां जाणावें। निकें तें आम्हां सांगावें। जे सखा सर्वस्व आघवें। आम्हांसि तूं ॥ तूं गुरु बंधु पिता। तूं आमुची इष्ट देवता। तूंचि सदा रक्षिता। आपदीं आमुतें ॥ (२ : ५८, ५९) –'देवा, तुम्हीच हे विचार करून ओळखावे. चांगले काय ते सांगावे. कारण आमचा सखा, आमचे सर्वस्व तुम्हीच आहात. देवा, तुम्हीच आमचे गुरू, बंधू, पिता, इष्ट देवता आणि संकटसमयी रक्षण करणारे आहात. माझे मधाचे बोलणे तुम्हांस पटत नसेल तर तुम्हांस जे योग्य वाटेल ते सांगा. कृपासागरा, तुमच्या कृपेचीच आवश्यकता आहे.'

### सावळा कृपामेघ श्रीकृष्ण

इतके अर्जुन बोलला तेव्हा नजरेनेच विष उतरविणारा श्रीकृष्ण गारुडी त्याच्या रक्षणासाठी तत्पर झाला. 'मग देखा तेथ फाल्गुनु। घेतला असे भ्रांती कवळूनु। जैसा घनपडळीं भानु। आच्छादिजे ॥ तयापरी तो धनुर्धरु। जाहलासें दुःखें जर्जरु। जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु। वणवला कां ॥ म्हणोनि सहजें सुनीळु। कृपामृतें सजळु। तो वोळला श्रीगोपाळु। महामेघु ॥' (२ : ७५–७७)– उन्हाळ्यात पर्वताला वणवा लागून तो जसा होरपळावा तसा अर्जन मोहाने ग्रस्त झालेला पाहून त्याला शांत करण्यासाठी सावळा कृपामेघ श्रीकृष्णाच्या रूपाने त्याच्याकडे वळला. त्या मेघाला शोभिवंत दातांची चमकणारी प्रभा हीच कोणी वीज भासली आणि त्याची गंभीर वाणी गर्जनेची चाल भासली.

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाच्या मनातील 'कष्मल' घालवून देण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्ण त्याची समजूत काढताना म्हणाले, 'अर्जुना! तू आपल्याला जाणता समजतोस, आणि अज्ञानाला मात्र सोडीत नाहीस. आणि आम्ही काही शिकवावे तर तूच नीतीच्या बाता मारतोस! आधीच जन्मांध, त्यात वेड लागावे म्हणजे ते मनुष्य जसे बरळते तसे तुझे हे शहाणपण बोकाळले आहे! या विश्वाच्या जन्माची व मरणाची काळजी तुला कशाला? हे जग

काय तू निर्माण केलेस ? हे काय तुझ्या हातून मरणारे आहे ? ‘परी मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी । आणि तूंचि नीति सांगसी । आम्हांप्रति ? ’ अरे, हे उपजले, हे नाश पावले याचा अर्थ तरी ध्यानात आण. शरीर हे नाशवंत आहे, त्याला मारायला तू एवढा का भितोस ? जुनी वस्त्रे टाकून नवी वस्त्रे घेण्यात भीती कसली ? ‘उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे । हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा (२ : १५९)– जे जन्मास येते त्याचा नाश होणारच, आणि नष्ट झालेले पुनः जन्मणारच. सूर्याच्या उदयास्ताप्रमाणेच हे आहे. अर्जुना, ज्या स्वधर्माने तरायचे त्यालाच तू विसरतोस ? उगाच सुख-दुःखाच्या गोष्टी बोलतोस ? या संग्रामाचा अव्हेर तू करू नकोस. क्षत्रियाचा धर्म तू सोडशील तर तुझी सर्वत्र मानहानी होईल. अर्जुन भिऊन पळाला, असे का नाव तुला कमवायचे आहे ? अरे, ‘दिगंतीचे भूपति । भाट होऊनि वाखाणिती । जे आइकिलिया दचकती । कृतांतादिक’ (२ : २१२) असा तू रणांगणातून पळून जाणार ? ’ अशा प्रकारचा नाना पद्धतींनी भगवंतांनी त्याला उपदेश केला.

**‘तरी सरलें म्हणें’**

श्रीकृष्णाने इतके सांगितले तरी अर्जुनाच्या मनातील गाठ काही उकलेना. तो भगवंतांना म्हणाला, ‘कमलापती, देवा, तुमचे बोलणे मी लक्षपूर्वक ऐकले. कर्म, कर्ता हे काहीच जर उरत नसेल तर मग मला युद्ध करण्यासाठी का हो प्रवृत्त करता ? कर्मच जर तुम्हांला मान्य नाही तर मग मला या फंदात कशासाठी पाडता ? देवा, तुम्हीच असे घोटाळ्याचे बोलू लागला तर माझ्यासारख्या अडाण्याने जावे तरी कोठे हो ? देवा, वैद्याने पथ्य सांगून औषधात मात्र विष कालविले तर तो रोगी जगेल काय ? आंधळ्याला आडवाटेला लावावे, माकडाला मद्य पाजावे, तसाच हा तुमचा उपदेश म्हणायचा!’ ‘मी आधींचि कांहीं नेणें । वरी कवळिलों मोहें येणें । श्रीकृष्णा विवेकु याकारणें । पुसिला तुज ।। तंव तुझी एकेक नवाई । एथ उपदेशामाजीं गांवाई । तरी अनुसरलेया काई । ऐसें कीजे ? ।। आम्हीं तनुमनुजीवें । तुझिया बोला वोटंगावें । आणि तुवांचि ऐसें करावें । तरी सरलें म्हणे’ ( ३ : १०—१२ ) – मला तर आधीच काही कळत नाही. त्यात मी मोहग्रस्त, म्हणून कृष्णा, तुम्हांला मी सुविचार पुसला, तो तुमची तऱ्हाच

काही निराळी दिसते. तुमच्या उपदेशातच घोटाळा आहे. त्याला अनुसरून मग काय साधणार ? आम्ही जीवेभावेकरून तुमच्या वचनावर भार टाकायचा, आणि तुम्ही तर असे करणार. म्हणजे सारेच आटोपले म्हणायचे. देवा, तुम्ही मला थापा मारून ठकवीत आहात काय ?'

**'जी जीं परम मंगळधामा'**

असे सलगीचे आणि प्रसंगी देवास बोचेल असे भाषण अर्जुन करीत असला तरी या श्रीकृष्णाशिवाय आपला तरणोपाय नाही असे समजून अर्जुन पुन: देवाला विनंती करतो, आपल्या मंद बुद्धीची कबुली देतो. अर्जुनाच्या ग्रस्त मनाची व कोवळ्या परंतु भांबावलेल्या मनाची अवस्था व्यक्त करताना ज्ञानेश्वर अर्जुनाच्या मुखातं घालतात, 'मी अत्यंत जड असें। परि ऐसाही निकें परियेसें। श्रीकृष्णा बोलावें तुवा ऐसें। एकनिष्ठा ।। देखे रोगातें जिणावें। औषध तरी देयावें। परी तें अति रुच्य व्हावें। मधुर जैसें।। तैसें सकळार्थभरित। तत्त्व सांगावें उचित। परी बोधे माझें चित्त। जयापरी ।। देवा तुज ऐसा निजगुरु। आजि आर्तीधणी कां न करूं। एथ भीड कवणाची धरूं। तूं माय आमुची ।। हां गा कामधेनूचें दुभतें। दैवें जाहलें जरी आपैतें। तरी कामनेची कां तेथें। वाणी कीजे ।। जरी चिंतामणी हातां चढे। तरी वांच्छेचें कवण सांकडें। कां आपुलेनि सुरवाडें। इच्छावें ना।। देखा अमृतसिंधूतें ठाकावें। मग ताहानचि जरी फुटावें। तरी सायासु कां करावे। मागील ते ।। ( ३ : १८-२४ )– अहो, मी अतिशय मंद बुद्धीचा आहे. तेव्हा मला समजेल असे सरळ व निश्चित बोला ना. रोग्याचा रोग दूर करण्यासाठी औषध द्यायलाच पाहिजे. पण ते रुचिकर व गोड असावे. त्याचप्रमाणे परिपूर्ण अर्थाचे व तत्त्वबोधाचे मला उमजेल असे भाषण तुम्ही करावे. देवा, तुमच्यासारखा गुरू भेटल्यावर माझी आवड का बरे पूर्ण होऊ नये? तुम्हीच माझी माउली आहात, मग येथे संकोच कशासाठी ? चिंतामणीच हातात आल्यावर मग इच्छा करणे काय अवघड आहे ? समुद्राजवळ असून तहानेने तडफडावे काय ? दुभत्या कामधेनूजवळ इच्छा करायला संकोच कशासाठी ? देवा, लक्ष्मीपते, अनेक जन्मांची उपासना केली तेव्हा सुदैवाने तुम्ही मला लाभला, मग हौसेप्रमाणे का मागू नये हो ? आज माझ्या सर्व इच्छांना नवे चैतन्य आले आहे. आमचे पुण्य फळास आले असून सर्व मनो-

रथांना पूर्ण विजय मिळाला आहे. 'जी जी परम मंगळधामा । सकळ देव-देवोत्तमा । तूं स्वाधीन आजि आम्हां । म्हणऊनियां ।। जैसें मातेच्या ठायीं । अपत्या अनवसरु नाहीं । स्तन्यालागूनि पाही । जियापरी ' ( ३ : २८,-२९ ) – मंगलमय देवदेवेश्वरा, तुम्ही आज मला सर्वस्वी अनुकूल बनला आहात. तुमचा जयजयकार असो. आईच्या स्तनपानासाठी मुलाला काळ वेळ पाहावी लागत नाही, त्याप्रमाणे देवा, मी आपल्या आवडीने तुमच्यापाशी सलगी केली आहे.

**असा हा वत्सल संवाद**

आणि मग या पार्श्वभूमीवर, या वत्सल व हळुवार भूमिकेवर श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद ज्ञानेश्वरांनी आपल्या गोड वाणीने अधिकच रुचकर केला आहे. प्रियत्वाची ओढ उभयतांच्या मनात आहे. श्रीकृष्णाला अर्जुनाविषयी किती प्रेम आहे ते सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'जे न सांगेचि पितया वसुदेवासी । जें न सांगेचि माते देवकीसी । जें न सांगेचि बंधु बळिभद्रासी । तें गुह्य अर्जुनेंसी बोलत ।। देवी लक्ष्मी एवढी जवळिक । परी तेही न देखे या प्रेमाचें सुख । आजि कृष्णस्नेहाचें बिक । ययातेंचि आथी ।। सनकादिकांचिया आशा । वाढीनल्या होतिया कीर बहुवसा । परी त्याही येणें मानें यशा । येतीचिना ।। या जगदीश्वराचें प्रेम । एथ दिसतसे निरुपम । कैसें पार्थे येणें सर्वोत्तम । पुण्य केलें ।। हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त हा आला व्यक्ती । मज एकवंकी यांची स्थिति । आवडतु असे ।। एऱ्हवीं हा योगियां नाडळे । वेदार्थासी नाकळे । जेथ ध्यानाचेही डोळे । पावती ना ।। तो हा निजस्वरूप । अनादि निष्कंप । परी कवणें मानें सकृप । जाहला आहे ।। ' (४ : ८-१४)– हा श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाशी अत्यंत प्रियत्वाने वागत आहे. प्रत्यक्ष पिता वसुदेव, माता देवकी, भाऊ बळराम यांनाही हे गहन तत्त्वज्ञान त्याने कधी सांगितले नाही; अहो, देवी लक्ष्मी इतकी जवळची ना ? पण तिलाही हे प्रेमसुख मिळाले नाही. ईश्वराचे प्रेम आपणांस मिळेल अशी फार मोठी आशा सनकादिकांना होती, पण त्यांनाही या अर्जुनाएवढे यश मिळाले नाही. या अर्जुनाची केवढी पुण्याई पाहा. या जगन्नाथाचे त्याच्याविषयी प्रेम तुलनारहित आहे. निराकार परमेश्वर याच्यासाठी साकार बनला आहे. सामान्यतः हा श्रीकृष्ण योग्यांना सापडत

नाही, वेदार्थाला समजत नाही, ध्यानधारणेत येऊ शकत नाही, पण हा अर्जुनाविषयी पाहा ना किती सदय व प्रेमळ बनला आहे तो !

**' तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा '**

अर्जुनाच्या या नम्र व अनन्य भूमिकेमुळे श्रीकृष्णही वारंवार विरघळतो. त्याला तरी अर्जुनाएवढा थोर भक्त कोठे आहे ? गहिवर येऊन श्रीकृष्णही म्हणतो, ' हे जीवीचें निज गुज । परी केवीं राखों तुज । जे पढियेसी तूं मज । म्हणऊनियां ।। तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा । मैत्रियेची चित्कळा । धनुर्धरा ।। तूं अनुसंगाचा ठावो । आता तुज काय वेचूं जावों । जऱ्ही संग्रामारूढ आहों । जाहलों आम्ही ।। (४ : २८–३०)– अर्जुना, तुला मी माझ्या जीवनाचे रहस्य सांगणार आहे. तू माझा आवडता असल्यामुळे मी ते तुझ्यापासून गुप्तपणे राखून ठेवणार नाही. वीरा पार्था, तू केवळ प्रेमाचा अवतार आहेस, भक्तीचा प्राण आणि जीवसर्वस्व आहेस, तू श्रद्धेचे आगर आहेस, तुझ्याजवळ काही लपविता येणार नाही. ' एवढे श्रीकृष्ण बोलला तरी अर्जुनाचे चित्त भरून येते. श्रीकृष्ण-अर्जुन यांच्या प्रियत्वाचा असा गोड शिडकावा ज्ञानेश्वरीच्या पानोपानी आहे. अर्जुन यानंतर श्रीकृष्णास म्हणतो, ' कृपासागरा, आईने मुलावर प्रेम केले तर त्यात नवल ते काय ? देवा, ' तूं संसारश्रांतांची साउली । अनाथ जीवांची माउली । आमुतें कीर प्रसवली । तुझीच कृपा ' (४ : ३३) तूच संसारात शिणलेल्यांची शीतळ सावली आहेस, निराश्रितांची माउली आहेस. तुमच्याच कृपेने आम्ही जन्मास आलो. देवा, एखाद्या बाईने पांगळ्या मुलास जन्म दिल्यावर जसे तिला त्याचे सर्व करावे लागते तसे तुम्हांला माझे सर्वच पाहावे लागते.

**श्रीकृष्णप्रेमामृताची वृष्टी**

ज्ञानेश्वरीत तत्त्वज्ञान आहे, कर्मयोग आहे, साक्षात्काराचे विवरण आहे, पण वाचकाचे मन भुलते ते या ग्रंथातील प्रियत्वाच्या नाना खुणा पाहून. आपले सांगणे अर्जुन मन लावून ऐकत आहे, त्याप्रमाणे वागण्याचाही त्याचा प्रयत्न आहे, असे पाहून भगवान श्रीकृष्ण त्याच्या शंका पुनः पुनः निरसन करतात. श्रीकृष्णार्जुनांची ही प्रीती व सलगी पाहून ज्ञानेश्वर कधी कधी श्रोत्यांचे चित्त याकडे वळवितात. ते म्हणतात, " आधींच चित्त मायेचें । वरी मिष जाहलें पढियंतयाचें । आतां ते अद्‌भुतपण स्नेहाचें । कवण जाणे ।।

ते म्हणों कारुण्यरसाची वृष्टि । की नवेया स्नेहाची सृष्टि । हें असो नेणिजे दृष्टि । हरीची वानूं ।। जे अमृताची वोतली । की प्रेमचि पिऊन मातली । म्हणोनि अर्जुनमोहें गुंतली । निघों नेणे (५:१७०–७२)"– श्रोतेहो, आधीच आईचे मन, त्यात मग आवडीची भर. प्रेमरसाला भरते येणारच ! श्रीकृष्णांनी जी प्रेमदृष्टी अर्जुनाकडे वळविली तिला काय अमृताची वृष्टी म्हणू की अद्भुत स्नेहरसाची सृष्टी म्हणू, हे काही मला समजत नाही. ही कृपादृष्टी म्हणजे जणू अमृतरसाची ओतीव पुतळीच होती अथवा प्रेमरसाच्या पानाने धुंद झालेली होती.

### अशी द्वैताची गोडी

श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या प्रियत्वाच्या वा सलगीच्या अनेक छटा ज्ञानेश्वरीत दिसतील. श्रीकृष्णाने अर्जुनाला सिद्ध पुरुषाची लक्षणे सांगितली. अद्वैताचे निरूपण केले खरे, पण द्वैताचा ठावच पुसून टाकायला श्रीकृष्ण तयार नाही. कारण, पूर्ण अद्वैतात प्रियत्वाचे सुख कोठले ? 'ऐके द्वैताचा ठावोचि फेडी । ते ब्रह्मविद्या कीजेल उघडी । तरि 'अर्जुन पढिये' ये गोडी । नासेल-हन ।।' (६ : ११३)–'अर्जुना, बाबा, द्वैताचे नावच पुसून टाकले तर 'अर्जुन माझा लाडका आहे' या कल्पनेतला मधुर रस नासेल ना ! म्हणून तुझ्या स्नेहाचे सुख भोगण्यासाठी मी जरा आडपडदा ठेविला आहे.' एवढेच बोलून श्रीकृष्ण थांबतात असे नाही तर पुढे ते म्हणतात, 'अहं ब्रह्मास्मि' या भावनेत गुरफटून जे मोक्षसुखाच्या मागे लागतात त्यांची दृष्ट मात्र तुझ्या व माझ्या प्रेमाला लागू नये.' कारण कृष्णाला ही भीती आहेच की, हा अर्जुन जर आपल्यात विरून गेला तर ? 'तरि मग काय कीजेल । एकलेया ? '– मग आपण एकटेच काय करायचे ? 'दिठीचि पाहता निविजे । कां तोंड भरोनि बोलिजे । ना तरी दाटूनि खेंव दीजे । ऐसें कवण आहे ? ।। आपुलिया मना बरवी । असमाई गोठी जीवी । ते कवणेसि चावळावी । जरी ऐक्य जाहलें ?'(६ : ११७-१८)– ज्याला पाहून मन शांत व्हावे, ज्याच्याबरोबर तोंडभर बोलावे, ज्याला प्रेमभराने मिठी मारावी असे मला उरणार तरी कोण ? ' काय नवल आहे पाहा, ज्याच्या स्वरूपात जाऊन मिळण्यासाठी जीव अनेक खटपटी करतो, यातायात करतो, त्या लाडक्या जीवाच्या प्रेम-सुखासाठी प्रत्यक्ष परमात्मा व्याकूळ बनलेला असतो !

**श्रीकृष्णाला अर्जुनाचे पिसे**

याच काकुलतीने श्रीकृष्णांनी अर्जुनाचे चित्त आपल्याकडे ओढून घेतले होते. यावर ज्ञानेश्वर म्हणतात, श्रोत्यांना हे सारे वर्णन अवघड वाटेल, पण त्यांनी पूर्णपणे लक्षात ठेवावे की, 'पार्थ उघडें। कृष्णसुखाचेंचि रूपडें। वोतलें गा,' इतकेच नव्हे तर म्हातारपणी एखाद्या वांझेला एकच मूल झाले की ती पुत्रप्रेमाची पुतळी नाचू लागते. तशीच अवस्था या गोपालकृष्णाची झाली आहे. याला अर्जुनाच्या प्रियत्वाची गोडी केवढी पहा. रणांगणावर अद्वैताचा उपदेश असला तरी अर्जुनाच्या प्रेमाचे बाहुले मात्र येथे नाचले आहे! येथे कसला संकोच? कसली लाज? आवड म्हटली की लाज सुटणारच. व्यसन म्हटले की तिटकारा संपला. पिसे म्हटले की शुद्धी संपलीच. या कृष्णाला अर्जुनाचे पिसेच लागले आहे ना! 'यापरी बाप पुण्यपवित्र। जगीं भक्तिबीजासी सुक्षेत्र। तो श्रीकृष्ण कृपेपात्र। याचिलागीं ॥ हो कां आत्मनिवेदनातळींची। जे पीठिका होय सख्याची। पार्थु अधिष्ठात्री तेथींची। मातृका गा' (६ : १२६ – २७) – अर्जुनाची पुण्याई फार मोठी व पवित्र म्हणूनच श्रीकृष्णाच्या कृपेचे भक्तिबीज ग्रहण करण्यास तो सुपीक जमिनीप्रमाणे बनला. नवविधा भक्तींतील शेवटची जी आत्मनिवेदन भक्ती तिच्या पायथ्याशी असणारी आठवी सख्यभक्ति म्हणजे अर्जुनच! ज्ञानेश्वर आणखी पुढे म्हणतात, जवळ प्रत्यक्ष श्रीकृष्ण असताना वर्णन मात्र करावेसे वाटते त्याच्या दासाचे–अर्जुनाचे. 'पाहा पां अनुरागें भजे। जे प्रियोत्तमें मानिजे। ते पतीहूनि काय न वानिजे। पतिव्रता॥ तैसा अर्जुनचि विशेषें स्तवावा। ऐसें आवडलें मज जीवा। जे तो त्रिभुवनींचिया दैवां। एकायतनु जाहला॥'– जी एकनिष्ठ प्रेमाने पतीची सेवा करते त्या पतिव्रतेची वाखाणणी पतीपेक्षा अधिक होय की. त्याप्रमाणे अर्जुनाची विशेष स्तुती करावी असे मला वाटते. कारण साऱ्या त्रिभुवनाची पुण्याई त्याच्या एकट्याच्याच वाट्यास आलेली आहे.

**ब्रह्मरस आणि परमानंद**

जीव-शिव, आत्मा-परमात्मा, भक्त-देव यांचे मोठे हृद्य नाते ज्ञानेश्वरांनी कृष्णार्जुनांच्या प्रेमाच्या निमित्ताने वर्णन केले आहे. जीवावरून शिव ओळखावा, आत्म्यावरून परमात्मा जाणावा, जीवावरून शिव समजावून घ्यावा

असे हे प्रेमभक्तीचे नाते वर्णन करताना ज्ञानेश्वर आणखी म्हणतात, ' जयाचिया आवडीचेनि पांगें । अमूर्तुही मूर्ति आवगे । पूर्णाहि परी लागे । अवस्था जयाची ' (६,१३१)-या अर्जुनाच्या प्रेमाला वश होऊन श्रीकृष्ण परमात्म्यासही अमूर्त अवस्था सोडून मूर्त व्हावेसे वाटते. त्या पूर्णकामालाही उत्कंठा निर्माण होते. आणि या भक्तवत्सल प्रभूचे प्रेम अर्जुनाच्या मनात किती घनदाट होते ? श्रीकृष्णाच्या बोधाचे रूप वर्णन करून सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, विपुल अर्थरसाने दाटलेली आणि सद्भावाने सुगंधित झालेली अशी ती परब्रह्माचे प्रतिपादन करणारी वचनफळे कृपाप्रसादाच्या मंद झुळकीने श्रीकृष्णरूपी वृक्षावरून अर्जुनाच्या कानांच्या झोळीत पडली. ही फळे महासिद्धान्तांची बनविली असून ब्रह्मरसाच्या सागरात बुचकळून काढली होती ! परमानंदात घोळलेली होती ! या अलौकिक सुखाचा आस्वाद घेताना अर्जुन स्वर्गालाही वाकुल्या दाखवीत राहिला. त्याच्या अंतःकरणाला आनंदाच्या गुदगुल्या होत राहिल्या.

**' पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा '**

विश्वरूपदर्शनाच्या अकराव्या अध्यायात तर श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या प्रियत्वाची ज्ञानेश्वरांनी बहार करून सोडिली आहे. आपणांस विश्वरूपदर्शन व्हावे म्हणून अर्जुन अशा काही खुबीने विचारतो की, कृष्णाने त्याला ते विराट रूप दाखवावेच. ज्ञानेश्वर महाराज या संदर्भात म्हणतात, ' अहो वासरूं देखलियाचिसाठीं । धेनू खडबडोनि मोहें उठी । मग स्तनामुखाचिये भेटीं । काय पान्हा धरे ? ।। पाहा पां तया पांडवांचेनि नांवें । जो कृष्ण रानींही प्रतिपाळूं धांवे । तयातें अर्जुनें जंव पुसावें । तंव साहील काई ? ।। तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण । आणि येरू स्नेहा घातलें आहे माजवण । ऐसिये मिळवणीं वेगळेपण । उरे हेंचि बहु ' ।। (११:४०-४२)– अहो, वासराचे दर्शन होताच गाय खडबडून उठते. मग वासराने कासेस प्रत्यक्ष तोंड लावले की पान्हा फुटल्यावाचून राहील काय ? त्या पांडवांसाठी कृष्ण रानावनातही संरक्षणासाठी धावले मग अर्जुनाची विनवणी अमान्य करतील काय ? श्रीकृष्ण म्हणजे प्रेमाचा अवतार आणि अर्जुन म्हणजे प्रेमाचा चांगलाच खुराक, असा मोठा प्रेमाचा योग आहे. तरीही कृष्णाने विश्वरूप दाखवावे म्हणून अर्जुनाची परोपरीने विनंती आहेच. या प्रसंगाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, ' श्रीकृष्ण म्हणजे दयेचा मेघ, अर्जुन म्हणजे

जवळ आलेला वर्षाकाळ. श्रीकृष्ण म्हणजे कोकिळ तर अर्जुन म्हणजे वसंत ऋतू.' याच वृत्तीने भगवंतांनी अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली. आणि विराट विश्वरूपाचे दर्शन घडविले. अर्जुनाच्या मोहात, प्रेमात सापडलेल्या कृष्णाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'परि पांचाही आंतु अर्जुना । श्रीकृष्ण साविियाचि जाहला अधीना । कामुक कां जैसा अंगना । आपैता कीजे ।। पढविलें पाखरूं ऐसे न बोले । यापरी क्रीडामृगही तैसा न चले । कैसें दैव एथें सुरवाडिलें । तें जाणों न ये ।। आजि परब्रह्म हें सगळें । भोगावया सदैव याचेचि डोळे । कैचे वाचेचे हन लळे । पाळीत असे ।। हा कोपे कीं निवांतु माहे । हा रुसे तरी बुझावीत जाये । नवल पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा ।।' (११:१६९-७२)– पाच पांडवांपैकी अर्जुनाच्या लोभात श्रीकृष्ण अधिक अडकतात. जणू एखादा विषयी मनुष्य लावण्यवतीने भुलवून ठेवावा तसे. शिकवलेले पाखरूही बोलणार नाही, करमणुकीसाठी पाळलेले हरिणही बागडणार नाही, पण श्रीकृष्ण मात्र या अर्जुनाच्या नादाने नाचतात, वागडतात, बडबडतात. अर्जुन रागावला की देव त्याची समजूत घालतात. अर्जुनाचे इतके वेड या देवाला आहे!

**प्रियत्वाच्या भोगासाठी सगुणाचा आधार**

भगवंताचे विराट् रूप पाहून अर्जुन चकित झाला. हा आपला सखा श्रीकृष्ण सर्व विश्वाला व्यापून आहे असे वाटून त्याला स्वतःचीच लाज वाटली. या श्रेष्ठ कृष्णाची आपण थट्टा केली, त्याच्याशी सलगी केली याचे राहून राहून दुःख होऊन अर्जुनाने भयभीत व आश्चर्ययुक्त चित्ताने स्तुती केली. स्वतःकडून अपराध झाल्याच्या जाणिवेने तो म्हणाला, 'अहो केवढी वावगी गोष्ट घडली आमच्या हातून. आम्हीं अमृताने सारवण घातले, कामधेनू विकून शिंगरू घेतले. परिसाचा दगड घराच्या पायात घातला, कल्पवृक्ष तोडून त्याचे शेताला कुंपण घातले. जगदीश्वरा, आमच्या फायद्यासाठींच जणू तुम्हांला आम्ही विकत घेतले. केवढी अनुचित गोष्ट झाली ही!' आणि यानंतर अर्जुनाला उपरती झाली. त्याला या विश्वरूपाचा मोह राहिला नाही. पहिल्यासारखेच सगुण सुंदर रूप परमेश्वराने धारण करावे म्हणून तो विनवू लागला, 'देवा, ज्याची अंगकांती निळी आहे, पाचू मण्याला सुवास यावा अथवा आनंदाला कोंभ फुटावा त्याप्रमाणे ज्याच्या कमरेची शोभा मदनाला भूषविते, ज्या मस्तकावर मुकुट आहे, का मुकुटाला मस्तक आहे अशी भ्रांती

जेथे पडते, ज्याने वैजयंती माळ गळयात घातली आहे, ज्याचे चक्र तेजाने चमकत आहे, 'किंबहुना स्वामी ! तें देखावया उत्कंठित पां मी । म्हणोनि आतां तुम्ही । तैसेया होआवें ।। हे विश्वरूपाचे सोहळे । भोगोनि निवाले जी डोळे । आतां होताति आंधळे । कृष्णमूर्तिलागीं ।। तें साकार कृष्ण रूपडें । वांचूनि पाहों नावडे । तें न देखतां थोडें । मानिताति हें ।। आम्हां भोग मोक्षाचिया ठायीं । श्रीमूर्तियांचूनि नाहीं । म्हणोनि तैसाचि साकारू होई । हें सावरीं आतां ।।' ( ११ : ६०५-०८ ) – असे हे गोजिरवाणे सगुण रूप मी पाहाण्यासाठी अधीर झालो आहे. देवा, तेच रूप धारण करा. अहो, या तुमच्या विश्वरूपदर्शनाच्या सोहळयामुळ माझ्या डोळयांचे पारणे फिटले. आता तुमचे सौम्य रूप पाहाण्यासाठी डोळे हपापले आहेत. त्यांना त्या साजऱ्या व रेखीव मूर्तीखेरीज काही सुचत नाही. त्या सगुण रूपापुढे विश्वरूपाची काय किंमत? आम्हांला या सगुण मूर्तीखेरीज इतरत्र कोठेच भोग अथवा मोक्ष यांचा लाभ होणार नाही. तेव्हा देवा, हे विश्वरूप आता तुमचे तुम्ही आवरून ठेवा, व सगुण साकार व्हा.'

आणि आपल्या शिष्यासाठी कृष्णाने पुनः सगुण रूप धारण केले. सोन्याची लगड मोडून आपल्या हौसेसाठी दागिना केला. 'तैसें शिष्याचिये प्रीती जाहलें । कृष्णत्व होतें तें विश्वरूप केलें । तें मना नयेचि मग आणिलें । कृष्णपण मागुतें' – या अर्जुनशिष्याचे प्रेम भगवंतास असे की, त्याच्या हट्टासाठी देवाने विश्वरूप धारण केले आणि त्याचाच पुनः हट्ट म्हणून ते सगुणावर आले ! ज्ञानेश्वरांनी एक सुंदर दृष्टान्त देऊन म्हटले आहे, 'अहो कृष्णमूर्तीच्या आकाराची विश्वरूप वस्त्राची घडी कृष्णांनी अर्जुनाच्या प्रियत्वासाठी उलगडून दाखविली. त्या वस्त्राची लांबी, रुंदी, रंग सर्व दाखवून त्या ग्राहकाला पसंत न पडल्यामुळे पुनः पूर्वीप्रमाणे घडी घालून वस्त्र ठेवून दिले.'

## 'दोहीं बोठीं एक बोलणें'

श्रीकृष्ण-अर्जुन ही एक प्रतीकात्मक जोडी आहे. जीव-शिव, शिष्य-गुरू यांच्या नात्यातील माधुर्य या जोडीच्या निमित्ताने ज्ञानेश्वर वारंवार दाखवितात. प्रियत्वाची मौज सांगतात. श्रीकृष्णांच्या सागरासारख्या उपदेशाला पिऊन टाकणारा अगस्ती म्हणजे अर्जुन असे त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. श्रीकृष्णांनी केलेला बोध अर्जुनाच्या हृदयावर कसा उमटला ? तर आकाशा-

तील चंद्र जसा दुग्धसमुद्रात, तकतकीत भिंतीत जसे समोरचे चित्र, तसा या गुरुशिष्यांचे कधी ऐक्य कसे होते ? तर ‘ पैं दोहीं वोठीं एक बोलणें । दोहीं चरणीं एक चालणें । तैसें पुसणें सांगणें । तुझें माझें ’ (१५:४५४)– इतके ऐक्य लाभूनही प्रियत्वाच्या सुखासाठी पुनः दोघे द्वैतावर आहेतच. श्रीकृष्णाचे बोलणे संपत आले की, अर्जुन व्याकूळ व्हायचा. या भगवंताने पुनः पुनः तेच तेच बोलावे असे त्याला वाटे. या संवादसुखातील स्वारस्य अवीट होते. ‘ वत्स धालयाही वरी । धेनु न वचावी दुरी । अनन्य प्रीतीची परी । ऐसी आहे ।। तेणें काजेंवीणही बोलावें । तें देखिलें तरी पाहावें । भोगितां चाड दुणावे । पढियंतासाठीं ।। ऐसी प्रेमाची हे जाती । आणि व्यर्थ तंव तेचि मूर्ति । म्हणूनि करूं लाहे खंती । उगेपणाची ’ (१८:७८-८०)– वासराची तृप्ती झाली, तरी गाय दूर न व्हावी असे त्याला वाटते, अशी ही एकनिष्ठ प्रेमाची रीत आहे. हे प्रेम कारणावाचून बोलते, पाहिलेलेच पुनः पाहते, प्रियवस्तू भोगताना तिचाच नाद अधिक लागतो. अशा या प्रेमाची अर्जुन तर मूर्तीच आहे, म्हणून भगवंताच्या मनाला मौनानेंही क्लेश होतात.

अर्जुनाला श्रीकृष्णांनी जो बोध केला तो साऱ्या जगाला नंतर तारक झाला. सर्व काही सांगून झाल्यावर ‘ मग सांवळा सकंकणु । बाहू पसरोनि दक्षिणु । आलिंगिला स्वशरणु । भक्तराजु तो ।। ’– मग त्या कृष्णाने आपल्या कंकण-युक्त सावळ्या हाताने भक्तश्रेष्ठ अर्जुनास आलिंगन दिले. या अद्वितीय मीलनाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, ‘ हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचे तें हृदयीं घातलें । द्वैत न मोडतां केलें । आपणांऐसे अर्जुना ।। दीपें दीपु लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला । द्वैत न मोडतां केला । आपणपें पार्थु ।। तेव्हां सुखाचा मग तया । पूरु आला जो धनंजया । तेथ वाडु तऱ्ही बुडोनियां । ठेला देवो ’ (१८:१४२१–२३)– हृदयाला हृदय लागल्याबरोबर कृष्णाच्या हृदयातील रहस्य अर्जुनाच्या हृदयात शिरले. एका दिव्यावर दुसरा दिवा लावावा त्याप्रमाणे द्वैत न मोडता कृष्णांनी अर्जुनाला आत्मस्वरूप केले, मग त्या अर्जुनावर जो महासुखाचा लोंढा लोटला त्यात ते दोघेही बुडून गेले ! दोन सागरांचीच जणु गाठ पडली.

**‘ चंद्र तेथें चंद्रिका ’**

युद्धाच्या आरंभी असलेले मनातले किल्मिष दूर झाले. सर्व संशय फिटले. मोठ्या आनंदाने अर्जुनाने तशी कबूली दिली. तो म्हणाला, ‘ गुंतलों होतों

अर्जुनगुणें । तो मुक्त जालों तुझेपणें । आतां पुसणें सांगणें । दोन्हीं नाहीं ॥' (१८ : १५६३) देवा, मी अर्जुन युद्ध करणारा आहे, या मोहात गुंतलो होतो. पण तुझ्या कृपाप्रसादाने मी त्यातून मुक्त झालो. आता प्रश्न विचारणे व उत्तर देणे या दोनही गोष्टी संपल्या. देवा, आता मी तुमची कोणतीही आज्ञा पाळीन.' अर्जुनाच्या या बोलण्याने देवसुद्धा संतुष्ट होऊन सुखाने नाचू लागला. अशा रीतीने श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या प्रियत्वाची कथा सबंध ज्ञानेश्वरीत मोठ्या लडिवाळपणे रंगविली गेली आहे. श्रीकृण व अर्जुन ! हे दोघे जेथें, तेथे जय खात्रीने. या ऐक्याचे काव्यमय वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी बहारदार दृष्टान्त दिले आहेत:

चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथें अंबिका । संत तेथें विवेका । असणें की जी ॥
रावो तेथें कटक । सौजन्य तेथें सोयरीक । वन्हि तेथें दाहक । सामर्थ्य कीं ॥
दया तेथें धर्मु । धर्मु तेथें सुखागमु । सुखीं पुरुषोत्तमु । असे जैसा ॥
वसंत तेथें वनें । वन तेथें सुमनें । सुमनीं पालिगनें । सारंगांचीं ॥
गुरु तेथें ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथी जैसें ॥
भाग्य तेथें विलासु । सुख तेथें उल्लासु ।
हें असो तेथ प्रकाशु । सूर्य जेथें ॥
तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ ।
तो श्रीकृष्णरावो जेथें । तेथ लक्ष्मी ॥
आणि आपुले नि कांतेंसीं । ते जगदंबा जयापासीं ।
अणिमादिकी काय दासी । नव्हती तयातें ? ॥
कृष्ण विजयस्वरूप निजांगें । तो राहिला असे जेणें भागें ।
तें जयो लागवेगें । तेथेंचि आहे ॥ (१८ : १६३२ -४० )

असे हे अर्जुन-श्रीकृष्णांचे ऐक्य प्रियत्वावर उभे आहे. या थोर प्रेमाच्या वर्णनाने ज्ञानेश्वरीतील कित्येक ओव्या आर्द्र झाल्या आहेत. ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे, जेथे कृष्ण तेथे अर्जुन, जेथे अर्जुन तेथे विजयश्री आणि हे जेथे आहे तेथील झाडे कल्पतरूशी पैज लावतात. तेथील धोंडेही चिंतामणी बनतात. तेथील मातीही सुवर्णकणांनी भूषित होते. तेथील साध्या नद्या अमृतरसाने वाहू लागतात.

# १२

# ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन

**‘ आनंदाचें आवारूं मांडूं जगा ’**

मानवी जीवनाचा श्रेष्ठतम आदर्श म्हणजे ईश्वरप्राप्ती करून घेणे. प्रभुप्रेमात रंगणे. ब्रह्मानंदाची अनुभूती घेणे. याच हेतूने ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी श्रोत्यांसमोर सांगितली आणि निरूपण अतिशय सुलभ व्हावे म्हणून उपमा-दृष्टान्तादि अलंकारांनी समृद्ध केले. नाना रसांची निर्मिती केली. नुसतीच शांतिरसाची कथा असली तरी ‘ शृंगाराच्या माथां पाय ’ ठेवणारी असल्याने ती लोकप्रियही झाली. आपल्या साहित्यकलेचा यथार्थ गौरव करीत असताना ज्ञानेश्वर म्हणतात, ‘ दाऊ वेल्हाळे देशी नवी । जे साहित्यातें वोजावी । अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणें ॥ बोल ओल्हावतेनि गुणें । चंद्रासि घे उमाणे । रसरंगी भुलवणे । नादु लोपी ॥ खेचराचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा । श्रवणासवे सुमना । समाधि जोडे ॥ तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेसी विश्व भरूं । आनंदाचें आवारूं । मांडूं जगा ॥ फिटो विवेकाची वाणी । हो काना मना जिणी । देखों आवडे तो खाणी । ब्रह्म-

विद्येची ।। दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा– । माजी विश्व ।। हें निफजेल आतां आघवें । ऐसें बोलिजेल बरवें । जे अधिष्ठिला असे परमदेवें । श्रीनिवृत्ती मी ।। म्हणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमा श्लेष कोंदाकोंदी । झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी '(१३ : ११५७-६४)

आपल्या ग्रंथलेखनाचा हेतू स्पष्ट करताना ज्ञानेश्वर वरील ओव्यांत म्हणतात की, मी देशी भाषाच अशा कौशल्याने मांडीन की ती ललित वाङ्मयाची संजीवनी ठरेल. आपल्या गोडीने अमृतालाही फिके पाडील. माझे हे मराठी बोल रसार्द्र शीतलपणात चंद्राच्या बरोबरीने उतरतील आणि रसाळपणाच्या बाबतीत अथवा भुलावणीत प्रत्यक्ष नादब्रह्महि लीन होऊन राहील. माझी ही शब्दरचना एखाद्या अर्धवटाच्या अंतःकरणालासुद्धा सात्त्विक वृत्तीचा पान्हा फोडील आणि हिच्या श्रवणाने साधुसंतांच्या मनाची समाधी लागेल. मी माझ्या वाग्विलासाने सर्व विश्व गीतार्थमय करीन आणि सगळ्या जगासाठी आनंदाचे मी मंदिर उभारीन. माझ्या या व्याख्यानाने विवेक बोलू लागेल, कानांचे सार्थक होईल, मनास धन्यता वाटेल. ज्यास वाटेल, त्यास ब्रह्मविद्येचा लाभ होईल. परमतत्त्वाचे दर्शन सर्वांच्या डोळ्यांना घडेल, सर्वांना सुखाचे पर्व अनुभवास येईल. साऱ्या विश्वात ब्रह्मज्ञानाचा सुकाळ होईल. निवृत्तिनाथांच्या कृपेने हे सर्व खास घडून येईल. यासाठी उपमा, श्लेष इत्यादि अलंकारांची रेलचेल करून गीतेमधील प्रत्येक पदाचा अर्थ स्पष्ट करीन.

**ब्रह्मज्ञान आणि प्रपंचवृत्ती**

ज्ञानेश्वरांनी आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे गीतार्थाच्या निमित्ताने जीवास ब्रह्मज्ञानाची गोडी लावली. जें उत्सुक आहेत त्यांना तो अनुभवही प्राप्त करून दिला. ज्ञानेश्वरांचे वय, त्या काळची साधनसामग्री, समाजाकडून त्यांचा झालेला छळ, त्यांना करावी लागलेली भ्रमंती लक्षात घेता, त्यांनी निर्माण केलेले वाङ्मय व त्यातून दिलेली जीवनविषयक दृष्टी यांना इतरत्र तुलना नाही. समोर बसलेले श्रोते नाना जातींचे, नाना मतांचे, नाना व्यवसायांचे जाणून त्यांनी आपला प्रतिपाद्य विषय अनेक दृष्टान्त देऊन अतिशय सुलभ व गोचर बनविला आहे. अतींद्रिय असणारा विषय इंद्रियांकरवी भोगवीन ही स्वतःची प्रतिज्ञा खरी करून दाखविली आहे. ज्ञानेश्वरांनी ब्रह्मज्ञान सांगितले, परमार्थाचा अनुभव आबालवृद्धांना सुलभ करून दिला; हेच

त्यांचे महत्त्वाचे जीवितकार्य मानले पाहिजे परंतु अशा संतश्रेष्ठांना, जीवनात अर्थ वाटत नाही, चालू जीविताकडे त्यांचे लक्ष नसते, व्यवहार, व्यवसाय, प्रपंच, धनदौलत यांकडे ते दुर्लक्ष करतात,' जीवनासंबंधी अति वैराग्याचा निवृत्तीचा दृष्टिकोण निर्माण करतात, असा एक आक्षेप नेहमी येत असतो. या पुस्तकातील इतर लेखांतील विचारांवरून या आक्षेपात अर्थ नाही हे ध्यानात आले असेलच. केवळ प्रपंच, केवळ धनदौलत, केवळ व्यवहार संतांना नको आहे. हा सारा लौकिक प्रपंच कशासाठी करायचा याकडे त्यांचे लक्ष आहे. संसार वा प्रपंच सर्वांनी सोडून द्यावा असे न सांगता संसार वा प्रपंच म्हणजे काय हे ओळखून घेण्यासाठी संतांनी जीवांना प्रवृत्त केले आहे.

**दृष्टान्तांतून लौकिक जगाची ओळख**

याच दृष्टिकोणातून ज्ञानेश्वरांनी मानवी जीवनाकडे पाहिले असल्याने त्यांचे जीवनदर्शन एका विशिष्ट अशा उंच अवस्थेवरचे आहे. लौकिक जगाचा वा व्यवहाराचा हव्यास केव्हाही युक्त नव्हे असे त्यांचे मत असले तरी लौकिक जगाची पारखच त्यांना नव्हती असे नाही, 'उपमा श्लेष कोंदाकोंदी' करताना त्यांनी जे उपमांचे व दृष्टान्तांचे भव्य विश्व उभे केले आहे, त्यावरून त्यांनी किती विविध प्रकारच्या जीवनाचा अनुभव घेतला असेल याची साक्ष पटेल. वैविध्याने नटलेल्या लौकिक जीवनाचे दर्शन घडविणे हा त्यांच्या वाणीचा मुख्य विषय नाही. मुख्य विषयाचे विवेचन आपण आतापर्यंतच्या लेखांतून केले आहेच. आता येथे त्यांनी उपमादृष्टान्तांच्या साहचाने सहज जाता जाता, प्रतिपाद्य विषय सुलभ व्हावा म्हणून मानवी जीवनाचे जे बहुरंगी दर्शन घडविले आहे त्याचा थोडक्यात परिचय करून घेऊ. पूर्वकालीन व समकालीन लौकिक विषयांचा उल्लेख या नाही त्या कारणाने ज्ञानेश्वर करतात व त्यावरून त्यांची बहुश्रुतता तर ध्यानात येतेच, पण जीवनातील विविधतेचे आकर्षण त्यांच्या सर्वगामी मनास कसे होते याचाही प्रत्यय येतो.

**अनेक कथांचे समर्पक संदर्भ**

भगवद्गीतेवर मराठी भाषेत भाष्य करताना ज्ञानेश्वरांनी अनेक कथांचे पुराणांतील आख्यानांचे संदर्भ दिले आहेत. यमुनेत कृष्णभक्त अक्रुराला साक्षात्कार झाला, कालकेयांच्या त्रासातून देवांना सोडविण्यासाठी अगस्तीनें समुद्र पिऊन टाकला, श्रीकृष्णास व अर्जुनास अग्नीने शस्त्रे दिली, नारायण

नावाच्या आपल्या मुलास अंतकाळी हाक मारल्याने अजामिळाचा उद्धार झाला, जन्मल्याबरोबर घोड्यासारखा किंकाळणारा अश्वत्थामा, देवांचे वैद्य अश्विनीकुमार, इंद्र व त्याची राजधानी अमरावती, हत्ती ऐरावत, घोडा उच्चैःश्रवा, सारथी मातली, दरबारातील गंधर्व व अप्सरा, उर्वशी, कामधेनू, कल्पवृक्ष इत्यादी, विराटपुत्र उत्तर, व्याघ्रपाद ऋषीचा मुलगा उपमन्यू व त्याने मिळविलेला क्षीरसागर, एकलव्याची गुरुभक्ती, सांख्यशास्त्रप्रवर्तक कपिलमुनी, सहस्रकरांचा कुमरू कर्ण, कश्यपादि ऋषिकुले, कंसाऐसी अचाटें महा ढेंढी, कालिंदीचा तट, काशीपती राजा, शंकराच्या जटेतून प्रकटलेला शिवगण कीर्तिमुख, कुंतिभोज राजा, अलकेचा राजा कुबेर, गंगा आणि भागीरथी, पोपटाला देवाचे नाव ठेवून बोलाविणारी गणिका, गणेश, सरस्वती, कश्यप-विनता यांचा पुत्र गरूड, गायत्रीमंत्र, गौतम ऋषी, चौरंगीनाथ, मिथिलेचा राजा जनक, युधिष्ठिराचा पणतू जन्मेजय, सिंधुदेशाचा राजकुमार जयद्रथ, कश्यप व कद्रू यांचा नागपुत्र तक्षक, निबंधन राजाचा दुर्गुणी पुत्र त्रिशंकू, दुर्योधन, देवकी, द्रुपद व द्रुपदकुमार, द्रोण, भीष्म, धर्मराज, गर्गांचा ध्रुवदेव, नकुल, नटेश्वर, पुरुरव्याचा नातू नहुष, ब्रह्मदेवाचा मानसपुत्र नारद, प्रल्हादाचा बंधू संऱ्हाद, याचे पुत्र निवातकवच, नृसिंह, पार्वती, पूतना, प्रल्हादाचा नातू बली, बृहस्पती, ब्रह्मा, भस्मासुर, भीम, विष्णूच्या वक्षस्थलावर स्मृतिचिन्ह ठेवणारा भृगू, सर्व मानवांचा उत्पादक मनू, नेवासे येथील श्रीमहालसा, मार्कंडेय ऋषी, गोतमकन्या अंजना हिचा पुत्र मारुती, यम, यशोदा, रंभा, दाशरथी राम, रामदेवराय यादव, लक्ष्मी, वराह, वसिष्ठ, वसुदेव, वासुकी, विद्याधर, विराटराजा, विश्वामित्र, विष्णू, शंकर, शिखंडी, शिशुपाल, शुकाचार्य, कश्यप व कद्रू यांचा पुत्र शेष, सनक व सनत्कुमार, सहदेव, सात्यकी, सुदामा, हिरण्याक्ष अशा शेकडो स्त्रीपुरुषांचे उल्लेख कथासंदर्भासाठी ज्ञानेश्वरांनी दिलेले आहेत. कथांच्या निर्देशाने प्रतिपाद्य विषय समजण्यास सोपे होते.

## प्रमदा, बाला, कुलस्त्री

ज्ञानेश्वरादिक संतांनी स्त्रियांची निंदाच केली अशी एक सर्वत्र समजूत आहे ती बरोबर नाही. अनाचारी पुरुषांचीही संत अशीच निंदा करताना दिसतात. पुरुषास त्याचे कर्तव्य विसरायला लावणारी वा

अनीतिमान कर्म करणारी स्त्री त्यांनी आपल्या टीकेचा विषय बनविली यात काय चुकले ? येऱ्हवी ज्ञानेश्वरांनी स्त्री, तरुण स्त्री, सती, पतिव्रता, साध्वी यांचा अनेक ठिकाणी गौरवच केलेला आहे. 'की प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रकटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ' हा उल्लेख काव्यमय नाही काय ? मुक्तिबाला गुणकुसुमांची माला घेऊन वैराग्यास वरते हा संदर्भ ध्यानात येण्यासारखा आहे. कामिनी, तन्वंगी, तरुणांगी, प्रमदा, बाला, कुलस्त्री इत्यादींचे मनोद्य उल्लेख ज्ञानेश्वरांनी केलेले आहेत. उत्तम कुलातील आणि कलागुणांनी संपन्न अशा स्त्रीचा त्यांनी गौरवच केला आहे. कुलवधू आपल्या अवयवांना लपविते हा मोघम उल्लेख ज्ञानेश्वरांच्या औचित्याचा द्योतक आहे. जेवणारा रसज्ञ असला म्हणजे सुगरण भरपूर वाढते हा आपला नित्याचा अनुभव नाही का ? षड्रसांची पक्वान्ने आणि वाढणारी लावण्यवतीं व गुणवती असल्या योगामुळे जेवण भरपूर होते. ज्ञानेश्वरांनी आणखी एक दृष्टान्त दिला आहे : कुलस्त्री माराच्या भयाने परघरी गेली व तेथेही तिची तीच गत झाली तर आपण उगाच नवऱ्याला सोडले असे तिला वाटते; हा अनुभव सार्वत्रिकच नव्हे काय ? 'वधुवरांचिये मीलनीं । वऱ्हाडियां लुगडीं लेणीं ' मिळतात हे ज्ञानेश्वरांना माहीत होते. 'सकुलीनें आपुली कुलींची आत्मजा दीधली ' चा प्रसंग त्यांना दिसत असावा.

### पतिव्रतेसंबंधी नितान्त आदर

पतिपत्नींच्या नाजुक प्रेमसंबंधींचे व परस्पर विश्वासाच्या आल्हाददायक वर्तनाचे दर्शनही ज्ञानेश्वर सहज जाता जाता दृष्टान्त देऊन घडवितात. जरी कुरूप असली तरी परिणामी आपली स्त्रीच बरी असे त्यांनी सुचविले आहे, 'आलिंगनमेळीं । आपेंआपु कवळी 'याचाही उल्लेख ते करतात. पत्नी आपले सर्वस्व पतीला देते, तो भेटल्यावर तिला राहवत नाही, पति पुत्र यांना दिलेल्या आलिंगनांत भेद आहे, 'प्रियोत्तमाच्या कंठीं । प्रमदा घे आटी, ' 'पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचोनि न स्पर्शे, ' 'अहेतुकेंनि चित्तें । अनुष्ठा पां एयातें । पतिव्रता पतितें । जेयापरी, ' 'लावण्यगुण युवती आणि पतिव्रता, ' 'पतिव्रते आलें । वार्धक्य जैसें, ' 'तेया अनुरागा वेधु लावी । 'एकपत्नीव्रत घेववी, ' 'गांवा गेलेयां वल्लभु । पतिव्रतेचा विरह-

क्षोभु,' 'पतिचेया व्रता। अनुसरे पतिव्रता। अनायासें आत्महिता। भेटे जेवी,' 'तरि येकु प्रियोत्तमु-। वांचुनु वाढों नेदी कामु। जैसा का मनोधर्मु। पतिव्रतेचा,' 'पै आघवांचि भोगेंसि। पतिव्रता क्रीडे प्रियेंसि' इत्यादी पतिव्रतेच्या वर्तनाचे व प्रेमाचे उल्लेख जेव्हा ज्ञानेश्वर करतात तेव्हा पतिव्रतेबद्दलचा मोठा आदरच ते व्यक्त करताना दिसतात. सतीबद्दल तर ज्ञानेश्वरांच्या मनात नितान्त आदर आहे. साध्वी स्त्री, सवत, वांझ स्त्री, विधवा, दाई, दासी, इत्यादींचे त्यांनी केलेले उल्लेखही अतिशय समर्पक व मनोज्ञ आहेत.

**आणि ही अशी स्वैरिणी**

कुलवती वा पतिव्रता स्त्री ज्ञानेश्वरांच्या आदरास पात्र आहे. पण स्वैरिणी अथवा हीन चालीची स्त्री त्यांच्या टीकेचा विषय झालेली आहे. पश्चात्तापदग्ध दुराचारी ईश्वरास शरण गेल्यास त्याचा उद्धार होईल असे ते म्हणतातच; परंतु धांगडी, व्यभिचारिणी पण्यांगना, वाणसी म्हणजे वेश्या, स्वैरिणी यांच्याविषयी त्यांनी लोकांना सावध केले आहे. दृष्टान्तासाठी यांचा उपयोग करून त्यांचा अव्हेर केला आहे. पण्यांगना वय लपविते, लटके प्रेम दाखवून पुरुषास भुलविते, पुण्याची पुंजी संपली की याज्ञिक स्वर्गातून मृत्युलोकावर कसे येतात? तर खिशातील पैसा संपल्यावर वेश्या जशी पुरुषाला हाकलून देते तसे. स्वैरिणी स्त्री पतीच्या पुढे पुढे करते. पण तिचे चित्त बाजारात इतर पुरुषांत असते. स्त्रैण पुरुषाला स्त्री आपलासा करून घेते; इत्यादी संदर्भावरून ज्ञानेश्वरांनी याही जातिविशेषाचा परामर्श घेतलेला आहे असे दिसते.

**स्नेहाळ मातेचे मंगल चित्र**

मातृप्रेमाबद्दल तर ज्ञानेश्वरांना परमावधीचा जिव्हाळा आहे. श्रीकृष्ण, सद्गुरुनाथ, संतसज्जन, श्रुती इत्यादींना त्यांनी अनेकदा माउली म्हणूनच संबोधिले आहे आणि मातेच्या प्रेमाचे व वात्सल्याचे दृष्टान्त तर त्यांनी पदोपदी दिले आहेत. मातृप्रेमाचे एखादे मंगल स्तोत्रच ज्ञानेश्वरांच्या ओव्या एकत्र करून रचण्यासारखे आहे. अपत्य, तान्हे लेकरू, पान्हा, झटे, मायबाप, माता, मूल इत्यादी उपमाने ज्ञानेश्वरांच्या ओवीत अनेकदा डोकावताना दिसतात. 'कामधेनु ऐसी माये,' 'स्नेहालागि माये म्हणिपे,' 'मातेचां कोपीं

थोकलें स्नेह आथि,' 'एथ भीड कवणाची धरूं । तूं माये आमुची,' 'मातेचां ठाईं अपत्या स्तन्यासि लागौनि अनवसरु नाहीं', 'अपत्यातें माये ओसंडूनि जरि जाये । तरि तें कैसेनि जिये ?,' । 'माये आपुलेयाचा स्नेहो करी एथ विस्मयो काइ, ? ।' 'आधींच चित्त मायेचें । वरि मीस जालें पढियंतेयाचें,' 'जें अपत्य थानौनि निगे । तेयाची भूक ते मायेसीचि लागे,' 'आणि बाळक बोब्रडां बोलीं । कां वांकुडां विचुकीं पाउलीं । चोज करूनि माउली । रिझवी जेवी,' 'आहो तान्हेयाची लागे झटे । तरि तेणें अधिकचि पान्हा फुटे । रोषें प्रेम दुणवटे । पाढियंतेयाचेनि' अशा अनेक ओव्यांतून व संदर्भातून ज्ञानेश्वर मातेचे स्नेहाळ शब्दचित्र उभे करतात. माता कशी असते ? ज्ञानेश्वर म्हणतात 'तें जो जो खेळु दावी । तो तो सोनेयाचा करूनि ठेवी,' कारण 'माउली बाळाची योग्यता जाणे' आणि ही गुरुमाय कशी असते ? ज्ञानेश्वर सांगतात, 'मनपवनाचीं खेळणीं । रिद्धीसिद्धींची बाळलेणीं । लेववीसी माये,' 'सतरावियेचें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरू गासी । समाधिबोधें निजवीसि । बुझाऊनि'.

**वात्सल्याचा श्रेष्ठ आदर्श**

आई आणि मूल यांच्या प्रीतीच्या व वात्सल्याच्या नाना छटा ज्ञानेश्वरांनी आपल्या श्रोत्यांना दाखविल्या आहेत. चिरपरिचित अशा या उपमानसृष्टीमुळे ज्ञानेश्वरांच्या ओव्या वत्सल रसात भिजून चिंब झाल्या आहेत. 'कां स्नेहाळ माये । तान्हेयाची वास पाहे । तिये दिठी आहे । हळुवार ॥,' 'माये पुढां बालका । रिगतां न पडेचि आवांका,' 'बाळा उचित जाणणें होये । तरि बाळपणचि के आहे । परि साचचि एरि माए । म्हणौनि तोषे,' 'परि अहिंति कौपौनि सोफ । लालनीं मी जैसें पुष्प । तिये मातेचें स्वरूप । जैसें होय' अशा अनेक ओव्यांतून ज्ञानेश्वर आईच्या प्रेमाचे दर्शन घडवितात. आंगाजीवाची संपत्ती वेचून आई बाळाचे पालन करते, त्यात तिला कधी खंती वाटत नाही, मातेपुढून बालक दूर नेले तर तिची अवस्था पाण्याविना माशासारखी होते, आपली आई रूपाने साधारण असली तरी तिच्या प्रेमात काही बाधा येत नाही, इतर स्त्रिया रंभेपेक्षा सुंदर असल्या तरी बालकाला त्या काय करायच्या ? असा आदर्श मातेच्या प्रेमाचा ज्ञानेश्वरांनी निर्माण केला आहे.

## मायबापांचे सुख

मातेप्रमाणेच पित्याचाही गौरव ज्ञानेश्वर मनापासून करतात. 'सकलां तीर्थांचिये धुरे । जियें कां मातापितरें' यांना ज्ञानेश्वरांनी महत्त्व दिले आहे. 'जैसा स्वभावो मायेबापांचा । अपत्य बोले जऱ्ही बोबडिया वाचा । तऱ्हीं अधिकाधिक तेयांचा । संतोषचि आथि' या ओवीत त्यांनी मायबापांचे प्रेम व कौतुक वर्णन केले आहे. 'जे विश्वरूपाची आळी घेतली । ते मायबापें पुरविली । स्नेहाळपणें' अशी श्रीकृष्णाबद्दलची ज्ञानेश्वरांची भावना आपण पाहिली आहेच. 'पहिलियें बाळदशें । आई बा हेंचि पिसें' म्हणून ज्ञानेश्वरांनीं लहानपणी आईबापांची आवड मुलास कशी असते ते व्यक्त केले आहे. म्हातारपणी झालेल्या मुलाचे कौतुक आईबाप किती करतात हेही ज्ञानेश्वर सांगतात. 'परि नेणतें जरि होये । तऱ्हि देखौनि बापु की माये । हरिखु कोंहि न माये । चोज करिती' याही ओवीत आईबापांच्या कौतुकाचे दर्शन आहे. 'तरी घरीं मातापितरां । धड बोलीं नाहीं संसारां । येर विश्व भरी आदरा । मूर्ख जैसा'— घरीं एखादा मूर्ख आईबापांचा आदर करीत नाही, त्यांच्याशी धडपणे बोलतही नाही, पण जगाशी मात्र प्रेमाने वागतो त्याचा निषेधच ज्ञानेश्वर करतात. सज्जन माणसाचे बोलणे कसे असते ? ज्ञानेश्वर सहज सांगून जातात. 'तरि परिसे तया होय मायबाप;' आपले मायबापच प्रेमळपणे बोलतात असे ऐकणाराला वाटावे.

अनुभवामृताच्या आरंभी ज्ञानेश्वरांनी 'ऐसीं इयें निरुपाधिकें । जगाची जिये जनकें' त्यांनाच मनोभावें वंदन केले आहे. 'मायबापे आमुची विठोबा रखुमाई निजाची' सारख्या अभंगातून ते ईश्वराला मायबाप म्हणून संबोधतात. तान्हया दूधपित्या मुलाचाही उल्लेख ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीत अनेकदा करतात. आईशिवाय मूल जगणे कठीण असल्याचे ते सांगतात. 'अनन्यजीविता माता । बालका जैसीं' असे मातामूल यांचे नाते त्यांनी सांगितले आहे. बालक बापाच्या ताटात जेवायला बसते व आपल्या बापालाच भरविते तेव्हा बाप कौतुकाने आपले मुख पुढे करतो असे मोठे वत्सलपूर्ण चित्र ज्ञानेश्वरांनी एका ओवीत उभे केले आहे.

## आणि हे असे खेळ

ज्ञानेश्वरांच्या लौकिक सृष्टीत व जीवनदर्शनात खेळांचेही उल्लेख आलेले आहेत. चेंडू जमिनीवर आपटून वर झेलणे, ओलसर जमिनीवरून मात्र तो तेवढ्या जोरात उसळत नाही, विटीदांडूत 'कोलू धरूं' असा उल्लेख त्यांनी केला आहे. सारीपाट खेळणे, सोंगट्या खेळणे, कळसूत्री बाहुल्या नाचविणे, करमणुकीसाठी शोभेची चित्रे काढणे, नृत्यनाच करणे, द्यूत खेळणे इत्यादी प्रकार ज्ञानेश्वरांनी उल्लेखिले आहेत. टिपरी, हमामा, फुगडी इत्यादी खेळांवर ज्ञानेश्वरांचे रूपकात्मक अभंग प्रसिद्ध आहेत. 'साईखेडियातें देखोनियां माते,' 'भवाब्धीसागरीं मांडिली टिपरी, ।' 'हमामा रे पोरा हमामा । घुमरी वाजे घुमामा,'' फुगडी फू गें फुगडी फू' यांच्यापैकी अनेक खेळांची माहिती ज्ञानेश्वरांना असावी.

## शेतकऱ्याचा व्यवसाय

खेळाप्रमाणेच अनेक धंदेवाइकांचा व व्यावसायिकांचाही उल्लेख ज्ञानेश्वर करतात. शेतकऱ्यांचे उल्लेख तर ज्ञानेश्वरीत भरपूर आहेत. कदाचित त्यांच्या श्रोत्यांत शेती कसणारांची संख्या अधिक असावी. 'तरी भूमि बीज नांगरू । या भांडवलाचा आधारू ।' शेतकऱ्यांना असतो. तेराव्या अध्यायाच्या प्रारंभीचे रूपक क्षेत्रावर म्हणजे शेतावरच उभे आहे. कुळ, कुळवाडी, वस्तीकर, बलौता, वृत्ती हे सारे शद्व कृषिकर्माशी संबंधित आहेत. शेताची मर्यादा दगड घालून आखणे, भाजणी व वापसा करणे, 'इंद्रियबैलांची पेटी' करून शेत नांगरणे, 'तास' पाडून चाड्याने बीज पेरणे, बी पेरले की मातीखाली झाकणे, लोंब्या उगवल्या की त्यांचे रक्षण करणे, तणांचे बुजगावणे करणे, पिकाची कापणी आणि मळणी करणे, अत्यंत परिश्रमाची कामे करून 'पाटा' घेणे, खात्यात स्वतःचे नाव नोंदविणे, वहिवाटीचे नाव पुसले जाणे, जीवाचे औत जोडणे, 'अवसिपाहाटी' न पाहाता, न कंटाळता श्रम करणे, 'जैसा पुजुनि देवो पाहिजे । पेरूनि सेता जाइजें' ही रीत, प्रेत झाकून पेरणी करण्याची निकड अशा अनेक गोष्टी ज्ञानेश्वर जाणतात. शेत व शेतकरी यांच्या व्यवसायाचे व वर्तनाचे निरीक्षण ज्ञानेश्वरांनी आश्चर्यकारक असे केलेले दिसते.

**मायबापांचे सुख**

मातेप्रमाणेच पित्याचाही गौरव ज्ञानेश्वर मनापासून करतात. ‘सकळां तीर्थांचिये धुरे । जियें कां मातापितरें’ यांना ज्ञानेश्वरांनी महत्त्व दिले आहे. ‘जैसा स्वभावो मायेबापांचा । अपत्य बोले जऱ्ही बोबडिया वाचा । तऱ्हीं अधिकाधिक तेयांचा । संतोषचि आथि’ या ओवीत त्यांनी मायबापांचे प्रेम व कौतुक वर्णन केले आहे. ‘जे विश्वरूपाची आळी घेतली । ते मायबापें पुरविली । स्नेहाळपणें’ अशी श्रीकृष्णाबद्दलची ज्ञानेश्वरांची भावना आपण पाहिली आहेच. ‘पहिलियें बाळदशें । आई बा हेंचि पिसें’ म्हणून ज्ञानेश्वरांनीं लहानपणी आईबापांची आवड मुलास कशी असते ते व्यक्त केले आहे. म्हातारपणी झालेल्या मुलाचे कौतुक आईबाप किती करतात हेही ज्ञानेश्वर सांगतात. ‘परि नेणतें जरि होये । तऱ्हि देखौनि बापु की माये । हरिखु केंहि न माये । चोज करिती’ याही ओवीत आईबापांच्या कौतुकाचे दर्शन आहे. ‘तरी घरीं मातापितरां । धड बोलीं नाहीं संसारां । येर विश्व भरी आदरा । मूर्ख जैसा’— घरीं एखादा मूर्ख आईबापांचा आदर करीत नाही, त्यांच्याशी धडपणे बोलतही नाही, पण जगाशी मात्र प्रेमाने वागतो त्याचा निषेधच ज्ञानेश्वर करतात. सज्जन माणसाचे बोलणे कसे असते ? ज्ञानेश्वर सहज सांगून जातात. ‘तरि परिसे तया होय मायबाप;’ आपले मायबापच प्रेमळपणें बोलतात असे ऐकणाराला वाटावे.

अनुभवामृताच्या आरंभी ज्ञानेश्वरांनी ‘ऐसीं इयें निरुपाधिकें । जगाची जिये जनकें’ त्यांनाच मनोभावें वंदन केले आहे. ‘मायबापे आमुची विठोबा रखुमाई निजाची’ सारख्या अभंगातून ते ईश्वराला मायबाप म्हणून संबोधतात. तान्हया दूधपित्या मुलाचाही उल्लेख ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीत अनेकदा करतात. आईशिवाय मूल जगणे कठीण असल्याचे ते सांगतात. ‘अनन्यजीविता माता । बालका जैसीं’ असे मातामूल यांचे नाते त्यांनी सांगितले आहे. बालक बापाच्या ताटात जेवायला बसते व आपल्या बापालाच भरविते तेव्हा बाप कौतुकाने आपले मुख पुढे करतो असे मोठे वत्सलपूर्ण चित्र ज्ञानेश्वरांनी एका ओवीत उभे केले आहे.

### आणि हे असे खेळ

ज्ञानेश्वरांच्या लौकिक सृष्टीत व जीवनदर्शनात खेळांचेही उल्लेख आलेले आहेत. चेंडू जमिनीवर आपटून वर झेलणे, ओलसर जमिनीवरून मात्र तो तेवढ्या जोरात उसळत नाही, विटीदांडूत 'कोलू धरूं' असा उल्लेख त्यांनी केला आहे. सारीपाट खेळणे, सोंगट्या खेळणे, कळसूत्री बाहुल्या नाचविणे, करमणुकीसाठी शोभेची चित्रे काढणे, नृत्यनाच करणे, द्यूत खेळणे इत्यादी प्रकार ज्ञानेश्वरांनी उल्लेखिले आहेत. टिपरी, हमामा, फुगडी इत्यादी खेळांवर ज्ञानेश्वरांचे रूपकात्मक अभंग प्रसिद्ध आहेत. 'साईखेडियातें देखोनियां माते,' 'भवाब्धीसागरीं मांडिली टिपरी, ।' 'हमामा रे पोरा हमामा । घुमरी वाजे घुमामा,' 'फुगडी फू गें फुगडी फू' यांच्यापैकी अनेक खेळांची माहिती ज्ञानेश्वरांना असावी.

### शेतकऱ्याचा व्यवसाय

खेळाप्रमाणेच अनेक धंदेवाइकांचा व व्यावसायिकांचाही उल्लेख ज्ञानेश्वर करतात. शेतकऱ्यांचे उल्लेख तर ज्ञानेश्वरीत भरपूर आहेत. कदाचित त्यांच्या श्रोत्यांत शेती कसणारांची संख्या अधिक असावी. 'तरी भूमि बीज नांगरू । या भांडवलाचा आधारू ।' शेतकऱ्यांना असतो. तेराव्या अध्यायाच्या प्रारंभीचे रूपक क्षेत्रावर म्हणजे शेतावरच उभे आहे. कुळ, कुळवाडी, वस्तीकर, बलौता, वृत्ती हे सारे शब्द कृषिकर्माशी संबंधित आहेत. शेताची मर्यादा दगड घालून आखणे, भाजणी व वापसा करणे, 'इंद्रियबैलांची पेटी' करून शेत नांगरणे, 'तास' पाडून चाड्याने बीज पेरणे, बी पेरले की मातीखाली झाकणे, लोंब्या उगवल्या की त्यांचे रक्षण करणे, तणांचे बुजगावणे करणे, पिकाची कापणी आणि मळणी करणे, अत्यंत परिश्रमाची कामे करून 'पाटा' घेणे, खात्यात स्वतःचे नाव नोंदविणे, वहिवाटीचे नाव पुसले जाणे, जीवाचे औत जोडणे, 'अवसिपाहाटी' न पाहाता, न कंटाळता श्रम करणे, 'जैसा पुजुनि देवो पाहिजे । पेरूनि सेता जाइजें' ही रीत, प्रेत झाकून पेरणी करण्याची निकड अशा अनेक गोष्टी ज्ञानेश्वर जाणतात. शेत व शेतकरी यांच्या व्यवसायाचे व वर्तनाचे निरीक्षण ज्ञानेश्वरांनी आश्चर्यकारक असे केलेले दिसते.

## नाना जाती - नाना व्यवसाय

कीर्तनकार, अग्निहोत्री, याज्ञिक, भाट, वैद्य, ज्योतिषी, पंचाक्षरी, मांत्रिक, अभिचारक, महंत, व्यापारी, कापडी म्हणजे यात्रेकरू, चित्रकार, सोनार, लोहार, कुंभार, धोबी, आचारी, माळी, नट, पारधी, मांदुरी म्हणजे चाबूकस्वार, कोल्हाटी, वासुदेव, गुराखी, गारुडी, भांड, भिल्ल, म्लेंच्छ, चांडाल, जुगारी, मातंग, चोर इत्यादिकांच्या व्यवसायांचे समर्पक उल्लेख ज्ञानेश्वर करतात. व्यापाराला भांडवल लागते, त्याचा उपयोग जपून करावा लागतो, नीट उपयोग केला तर चौपट फायदा होतो, कापडाच्या गठ्ठ्याची दोरी सोडून, घडी उलगडून वाण ग्राहकास दाखवितात इत्यादी संदर्भ व्यापारातील आहेत. तीन माडयांची त्रिमालिके, धवलारे, प्रासाद, रमणिकांची राजभुवने इत्यादी इमारतींचे उल्लेख येतात. रथाचे निरनिराळे भाग तयार करणे, घराला दादर बनविणे, कपाट, दार करणे, खिडकी, दारवठा करणे इत्यादी कामे सुताराची होत. अलंकारांप्रमाणे लहान घंटया, बाळलेणी, भूषणे, केयूरे, कंकणे इत्यादी दागिन्यांच्या संदर्भात सोनारांचा उल्लेख येतो. मूस, ठसा, कोंदणासाठी व जडावासाठी लागणारी हत्यारे, पांचिक, पन्हेरे, साडपन्हेरे व सोले यांचे कस ठरविणे, वालाच्या वजनानें सोने तोलणे, शुद्ध सोन्यात हलकी धातू मिसळून त्याचा कस कमी करणे इत्यादी कामांचे उल्लेख ज्ञानेश्वर करतात. आटीव लोहखांब, पहार, भाला, करवत, असीपत्र ( तलवार), इत्यादी उल्लेख लोहाराचे सापडतात. खापर, माठ, घट, चाक इत्यादींनी कुंभाराचा व्यवसाय सूचित झाला आहे. यांखेरीज दासदासी, शिपाई, द्वारपाल, छत्रीधारी, चवरधर, हडप इत्यादी कामे करणारांचेही उल्लेख येतात.

## प्राणिसृष्टीचे नवलपूर्ण दर्शन

ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांतून निरूपण अध्यात्माचे, परमार्थाचे, आत्मसाक्षात्काराचे आहे यात शंका नसली तरी त्यांनी मानवी जीवन किती विविध अंगांनी निरखून पाहिले होते याची साक्ष त्यांच्या शेकडो दृष्टान्तांवरून येते. मानवी स्वभाव व त्याच्या विविध छटा रंगविण्यासाठी ज्ञानेश्वरांनी विविध प्राण्यांचा, पशूंचा, पक्ष्यांचा, कीटकांचा जो उल्लेख केला आहे तोही आश्चर्यजनक असा आहे. उंट, उंदीर, कासव, कुत्रा, कोल्हा, गाढव, गाय, वासरू,

घोडा, बैल, माकड, मांजर, मेंढा, म्हैस, लांडगा, वाघ, शेळी, ससा, सिंह, हत्ती, हरिण ही सर्व मंडळी उपमान होऊन ज्ञानेश्वरांच्या जीवनदर्शनाचे वैभव वाढविण्यास तत्पर अशी आहेत. म्हातारपणी शरीरावर सुरकुत्या पडल्या की गुडघा उंटासारखा होतो. इंद्रियविषयांची सोबत आपणांला सुखदायक कशी होणार ? हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, उंदिरास सर्पफणीची सावली मानवेल काय ? कासव आपले अवयव पसरते, आखडून धरते, कासवी नजरेने आपल्या पिलांचे रक्षण करते, पोटासाठी कुत्रे अन्न झाकले-उघडे बघत नाही. कोल्ह्याला चंदनाची आवड निर्माण होत नाही, चंद्राच्या चांदण्याचा कोल्ह्यास मत्सर वाटतो, गाढवाला तीर्थाने म्हाणून काय उपयोग ? असे अनेक उल्लेख ज्ञानेश्वर करतात. गाय–वासरू यांच्या वात्सल्याचे उल्लेखही ज्ञानेश्वरीत अनेक आहेत. गाय कोठेही चरत असली तरी तिचे चित्त वासराकडे असते. दुभत्याच्या आशेने लोक गाईस सांभाळतात, वासरू जवळ आले की तिला पान्हा फुटायला वेळ लागत नाही. पान्हा फुटावा म्हणून वासराचा 'भोकसा' पेंढा भरून तिच्या पुढे ठेवतात, सांजवणीसाठी वासरू पळत सुटते. वासरू पाहून गाय मोहाने उठते. तिला पान्हा आवरता येत नाही असे मोठे मजेदार संदर्भ ज्ञानेश्वर आपले विवेचन सुलभ व्हावे म्हणून देतात. व्याघ्राचे छत्र कधी सुखकर होणार नाही, सिंह हत्तींच्या कळपाचा विचार करीत नाही, वाटेत सिंह दिसला तर त्याला चुकविण्यातच हित आहे, हत्ती अंग धुतल्यानंतर पुन:चिखलाचे पाणी अंगावर उडवून घेतो इत्यादी संदर्भ ज्ञानेश्वर वाचकांना व श्रोत्यांना पुरवितात.

पक्षी आणि कृमिकीटक यांचेही ज्ञानेश्वरांना वावडे नाही. कोकिळ, गरूड, गिधाड, कावळा, घुबड, चकोर, चातक, टिटवी, पारवा, पोपट, बगळा, मोर, ससाणा, सारस, हंस व राजहंस इत्यादी पक्ष्यांचे संदर्भ ज्ञानेश्वरीत जागजागी येतात. वांती होऊन पडलेले भक्षण करण्यात कावळा मागेपुढे पाहात नाही. चंद्राचा उदय कावळ्यांना काय उपयोगाचा ? कावळ्याला एकच बुबुळ असते, वसंत ऋतूत कोकिळेस कंठ फुटतो, गरूड विष्णूच्या सेवेत तत्पर असतो, घुबडाला फक्त अंधारातच दिसते. कुमुददलाच्या ताटात शुद्ध चंद्रकिरणांचे भोजन चकोर घेतो, चोच उघडून चकोर चंद्राकडे पाहातात, चातक पक्षी मेघाची वाट पाहातो, टिटवी आपल्या

चोचीने समुद्र कितीसा भरणार? आकाशात भरारी मारणारा पारवा पारवीला पाहून एकदम आपले आंग तिच्याकडे लोटून देतो, मेघाच्या गर्जनेने मोरास आनंद होतो, सारस पक्षी प्रेमाने जोडपे करून राहातात, राजहंसाचे चालणे डौलदार असते असे अनेक गंमतीदार उल्लेख ज्ञानेश्वर दृष्टान्तासाठी करतात. इंगळी, काजवा, कोसला, गोचीड, पतंग, बेडूक, भुंगा, मधमाशी, मुंगी, मरकुट म्हणजे चिलट, वाळवी, विंचू, सरडा, सर्प, मासे इत्यादी लहानसान प्राणीही ज्ञानेश्वरांच्या नजरेतून सुटले नाहीत. सूर्यापुढे काजव्याची काय शोभा? गाईच्या कासेजवळ राहून गोचीड निरंतर दुधा-ऐवजी रक्तच सेवन करते, दिव्याच्या प्रकाशावर पतंग झडप घालतो, शेवाळात व चिखलात बेडूक राहातो व आपण स्वतः सर्पाच्या तोंडी जाताना माशा गिळीत असतो, स्वातीच्या पाण्याचे शिंपल्यात मोती, पण सर्पाच्या तोंडात विष बनते. सर्पामुळे चंदनवृक्ष वाईट ठरतो. सर्पांगना सुवर्णाच्या ठेव्यावर बसते, असे अनेक संदर्भ देऊन ज्ञानेश्वरांनी या प्राणिसृष्टीला उपमा-नाच्या रूपाने मानवी सेवेला जुंपले आहे.

### वनस्पतींचा असा लोभ

ज्ञानेश्वर स्वभावतःच कविहृदयाचे सत्पुरुष. त्यांच्या प्रतिभेच्या झेपेतून झाडे, पाने, फळे, फुले कशी सुटणार? या वृक्षसृष्टीवर तर त्यांचा कमालीचा लोभ आहे. सर्वांना सुखद सावली देणाऱ्या वृक्षांच्या अंगावर ओरखडे ओढून औषधासाठी चीक काढणाऱ्या आयुर्वेदाला ज्ञानेश्वरांनी दोष दिला आहे. अशोक, अश्वत्थ, आंबा, ऊस, केळ, धोत्रा, खैर, चंदन, तमाल, तुळस, दूर्वा, द्राक्षवेल, निंब, निर्गुडी, पिंपळ, बाभूळ, भेंड, बोराटी, भोपळ्याचा वेल, वड अशा अनेक वृक्षांचे संदर्भ ज्ञानेश्वर समर्पकपणे देतात. वृक्षांत अश्वत्थ म्हणजे मीच असे भगवंताचे सांगणें आहे. उसाची कणसे निरुपयोगी असतात, ऊस पाळणाराला व गाळणाराला सारखाच गोड लागतो, उसाची साखर बनविल्यावर साखरेचा पुनः ऊस बनविता येत नाही, कर्पूरकेळीची सोपटी सोलून काढली की त्यांतून कापराचे कण गळतात, खैराच्या निखाऱ्याची उष्णता प्रखर असते, चंदनाचा सुवास व थंडपणा सुखकर असतो, तमालाची पाने आधी हिरवी, नंतर काळसर पडतात. तुळशीच्या रक्षणासाठी वृंदावन बांधतात, दूर्वांची मुळे अमर असतात, गीता ही द्राक्षांच्या वेलीची मांडवी

आहे, परिणाम हितकर असेल तर निंबाचा पाला गुणवान मानावा, निंबोळयांच्या बहराचा फायदा कावळयांनाच होतो. संसारवृक्ष पिंपळाच्या अथवा वडाच्या झाडाप्रमाणे फोफावतो, असे कितीतरी गमतीदार उल्लेख ज्ञानेश्वर करतात.

वृक्षांप्रमाणेच फुलांचीही हौस ज्ञानेश्वरांच्या कोवळया मनास भरपूर होती. कमळ, चाफा, जाई, जुई, मोगरा, पारिजात, शेवंती इत्यादींचे मोठे सुंदर संदर्भ ज्ञानेश्वर देतात. ज्ञानेश्वरांच्या सृष्टीत चंद्रविकासी व सूर्य-विकासी कमळे आहेत. अद्वयाब्जिनीविलासु, नीलोत्पल, रातोत्पल, कमल-कंद, कमलपराग, कमलवन, लीलाकमळ, हृदयकमळ अशा अनेक शब्दांतून कमळाचे रूपक त्यांनी साधलेले दिसेल. कमळाचा कांदा पाण्यात कितीही खोल असला तरी फूल व पानें मात्र पाण्याच्या वरच असतात, जाईचे फूल उमलले की कोमेजून जाते, वसंत ऋतूत मोगरी फुलून येते, दारी असलेल्या कैवल्याच्या वेलीचा मोगरा फुलून आलेला आहे. असे अनेक संदर्भ ज्ञानेश्व-रांची पुष्पसृष्टी खुलवितात.

**चंद्र आणि चांदणे**

सूर्य, चंद्र, त्यांची ग्रहणे इत्यादींचेही उल्लेख ज्ञानेश्वरांनी दृष्टान्तांसाठी केलेले आहेत. सूर्य स्थिर असतो, सूर्याच्या तापाने पाण्याची वाफ होते व पाऊस पडतो, सूर्यप्रकाशात नक्षत्रे लुप्त होतात, कमळे उमलतात, मृगजळे दिसतात असे अनेक दाखले ज्ञानेश्वरांनी दिलेले आहेत. चंद्राविषयी तर ज्ञानेश्वरांच्या कविमनाला विलक्षण आकर्षण आहे. चंद्रामुळे समुद्राला भरती येते, चंद्र म्हणजे अमृताचा चालता सागर, चंद्राच्या अमृताने वनस्पतीत औषधी गुण येतात, अशा शास्त्रीय माहितीबरोबर ज्ञानेश्वर चंद्राच्या विविध संकेतांचाही उल्लेख करतात. चंद्रप्रकाशात चंद्रकांत मणी पाझरतो, चंद्र-किरणांवर चकोर पक्षी जगतो, समुद्रमंथनातून चंद्र निर्माण झाला, विषदाह कमी व्हावा म्हणून शंकरांनी चंद्र मस्तकी धारण केला, असे अनेक सांकेतिक व पौरणिक दाखले ज्ञानेश्वर देतात. शुक्ल पक्षात चंद्र वाढतो आणि कृष्ण पक्षात कमी होतो, अमावस्येला चंद्रसूर्यांची बिंबे एकासमोर एक अशी येतात असा उल्लेख करून ग्रहणें, केतू, मृगजळ, राशिनाव असा ज्योतिष-शास्त्रीय संदर्भही ते देतात.

ज्ञानेश्वरांच्या जीवनसृष्टीत ही अशी विलक्षण विविधता आहे. त्यांचे मुख्य लक्ष आत्मज्ञानाकडे असले तरी लौकिक जग त्यांना पारखे नाही. कुरुक्षेत्र, महाराष्ट्र मंडळ, काशी, गोकुळ, द्वारका, प्रयाग, लंका, विराटनगरी, हस्तिनापूर इत्यादी देश वा शहरे जसे ते सांगतात त्याचप्रमाणे मंदार, मलय, मेरू, हिमालय, इत्यादी पर्वतांचे व गंगा, कालिंदी, यमुना, गोदावरी, सरस्वती इत्यादी नद्यांचेही उल्लेख ते करतात. दिवाळी, पाडवा, होळी, यांसारख्या सणांचे उल्लेख त्यांनी केले आहेत. अनेक रत्ने, अलंकार, हत्यारे, खाद्यपदार्थ, रोग व व्याधी, नाना रंग इत्यादींचा शोध ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात घेता येण्यासारखा आहे. 'ज्ञानेश्वरांचे मन म्हणजे मानवी मनांची बेरजी होय' असे प्रा. माटे म्हणत असत. श्रीज्ञानेश्वरांच्या आत्मसाक्षात्कारी मनोगाभाऱ्यातील लौकिक जीवनाचे हे मनोज्ञ दर्शन अलौकिकच नाही काय ? ज्ञानेश्वरांसारख्या श्रेष्ठ संत पुरुषाच्या परतत्त्वस्पर्शामुळे लौकिक जीवनालाही दैवी वा अलौकिकाची झळाळी प्राप्त होते आणि मानवी जीवनाचे आदर्श समर्पक दृष्टान्तांच्या मदतीने सतेज होऊन अवतरतात.

१८०१४
८०
निबंध
६०००९
२२९६
१९।३।९३
REFBK-0018414